रघुकुलभूषण रामाने पृथ्वीकन्या सीतेशी विवाह केला. त्यानंतर लक्ष्मणाने सीतेची लहान बहीण असणाऱ्या उर्मिलेशी विवाह केला. राम व लक्ष्मण यांच्यापेक्षा जे कनिष्ठ व अत्यंत पराक्रमी असे (भरत व शत्रुघ्न) भाऊ होते. त्यांनी कुशध्वजाच्या अत्यंत सुंदर कन्यांशी विवाह केला.

ते चतुर्थसहितास्त्रयो बभुः सूनवो नववधूपरिग्रहाः ।
सामदानविधिभेदनिग्रहाः सिद्धिमन्त इव तस्य भूपतेः ॥५५ ॥

ज्याप्रमाणे दशरथराजाचे साम, दान, दंड, व भेद इत्यादी विग्रह सिद्धींनी युक्त होऊन शोभून दिसावेत त्याचप्रमाणे चवथ्याने युक्त झालेले ते दशरथाचे तीन पुत्र (म्हणजेच चार पुत्र) नववधूंच्या परिग्रहामुळे शोभून दिसू लागले.

ता नराधिपसुता नृपात्मजैस्ते च ताभिरगमन्कृतार्थताम् ।
सोऽभवद्वरवधूसमागमः प्रत्ययप्रकृतियोगसंनिभः ॥५६ ॥

त्या जनकराजकन्या त्या दशरथपुत्रांच्या योगाने व ते दशरथपुत्र त्या जनकराजकन्यांच्या योगाने कृतार्थ झाले. तो वर आणि वधू यांचा समागम जणू काही प्रत्यय आणि प्रकृती यांच्या समागमाप्रमाणेच झाला (**टीप** – यद्यपि 'प्रकृती' या शब्दाचे विविध अर्थ विविध शास्त्रांमध्ये वर्णिलेले आहेत तरीसुद्धा प्रकृति-प्रत्यय या साहचर्यामुळे वैयाकरणांना अभिमत प्रकृती हा अर्थ येथे स्वीकारावयाचा आहे. आचार्य अजयपालांच्या मते प्रकृतीतील अर्थांना जे प्रकाशित करतात ते प्रत्यय. जसे कृतिः या ठिकाणी कृ ही प्रकृती व क्तिन् (ति) हा प्रत्यय आहे.)

एवमात्तरतिरात्मसंभवांस्तान्निवेश्य चतुरोऽपि तत्र सः ।
अध्वसु त्रिषु विसृष्टमैथिलः स्वां पुरीं दशरथो न्यवर्तत ॥५७ ॥

अशाप्रकारे तो दशरथराजा मिथिलानगरी मध्ये आपल्या चारही पुत्रांचा विवाह संपन्न करून प्रयाणाच्या तिसऱ्या पडावावर (तीन रात्रींनंतर) मिथिलानरेश जनकाला निरोप देऊन आनांदित होऊन आपल्या नगरीकडे निघाला.

तस्य जातु मरुतः प्रतीपगा वर्त्मसु ध्वजतरुप्रमाथिनः ।
चिक्लिशुर्भृशतया वरूथिनीमुत्तटा इव नदीरयाः स्थलीम् ॥५८ ॥

ज्याप्रमाणे दुथडी भरून वाहणाऱ्या नदीच्या प्रवाहाचा वेग जमिनीला वारंवार प्रभावित करतो त्याचप्रमाणे ध्वजरूपी वृक्षांचा विध्वंस करणाऱ्या व उलट्या दिशेने वाहणाऱ्या वाऱ्याने दशरथाच्या सैन्याला मार्गामध्ये अनेकदा त्रास दिला.

लक्ष्यते स्म तदनन्तरं रविर्बद्धभीमपरिवेषमण्डलः ।
वैनतेयशमितस्य भोगिनो भोगवेष्टित इव च्युतो मणिः ॥५९ ॥

त्यानंतर सूर्याभोवती भयानक खळे निर्माण झाले ते असे दिसत होते की जणू काही गरुडाने मारलेला साप आपल्या फण्यावरील गळून पडलेल्या मण्याभोवती वेटोळे घालून पडला असावा.

श्येनपक्षपरिधूसरालकाः सान्ध्यमेघरुधिरार्द्रवाससः ।
अङ्गना इव रजस्वला दिशो नो बभूवुरवलोकनक्षमाः ॥६०॥

(तेल न लावल्यामुळे) ससाण्याच्या पंखाप्रमाणे भुरकट केस असणाऱ्या व सायंकालीन लाल मेघाप्रमाणे रक्तभिजली वस्त्रे धारण करणाऱ्या रजस्वला स्त्रीप्रमाणे सर्व दिशा पाहण्यास योग्य राहिल्या नाहीत. (धर्मशास्त्रानुसार रजस्वला स्त्रीचे दर्शन निषिद्ध मानले आहे.)

भास्करश्च दिशमध्युवास यां तां श्रिताः प्रतिभयं ववासिरे ।
क्षत्रशोणितपितृक्रियोचितं चोदयन्त्य इव भार्गवं शिवाः ॥६१॥

आणि सूर्य ज्या दिशेला जाऊन थांबला होता, त्याच दिशेला आश्रय घेतलेल्या कोल्ह्यांच्या माद्या क्षत्रियांच्या रक्तानेच स्वतःच्या पितरांच्या तर्पण क्रिया करणे योग्य मानणाऱ्या परशुरामाला जणू काही चेतवण्यासाठीय भयंकर रुदन करु लागल्या. (पश्चिमेला कोल्हेकुई सुरू झाली.)

तत्प्रतीपपवनादिवैकृतं प्रेक्ष्य शान्तिमधिकृत्य कृत्यविद् ।
अन्वयुङ्क्त गुरुमीश्वरः क्षितेः स्वन्तमित्यलघयत्स तद्व्यथाम् ॥६२॥

ते वाऱ्याचे उलटे वाहणे इत्यादी अपशकुन पाहून शान्ती इच्छिणाऱ्या कार्यकुशल पृथ्वीनरेश दशरथाने गुरु वसिष्ठांना त्याविषयी विचारले. त्या गुरूंनी याचा शेवट गोडच होईल असे सांगून त्याची व्यथा हलकी केली.

तेजसः सपदि राशिरुत्थितः प्रादुरास किल वाहिनीमुखे ।
यः प्रमृज्य नयनानि सैनिकैर्लक्षणीयपुरुषाकृतिश्चिरात् ॥६३॥

अचानक सैन्यदलाच्या समोरच तेजाचा एक पुंज प्रकट झाला. काही वेळाने सैनिकांनी डोळे चोळून पाहिल्यानंतर ती तेजोराशी पुरुषाच्या आकृतीमध्ये परावर्तित झाली.

पित्र्यवंशमुपवीतलक्षणं मातृकं च धनुरूर्जितं दधत् ।
यः ससोम इव घर्मदीधितिः सद्विजिह्व इव चन्दनद्रुमः ॥६४॥

यज्ञोपवीताद्वारे पित्याचा अंश व धनुष्य या चिह्नाने मातेचा अंश सूचित करणारी ती आकृती जणू काही सर्पांनी युक्त असलेल्या चंदनवृक्षाप्रमाणेच (किंवा) चंद्राने युक्त असणाऱ्या सूर्याप्रमाणे दिसू लागली.

येन रोषपरुषात्मनः पितुः शासने स्थितिभिदोऽपि तस्थुषा ।
वेपमानजननीशिरश्छिदा प्रागजीयत घृणा ततो मही ॥६५॥

क्रोधामुळे अत्यंत कठोर अन्तःकरण झालेल्या व मर्यादेचे अतिक्रमण करणाऱ्या पित्याच्या आज्ञेचे पालन करणाऱ्या त्याने भीतीने थरथरत असणाऱ्या स्वमातेचाही शिरच्छेद करताना प्रथम करुणाभावनेवर व नंतर पृथ्वीवरती विजय मिळवला होता.

अक्षबीजवलयेन निर्बभौ दक्षिणश्रवणसंस्थितेन यः ।
क्षत्रियान्तकरणैकविंशतेर्व्याजपूर्वगणनामिवोद्वहन् ॥६६॥

उजव्या कानातील (एकवीस) रुद्राक्षांच्या माळेमुळे जणू काही क्षत्रियांचा वध केलेल्या एकवीस या संख्येच्या गणनेलाच माळेच्या निमित्ताने त्याने धारण केले होते.

तं पितुर्वधभवेन मन्युना राजवंशनिधनाय दीक्षितम् ।
बालसूनुरवलोक्य भार्गवं स्वां दशां च विषसाद पार्थिवः ॥६७॥

आपल्या पित्याच्या वधामुळे निर्माण झालेल्या क्रोधाद्वारे राजवंशाचा विध्वंस करण्यास प्रवृत्त झालेल्या त्या परशुरामाकडे आणि स्वतःच्या परिस्थितीकडे पाहून लेकुरवाळा तो दशरथ राजा दुःखी झाला.

नाम राम इति तुल्यमात्मजे वर्तमानमहिते च दारुणे ।
ह्यघमस्य भयदायि चाभवद्रत्नजातमिव हारसर्पयोः ॥६८॥

आपला पुत्र व भयानक असा शत्रू यांच्या बाबतीत 'राम' या नावाचे असणारे साधर्म्य त्या दशरथाला पुत्राच्या बाबतीत हारातील मण्याप्रमाणे संतोषदायक आणि शत्रूच्या वाबतीत सर्पमण्याप्रमाणे भयप्रद वाटले.

अर्घ्यमर्घ्यमिति वादिनं नृपं सोऽनवेक्ष्य भरताग्रजो यतः ।
क्षत्रकोपदहनार्चिषं ततः संदधे दृशमुदग्रतारकाम् ॥६९ ॥

त्या परशुरामाने, 'अर्घ्याचा स्वीकार करा, अर्घ्याचा स्वीकार करा' असे म्हणणाऱ्या राजा दशरथाकडे लक्ष न देता क्षत्रियविषयक क्रोध उफाळून आल्यामुळे भरताच्या ज्येष्ठ बंधू रामाकडे आपली जळजळीत दृष्टी रोखली.

तेन कार्मुकनिषक्तमुष्टिना राघवो विगतभीः पुरोगतः ।
अङ्गुलीविवरचारिणं शरं कुर्वता निजगदे युयुत्सुना ॥७० ॥

मुठीत धनुष्य धारण केलेला व लढण्याची इच्छा असणारा तो भार्गव बोटांच्या फटीमध्ये बाण धरुन आपल्या समोर निर्भयपणे समोर ठाकलेल्या राघवाला म्हणाला.

क्षत्रजातमपकारवैरि मे तन्निहत्य बहुशः शमं गतः ।
सुप्तसर्प इव दण्डघट्टनाद्रोषितोऽस्मि तव विक्रमश्रवात् ॥७१ ॥

(पितृवधरूपी) अपकार केल्याने संपूर्ण क्षत्रियजाती माझी शत्रू झालेली आहे. अनेकदा तिचा वध करून मी शांत झालो आहे. पण तुझ्या पराक्रमाच्या श्रवणाने मात्र ज्याप्रमाणे निद्रिस्त सर्प जसा काठीच्या फटक्याने चवताळतो, तसाच मीदेखील संतप्त झालो आहे.

मैथिलस्य धनुरन्यपार्थिवैस्त्वं किलानमितपूर्वमक्षणोः ।
तन्निशम्य भवता समर्थये वीर्यशृङ्गमिव भग्नमात्मनः ॥७२ ॥

अन्य राजांकडून पूर्वी कधीही वाकवले न गेलेले मिथिलानरेश जनकाचे धनुष्य तू भग्न केलेस असे ऐकून जणू काही माझे पराक्रमरूपी शिंगच तू भग्न केले आहेस असे मी मानतो.

अन्यदा जगति राम इत्ययं शब्द उच्चरित एव मामगात् ।
व्रीडमावहति मे स संप्रति व्यस्तवृत्तिरुदयोन्मुखे त्वयि ॥७३ ॥

यापूर्वी जगात उच्चारलेला 'राम' हा शब्द फक्त मलाच लागू होत असे पण आता तुझ्या झालेल्या उदयामुळे तो शब्द विपरीत अर्थाचा होऊन मला लाजवीत आहे.

बिभ्रतोऽस्त्रमचलेऽप्यकुण्ठितं द्वौ रिपू मम मतौ समागसौ ।
धेनुवत्सहरणाच्च हैहयस्त्वं च कीर्तिमपहर्तुमुद्यतः ॥७४ ॥

(क्रौञ्च) पर्वतावर देखील कुंठित न होणारे अस्त्र धारण करणाऱ्या माझे, तुल्य अपराध असणारे असे, दोनच शत्रू आजवर उत्पन्न झाले आहेत. गाईच्या वासराचे हरण केल्यामुळे कार्तवीर्य आणि माझ्या कीर्तीचे अपहरण करणास उत्सुक झालेला असा तू.

क्षत्रियान्तकरणोऽपि विक्रमस्तेन मामवति नाजिते त्वयि ।
पावकस्य महिमा स गण्यते कक्षवज्ज्वलति सागरेऽपि यः ॥७५ ॥

क्षत्रियांचा अंत करणारा माझा पराक्रम देखील जोपर्यंत तुझ्यावर विजय मिळत नाही तोपर्यंत मला सुखदायक ठरणार नाही. समुद्रामध्ये देखील सुकलेल्या गवताप्रमाणे जळत राहणे हाच अग्नीचा महिमा मानला जातो.

विद्धि चात्तबलमोजसा हरेरैश्वरं धनुरभाजि यत्त्वया ।
खातमूलमनिलो नदीरयैः पातयत्यपि मृदुस्तटद्रुमम् ॥७६ ॥

भगवान शंकराचे जे धनुष्य तुझ्याकडून भंग झाले ते तर भगवान विष्णूच्या पराक्रमाने आधीच शक्तिहीन झाले होते असे समज. नदीच्या वेगाने ज्याची मुळे खणून काढली आहेत अशा वृक्षाला मंद वाहणारा वारा देखील सहजच पाडतो.

तन्मदीयमिदमायुधं ज्यया संगमय्य सशरं विकृष्यताम् ।
तिष्ठतु प्रधनमेवमप्यहं तुल्यबाहुतरसा जितस्त्वया ॥७७ ॥

म्हणून आता माझे हे धनुष्य प्रत्यंचा चढवून बाणाने युक्त करून ओढ. युद्ध राहू देत. अशाप्रकारे इतके जरी केलेस तरी समान अशा सामर्थ्यामुळे भी तुझ्याकडून जिंकला जाईन. (मी हरलो असे मी मानेन.)

कातरोऽसि यदि वोद्वृतार्चिषा तर्जितः परशुधारया मम ।
ज्यानिघातकठिनाङ्गुलिर्वृथा बध्यतामभययाचनाञ्जलिः ॥७८ ॥

आग ओकणाऱ्या माझ्या परशूच्या धारेला घाबरून जर तू धैर्य गाळून बसशील तर मात्र धनुष्याच्या प्रत्यंचेच्या आघातामुळे बोटांवर व्यर्थ घट्टे पडलेले आहेत असे हात जोडून अभयदानासाठी याचना कर.

एवमुक्तवति भीमदर्शने भार्गवे स्मितविकम्पिताधरः ।
तद्धनुर्ग्रहणमेव राघवः प्रत्यपद्यत समर्थमुत्तरम् ॥७९ ॥

दिसायला भयानक असणाऱ्या परशुरामाने असे म्हटल्यावर स्मित हास्यामुळे ज्याचा अधरोष्ठ हलत आहे अशा रामाने त्याचे धनुष्य असे पेलले की जणू भार्गवाच्या वचनांचे तेच एक यथायोग्य उत्तर असावे.

पूर्वजन्मधनुषा समागतः सोऽतिमात्रलघुदर्शनोऽभवत् ।
केवलोऽपि सुभगो नवाम्बुदः किं पुनस्त्रिदशचापलाञ्छितः ॥८० ॥

पूर्वजन्मीच्या नारायण अवतारातील धनुष्याशी संगम झाल्यामुळे तो राम अधिकच शोभून दिसू लागला. नवीन मेघ एकाकी असला तरीही सुंदर दिसतो. तर मग इंद्रधनुष्याने अंकित झालेल्या मेघाबद्दल काय सांगावे ?

तेन भूमिनिहितैककोटि तत्कार्मुकं च बलिनाधिरोपितम् ।
निष्प्रभश्च रिपुरास भूभृतां धूमशेष इव धूमकेतनः ॥८१ ॥

सामर्थ्यशाली अशा त्या रामाने ज्याचे एक टोक जमिनीवरती टेकवले आहे अशा धनुष्यावर प्रत्यंचा चढवली आणि त्यावेळी जणू काही धूरच शिल्लक राहिलेल्या अग्नीप्रमाणे क्षत्रियांचा शत्रू असणारा परशुराम निष्प्रभ झाला.

तावुभावपि परस्परस्थितौ वर्धमानपरिहीनतेजसौ ।
पश्यति स्म जनता दिनात्यये पार्वणौ शशिदिवाकराविव ॥८२ ॥

परस्परांच्या पुढे उपस्थित झालेल्या तेज वाढत असलेला (राम) व तेज क्षीण होत असलेला (परशुराम) हे दाघे पौर्णिमेच्या दिवशीच्या सायंकाळच्या चंद्र व सूर्याप्रमाणे दिसत होते.

तं कृपामृदुरवेक्ष्य भार्गवं राघवः स्खलितवीर्यमात्मनि ।
स्वं च संहितममोघमाशुगं व्याजहार हरसूनुसंनिभः ॥८३ ॥

शिवपुत्र स्कंदाप्रमाणे अत्यंत कृपाळू असणारा तो राम आपल्यासमोर निस्तेज झालेल्या त्या परशुरामाला व धनुष्यावर चढविलेल्या अमोघ आणि अतिवेगवान बाणाला पाहून म्हणाला.

न प्रहर्तुमलमस्मि निर्दयं विप्र इत्यभिभवत्यपि त्वयि ।
शंस किं गतिमनेन पत्रिणा हन्मि लोकमुत ते मखार्जितम् ॥८४ ॥

तुझा जरी पराजय झाला असला तरी देखील तू ब्राह्मण असल्यामुळे निर्दयीपणे मी तुला मारू इच्छित नाही. आता या बाणाने तुझी गती कुंठित करू की यज्ञसामर्थ्याने मिळवलेल्या स्वर्गाचा विध्वंस करू ते सांग.

प्रत्युवाच तमृषिर्न तत्त्वतस्त्वां न वेद्मि पुरुषं पुरातनम् ।
गां गतस्य तव धाम वैष्णवं कोपितो ह्यसि मया दिदृक्षुणा ॥८५ ॥

ऋषी परशुराम रामाला म्हणाले, 'खरे पाहता पुरातन पुरुष असणाऱ्या तुझ्याबद्दल मी जाणत नाही असे नाही पण पृथ्वीवर अवतीर्ण झालेल्या तुझे वैष्णव तेज पाहण्याच्या इच्छेने मी तुला मुद्दाम क्रोधित केले.

भस्मसात्कृतवतः पितृद्विषः पात्रसाच्च वसुधां ससागराम् ।
आहितो जयविपर्ययोऽपि मे श्लाघ्य एव परमेष्ठिना त्वया ॥८६ ॥

वडिलांशी शत्रुत्व घेणाऱ्या क्षत्रियांना भस्मसात् करणाऱ्या व समुद्रासहित पृथ्वीचे दान देणाऱ्या अशा मला परमपुरुषाद्वारा झालेला पराभव देखील प्रशंसनीय वाटतो.

तद्गतिं मतिमतां वरेप्सितां पुण्यतीर्थगमनाय रक्ष मे ।
पीडयिष्यति न मां स्खिलीकृता स्वर्गपद्धतिरभोगलोलुपम् ॥८७ ॥

हे बुद्धिमंतांमध्ये श्रेष्ठ असणाऱ्या रामा, पुण्यतीर्थांना जाऊ इच्छिणाऱ्या असणाऱ्या माझ्या गतीचे तू रक्षण कर. भोगांच्या बाबतीत विगतस्पृह असणाऱ्या माझ्यासाठी स्वर्गाचे द्वार बंद झाले तरी मला त्रास होणार नाही.

प्रत्यपद्यत तथेति राघवः प्राङ्मुखश्च विससर्ज सायकम् ।
भार्गवस्य सुकृतोऽपि सोऽभवत्स्वर्गमार्गपरिघो दुरत्ययः ॥८८ ॥

श्रीरामाने 'ठीक आहे' असे म्हणून ती विनंती मान्य केली व पूर्वेकडे तोंड करून बाण सोडला. तो बाण पुण्यवान परशुरामासाठी देखील स्वर्गमार्ग ओलांडण्यास प्रतिबंधक झाला. (स्वर्गात जाण्यास अडथळा ठरला)

राघवोऽपि चरणौ तपोनिधेः क्षम्यतामिति वदन्समस्पृशत् ।
निर्जितेषु तरसा तरस्विनां शत्रुषु प्रणतिरेव कीर्तये ॥८९ ॥

'क्षमा करा' असे म्हणत रामाने देखील तपोनिधी परशुरामाच्या चरणांना स्पर्श केला. सामर्थ्याने शत्रूंवर विजय प्राप्त केला असतानाही सामर्थ्यवंतांनी केलेला नमस्कारच यश वाढविणारा ठरतो.

राजसत्वमवधूय मातृकं पित्र्यमस्मि गमितः शमं यदा ।
नन्वनिन्दितफलो मम त्वया निग्रहोऽप्ययमनुग्रहीकृतः ॥९० ॥

तेव्हा परशुराम म्हणाले, 'ज्या अर्थी मातेकडून प्राप्त झालेल्या रजोगुणाचा तिरस्कार करून पित्याकडून प्राप्त झालेल्या शांतगुणाप्रति मला तू पोहचवलेले आहेस त्या अर्थी तुझ्याकडून झालेला हा माझा पराभव देखील प्रशंसनीय फळ देणारा असल्यामुळे खरोखरच उपकाराप्रमाणे आहे.

साधयाम्यहमविघ्नमस्तु ते देवकार्यमुपपादयिष्यतः ।
ऊचिवानिति वचः सलक्ष्मणं लक्ष्मणाग्रजमृषिस्तिरोदधे ॥९१ ॥

'मी आता निघतो. देवांचे कार्य संपन्न करावयास निघालेल्या तुझ्या मार्गात संकट न येवो'. असे लक्ष्मणासह असणाऱ्या त्याच्या ज्येष्ठ-भावाला-रामाला म्हणून ते ऋषी परशुराम अदृश्य झाले.

तस्मिन्गते विजयिनं परिरभ्य रामं
स्नेहादमन्यत पिता पुनरेव जातम् ।
तस्याभवत्क्षणशुचः परितोषलाभः
कक्षाग्निलङ्घिततरोरिव वृष्टिपातः ॥९२ ॥

परशुराम निघून गेल्यानंतर विजयी रामाला दशरथाने प्रेमपूर्वक आलिङ्गन दिले जणू काही पुत्राचा पुनर्जन्मच झाल्याप्रमाणे त्याला वाटले. क्षणभरासाठी दुःखी

झालेल्या दशरथाला लाभलेली ती संतुष्टी जणू काही दावाग्नीने होरपळलेल्या वृक्षाला पावसाच्या सरींनी लाभणाऱ्या संतुष्टीप्रमाणेच होती

अथ पथि गमयित्वा क्लृप्तरम्योपकार्ये
कतिचिदवनिपालः शर्वरीः शर्वकल्पः ।
पुरमविशदयोध्यां मैथिलीदर्शनीनां
कुवलयितगवाक्षां लोचनैरङ्गनानाम् ॥९३ ॥

इति श्रीरघुवंशे महाकाव्ये कविश्रीकालिदासकृतौ सीताविवाहो नाम एकादशः सर्गः ।

त्यानंतर भगवान शंकराप्रमाणे असणाऱ्या त्या पृथ्वीपती दशरथाने मार्गामध्ये बनवलेल्या रमणीय अशा तंबूमध्ये काही रात्री घालवल्या व मिथिला देशाच्या राजपुत्रींना पाहण्याकरिता सुंदरीच्या नेत्ररूप कमलांनी भरलेल्या खिडक्या असणाऱ्या अयोध्या नगरीमध्ये प्रवेश केला.

अशा रीतीने कविश्रेष्ठ कालिदास रचित रघुवंशनामक महाकाव्यातील 'सीताविवाह' नामक अकरावा सर्ग समाप्त झाला.

Dr. Shaikh Imran
Assistant Professor Urdu
Maharashtra Education Service Class-I
Vasantrao Naik Govt. Institute of
Arts & Social Sciences, Nagpur

द्वादश : सर्गः

निर्दिष्टविषयस्नेहः स दशान्तमुपेयिवान् ।
आसीदासन्ननिर्वाणः प्रदीपार्चिरिवोषसि ॥१ ॥

शब्द इत्यादी विषयांच्या सुखाचा ज्याने आस्वाद घेतलेला आहे व जो आयुष्याच्या अंतिम अवस्थेत म्हणजेच वृद्धावस्थेत होता असा दशरथ राजा प्रभातकालीन दिव्याच्या वातीप्रमाणे मोक्षकाळाच्या जवळ जाऊन पोहचलेला होता.

तं कर्णमूलमागत्य रामे श्रीर्न्यस्यतामिति ।
कैकेयीशङ्कयेवाह पलितच्छद्मना जरा ॥२ ॥

वृद्धावस्था कैकेयीविषयीच्या शंकेनेच जणू काही पांढऱ्या केसांच्या रूपाने दशरथराजाच्या कानाशी येऊन, राज्यलक्ष्मी(आता) रामाच्या स्वाधीन करा असे सांगू लागली.

सा पौरान्पौरकान्तस्य रामस्याभ्युदयश्रुतिः ।
प्रत्येकं हृदयांचक्रे कुल्येवोद्यानपादपान् ॥३ ॥

Maharashtra Education Service Class-I
Vasantrao Naik Govt. Institute of
Arts & Social Sciences, Nagpur

ज्याप्रमाणे कालव्यातील पाणी उद्यानातील वृक्षांना आनंद प्रदान करते त्याचप्रमाणी अत्यंत लोकप्रिय असणाऱ्या रामाच्या राज्याभिषेकाच्या बातमीने प्रत्येकाला आनंदित केले.

तस्याभिषेकसंभारे कल्पितं क्रूरनिश्चया ।
दूषयामास कैकेयी शोकोष्णैः पार्थिवाश्रुभिः ॥४ ॥

परंतु क्रूरपणाचा निश्चय केलेल्या कैकेयीने त्या रामाच्या राज्याभिषेकासाठी आणलेल्या सामग्रीला शोकामुळे उष्ण झालेल्या दशरथराजाच्या अश्रूंनी दूषित केले.

सा किलाश्वासिता चण्डी भर्त्रा तत्संश्रुतौ वरौ ।
उद्ववामेन्द्रसिक्ता भूर्बिलमग्नाविवोरगौ ॥५ ॥

ज्याप्रमाणे बिळामध्ये दडून बसलेल्या दोन सर्पांना पावसाने भिजलेली जमीन बाहेर टाकते त्याप्रमाणेच क्रुद्ध झालेल्या त्या कैकेयीने पतीने खरोखरच पुष्कळ मनधरणी करून सुद्धा त्याने पूर्वी देऊ केलेले दोन वर मागून घेतलेच.

तयोश्चतुर्दशैकेन रामं प्राव्राजयत्समाः ।
द्वितीयेन सुतस्यैच्छद्वैधव्यैकफलां श्रियम् ॥६ ॥

तिने त्या दोन वरांपैकी एका वराने रामाला चौदा वर्षे वनवासात पाठवले तर दुसऱ्या वराने स्वपुत्राला अशी राज्यलक्ष्मी देऊ केली की जिचे फळ स्वतःचे वैधव्य हेच असेल!

पित्रा दत्तां रुदन्नामः प्राङ्नहीं प्रत्यपद्यत ।
पश्चाद्वनाय गच्छेति तदाज्ञां मुदितोऽग्रहीत् ॥७ ॥

पूर्वी पित्याने दिलेल्या पृथ्वीचा दुःखपूर्ण अंतःकरणाने रामाने स्वीकार केला होता पण नंतर वनवासाला जा अशा त्यांच्या आज्ञेचे मात्र अतिशय हर्षपूर्ण अंतःकरणाने त्याने ग्रहण केले.

दधतो मङ्गलक्षौमे वसानस्य च वल्कले ।
ददृशुर्विस्मितास्तस्य मुखरागं समं जनाः ॥८ ॥

मंगलप्रसंगासाठी योग्य वस्त्रे धारण करणाऱ्या व वल्कले धारण करणाऱ्या त्या रामाच्या चेहऱ्यावरील एकाच प्रकारचे भाव पाहून लोकांना अतिशय आश्चर्य वाटले.

स सीतालक्ष्मणसखः सत्याद्गुरुमलोपयन् ।
विवेश दण्डकारण्यं प्रत्येकं च सतां मनः ॥९ ॥

वडिलांना सत्यापासून दूर न करता (त्यांनी देऊ केलेले वर खोटे न पाडता) सीता व लक्ष्मण यांच्यासह त्या रामाने दण्डकारण्यात तसेच प्रत्येक सत्पुरुषाच्या मनामध्ये प्रवेश केला.

राजापि तद्वियोगार्तः स्मृत्वा शापं स्वकर्मजम् ।
शरीरत्यागमात्रेण शुद्धिलाभमन्यत ॥१० ॥

त्या रामाच्या विरहाने दुःखित झालेल्या राजा दशरथाने देखील स्वतःच्या (पूर्व) कर्मामुळे प्राप्त झालेला शाप आठवून शरीराचा त्याग हेच केवळ प्रायश्चित्त आहे असे मानले.

विप्रोषितकुमारं तद्राज्यमस्तमितेश्वरम् ।
रन्ध्रान्वेषणदक्षाणां द्विषामामिषतां ययौ ॥११ ॥

राम, लक्ष्मण इत्यादी राजकुमार दूर असल्यामुळे तसेच दशरथ राजा दिवंगत झाल्यमुळे छिद्रान्वेषी शत्रूंना ते राज्य गिळंकृत करण्याची इच्छा झाली.

अथानाथाः प्रकृतयो मातृबन्धुनिवासिनम् ।
मौलैरानाययामासुर्भरतं स्तम्भिताश्रुभिः ॥१२ ॥

तेव्हा अनाथ झालेल्या मंत्रिमंडळाने ज्यांनी आपल्या अश्रूंना आवर घातला आहे अशा विश्वासपात्र सचिवांच्या द्वारे मामाच्या घरी राहत असणाऱ्या भरतास आणवले.

श्रुत्वा तथाविधं मृत्युं कैकेयीतनयः पितुः ।
मातुर्न केवलं स्वस्याः श्रियोऽप्यासीत्पराङ्मुखः ॥१३ ॥

कैकेयीपुत्र भरताने आपल्या वडिलांचे तशा प्रकारचे निधन झालेले ऐकून केवळ स्वतःच्या आईपासूनच नव्हे तर राज्यलक्ष्मीपासून ही तोंड फिरविले.

ससैन्यश्चान्वगाद्रामं दर्शितानाश्रमालयैः ।
तस्य पश्यन्ससौमित्रेरुदश्रुर्वसतिद्रुमान् ॥१४ ॥

सोबतीला सैन्य घेऊन भरत रामाच्या शोधार्थ निघाला. ज्या वृक्षांखाली रामाने निवास केला होता ते वृक्ष आश्रमवासी जनांनी जेव्हा दाखविले तेव्हा त्या वृक्षांकडे पाहून भरताच्या डोळ्यातून अश्रू बाहू लागले.

चित्रकूटवनस्थं च कथितस्वर्गतिर्गुरोः ।
लक्ष्म्या निमन्त्रयांचक्रे तमनुच्छिष्टसंपदा ॥१५ ॥

चित्रकूटवनामध्ये राहत असलेल्या त्या रामाला वडिलांच्या निधनाची वार्ता सांगून भरत जिच्या ऐश्वर्याचा उपभोग घेतला गेलेला नाही अशा राज्यलक्ष्मीसाठी निमंत्रित करू लागला (परतण्याचा आग्रह करू लागला)

स हि प्रथमजे तस्मिन्नकृतश्रीपरिग्रहे ।
परिवेत्तारमात्मानं मेने स्वीकरणाद्ध्रुवः ॥१६ ॥

ज्येष्ठ भाऊ असणाऱ्या रामाने राज्यलक्ष्मीचा स्वीकार केला नसताना, आपण जर स्वीकार केला तर आपण 'परिवेत्ता' होऊ असे तो (भरत) मानू लागला. (परिवेत्ता – मोठ्या भावाच्या आधी लहान भावाने लग्न करणे किंवा मोठ्या बहिणीचे लग्न व्हायच्या आधी तिच्या लहान बहिणीचे लग्न करणे या गोष्टीला परिवेदन म्हणतात. विष्णुधर्मसूत्रात् परिवेत्त्याला दोषी ठरवून त्याला श्राद्धाला बोलावू नये असे सांगितले

आहे. वसिष्ठ धर्मसूत्रात् त्याला वीस दिवसांचे कृच्छ्र प्रायश्चित्त सांगितले आहे परंतु, भोठा भाऊ वेडा, पापी, रोगी, क्लीब असेल किंवा देशांतराला गेला असेल तर मात्र त्याच्या आधी लहान भावाला विवाह करण्याची अनुमती होती.)

तमशक्यमपाकृष्टुं निदेशात्स्वर्गिणः पितुः ।
ययाचे पादुके पश्चात्कर्तुं राज्याधिदेवते ॥१७ ॥

स्वर्गवासी वडिलांच्या आज्ञेपासून त्या रामाला परावृत्त करणे अशक्य झाल्यामुळे नंतर राज्याची अधिदेवता करण्यासाठी भरताने रामाच्या पादुकांची मागणी केली.

स विसृष्टस्तथेत्युक्त्वा भ्रात्रा नैवाविशत्पुरीम् ।
नन्दिग्रामगतस्तस्य राज्यं न्यासमिवाभुनक् ॥१८ ॥

रामाने 'ठीक आहे' असे म्हणून निरोप दिल्यावर तो भरत अयोध्यानगरीत मुळीच गेला नाही. परंतु नन्दिग्राम नावाच्या स्थळी जाऊन त्या रामाच्या राज्याचे ठेवीप्रमाणे त्याने पालन केले.

दृढभक्तिरिति ज्येष्ठे राज्यतृष्णापराङ्मुखः ।
मातुः पापस्य भरतः प्रायश्चित्तमिवाकरोत् ॥१९ ॥

ज्येष्ठ भावावरती अत्यंत भक्ती असणारा व राज्याच्या लोभापासून पराङ्मुख असणारा तो भरत जणू काही आईने केलेल्या पापाचे प्रायश्चित्तच करत होता.

रामोऽपि सह वैदेह्या वने वन्येन वर्तयन् ।
चचार सानुजः शान्तो वृद्धेक्ष्वाकुव्रतं युवा ॥२० ॥

धाकटा भाऊ लक्ष्मणासह असणारा, शांत वृत्तीचा राम देखील सीतेसोबत वनात वन्यवृत्तीने राहून इक्ष्वाकू वंशातील वृद्ध व्यक्तींनी आचरावयाचे वानप्रस्थ व्रत तरुणपणीच पाळत होता.

प्रभावस्तम्भितच्छायमाश्रितः स वनस्पतिम् ।
कदाचिदङ्के सीतायाः शिश्ये किञ्चिदिव श्रमात् ॥२१ ॥

आपल्या प्रभावाने ज्यांची छाया स्थिर झाली आहे अशा वृक्षांचा आश्रय घेऊन तो राम एकदा श्रमामुळे सीतेच्या मांडीवर(मस्तक ठेवून) थोडा वेळ निजला होता.

ऐन्द्रः किल नखैस्तस्या विददार स्तनौ द्विजः ।
प्रियोपभोगचिह्नेषु पौरोभाग्यमिवाचरन् ॥२२ ॥

(त्या वेळी) इन्द्राच्या पुत्राने (जयन्ताने) कावळ्याचे रूप घेऊन प्रिय रामाने उपभोगाच्या वेळी केलेल्या नखक्षतांच्या खुणांना दोषदृष्टीने पाहत सीतेच्या स्तनांना नखांनी विदीर्ण केले.

तस्मिन्नास्यदिषीकास्त्रं रामो रामावबोधितः ।
आत्मानं मुमुचे तस्मादेकनेत्रव्ययेन सः ॥२३ ॥

सीतेने जागे केल्यावर रामाने त्या कावळ्यावर इषीकास्त्र नावाचे अस्त्र सोडले आणि त्या कावळ्याने एक डोळा खर्ची घालून त्या अस्त्रापासून स्वतःची सुटका करवून घेतली.

रामस्त्वासन्नदेशत्वाद्भरतागमनं पुनः ।
आशङ्क्योत्सुकसारङ्गां चित्रकूटस्थलीं जहौ ॥२४ ॥

अयोध्या जवळच असल्यामुळे भरत पुन्हा येथे येईल अशा आशंकेने जेथील हरणे अस्वस्थ झाली होती त्या चित्रकूट पर्वताचा रामाने त्याग केला. (राम जाणार म्हणून हरणेही बेचैन झाली होती.)

प्रययावातिथेयेषु वसन्नृषिकुलेषु सः ।
दक्षिणां दिशमृक्षेषु वार्षिकेष्विव भास्करः ॥२५ ॥

वर्षाकालीन नक्षत्रांमध्ये वास करत जाणाऱ्या सूर्याप्रमाणे तो राम उत्तमप्रकारे अतिथिसत्कार करणाऱ्या ऋषींच्या आश्रमांत निवास करीत दक्षिण दिशेला गेला.

बभौ तमनुगच्छन्ती विदेहाधिपतेः सुता ।
प्रतिषिद्धापि कैकेय्या लक्ष्मीरिव गुणोन्मुखी ॥२६ ॥

कैकेयीने अडवले असतानाही रामाचे अनुसरण करणारी विदेहराजाची कन्या सीता सद्गुणांवर आसक्त होणाम्या लक्ष्मीप्रमाणे शोभून दिसत होती.

अनसूयातिसृष्टेन पुण्यगन्धेन काननम् ।
सा चकाराङ्गरागेण पुष्पोच्चलितषट्पदम् ॥२७ ॥

(अत्रिऋषींच्या पत्नीने) अनसूयेने दिलेल्या अतिशय सुगंधित अशा अंगरागाने त्या बनातील भ्रमरांना सीतेने पुष्पांपासून विलग केले. (फुलांना सोडून भ्रमर तिच्याकडेच आकृष्ट झाले.)

संध्याभ्रकपिशस्तस्य विराधो नाम राक्षसः ।
अतिष्ठन्मार्गमावृत्य रामस्येन्दोरिव ग्रहः ॥२८ ॥

ज्याप्रमाणे राहू चंद्राचा मार्ग अडवतो त्याचप्रमाणे सायंकालीन मेघांच्या वर्णाप्रमाणे पिंगट रंगाचा विराध नावाचा राक्षस त्या रामाचा मार्ग अडवून उभा राहिला.

स जहार तयोर्मध्ये मैथिलीं लोकशोषणः ।
नभोनभस्ययोर्वृष्टिमवग्रह इवान्तरे ॥२९ ॥

ज्याप्रमाणे अवर्षणकाल श्रावण व भाद्रपद महिन्यांमधील पर्जन्यवृष्टीचे हरण करतो त्याचप्रमाणे त्या विराध राक्षसाने राम व लक्ष्मण या दोहोंच्या मधून मैथिलीचे हरण केले.

तं विनिष्पिष्य काकुत्स्थौ पुरा दूषयति स्थलीम् ।
गन्धेनाशुचिना चेति वसुधायां निचख्नतुः ॥३० ॥

राम व लक्ष्मणाने त्या विराधराक्षसाचा वध केला व पुढे त्याच्या अशुद्ध अशा दुर्गंधीने ते स्थान दूषित होऊ नये म्हणून त्याला जमिनीमध्ये गाडले.

पञ्चवट्यां ततो रामः शासनात्कुम्भजन्मनः ।
अनपोढस्थितिस्तस्थौ विन्ध्याद्रिः प्रकृताविव ॥३१ ॥

त्यानंतर अगस्ती ऋषींच्या आज्ञेवरून मूलस्थितीतर राहणाऱ्या विन्ध्य पर्वताप्रमाणे अगस्तींच्या उपदेशाचे उल्लंघन न करता तो राम पंचवटीमध्ये राहिला.

रावणावरजा तत्र राघवं मदनातुरा ।
अभिपेदे निदाघार्ता व्यालीव मलयद्रुमम् ॥३२ ॥

उन्हाने त्रस्त झालेली सर्पिणी ज्याप्रमाणे चंदनवृक्षाकडे जाते, त्याप्रमाणे तेथे कामाने पीडित झालेली रावणाची धाकटी बहीण शूर्पणखा रामाजवळ येऊन पोहचली.

सा सीतासंनिधावेव तं वव्रे कथितान्वया ।
अत्यारूढो हि नारीणामकालज्ञो मनोभवः ॥३३ ॥

त्या शूर्पणखेने सीतेच्या देखतच स्वतःच्या वंशाचे वर्णन करून त्या रामाची वररूपाने निवड केली. कामवासनेचा अतिरेक झाला की स्त्रियांना काळवेळेचे भान राहत नाही.

कलत्रवानहं बाले कनीयांसं भजस्व मे ।
इति रामो वृषस्यन्तीं वृषस्कन्धः शशास ताम् ॥३४ ॥

अगं मुली ! मी सपत्नीक आहे. तू माझ्या छाकट्या भावाकडे जा असे बैलाप्रमाणे भारदस्त खांदे असणाऱ्या रामाने कामाने त्रस्त झालेल्या शूर्पणखेला सांगितले.

ज्येष्ठाभिगमनात्पूर्वं तेनाप्यनभिनन्दिताम् ।
साऽभूद्रामाश्रया भूयो नदीवोभयकूलभाक् ॥३५ ॥

आधी मोठ्या भावाकडे गेल्यामुळे (तिला वहिनीप्रमाणे मानून) त्या लक्ष्मणाने देखील तिचा अंगीकार केला नाही म्हणून, दोन्ही तीरांवर आश्रय घेणाऱ्या नदीप्रमाणे त्या शूर्पणखेने पुन्हा रामाचा आश्रय घेतला.

संरम्भं मैथिलीहासः क्षणसौम्यां निनाय ताम् ।
निवातस्तिमितां वेलां चन्द्रोदय इवोदधेः ॥३६ ॥

त्यामुळे सीता हसली. ज्याप्रमाणे वाऱ्याच्या अभावामुळे स्थिर झालेल्या समुद्राच्या लाटा चंद्राच्या उदयाने पुन्हा उसळतात, त्याचप्रमाणे सीतेच्या हसण्यामुळे क्षणमात्र शांत असलेली ती शूर्पणखा प्रक्षुब्ध झाली.

फलमस्योपहासस्य सद्यः प्राप्स्यसि पश्य माम् ।
मृग्याः परिभवो व्याघ्र्यामित्यवेहि त्वया कृतम् ॥३७ ॥

"या उपहासाचे फळ तुला आता लगेच मिळेल तू पहाच. तुझे हे कार्य म्हणजे हरिणीने वाघिणीला डिवचण्यासारखे आहे. समजलीस?"

इत्युक्त्वा मैथिलीं भर्तुरङ्के निविशतीं भयात् ।
रूपं शूर्पणखा नाम्नः सदृशं प्रत्यपद्यत ॥३८ ॥

असे बोलून त्या शूर्पणखेने भीतीमुळे स्वतःच्या पतीच्या पायांना कवटाळणाऱ्या सीतेला (पाहत) स्वतःच्या नावाप्रमाणेच रूप धारण केले.

लक्ष्मणः प्रथमं श्रुत्वा कोकिलामञ्जुवादिनीम् ।
शिवाघोरस्वनां पश्चाद्बुबुधे विकृतेति ताम् ॥३९ ॥

सुरुवातीला कोकिळेप्रमाणे मंजुळ आवाजात भाषण करणाऱ्या व नंतर कोल्हीप्रमाणे कर्कश बोलणाऱ्या तिचा आवाज ऐकून ती मायावी आहे, हे लक्ष्मणाच्या लक्षात आले.

पर्णशालामथ क्षिप्रं विकृष्टासिः प्रविश्य सः ।
वैरूप्यपौनरुक्त्येन भीषणां तामयोजयत् ॥४० ॥

आपली तलवार म्यानातून बाहेर काढत त्या लक्ष्मणाने ताबडतोब पर्णकुटीमध्ये प्रवेश केला आणि मुळातच भीषण स्वरूप असणाऱ्या त्या शूर्पणखेला आणखी विद्रूप केले.

सा वक्रनखधारिण्या वेणुकर्कशपर्वया ।
अङ्कुशाकारयाङ्गुल्या तावतर्जयदम्बरे ॥४१ ॥

ती राक्षसी वक्र नखांनी युक्त असलेल्या, बांबूच्या पेरांप्रमाणे कठीण पेरे असणाऱ्या आणि अंकुशाच्या आकाराप्रमाणे असलेल्या आपल्या बोटाने आकाशातून राम व लक्ष्मण यांना धमकावू लागली.

प्राप्य चाशु जनस्थानं खरादिभ्यस्तथाविधम् ।
रामोपक्रममाचख्यौ रक्षःपरिभवं नवम् ॥४२ ॥

आणि ताबडतोब जनस्थानामध्ये जाऊन रामाने केलेला तशा प्रकारचा राक्षसांचा अपमान खर इत्यादी राक्षसांना तिने सांगितला.

मुखावयवलूनां तां नैरृता यत्पुरो दधुः ।
रामाभियायिनां तेषां तदेवाभूदमङ्गलम् ॥४३ ॥

मुखाचे नाक कान इत्यादी अवयव कापलेल्या त्या शूर्पणखेला पुढे घालून रामावर आक्रमण करायला गेलेल्या त्या राक्षसांना अपशकुनच झाला.

उदायुधानापततस्तान्दृष्ट्वान्वेक्ष्य राघवः ।
निदधे विजयाशंसां चापे सीतां च लक्ष्मणे ॥४४ ॥

आयुधे सज्ज करून येत असणाऱ्या त्या गर्विष्ठ अशा खर इत्यादी राक्षसांना पाहून रामाने आपल्या विजयाच्या आशेला धनुष्याकडे आणि सीतेला लक्ष्मणाकडे सोपविले.

एको दाशरथिः कामं यातुधानाः सहस्रशः ।
ते तु यावन्त एवाजौ तावांश्च ददृशे स तैः ॥४५ ॥

दशरथपुत्र राम हा एकाकी होता तर राक्षस संख्येने हजारो होते. पण तरीसुद्धा त्या युद्धामध्ये जितक्या संख्येने राक्षस होते त्यांना तितक्याच रामांचे दर्शन झाले.

असज्जनेन काकुत्स्थः प्रयुक्तमथ दूषणम् ।
न चक्षमे शुभाचारः स दूषणमिवात्मनः ॥४६ ॥

ज्याप्रमाणे दुर्जनांनी स्वतःला दिलेले दूषण सज्जन सहन करीत नाहीत त्याचप्रमाणे रणांगणामध्ये सद्व्यवहारी रामाने राक्षसांनी पाठवलेल्या दूषण नामक राक्षसाला सहन केले नही. (**टीप.**- ज्योतिषशास्त्रानुसार यात्रेमध्ये समोर अङ्गविच्छेदित व्यक्तीचे दिसणे अमङ्गलकारक मानले आहे.)

तं शरैः प्रतिजग्राह खरत्रिशिरसौ च सः ।
क्रमशस्ते पुनस्तस्य चापात्सममिवोद्ययुः ॥४७ ॥

त्या दूषण खर आणि त्रिशिरस् नावाच्या दैत्यांवर रामाने बाणांनी हल्ला चढवला ते बाण एकामागून एक असे क्रमानेच सोडले तरीसुद्धा रामाच्या धनुष्यापासून जणू काही एकाच वेळी निघत आहेत, असे भासत होते.

तैस्त्रयाणां शितैर्बाणैर्यथापूर्वविशुद्धिभिः ।
आयुर्देहातिगैः पीतं रुधिरं तु पतत्रिभिः ॥४८ ॥

शरीराला भेदून जाणाऱ्या त्या तीक्ष्ण बाणांनी पूर्वीप्रमाणेच शुद्ध राहून खर, दूषण आणि त्रिशिरस् यांचे आयुष्य पिऊन टाकले. व त्यांच्या रक्ताचे पान मात्र पक्ष्यांनी केले.

तस्मिन्रामशरोत्कृत्ते बले महति रक्षसाम् ।
उत्थितं ददृशेऽन्यच्च कबन्धेभ्यो न किञ्चन ॥४९ ॥

त्या राक्षसांच्या महासैन्यामध्ये रामाच्या बाणांनी छिन्नविच्छिन्न झालेल्या मस्तकविरहित शरीरांशिवाय आणखी काहीही दिसत नव्हते.

सा बाणवर्षिणं रामं योधयित्वा सुरद्विषाम् ।
अप्रबोधाय सुष्वाप गृध्रच्छाये वरूथिनी ॥५० ॥

देवांचा द्वेष करणाऱ्या राक्षसांची ती सेना बाणांचा वर्षाव करणाऱ्या रामास युद्ध करण्यास प्रवृत्त करून गिधाडांच्या सावलीमध्ये पुन्हा कधीही जागृत न होण्यासाठी झोपी गेली.

राघवास्त्रविदीर्णानां रावणं प्रति रक्षसाम् ।
तेषां शूर्पणखैवैका दुष्प्रवृत्तिहराऽभवत् ॥५१ ॥

राघवाच्या अस्त्रांनी विदीर्ण झालेल्या त्या राक्षसांच्या मध्ये रावणाकडे ती वाईट बातमी घेऊन जाण्यासाठी एक केवळ शूर्पणखाच जिवंत शिल्लक राहिली.

निग्रहात्स्वसुराप्तानां वधाच्च धनदानुजः ।
रामेण निहितं मेने पदं दशसु मूर्धसु ॥५२ ॥

बहीण शूर्पणखेच्या अंगच्छेदामुळे व खर इत्यादी बांधवांच्या वधामुळे आपल्या दहाही मस्तकांवर रामाने पाय ठेवला आहे असे रावणास वाटू लागले.

२२०

रक्षसा मृगरूपेण वञ्चयित्वा स राघवौ ।
जहार सीतां पक्षीन्द्रप्रयासक्षणविघ्नितः ॥५३ ॥

त्या रावणाने हरिणाचे रूप धारण केलेल्या राक्षसाच्या द्वारे राम व लक्ष्मणांना फसवून पक्षिश्रेष्ठ जटायूच्या प्रयत्नामुळे क्षणभराचे विघ्न आले तरी सीतेचे अपहरण केलेच.

तौ सीतान्वेषिणौ गृध्रं लूनपक्षमपश्यताम् ।
प्राणैर्दशरथप्रीतेरनृणं कण्ठवर्तिभिः ॥५४ ॥

सीतेचा शोध घेत असणाऱ्या त्या राम व लक्ष्मणांनी पंख कापले गेलेल्या व प्राण कंठाशी आलेल्या, राजा दशरथाच्या प्रेमाचे ऋण फेडणाऱ्या त्या गृध्र जटायूला पाहिले.

स रावणहृतां ताभ्यां वचसाचष्ट मैथिलीम् ।
आत्मनः सुमहत्कर्म व्रणैरावेद्य संस्थितः ॥५५ ॥

रावणाने सीतेचे अपहरण केले आहे इतकेच जटायूने राम व लक्ष्मणाला शब्दांनी सांगितले. मात्र आपण केलेले युद्धरूपी अतिशय मोठे कार्य शरीरावरील जखमांनीच दाखवून त्याने प्राण सोडले.

तयोस्तस्मिन्नवीभूतपितृव्यापत्तिशोकयोः ।
पितरीवाग्निसंस्कारात्परा ववृतिरे क्रियाः ॥५६ ॥

ज्यांचे वडिलांच्या मरणाचे दुःख ताजे झाले आहे अशा राम व लक्ष्मणांनी स्वतःच्या वडिलांच्या प्रमाणेच त्या जटायूच्याही अग्निसंस्कारापासूनच्या पुढील सर्व क्रिया केल्या.

वधनिर्धूतशापस्य कबन्धस्योपदेशतः ।
मुमूर्च्छ सख्यं रामस्य समानव्यसने हरौ ॥५७ ॥

वधामुळे शापमुक्त झालेल्या कबंधाच्या उपदेशावरून समान संकटामध्ये असणाऱ्या सुग्रीवाशी रामाची मित्रता वाढीस लागली.

स हत्वा वालिनं वीरस्तत्पदे चिरकाङ्क्षिते ।
धातोः स्थान इवादेशं सुग्रीवं संन्यवेशयत् ॥५८ ॥

वीर रामाने वालीचा वध करून ज्याप्रमाणे धातूच्या जागी आदेशाची स्थापना करावी त्याचप्रमाणे खूप दिवसांपासून इच्छिलेल्या वालीच्या पदावर सुग्रीवाची स्थापना केली. (टीप-यद्यपि धातु व आदेश हे शब्द बह्वर्थक असले तरीसुद्धा प्रस्तुत श्लोकामध्ये व्याकरणशास्त्रातीलच धातु व आदेश यांचे ग्रहण करावयाचे आहे. आचार्य पाणिनींनी 'भूवादयो धातवः' या अष्टाध्यायीस्थ सूत्राने धातुसंज्ञा संगितली आहे. काही ठिकाणी आचार्य पाणिनींनी या धातूंच्या जागी विशिष्ट आदेश सांगितले आहेत जसे की, अस्तेर्भूः या सूत्राने अस् या धातूच्या जागी भू या आदेशाची स्थापना केली जाते.)

इतस्ततश्च वैदेहीमन्वेष्टुं भर्तृचोदिताः ।
कपयश्चेरुरार्तस्य रामस्येव मनोरथाः ॥५९ ॥

स्वामी सुग्रीवाने पाठवलेले ते सर्व वानर सीतेचा शोध घेण्यासाठी विरहाने त्रस्त झालेल्या रामाच्या मनोरथाप्रमाणे इकडे तिकडे फिरू लागले.

प्रवृत्तावुपलब्धायां तस्याः संपातिदर्शनात् ।
मारुतिः सागरं तीर्णः संसारमिव निर्ममः ॥६० ॥

ज्याप्रमाणे अनासक्त मानव संसार तरून जातो त्याप्रमाणे संपातीच्या दर्शनामुळे सीतेचा वृत्तांत प्राप्त झाल्यावर मारुती देखील समुद्र तरून गेला.

दृष्टा विचिन्वता तेन लङ्कायां राक्षसीवृता ।
जानकी विषवल्लीभिः परितेव महौषधिः ॥६१ ॥

लंकेमध्ये सीतेचा शोध घेत असताना त्या मारुतीने विषारी वेलींनी वेढलेल्या संजीवनी लतेप्रमाणेच, राक्षसींनी वेढलेल्या सीतेला पाहिले.

तस्यै भर्तुरभिज्ञानमङ्गुलीयं ददौ कपिः ।
प्रत्युद्गतमिवानुष्णैस्तदानन्दाश्रुबिन्दुभिः ॥६२ ॥

पतीची खूण म्हणून हनुमानाने सीतेला त्याची अंगठी दिली. तेव्हा सीतेने आपल्या शीतल आनंदाच्या अश्रूबिंदूनी जणू काय त्या अंगठीचा सत्कारच केला.

निर्वाप्य प्रियसंदेशैः सीतामक्षवधोद्धतः ।
स ददाह पुरीं लङ्कां क्षणसोढारिनिग्रहः ॥६३ ॥

अक्षाचा (रावणाच्या मुलाचा) वध केल्यामुळे धीट बनलेल्या त्या मारुतीने प्रियतमाच्या संदेशांनी सीतेला सुख प्रदान करून व क्षणभर शत्रूंनी बंदी केल्याचा त्रास सहन करून लंकानगरीचे दहन केले.

प्रत्यभिज्ञानरत्नं च रामायादर्शयत्कृती ।
हृदयं स्वयमायातं वैदेह्या इव मूर्तिमत् ॥६४ ॥

कृतकृत्य झालेल्या त्या कपी हनुमानाने सीतेच्या जणू काही मूर्तिमंत हृदयाप्रमाणेच असणारे व ओळख पटल्याची खूण असणारे रत्न रामाला दाखवले.

स प्राप हृदयन्यस्तमणिस्पर्शनिमीलितः ।
अपयोधरसंसर्गौ प्रियालिङ्गननिर्वृतिम् ॥६५ ॥

हृदयाशी कवटाळलेल्या त्या मण्याच्या स्पर्शाने भावुक झालेल्या रामाने स्तनस्पर्शाशिवायच प्रेयसीच्या आलिंगनाचे सर्व सुख मिळवले.

श्रुत्वा रामः प्रियोदन्तं मेने तत्सङ्गमोत्सुकः ।
महार्णवपरिक्षेपं लङ्कायाः परिखालघुम् ॥६६ ॥

प्रियसीतेची शुभवार्ता ऐकून तिच्या भेटीसाठी उत्सुक झालेल्या रामाने लंकेच्या भोवती असणारा महासागराचा वेढा देखील एवाद्या लहान खंदकाप्रमाणे मानला.

स प्रतस्थेऽरिनाशाय हरिसैन्यैरनुद्रुतः ।
न केवलं भुवः पृष्ठे व्योम्नि संबाधवर्तिभिः ॥६७ ॥

केवळ भूतलावरच नव्हे नर आकाशामध्येही संकटे निर्माण करणाऱ्या वानरसैन्यासह तो राम शत्रूच्या विनाशासाठी निघाला.

निविष्टमुदधेः कूले तं प्रपेदे बिभीषणः ।
स्नेहाद्राक्षसलक्ष्म्येव बुद्धिमाविश्य चोदितः ॥६८ ॥

राक्षसलक्ष्मीने ज्याच्या बुद्धीमध्ये प्रवेश करून प्रेरणा दिलेली आहे असा विभीषण समुद्राच्या किनाऱ्यावरती पोचलेल्या रामाला येऊन भेटला.

तस्मै निशाचरैश्वर्यं प्रतिशुश्राव राघवः ।
काले खलु समारब्धाः फलं बध्नन्ति नीतयः ॥६९ ॥

त्या विभीषणाला राक्षसांचे राज्य देण्याची रामाने प्रतिज्ञा केली. खरेच आहे, योग्यवेळी योग्यप्रकारे आखलेली नीती नक्कीच फळ देते.

स सेतुं बन्धयामास प्लवगैर्लवणाम्भसि ।
रसातलादिवोन्मग्नं शेषं स्वमाय शार्ङ्गिणः ॥७० ॥

ज्याप्रमाणे भगवान विष्णूच्या शयनाकरिता रसातळातून शेषनाग वरती यावा त्याचप्रमाणे क्षारयुक्त समुद्रामध्ये वानरांकरवी रामाने सेतूची बांधणी केली.

तेनोत्तीर्य पथा लङ्कां रोधयामास पिङ्गलैः ।
द्वितीयं हेमप्राकारं कुर्वद्भिरिव वानरैः ॥७१ ॥

त्या सेतुमार्गाने समुद्र ओलांडून जाऊन रामाने जणू काही दुसरा सुवर्णाचा दुर्गच निर्माण करणाऱ्या पिंगट वर्णाच्या वानरांद्वारा लंकेला घेरले.

रणः प्रववृते तत्र भीमः प्लवगरक्षसाम् ।
दिग्विजृम्भितकाकुत्स्थपौलस्त्यजयघोषणः ॥७२ ॥
पादपाविद्धपरिघः शिलानिष्पिष्टमुद्गरः ।
अतिशस्त्रनखन्यासः शैलरुग्णमतङ्गजः ॥७३ ॥

राम व रावण यांच्या जयजयकारांच्या घोषणांनी दिशा भेदून टाकणारे, जेथे वृक्षांनी लोखंडाने युक्त असलेल्या काठ्या भग्न केल्या आहेत. जेथे पाषाणखंडांनी मुद्गर नावाची आयुधे चूर्ण केली आहेत. जेथे अन्य शस्त्रांच्या आघातांपेक्षा (वानरांच्या) नखांचे घावच भयंकर आहेत,पाषाणखंडांनी जेथे हत्तींना जखमी केले आहे असे वानर व राक्षसांचे भयंकर युद्ध तेथे घडले.

अथ रामशिरश्छेददर्शनोद्भ्रान्तचेतनाम् ।
सीतां मायेति शंसन्ती त्रिजटा समजीवयत् ॥७४ ॥

त्यानंतर रामाचा शिरच्छेद झाल्याचे पाहून बेशुद्ध झालेल्या सीतेला त्रिजटा नावाच्या राक्षसीने ही केवळ माया आहे असे सांगून सावध केले.

कामं जीवति मे नाथ इति सा विजहौ शुचम् ।
प्राङ्मत्वा सत्यमस्यान्तं जीवितास्मीति लज्जिता ॥७५ ॥

आपला पती खरोखरीच जिवंत आहे हे पाहून सीतेने शोकाचा त्याग केला. मात्र पूर्वी पतीचे निधन खरे मानूनही आपण जिवंत कसे राहिलो या भावनेने ती लज्जित झाली.

गरुडापातविश्लिष्टमेघनादास्त्रबन्धनः ।
दाशरथ्योः क्षणक्लेशः स्वमवृत्त इवाभवत् ॥७६ ॥

मेघनादाने राम व लक्ष्मणाचे नागपाशाने केलेले बंधन गरुडाच्या आगमनामुळे गळून पडले त्यामुळे क्षणभरच क्लेशदायक ठरलेले ते बंधन दशरथपुत्रांना स्वप्नातील घटनेप्रमाणे वाटले.

ततो बिभेद पौलस्त्यः शक्त्या वक्षसि लक्ष्मणम् ।
रामस्त्वनाहतोऽप्यासीद्विदीर्णहृदयः शुचा ॥७७ ॥

त्यानंतर रावणाने शक्ती नावाचे आयुध सोडून लक्ष्मणाच्या वक्षस्थलावर आघात केला. पण रामावर आघात झाला नसतानाही केवल दुःखाने त्याचे हृदय विदीर्ण झाले.

स मारुतिसमानीतमहौषधिहतव्यथः ।
लङ्कास्त्रीणां पुनश्चक्रे विलापाचार्यकं शरैः ॥७८ ॥

मारुतीने आणलेल्या (संजीवनी नामक) महान् औषधीने कष्टांचे निवारण झाल्यावर लक्ष्मणाने पुन्हा आपल्या बाणांनी लंकेतील स्त्रियांना विलाप करण्यास भाग पाडले.

स नादं मेघनादस्य धनुश्चेन्द्रायुधप्रभम् ।
मेघस्येव शरत्कालो न किञ्चित्पर्यशेषयत् ॥७९ ॥

ज्याप्रमाणे शरद ऋतूचा काल मेघगर्जना किंवा इंद्रधनुष्य यापैकी काहीही शिल्लक ठेवीत नाही त्याचप्रमाणे त्या लक्ष्मणाने मेघनादाची गर्जना आणि इंद्राच्या आयुधाप्रमाणे तेजस्वी असणारे त्याचे धनुष्य यापैकी काहीही शिल्लक ठेवले नाही.

कुम्भकर्णः कपीन्द्रेण तुल्यावस्थः स्वसुः कृतः ।
रुरोध रामं शृङ्गीव टङ्कच्छिन्नमनःशिलः ॥८० ॥

कुंभकर्णाची अवस्था सुग्रीवाने त्याच्या (कुंभकर्णाच्या) बहिणीप्रमाणेच केली. (नाक कान कापल्याप्रमाणे त्यास रक्तबंबाळ केले.) मग छिन्नीने कापून काढलेल्या मनःशिलापाषाणाच्या कड्याप्रमाणे दिसणारा कुंभकर्ण रामाचा मार्ग अडवून उभा राहिला.

अकाले बोधितो भ्राता प्रियस्वमो वृथा भवान् ।
रामेषुभिरितीवासौ दीर्घनिद्रां प्रवेशितः ॥८१ ॥

'तुला झोप प्रिय असतानाही तुझ्या भावाने तुला अवेळी जागे केले.' असे म्हणत रामाच्या बाणांनी जणू काही त्याला चिरनिद्रेमध्येच नेऊन ठेवले.

इतराण्यपि रक्षांसि पेतुर्वानरकोटिषु ।
रजांसि समरोत्थानि तच्छोणितनदीष्विव ॥८२ ॥

ज्याप्रमाणे समरांगणातून उठलेली धूळ शत्रूच्या रक्ताच्या नदीमध्ये पडून नामशेष व्हावी त्याप्रमाणे इतर राक्षस देखील कोट्यावधी वानरांमध्ये पडून नष्ट झाले.

निर्ययावथ पौलस्त्यः पुनर्युद्धाय मन्दिरात् ।
अरावणमरामं वा जगदद्येति निश्चितः ॥८३ ॥

आज हे जग रावणरहित होईल किंवा रामरहित तरी होईल अशा निश्चयाने तो रावण पुन्हा युद्ध करण्यासाठी भवनातून बाहेर पडला.

रामं पदातिमालोक्य लङ्केशं च वरूथिनम् ।
हरियुग्यं रथं तस्मै प्रजिघाय पुरन्दरः ॥८४ ॥

राम पादचारी असलेले पाहून व रावण रथावरती स्वार असलेला पाहून इंद्राने पिंगट रंगाच्या अश्वांनी युक्त असणारा रथ रामासाठी पाठवला.

तमाधूतध्वजपटं व्योमगङ्गोर्मिवायुभिः ।
देवसूतभुजालम्बी जैत्रमध्यास्त राघवः ॥८५ ॥

आकाशगंगेतील लाटांमुळे उत्पन्न झालेल्या वाऱ्याने ज्याची ध्वजपताका फडकत आहे अशा त्या विजयशील रथामध्ये इन्द्रसारथी मातलीच्या हातांचा आधार घेऊन राम स्थानापन्न झाला.

मातलिस्तस्य माहेन्द्रमामुमोच तनुच्छदम् ।
यत्रोत्पलदलक्लैब्यमस्त्राण्यापुः सुरद्विषाम् ॥८६ ॥

देवांचा द्वेष करणाऱ्या असुरांची अस्त्रे ज्याच्यावर कमळांच्या पाकळ्यांप्रमाणे निष्प्रभ ठरतात असे इंद्राचे चिलखत मातलीने त्या रामाच्या शरीरवरती चढवले.

अन्योन्यदर्शनप्राप्तविक्रमावसरं चिरात् ।
रामरावणयोर्युद्धं चरितार्थमिवाभवत् ॥८७ ॥

परस्परांच्या दर्शनांने प्राप्त झालेल्या पराक्रमाच्या चिरप्रतीक्षित संधीमुळे राम व रावण यांचे युद्ध जणू काही पराक्रमाचे सार्थक झाल्याप्रमाणेच झाले.

भुजमूर्धोरुबाहुल्यादेकोऽपि धनदानुजः ।
ददृशे ह्यथापूर्वो मातृवंश इव स्थितः ॥८८ ॥

(इतर राक्षस मारले गेल्यामुळे रावण एकटा पडला होता. तरीही) हात, मस्तके व मांड्या यांच्या मोठ्या संख्येमुळे तो रावण एकटा असून देखील पूर्वीसारखा राक्षसवंशामध्ये असल्याप्रमाणेच दिसत होता.

जेतारं लोकपालानां स्वमुखैरर्चितेश्वरम् ।
रामस्तुलितकैलासमरातिं बह्वमन्यत ॥८९ ॥

लोकपालांवरती ज्याने विजय मिळवलेला आहे, स्वतःची शिरकमळे वाहून ज्याने ईश्वराची पूजा केली आहे, कैलासपर्वत देखील ज्याने उचललेला आहे अशा शत्रूला रावणाला रामाने कमी लेखले नाही.

तस्य स्फुरति पौलस्त्यः सीतासंगमशंसिनि ।
निचखानाधिकक्रोधः शरं सव्येतरे भुजे ॥९० ॥

त्या रामाच्या सीतासंगमसूचक स्फुरण पावणाऱ्या उजव्या हातावरती क्रोधाने बेभान झालेल्या रावणाने बाणाचा प्रहार केला.

रावणस्यापि रामास्तो भित्त्वा हृदयमाशुगः ।
विवेश भुवमास्त्यातुमुरगेभ्य इव प्रियम् ॥९१ ॥

रामाने सोडलेला बाण देखील रावणाच्या हृदयाला भेदून, ही प्रियवार्ता पातालवासी सर्पांना सांगण्यासाठी जणू जमिनीत घुसला.

वचसैव तयोर्वाक्यमस्त्रमस्त्रेण निघ्नतोः ।
अन्योन्यजयसंरम्भो ववृधे वादिनोरिव ॥९२ ॥

ज्याप्रमाणे वादी व प्रतिवादी वाक्याचा प्रतिकार वाक्यानेच करतात त्या प्रमाणे अस्त्राचा प्रतिकार अस्त्रानेच करणाऱ्या त्या राम व रावण यांचा परस्परांवर विजय प्राप्त करण्याचा आवेग वाढतच होता.

विक्रमव्यतिहारेण सामान्याऽभूद्वयोरपि ।
जयश्रीरन्तरा वेदिर्मत्तवारणयोरिव ॥९३ ॥

पराक्रम हा पर्यायक्रमाने दोन्हीकडे होत असल्यामुळे दोन उन्मत्त हत्तींच्या मध्ये असणाऱ्या भिंतीप्रमाणे विजयश्री सुद्धा सामान्य (तटस्थ) होऊन गेली होती. (टीप – राम व रावण हे तुल्यबळ प्रतिस्पर्धी असल्यामुळे पराक्रमाचे दर्शन दोन्हीही पक्षांमध्ये

घडत होते. त्यामुळे विजयश्रीला नेमकी कोणाची निवड करावी हे ठरविता येत नव्हते. हत्तीच्या झुंजीच्या वेळी मध्ये निर्मिलेल्या भिंतीप्रमाणे संप्रती विजयश्रीही तटस्थ झाल्यप्रमाणे एकदा इकडे तर एकदा तिकडे झुकत होती.)

कृतप्रतिकृतप्रीतैस्तयोर्मुक्तां सुरासुरैः ।
परस्परशरव्रातः पुष्पवृष्टिं न सेहिरे ॥९४ ॥

स्वतः अस्त्राचा प्रयोग केल्याने तसेच शत्रूपक्षाकडील अस्त्रप्रयोगाचा प्रतिकार केल्याने आनंदित झालेल्या सुरासुरांच्या समूहापैकी सुरांनी रामावर केलेली व असुरांनी रावणावर केलेली पुष्पवृष्टी परस्परांनी प्रयोग केलेल्या बाणांच्या समूहांनी सहन केली नाही. (बाणांनी पुष्पवृष्टी मधेच अडवली.)

अयःशङ्कुचितां रक्षः शतघ्नीमथ शत्रवे ।
हृतां वैवस्वतस्येव कूटशाल्मलिमक्षिपत् ॥९५ ॥

लोखंडी खिळ्यांनी युक्त असणारी, यमाच्या कूटशाल्मली नामक गदेप्रमाणेच असणारी ती शतघ्नी गदा रावणाने रामावरती फेकली.

राघवो रथमप्राप्तां तामाशां च सुरद्विषाम् ।
अर्धचन्द्रमुखैर्बाणैश्चिच्छेद कदलीमुखम् ॥९६ ॥

रथापर्यंत येऊन न पोहचलेल्या व राक्षसांच्या विजयाची आशा असणाऱ्या त्या गदेला रामाने अर्धचन्द्रमुख बाणांचा प्रयोग करून केळे कापावे तसे सहजगत्या छिन्नभिन्न केले.

अमोघं संदधे चास्मै धनुष्येकधनुर्धरः ।
ब्राह्ममस्त्रं प्रियाशोकशल्यनिष्कर्षणौषधम् ॥९७ ॥

आणि अद्वितीय धनुर्धर असणाऱ्या त्या रामाने प्रियपत्नी विषयक शोकाचे शल्य दूर करणारे जणू काही औषधच असणारे अमोघ ब्रह्मास्त्र रावणावरती सोडण्यासाठी धनुष्यावर चढवले.

तद्व्योम्नि शतधा भिन्नं ददृशे दीप्तिमन्मुखम् ।
वपुर्महोरगस्येव करालफलमण्डलम् ॥९८ ॥

आकाशामध्ये शतधा विभक्त झालेले ते तेजस्वी ब्रह्मास्त्र शेषनागाच्या अक्राळविक्राळ फणांच्या मंडलाप्रमाणेच भीषण दिसू लागले.

तेन मन्त्रप्रयुक्तेन निमेषार्धादपातयत् ।
स रावणशिरःपङ्क्तिमज्ञातव्रणवेदनाम् ॥९९ ॥

रामाने मन्त्रांचा प्रयोग करून सोडलेल्या त्या ब्रह्मास्त्राने जखमांची वेदना जाणवण्याच्या अगोदरच रावणाच्या मस्तकांची मालिका क्षणार्धातच खाली पाडली.

बालार्कप्रतिमेवाप्सु वीचिभिन्ना पतिष्यतः ।
रराज रक्षःकायस्य कण्ठच्छेदपरम्परा ॥१०० ॥

ज्याप्रमाणे पाण्यामध्ये लाटांनी भिन्न झालेले बालसूर्याचे प्रतिबिंब शोभून दिसते, त्याचप्रमाणे पडत असणाऱ्या रावणाच्या तुटलेल्या मुखांची मालिका शोभून दिसत होती.

मरुतां पश्यतां तस्य शिरांसि पतितान्यपि ।
मनो नातिविशश्वास पुनःसंधानशङ्किनाम् ॥१०१ ॥

त्या रावणाची शिरे खाली पडलेली असून सुद्धा ती शिरे पुन्हा जुळतील की काय या शंकेने ते चित्र पाहत असणाऱ्या देवांच्या मनाला ठाम विश्वास बसत नव्हता.

अथ मदगुरुपक्षैर्लोकपालद्विपानाम-
नुगतमलिवृन्दैर्गण्डभित्तीर्विहाय ।
उपनतमणिबन्धे मूर्ध्नि पौलस्त्यशत्रोः
सुरभि सुरविमुक्तं पुष्पवर्षं पपात ॥१०२ ॥

ज्याचा लवकरच राज्याभिषेक होणार होता, त्या रावणशत्रू रामाच्या मस्तकावर देवांनी सुगंधित फुलांचा वर्षाव केला. तो सुगंध असा होता की हत्तींच्या गंडस्थळांवर संचार केल्यामुळे ज्यांचे पंख भिजले आहेत, त्या भ्रमरांच्या समूहांनी ती गंडस्थले सोडून त्याच फुलांकडे धाव घेतली.

यन्ता हरेः सपदि संहृतकार्मुकज्यमापृच्छ्य राघवमनुष्ठितदेवकार्यम् ।
नामाङ्करावणशराङ्कितकेतुयष्टिमूर्ध्वं रथं हरिसहस्रयुजं निनाय ॥१०३ ॥

ज्याने आपल्या धनुष्याची दोरी आवरलेली आहे, आणि रावणवधरूपी देवकार्य ज्याने व्यवस्थितपणे पार पाडले आहे, अशा रामाचा निरोप घेऊन, इंद्राचा सारथी मातली लगेच ज्याच्या ध्वजाची काठी रावणाने सोडलेल्या बाणांनी चिह्नांकित झाली आहे असा एक हजार अश्वांनी युक्त असणारा रथ स्वर्गाला घेऊन गेला.

रघुपतिरपि जातवेदोविशुद्धां प्रगृह्य प्रियां
प्रियसुहृदि बिभीषणे संगमय्य श्रियं वैरिणः ।
रविसुतसहितेन तेनानुयातः ससौमित्रिणा
भुजविजितविमानरत्नाधिरूढः प्रतस्थे पुरीम् ॥१०४ ॥

इति श्रीरघुवंशे महाकाव्ये कविश्रीकालिदासकृतौ रावणवधो नाम द्वादशः सर्गः ।

राम देखील अग्निपरीक्षेमध्ये विशुद्ध ठरलेल्या प्रियेचा (सीतेचा) स्वीकार करून. शत्रू रावणाची राज्यलक्ष्मी प्रिय मित्र असणाऱ्या बिभीषणाकडे सोपवून रविसुत

सुग्रीव, बिभीषण व लक्ष्मणाच्या बरोबर स्वतःच्या बाहुपराक्रमाने जिंकलेल्या विमानरत्न पुष्पकामध्ये आरूढ होऊन अयोध्यनगरीला निघाला.

अशा रीतीने कविश्रेष्ठ कालिदास रचित रघुवंश नामक महाकाव्यातील रावणवध नामक बारावा अध्याय समाप्त झाल.



Dr Shaikh Imran
Assistant Professor Urdu
Maharashtra Education Service Class-I
Vasantrao Naik Govt. Institute of
Arts & Social Sciences, Nagpur

त्रयोदश : सर्गः

अथात्मनः शब्दगुणं गुणज्ञः पदं विमानेन विगाहमानः ।
रत्नाकरं वीक्ष्य मिथः स जायां रामाभिधानो हरिरित्युवाच ॥१ ॥

त्यानंतर शब्द हा गुण असलेल्या आकाशातून विमानाने संचार करीत असलेला, गुणांचा जाणकार असलेला व राम असे नाव धारण करणारा तो हरि (विष्णू) समुद्राला पाहून एकान्तामध्ये सीतेला म्हणाला.

वैदेहि पश्याऽऽमलयाद्विभक्तं मत्सेतुना फेनिलमम्बुराशिम् ।
छायापथेनेव शरत्प्रसन्नमाकाशमाविष्कृतचारुतारम् ॥२ ॥

अगं सीते, सुंदर तारकाना स्पष्टपणे दाखविणारे शरदऋतूमधील स्वच्छ आकाश ज्याप्रमाणे आकाशगंगेमुळे विभागले जावे त्याचप्रमाणे मी बनवलेल्या सेतूने मलय पर्वतापर्यंत विभागला गेलेला फेसाने युक्त असणारा समुद्र पहा.

गुरोर्यियक्षोः कपिलेन मेध्ये रसातलं संक्रमिते तुरङ्गे ।
तदर्थमुर्वीमवधारयद्भिः पूर्वैः किलायं परिवर्धितो नः ॥३ ॥

Dr. Sheikh Imran
Assistant Professor Urdu
Maharashtra Education Service Class-I
Vasantrao Naik Govt. Institute of
Arts & Social Sciences, Nag...

यज्ञ करण्याची इच्छा असणाऱ्या गुरु-सगराचा अश्वमेध यज्ञाचा घोडा कपिलमुनींनी रसातळात नेला असताना त्याला प्राप्त करण्यासाठी पृथ्वी खणणाऱ्या आमच्या पूर्वजानींच या समुद्राला इतके विशाल केले असे म्हणतात.

गर्भं दधत्यर्कमरीचयोऽस्माद्विवृद्धिमत्राश्नुवते वसूनि ।
अबिन्धनं वह्निमसौ बिभर्ति प्रह्लादनं ज्योतिरजन्यनेन ॥४ ॥

सूर्याची किरणे या समुद्रापासूनच गर्भ धारण करतात. त्यामध्येच रत्ने वृद्धिंगत होतात. पाणी हेच इंधन असणारा वडवानल हा धारण करतो आणि त्यानेच आह्लादकारक तेज असणाऱ्या चंद्राला जन्म दिला.

तां तामवस्थां प्रतिपद्यमानं स्थितं दश व्याप दिशो महिम्ना ।
विष्णोरिवास्यानवधारणीयमीदृक्तया रूपमियत्तया वा ॥५ ॥

विशालतेमुळे दाही दिशांना व्यापून राहिले व विष्णूप्रमाणेच अनेक रूपे धारण करणाऱ्या समुद्राचे 'हा अशा प्रकारचा आहे', किंवा इतका विशाल आहे असे वर्णन करणे अशक्य आहे.

नाभिप्ररूढाम्बुरुहासनेन संस्तूयमानः प्रथमेन धात्रा ।
अमुं युगान्तोचितयोगनिद्रः संहृत्य लोकान्पुरुषोऽधिशेते ॥६ ॥

युगाचा अंत झाल्यावर सर्व लोकांचा संहार करून तो पुरुष विष्णू योगनिद्रा घेण्यासाठी या सागराचाच आश्रय घेतो. व नाभिकमलावरती आरूढ झालेले प्रथम ब्रह्मदेव त्याची स्तुती करतात.

पक्षच्छिदा गोत्रभिदात्तगन्धाः शरण्यमेनं शतशो महीघ्राः ।
नृपा इवोपप्लविनः परेभ्यो धर्मोत्तरं मध्यममाश्रयन्ते ॥७ ॥

शत्रूकडून भयभीत झालेले राजे ज्याप्रमाणे कुणा शरण देणाऱ्या धर्मात्मा राजाचा आश्रय घेतात त्याचप्रमाणे इंद्राकडून पंख कापले गेल्यामुळे निष्प्रभ किंवा दुर्बल झालेले शेकडो पर्वत शरण जाण्यास योग्य असणाऱ्या या समुद्राचाच आश्रय घेतात.

रसातलादादिभवेन पुंसा भुवः प्रयुक्तोद्वहनक्रियायाः ।
अस्याच्छमम्भः प्रलयप्रवृद्धं मुहूर्तवक्त्राभरणं बभूव ॥८ ॥

जेव्हा आदिवराहाने पृथ्वीला रसातळातून वर काढण्यास सुरूवात केली त्यावेळी प्रलयामुळे उसळलेले या समुद्राचे स्वच्छ पाणी जणू काही क्षणभरासाठी पृथ्वीच्या मुखावरणासारखे (घुंगटासारखे) भासत होते.

मुखार्पणेषु प्रकृतिप्रगल्भाः स्वयं तरङ्गाधरदानदक्षः ।
अनन्यसामान्यकलत्रवृत्तिः पिबत्यसौ पाययते च सिन्धुः ॥९ ॥

पत्नीवरील अनन्यसामान्य प्रेम प्रकट करणारा, तरंगरूपी अधराचे दान देण्यात चतुर असलेला हा समुद्र चुंबनासाठी मुख अर्पण करणाऱ्या स्वभावानेच धीट असलेल्या नद्यांचे स्वतः पान करतो व त्यांच्याकडून पान करवितो देखील.

ससत्त्वमादाय नदीमुखाम्भः संमीलयन्तो विवृताननत्वात् ।
अमी शिरोभिस्तिमयः सरन्ध्रैरूर्ध्वं वितन्वन्ति जलप्रवाहान् ॥१० ॥

हे तिमिनामक मासे तोंड उघडे असल्यामुळे नदीमुखाजवळील पाण्याचे मत्स्य इ. जीवांसहित ग्रहण करतात. तोंड बंद करून छिद्रयुक्त मस्तकांनी पाण्याच्या प्रवाहांना वरती उडवतात.

मातङ्गनक्रैः सहसोत्पतद्भिर्भिन्नान्द्विधा पश्य समुद्रफेनान् ।
कपोलसंसर्पितया य एषां व्रजन्ति कर्णक्षणचामरत्वम् ॥११ ॥

अचानक वरती उसळी मारणाऱ्या अजस्र मगरींनी दोन भागांमध्ये विभागलेला तो समुद्राचा फेस पहा, त्यांच्या गालावरून वाहणारा तो फेस क्षणभरासाठी कानातील चामर आभूषणाप्रमाणे वाटतो.

वेलानिलाय प्रसृता भुजङ्गा महोर्मिविस्फूर्जथुनिर्विशेषाः ।
सूर्यांशुसंपर्कविवृद्धरागैर्व्यज्यन्त एते मणिभिः फणस्थैः ॥१२ ॥

समुद्राकाठची हवा खाण्यासाठी पसरलेले, मोठ्या तरंगांच्या उद्रेकापेक्षा वेगळे न दिसणारे हे महासर्प फणांवरील सूर्य किरणांच्या संपर्काने चमचमणाऱ्या मण्यांमुळे सहज ओळखता येतात.

तवाधरस्पर्धिषु विद्रुमेषु पर्यस्तमेतत्सहसोर्मिवेगात् ।
ऊर्ध्वाङ्कुरप्रोतमुखं कथंचित्क्लेशादपक्रामति शङ्खयूथम् ॥१३ ॥

लाटांच्या जोराने तुझ्या अधरांसारख्या लाल रंगांच्या पोवळ्यांना धडकल्यामुळे ह्या जिवंत शंखांच्या तोंडाना पोवळ्यांच्या अंकुरांमुळे टोचे पडले आहेत. आणि त्या वेदनांमुळे ते मोठ्या कष्टाने चालत आहेत.

प्रवृत्तमात्रेण पयांसि पातुमावर्तवेगाद्भ्रमता घनेन ।
आभाति भूयिष्ठमयं समुद्रः प्रमथ्यमानो गिरिणेव भूयः ॥१४ ॥

जलपान करणास प्रवृत्त झालेल्या व पाण्यातील भोवऱ्यांच्या वेगामुळे फिरत असणाऱ्या मेघांमुळे जणू काही पुन्हा एकदा मंदार पर्वताने समुद्राचे मंथनच केले जात आहे असे वाटते.

दूरादयश्चक्रनिभस्य तन्वी तमालतालीवनराजिनीला ।
आभाति वेला लवणाम्बुराशेर्धारानिबद्धेव कलङ्करेखा ॥१५ ॥

लोहचक्राप्रमाणे वाटणाऱ्या समुद्राचा दूरवरून पाहिल्यामुळे लहान दिसणारा आणि तमाल व तालवृक्षाच्या वनराईमुळे निळसर दिसणारा किनारा जणू काही त्या लोहचक्रावरील कलंकरेषेप्रमाणेच दिसत आहे.

वेलानिलः केतकरेणुभिस्ते संभावयत्याननमायताक्षि ।
मामक्षमं मण्डलकालहानेर्वेत्तीव बिम्बाधरबद्धतृष्णम् ॥१६ ॥

हे विशालाक्षि! समुद्राच्या किनाऱ्यावरील वायू केतकीच्या परागकणांनी तुझे मुखमंडल सुशोभित करीत आहे. जणू काही तो वायू हे जाणतच आहे की बिंबफलाप्रमाणे असणाऱ्या तुझ्या अधराचे पान करण्याची तहान असलेला मी ते अधर सुशोभित करण्याकरिता आवश्यक अशी कालहानी सहन करण्यास समर्थ नाही (तितका वेळ थांबू शकत नाही).

एते वयं सैकतभिन्नशुक्तिपर्यस्तमुक्तापटलं पयोधेः ।
प्राप्ता मुहूर्तेन विमानवेगात्कूलं फलावर्जितपूगमालम् ॥१७ ॥

(हे बघ) शिंपले फुटून वाळूमध्ये मोती विखुरलेले आहेत. फळाच्या भारामुळे सुपारीची झाडे झुकली आहेत अशा समुद्राच्या किनाऱ्यावर आपण विमानाच्या वेगामुळे क्षणभरातच येऊन पोहचलो आहोत.

कुरुष्व तावत्करभोरु पश्चान्मार्गे मृगप्रेक्षिणि दृष्टिपातम् ।
एषा विदूरीभवतः समुद्रात्सकानना निष्पततीव भूमिः ॥१८ ॥

हे करभोरू! हे मृगनयनी सीते! जरा मागे तर बघ! अरण्यांनी युक्त असणारी भूमी जसजशी दूर होत आहे तसतशी जणू काही समुद्रातून बाहेर येत आहे की काय असे वाटत आहे.

क्वचित्पथा संचरते सुराणां क्वचिद्घनानां पततां क्वचिच्च ।
यथाविधो मे मनसोऽभिलाषः प्रवर्तते पश्य तथा विमानम् ॥१९ ॥

हे सीते! पहा बरे! ज्याप्रमाणे माझ्या मनाची इच्छा असेल त्याचप्रमाणे हे पुष्पकविमान संचार करीत आहे. केव्हातरी ते देवांच्या मार्गाने, कधी मेघांच्या मार्गाने तर केव्हा केव्हा ते पक्ष्यांच्या मार्गाने संचार करीत आहे.

असौ महेन्द्रद्विपदानगन्धिस्निग्धमार्गगावीचिविमर्दशीतः ।
आकाशवायुर्दिनयौवनोत्थानाचामति स्वेदलवान्मुखे ते ॥२० ॥

इंद्रगजाच्या-ऐरावताच्या-मदजलाने सुगंधित झालेला व गंगातरंगांच्या सहवासाने शीतल झालेला हा आकाशातील वायू मध्याह्नामुळे तुझ्या मुखावर आलेल्या घामाच्या बिंदूंचे हरणच करीत आहे.

करेण वातायनलम्बितेन स्पृष्टस्त्वया चण्डि कुतूहलिन्या ।
आमुञ्चतीवाभरणं द्वितीयमुद्भिन्नविद्युद्वलयो घनस्ते ॥२१ ॥

हे सीते! तू कुतूहलाने खिडकीतून बाहेर काढलेल्या हाताने ज्याला स्पर्श करतेस व ज्यामध्ये विजेचे वलय निर्माण झाले आहे असा हा मेघ जणू काही तुला दुसरे आभूषणच(कंकण) प्रदान करीत असल्याप्रमाणे वाटत आहे.

अमी जनस्थानमपोढविघ्नं मत्वा समारब्धनवोटजानि ।
अध्यासते चीरभृतो यथास्वं चिरोज्झितान्याश्रममण्डलानि ॥२२ ॥

हे वल्कले धारण करणारे तपस्वी जनस्थानाला संकटरहित मानून नूतन पर्णकुट्या उभारून पूर्वी राक्षसभयामुळे दीर्घकाळ ज्याचा त्याग केला गेला होता अशा आश्रमप्रदेशांमध्ये पूर्वीप्रमाणेच स्व स्व स्थानी राहत आहेत.

सैषा स्थली यत्र विचिन्वता त्वां भ्रष्टं मया नूपुरमेकमुर्व्याम् ।
अदृश्यत त्वच्चरणारविन्दविश्लेषदुःखादिव बद्धमौनम् ॥२३ ॥

हेच ते ठिकाण जेथे तुझा शोध घेत असताना, जणू काही तुझ्या चरणकमलांच्या वियोग दुःखाने मौन धारण केलेला, जमिनीवरती गळून पडलेला एक पैंजण दिसला होता.

त्वं रक्षसा भीरु यतोऽपनीता तं मार्गमेताः कृपया लता मे ।
अदर्शयन्वक्त्रमशक्नुवत्यः शाखाभिरावर्जितपल्लवाभिः ॥२४ ॥

हे कातर स्वभावाच्या सीते! रावणाने तुझे ज्या मार्गाने अपहरण करून नेले तो मार्ग शब्दांनी सांगण्यास असमर्थ असणाऱ्या याच वेलींनी फांद्यांची पाने त्या दिशेला बळवून कृपाळूपणे मला तो मार्ग दाखवला.

मृग्यश्च दर्भाङ्कुरनिर्व्यपेक्षास्तवागतिज्ञं समबोधयन्माम् ।
व्यापारयन्त्यो दिशि दक्षिणस्यामुत्पक्षराजीनि विलोचनानि ॥२५ ॥

तसेच दर्भांकुरभक्षणाचाही मोह टाळून हरिणींनी दक्षिण दिशेकडे दृष्टिक्षेप टाकून तुझ्या गतीचे ज्ञान नसलेल्या मला उत्तम मार्गदर्शन केले.

एतद्गिरेर्माल्यवतः पुरस्तादाविर्भत्यम्बरलेखि शृङ्गम् ।
नवं पयो यत्र घनैर्मया च त्वद्विप्रयोगाश्रु समं विसृष्टम् ॥२६ ॥
गन्धश्च धाराहतपल्वलानां कादम्बमर्धोद्गतकेसरं च ।
स्निग्धाश्च केकाः शिखिनां बभूवुर्यस्मिन्नसह्यानि विना त्वया मे ॥२७ ॥
पूर्वानुभूतं स्मरता च यत्र कम्पोत्तरं भीरु तवोपगूढम् ।
गुहाविसारीण्यतिवाहितानि मया कथंचिद्घनगर्जितानि ॥२८ ॥
आसारसिक्तक्षितिबाष्पयोगान्मामक्षिणोद्यत्र विभिन्नकोशैः ।
विडम्ब्यमाना नवकन्दलैस्ते विवाहधूमारुणलोचनश्रीः ॥२९ ॥

हे समोर माल्यवान् पर्वताचे गगनाचुंबी शिखर आहे, ज्या ठिकाणी मेघांनी नूतन जलाची आणि मी तुझ्या विरहामुळे आलेल्या अश्रूंची वृष्टी एकाच वेळी केली होती, जेथे प्रचंड पावसाच्या धारांमुळे निर्माण झालेल्या लहान जलाशयांतून येणारा सुवास, अर्धस्फुट कदंबपुष्प आणि मोरांच्या मधुर केका तुझ्या विरहामुळे मला असह्य वाटत होत्या. या गडगडाटाने कंपित होऊन तू मला पूर्वी दिलेले आलिंगन आठवून मी येथील गुहेत प्रतिध्वनित होणारा ढगांचा गडगडाट मोठ्या कष्टाने सहन केला होता. जलधारांनी चिंब भिजलेल्या जमिनीतील बाष्पाच्या

संपर्कामुळे उमललेल्या कर्दळीच्या नव्या ताज्या कळ्यांनी विवाहसमयीच्या धुराने लाल झालेल्या तुझ्या नेत्रांच्या सौंदर्याचे अनुकरण करीत मला त्रस्त केले होते.

उपान्तवानीरवनोपगूढान्यालक्षपारिप्लवसारसानि ।
दूरावतीर्णा पिबतीव खेदादमूनि पम्पासलिलानि दृष्टिः ॥३० ॥

इतका उंचीवरून नजर टाकताना काठावरील वेताच्या वनांचे आच्छादन आणि मधून मधून उडणारे सारस पक्षी यांच्यामुळे पंपासरोवराचे पाणी नीटसे दिसत नसल्यामुळे मी मोठ्या कष्टानेच पाहू शकतो आहे.

अत्राविषुक्तानि रथाङ्गनाम्नामन्योन्यदत्तोत्पलकेसराणि ।
द्वन्द्वानि दूरान्तरवर्तिना ते मया प्रिये सस्पृहमीक्षितानि ॥३१ ॥

प्रिय सीते! या पंपासरोवरावर एकमेकांपासून विभक्त न झालेली व परस्परांना कमलपुष्पाचे केसर देत असणारी ती चक्रवाक पक्ष्यांची जोडपी तुझ्यापासून दूर रहणाऱ्या मी अतिशय अभिलाषायुक्त नजरेने पाहिली होती.

इमां तटाशोकलतां च तन्वीं स्तनाभिरामस्तबकाभिनम्राम् ।
त्वत्प्राप्तिबुद्ध्या परिरब्धुकामः सौमित्रिणा साश्रुरहं निषिद्धः ॥३२ ॥

स्तनांप्रमाणे रमणीय असणाऱ्या पुष्पगुच्छांमुळे खाली झुकलेल्या, नाजुक अशा अशोकवृक्षाच्या या फांदीला जणू काही तूच सापडलीस या समजुतीने पाणावलेल्या डोळ्यांनी आलिंगन देण्याची इच्छा असणाऱ्या मला लक्ष्मणाने सावरले होते.

अमूर्विमानान्तरलम्बिनीनां श्रुत्वा स्वनं काञ्चनकिङ्किणीनाम् ।
प्रत्युद्व्रजन्तीव खमुत्पतन्त्यो गोदावरीसारसपङ्क्तयस्त्वाम् ॥३३ ॥

विमानाच्या मोकळ्या जागेमधून खाली लटकणाऱ्या सुवर्णघंटांचा आवाज ऐकून आकाशात उडणारे गोदावरी नदीवरील सारस पक्ष्यांचे हे थवे जणू काही तुझ्याच दिशेने येत आहेत.

एषा त्वया पेशलमध्ययापि घटाम्बुसंवर्धितबालचूता ।
आनन्दयत्युन्मुखकृष्णसारा दृष्टा चिरात्पञ्चवटी मनो मे ॥३४ ॥

दीर्घकाळांतर दृष्टीस पडलेली ही पंचवटी माझ्या मनाला आनंदित करीत आहे. तुझा कटिप्रदेश नाजुक असतानाही घागरींनी पाणी घालून येथील आम्रतरू तू वाढविले होतेस. येथील काळवीट माना वर करून (आपल्याला) बघत आहेत.

अत्रानुगोदं मृगयानिवृत्तस्तरङ्गवातेन विनीतखेदः ।
रहस्त्वदुत्सङ्गनिषण्णमूर्धा स्मरामि वानीरगृहेषु सुप्तः ॥३५ ॥

मला आठवत आहे की,येथे गोदावरी नदीच्या किनारी शिकारकार्य आटोपल्यानंतर (नदीच्या) तरंगांवरून वाहणाऱ्या वाऱ्यामुळे श्रमपरिहार झालेला मी वेताच्या कुंजात एकांतात तुझ्या मांडीवर डोके ठेवून निजत असे.

भ्रूभेदमात्रेण पदान्मघोनः प्रभ्रंशयां यो नहुषं चकार ।
तस्याविलाम्भःपरिशुद्धिहेतोर्भौमो मुनेः स्थानपरिग्रहोऽयम् ॥३६ ॥

केवळ आपली भुवई वक्र करून ज्यांनी नहुष राजाला इंद्रपदापासून दूर केले होने व ज्यांच्या उदयाने शरद ऋतूमध्ये अस्वच्छ पाणी स्वच्छ होते. अशा अगस्ती मुनींचा हा दिव्य आश्रम आहे.

त्रेताग्निधूमाग्रमनिन्द्यकीर्तेस्तस्येदमाक्रान्तविमानमार्गम् ।
घ्रात्वा हविर्गन्धि रजोविमुक्तः समश्नुते मे लघिमानमात्मा ॥३७ ॥

पवित्रतेसाठी प्रसिद्ध असणाऱ्या त्याच अगस्त्यऋषींनी (आहवनीय, गार्हपत्य व दक्षिणाग्नी या) तिन्ही अग्नींस अर्पण केलेल्या हवनसामग्रीच्या गंधात मिसळलेला धूर विमानमार्गापर्यंत येत आहे. त्याचा सुगंध ग्रहण करून माझ्या अंतःकरणातील रजोगुण निघून मन हलके झाले आहे.

एतन्मुनेर्मानिनि शातकर्णेः पञ्चाप्सरो नाम विहारवारि ।
आभाति पर्यन्तवनं विदूरान्मेघान्तरालक्ष्यमिवेन्दुबिम्बम् ॥३८ ॥

हे मानिनी सीते ! वनांनी वेढलेले पञ्चाप्सर नावाचे शातकर्णी मुनींचे हे जलक्रीडेचे सरोवर दुरून मेघांच्या मधून दिसणाऱ्या चंद्रबिंबाप्रमाणेच भासत आहे.

पुरा स दर्भाङ्कुरमात्रवृत्तिश्चरन्मृगैः सार्धमृषिर्मघोना ।
समाधिभीतेन किलोपनीतः पञ्चाप्सरोयौवनकूटबन्धम् ॥३९ ॥

पूर्वी केवळ दर्भांकुरांवर उदरनिर्वाह करणाऱ्या, मृगांसोबत राहणाऱ्या त्या मुनींना समाधीच्या (तपाच्या) प्रभावाच्या भीतीने देवराज इंद्राने पाच अप्सरांच्या यौवनरूपी जाळ्यामध्ये फसवले होते.

तस्यायमन्तर्हितसौधभाजः प्रसक्तसंगीतमृदङ्गघोषः ।
वियद्गतः पुष्पकचन्द्रशालाः क्षणं प्रतिश्रुन्मुखराः करोति ॥४० ॥

जलांतर्गत प्रासादामध्ये राहणाऱ्या शातकर्णी मुनींचा हा निरंतर चालू असणारा संगीत मृदंगांचा घोष आकाशाला जाऊन भिडतो आणि क्षणभरासाठी पुष्पक विमानाच्या चंद्रशालांनाही प्रतिध्वनींनी निनादून टाकतो. (टीप - चन्द्रशाला - आचार्य अमरसिंह व आचार्यहलायुध या कोशकारांनी चन्द्रशालेचा शिरोगृहम् असा अर्थ सांगितला आहे. आचार्य माल्लिनाथानीही शिरोगृहम् म्हणजे विमानाच्या अगदी वरची खोली असाच अर्थ स्वीकारलेला आहे.)

हविर्भुजामेधवतां चतुर्णां मध्ये ललाटंतपसप्तसप्तिः ।
असौ तपस्यत्यपरस्तपस्वी नाम्ना सुतीक्ष्णश्चरितेन दान्तः ॥४१ ॥

इंधनाने युक्त असणाऱ्या चार अग्नींच्या मध्ये मस्तक तापवणाऱ्या सूर्याप्रमाणे असणारा, नावाने सुतीक्ष्ण असणारा पण आचरणाने अतिशय उदात्त असणारा हा दुसरा तपस्वी तपश्चर्या करीत आहे.

४४३

अमुं सहासप्रहितेक्षणानि व्याजार्धसंदर्शितमेखलानि ।
नालं विकर्तुं जनितेन्द्रशङ्कं सुराङ्गनाविभ्रमचेष्टितानि ॥४२ ॥

आपल्या तपसामर्थ्याने इंद्राच्या मनात भय निर्माण केलेल्या या मुनींना हास्ययुक्त नजरांचे कटाक्ष व काहीतरी निमित्ताने मेखलांचे केलेले प्रदर्शन अशा अप्सरांच्या शृंगारचेष्टा तपश्चर्येपासून ढळवू शकल्या नाहीत.

एषोऽक्षमालावलयं मृगाणां कण्डूयितारं कुशसूचिलावम् ।
सभाजने मे भुजमूर्ध्वबाहुः सव्येतरं प्राध्वमितः प्रयुङ्क्ते ॥४३ ॥

एक हात वर केलेले हे सुतीक्ष्ण मुनी माझा सत्कार करण्यासाठी हरिणांना खाजविणाऱ्या व सुईप्रमाणे टोकदार दर्भ सहजपणे कापणाऱ्या रुद्राक्षमाळेचे वलय असणाऱ्या आपल्या उजव्या हाताचा प्रयोग मोठ्या आनंदाने करीत आहेत.

वाचंयमत्वात्प्रणतिं ममैष कम्पेन किञ्चित्प्रतिगृह्य मूर्ध्नः ।
दृष्टिं विमानव्यवधानमुक्तां पुनः सहस्रार्चिषि संनिधत्ते ॥४४ ॥

मौनव्रत धारण केल्यामुळे या सुतीक्ष्ण ऋषींनी किंचित् मान हलवून माझ्या नमस्काराचा स्वीकार केला. व विमानरूपी अडथळ्यातून मुक्त झालेल्या आपल्या दृष्टीला आता पुन्हा सूर्याच्या दिशेने वळवीत आहेत.

अदः शरण्यं शरभङ्गनाम्नस्तपोवनं पावनमाहिताग्नेः ।
चिराय संतर्प्य समिद्भिरग्निं यो मन्त्रपूतां तनुमप्यहौषीत् ॥४५ ॥

ज्यांनी दीर्घकाळपर्यंत समिधांद्वारा अग्नीला संतुष्ट केले व मंत्रानी पावन झालेला देह देखील अग्नीमध्ये समर्पित केला अशा शरभंग नावाच्या आहिताग्नी ऋषींचे शरण जाण्यास योग्य व पवित्र असे हे तपोवन आहे.

छायाविनीताध्वपरिश्रमेषु भूयिष्ठसंभाव्यफलेष्वमीषु ।
तस्यातिथीनामधुना सपर्या स्थिता सुपुत्रेष्विव पादपेषु ॥४६ ॥

सध्या अतिथीसत्काराचे त्या शरभंग ऋषींचे दायित्व आपल्या सावलीने प्रवासाचे श्रम नाहीसे करणाऱ्या व पुष्कळ प्रमाणात मधुर फळे प्रदान करणाऱ्या व त्यांच्या सुपुत्रांप्रमाणेच असणाऱ्या वृक्षांनी स्वीकारले आहे.

धारास्वनोद्गारिदरीमुखोऽसौ शृङ्गाङ्गलग्नाम्बुजवप्रपङ्क्तिः ।
बध्नाति मे बन्धुरगात्रि चक्षुर्दंष्ट्रः ककुभ्मानिव चित्रकूटः ॥४७ ॥

हे सुंदरी ! एखाद्या डुरकणाऱ्या सांडाप्रमाणे दिसणाऱ्या चित्रकूट पर्वतावर माझी नजर खिळून राहिली आहे. त्याची गुहा म्हणजे त्याचे मुख आहे. त्यातून निघणाऱ्या जलप्रवाहाचा आवाज म्हणजे त्याचे डुरकणे. शिखरे म्हणजे जणू काही शिंगेच आणि त्या शिखरांवर विसावलेले मेघ म्हणजे जणू काही त्या शिंगाना लागलेला चिखल आहे.

एषा प्रसन्नस्तिमितप्रवाहा सरिद्विदूरान्तरभावतन्वी ।
मन्दाकिनी भाति नगोपकण्ठे मुक्तावली कण्ठगतेव भूमेः ॥४८ ॥

ही प्रसन्न व शांतपणे वाहत असणारी, अतिशय दुरून पाहिल्यामुळे बारीक वाटणारी मंदाकिनी नदी (चित्रकूट) पर्वताच्या जवळ भूमीच्या कंठातील मोत्यांच्या माळेप्रमाणेच शोभून दिसत आहे.

अयं सुजातोऽद्रिगिरं तमालः प्रवालमादाय सुगन्धि यस्य ।
यवाङ्कुरापाण्डुकपोलशोभी मयावतंसः परिकल्पितस्ते ॥४९ ॥

पर्वताच्या समीपच असणारा उत्कृष्ट असा हा तमालवृक्ष पहा! याच्या यवांकुराप्रमाणे उज्ज्वल असणाऱ्या सुगंधित व कोवळ्या पानांचे तुझ्या गालांना शोभून दिसणारे कर्णभूषण मी बनविले होते.

अनिग्रहत्रासविनीतसत्त्वमपुष्पलिङ्गात्फलबन्धिवृक्षम् ।
वनं तपःसाधनमेतदत्रेराविष्कृतोदग्रतरप्रभावम् ॥५० ॥

दंडाचे भय नसूनही जेथील पशू अत्यंत नम्र आहेत, फुलांच्या बहराआधीच जेथील वृक्ष फळे धारण करतात असे अत्री ऋषींच्या अतिशय दिव्य सामर्थ्याचे प्रकटन करणारे व तपश्चर्येसाठी साधनभूत असणारे हे वन आहे.

अत्राभिषेकाय तपोधनानां सप्तर्षिहस्तोद्धृतहेमपद्माम् ।
प्रवर्तयामास किलानसूया त्रिस्रोतसं त्र्यम्बकमौलिमालाम् ॥५१ ॥

तीन लोकांमधून वाहणाऱ्या गंगेला अनसूयेने तपोधन ऋषींच्या स्नानासाठी येथे आणले. सप्तर्षिगण आपल्या हातांनी येथील सुवर्णकमळे तोडतात. शंकराच्या मस्तकावर माळेप्रमाणे ही गंगा शोभून दिसते.

वीरासनैर्ध्यानजुषामृषीणाममी समध्यासितवेदिमध्याः ।
निवातनिष्कम्पतया विभान्ति योगाधिरूढा इव शाखिनोऽपि ॥५२ ॥

वीरासन घालून ध्यानमग्न असणाऱ्या ऋषींचे हे वेदींच्या मध्यभागी असलेले वृक्ष देखील वाऱ्याच्या अभावी स्थिर असल्यामुळे जणू काही ध्यान करीत असल्याप्रमाणेच शोभून दिसत आहेत.

त्वया पुरस्तादुपयाचितो यः सोऽयं वटः श्याम इति प्रतीतः ।
राशिर्मणीनामिव गारुडानां सपद्मरागः फलितो विभाति ॥५३ ॥

ज्याची तू पूर्वी प्रार्थना केली होतीस तोच हा काळा वटवृक्ष. लालसर फळांनी युक्त झाल्यामुळे पद्मराग मण्यांनी युक्त असलेल्या मरकत मण्यांच्या राशीप्रमाणे शोभून दिसत आहे.

क्वचित्प्रभालेपिभिरिन्द्रनीलैर्मुक्तामयी यष्टिरिवानुविद्धा ।
अन्यत्र माला सितपङ्कजानामिन्दीवरैरुत्खचितान्तरेव ॥५४ ॥
क्वचित्खगानां प्रियमानसानां कादम्बसंसर्गवतीव पङ्क्तिः ।
अन्यत्र कालागुरुदत्तपत्रा भक्तिर्भुवश्चन्दनकल्पितेव ॥५५ ॥
क्वचित्प्रभा चान्द्रमसी तमोभिश्छायाविलीनैः शबलीकृतेव ।
अन्यत्र शुभ्रा शरदभ्रलेखा रन्ध्रेष्विवालक्ष्यनभःप्रदेशा ॥५६ ॥
क्वचिच्च कृष्णोरगभूषणेव भस्माङ्गरागा तनुरीश्वरस्य ।
पश्यानवद्याङ्गि विभाति गङ्गा भिन्नप्रवाहा यमुनातरङ्गैः ॥५७ ॥

57. हे शुभांगी सीते ! पहा बरे ! गंगेच्या प्रवाहात यमुनेच्या लाटा मिसळल्यामुळे ही गंगा नदी कुठेतरी शोभायमान इंद्रनील मण्यांनी गुंफलेल्या अशा मुक्तावलीप्रमाणे शोभून दिसत आहे कुठेतरी मध्ये मध्ये नीलकमलांची गुंफण केलेल्या श्वेतपंकजांच्या मालेप्रमाणे शोभते आहे कुठेतरी मानसरोवर प्रिय असणाऱ्या राजहंसाची नीलहंसांनी युक्त असावी त्याप्रमाणे शोभून दिसत आहे. कुठेतरी मध्ये मध्ये अगुरूने चित्रित केलेल्या चंदनाच्या नक्षीप्रमाणे शोभून दिसत आहे. तर कुठे मध्ये मध्ये सावली अंधाराचे ठिपके असलेल्या चंद्रप्रभेप्रमाणे दिसत आहे. तर कुठे फटींमधून नभाचा प्रदेश किंचित किंचित दिसणाऱ्या शरदऋतूतील शुभ्र मेघपंक्ती प्रमाणे दिसत आहे. आणि कुठेतरी कृष्णसर्पाने विभूषित असलेल्या भगवान शंकराच्या भस्मांकित शरीराप्रमाणे शोभून दिसत आहे.

समुद्रपत्न्योर्जलसंनिपाते पूतात्मनामत्र किलाभिषेकात् ।
तत्त्वावबोधेन विनापि भूयस्तनुत्यजां नास्ति शरीरबन्धः ॥५८ ॥

समुद्रपत्नी असणाऱ्या गंगा व यमुना नद्यांच्या या संगम स्थळी स्नान केल्याने ज्यांचा आत्मा पवित्र झाला आहे, अशा लोकांना तत्त्वज्ञान उमगले नाही तरीही शरीराच्या त्यागानंतर पुन्हा शरीर धारण करण्याचे बंधन मुळीच राहत नाही. (पुनर्जन्म होत नाही, मोक्ष लाभतो.)

२४९

पुरं निषादाधिपतेरिदं तद्यस्मिन्मया मौलिमणिं विहाय ।
जटासु बद्धास्वरुदत्सुमन्त्रः कैकेयि कामाः फलितास्तवेति ॥५९ ॥

हे निषादाधिपती गुह राजाचे नगरआहे जेथे राजमुकुटाचा त्याग करून जटा धारण करीत असता "हे कैकेयी तुझे मनोरथ सफल झाले" असा म्हणत सुमंत्राने विलाप केला होता.

पयोधरैः पुण्यजनाङ्गनानां निर्विष्टहेमाम्बुजरेणु यस्याः ।
ब्राह्मं सरः कारणमाप्तवाचो बुद्धेरिवाव्यक्तमुदाहरन्ति ॥६० ॥

ज्याप्रमाणे प्रकृती हे बुद्धितत्त्वाचे मूळ कारण आहे असे आप्तजन (ऋषीमुनी) सांगतात त्याचप्रमाणे यक्षस्त्रियांच्या स्तनांनी जेथील सुवर्णकमळांच्या परागकणांचा उपभोग घेतला आहे, असे मानसरोवर या सरयूनदीचे उगमस्थान आहे, असे आप्त सांगतात

जलानि या तीरनिखातयूपा वहत्ययोध्यामनु राजधानीम् ।
तुरङ्गमेधावभृथावतीर्णैरिक्ष्वाकुभिः पुण्यतरीकृतानि ॥६१ ॥

यज्ञीय पशू बांधण्यासाठी जिच्या तीरावर यूप उभारले आहेत, अशी ही सरयू नदी. अश्वमेध यज्ञाच्या शेवटी इक्ष्वाकुवंशीय राजांनी अवभृथ स्नान केल्यामुळे अधिक पवित्र झालेला तिचा जलप्रवाह राजधानी अयोध्येजवळून वाहत आहे.

यां सैकतोत्सङ्गसुखोचितानां प्राज्यैः पयोभिः परिवर्धितानाम् ।
सामान्यधात्रीमिव मानसं मे संभावयत्युत्तरकोसलानाम् ॥६२ ॥

उत्तरकोसलचे राजे हिच्या (शरयूनदीच्या) वाळवंटरूपी मांडीवर सुखाने विसावले, हिच्ये जलरूपी विपुल स्तन्य पिऊन पुष्ट झाले. माझे मन हिला उत्तरकोसलांची (दाई) सामान्यधात्रीच मानते. (टीप - समान्यधात्री - जन्मदात्या आईच्या अनुपस्थितीमध्ये किंवा बाळाच्या प्रसवानंतर ती दगावली असता किंवा

बाळाचे पोषण करण्यास किंवा स्तनपान देण्यास ती असमर्थ असता, जन्मदात्या आईप्रमाणेच जी स्त्री स्तनपान देऊन बाळाचे लालन पालन करते, तिला धात्री किंवा दाई असे म्हणतात. छ. शिवाजी महाराजांच्या पत्नीचे सईबाईसाहेबांचे निधन झाले असता शंभूबाळाचे पालनपोषण धाराऊ या धात्रीने केले होते हे सर्वश्रुतच आहे.)

सेयं मदीया जननीव तेन मान्येन राज्ञा सरयूर्वियुक्ता ।
दूरे वसन्तं शिशिरानिलैर्मां तरङ्गहस्तैरुपगूहतीव ॥६३ ॥

पूजनीय अशा राजा दशरथापासून वियोग पावलेली व माझ्या कौसल्या मातेप्रमाणेच वंदनीय असणारी ही शरयू नदी दूखर असणाऱ्या मला शीतल वायूने आपल्या तरंगरूपी हातांनी जणू काही आलिंगनच देत आहे.

विरक्तसन्ध्याकपिशं परस्ताद्यतो रजः पार्थिवमुज्जिहीते ।
शङ्के हनूमत्कथितप्रवृत्तिः प्रत्युद्गतो मां भरतः ससैन्यः ॥६४ ॥

लालगुलाबी संध्यासमयाप्रमाणे ताम्रवर्ण असलेली जमिनीवरची धूळ आपल्या समोर उडत असताना दिसत आहे. नक्कीच हनुमंताकडून माझ्या आगमनांची वार्ता ऐकून भरत सैन्यासहित माझ्या दिशेने येत आहे असे वाटते.

अद्धा श्रियं पालितसंगराय प्रत्यर्पयिष्यत्यनघां स साधुः ।
हत्वा निवृत्ताय मृधे खरादीन्संरक्षितां त्वामिव लक्ष्मणो मे ॥६५ ॥

युद्धामध्ये मी खर इत्यादी राक्षसांचा संहार करून परतल्यानंतर ज्याप्रमाणे लक्ष्मणाने तुला माझ्याकडे सोपविले त्याचप्रमाणे तो सज्जन भरत वडिलांचे वचन पूर्ण केलेल्या मला दोषरहित अशी राज्यलक्ष्मी समर्पित करेल यात शंका नाही.

असौ पुरस्कृत्य गुरुं पदातिः पश्चादवस्थापितवाहिनीकः ।
वृद्धैरमात्यैः सह चीरवासा मामर्घ्यपाणिर्भरतोऽप्युपैति ॥६६ ॥

हा पायी चालणारा, वल्कले धारण केलेला भरत (वसिष्ठ इत्यादी) गुरुजनांना पुढे करून सैन्यदलास मागे ठेवून वृद्ध अमात्यजनांसोबत हातामध्ये अर्घ्य पूजनसामग्री घेऊन माझ्याच दिशेने येत आहे.

पित्रा विसृष्टां मदपेक्षया यः श्रियं युवाप्यङ्कगतामभोक्ता ।
इयन्ति वर्षाणि तया सहोग्रमभ्यस्यतीव व्रतमासिधारम् ॥६७ ॥

त्या भरताने वडिलांनी देऊ केलेल्या व अगदी हाती आलेल्या राज्यलक्ष्मीचा तरुण असतानाही केवल माझ्या वरील भक्तीमुळे उपभोग घेतला नाही. त्या राज्यलक्ष्मीसोबत इतकी वर्षे राहत असताना त्याने जणू काही उग्र अशा असिधारा व्रताचेच पालन केले.

एतावदुक्तवति दाशरथौ तदीयामिच्छां विमानमधिदेवतया विदित्वा ।
ज्योतिष्पथादवततार सविस्मयाभि-रुद्वीक्षितं प्रकृतिभिर्भरतानुगाभिः ॥६८ ॥

दशरथपुत्र राम अशा प्रकारचे कथन करीत असतानाच त्या पुष्पक विमानाने आपली अधिदेवता असणाऱ्या रामाची इच्छा जाणून घेतली व भरताचे अनुसरण करणारे प्रजाजन आश्चर्ययुक्त होऊन वर पाहत असतानाच ते पुष्पक विमान आकशातून खाली जमिनीवरती अवतीर्ण झाले.

तस्मात्पुरःसरबिभीषणदर्शनेन सेवाविचक्षणहरीश्वरदत्तहस्तः ।
यानादवातरददूरमहीतलेन मार्गेण भङ्गिरचितस्फटिकेन रामः ॥६९ ॥

सेवाकार्यमध्ये कुशल असणाऱ्या कपीश्वर सुग्रीवाने ज्याला हात दिलेला आहे, असा तो श्रीराम, पुढे चालत असणाऱ्या बिभीषणाने दाखवून दिलेल्या, स्फटिकाने निर्मित असणाऱ्या व जमिनीपासून जवळच असणाऱ्या अशा स्फटिकाच्या सोपानमार्गाने त्या पुष्पकविमानातून खाली उतरला.

इक्ष्वाकुवंशगुरवे प्रयतः प्रणम्य स भ्रातरं भरतमर्घ्यपरिग्रहान्ते ।
पर्यश्रुरस्वजत मूर्धनि चोपजघ्रौ तद्भक्त्यपोढपितृराज्यमहाभिषेके ॥७० ॥

जितेंद्रिय रामाने इक्ष्वाकू कुळाच्या गुरूंना वसिष्ठांना नमस्कार केला व अर्घ्याचा स्वीकार केल्यानंतर आनंदाश्रूंनी सद्गदित होऊन बंधु भरताला आलिंगन दिले व ज्या मस्तकाने केवल रामभक्तीमुळेच वडिलांनी दिलेल्या राज्याचा अभिषेक नाकारला त्या भरताच्या मस्तकाचा गंध घेतला.

श्मश्रुप्रवृद्धिजनितानननविक्रियांश्च प्लक्षान्प्ररोहजटिलानिव मन्त्रिवृद्धान् ।
अन्वग्रहीत्प्रणमतः शुभदृष्टिपातैर्वार्तानुयोगमधुराक्षरया च वाचा ॥७१ ॥

दाढीमिशांची प्रचंड वाढ झाल्यामुळे ज्यांचे चेहरे विद्रूप झालेले आहेत व जणू काही पारंब्या लटकत असणाऱ्या वटवृक्षाप्रमामेच जे दिसत आहेत अशा ज्येष्ठ मंत्र्यांना कृपादृष्टीने व मधुर वाणीने क्षेम कुशल विचारून रामाने अनुगृहीत केले.

दुर्जातबन्धुरयमृक्षहरीश्वरो मे पौलस्त्य एष समरेषु पुरःप्रहर्ता ।
इत्याहतेन कथितौ रघुनन्दनेन व्युत्क्रम्य लक्ष्मणमुभौ भरतो ववन्दे ॥७२ ॥

हा माझा संकटकाळातील बांधव असणारा वानराधीश सुग्रीव आहे. व हा रणांगणामध्ये पुढे होऊन शत्रूवर प्रहार करणारा बिभीषण आहे असे रामाने अतिशय आदराने सांगितल्यावर भरताने लक्ष्मणाच्या अगोदर त्या दोघांना वंदन केले.

सौमित्रिणा तदनु संससृजे स चैन-
मुत्थाप्य नम्रशिरसं भृशमालिलिङ्ग ।
रूढेन्द्रजित्प्रहरणव्रणकर्कशेन
क्लिश्यन्निवास्य भुजमध्यमुरःस्थलेन ॥७३ ॥

नंतर भरताने सुमित्रापुत्र लक्ष्मणाची भेट घेतली आणि नतमस्तक झालेल्या लक्ष्मणाला वरती उठवून इंद्रजिताच्या प्रहारांनी झालेल्या जखमांमुळे कठोर झालेल्या लक्ष्मणाच्या छातीला आपल्या छातीने आवळित गाढ आलिङ्गन दिले.

२५२

रामाज्ञया हरिचमूपतयस्तदानीं
कृत्वा मनुष्यवपुराररुहुर्गजेन्द्रान् ।
तेषु क्षरत्सु बहुधा मदवारिधाराः
शैलाधिरोहणसुखान्युपलेभिरेमे ॥७४ ॥

तेव्हा रामाच्या आज्ञेने मानवदेह धारण केलेल्या वानरसेनेच्या अधिपतींनी श्रेष्ठ अशा हत्तींवर आरोहण केले. त्या हत्तींच्या गंडस्थळांमधून मदजलाच्या धारा प्रवाहित होत असल्याने त्या वानरसेनेच्या अधिपतींनी जणू काही पर्वतावरच चढण्याचे सुख अनुभविले.

सानुप्लवः प्रभुरपि क्षणदाचराणां
भेजे रथान्दशरथप्रभवानुशिष्टः ।
मायाविकल्परचितैरपि ये तदीयै-
र्न स्यन्दनैस्तुलितकृत्रिमभक्तिशोभाः ॥७५ ॥

दशरथपुत्र रामाच्या आज्ञेवरून राक्षसांचा स्वामी असणारा बिभीषण आपल्या अनुचरांसह रथांमध्ये बसला, ते (मानवनिर्मित) रथ इतके सुंदर होते की (राक्षसांचे) रथ त्यांच्यापुढे तुच्छ ठरावेत.

भूयस्ततो रघुपतिर्विलसत्पताक-
मध्यास्त कामगति सावरजो विमानम् ।
दोषातनं बुधबृहस्पतियोगदृश्य-
स्तारापतिस्तरलविद्युदिवाभ्रवृन्दम् ॥७६ ॥

रात्रीच्या वेळी बुध व गुरुशी संयोग पावलेला चंद्र जसा विजेने युक्त मेघांवर आरूढ व्हावा, तद्वत् आपल्या कनिष्ठ भावांसह पताकांनी झळकणाऱ्या व (मेघाप्रमाणेच) इच्छेनुसार संचार करणाऱ्या (पुष्पक) विमानावर पुन्हा आरूढ झाला.

(येथे रामास चंद्राची, भावांस बुध-गुरु या ग्रहांची, विमानास मेघाची व त्यावरील झळकणाऱ्या पताकांनी विजेची उपमा दिलेली आहे.)

तत्रेश्वरेण जगतां प्रलयादिवोर्वीं
वर्षात्ययेन रुचमभ्रघनादिवेन्दोः ।
रामेण मैथिलसुतां दशकण्ठकृच्छ्रा-
त्प्रत्युद्धृतां धृतिमतीं भरतो ववन्दे ॥७७ ॥

ज्याप्रकारे भगवंताने प्रलयापासून पृथ्वीचा उद्धार केला, पावसाळ्यानंतर शरदृतु ज्या प्रकारे चंद्राला मेघांपासून वाचवतो, तसेच रावणरूपी संकटापासून श्रीरामाने मैथिलीला वाचविले. त्यामुळे आनंदित झालेल्या तिला भरताने प्रणाम केला.

लङ्केश्वरप्रणतिभङ्गदृढव्रतं त-
द्वन्द्वं युगं चरणयोर्जनकात्मजायाः ।
ज्येष्ठानुवृत्तिजटिलं च शिरोऽस्य साधो-
रन्योन्यपावनमभूदुभयं समेत्य ॥७८ ॥

लंकेश्वर रावणाच्या प्रणयनिवेदनांचा धिक्कार केल्यामुळे जिचे पातिव्रत्य अखंड राहिले आहे अशा त्या जनकपुत्री सीतेचे वंदनीय चरणयुगल व ज्येष्ठबंधू रामाच्या आज्ञेचे अनुसरण केल्यामुळे जटाधारी झालेले त्या सज्जन भरताचे मस्तक हे उभयता एकत्र येऊन परस्परांना पवित्र करू लागले.

क्रोशार्धं प्रकृतिपुरःसरेण गत्वा
काकुत्स्थः स्तिमितजवेन पुष्पकेण ।
शत्रुघ्नप्रतिविहितोपकार्यमार्यः
साकेतोपवनमुदारमध्युवास ॥७९ ॥

इति रघुवंशे महाकाव्ये कविश्रीकालिदासकृतौ दण्डकाप्रत्यागमनो नाम त्रयोदशः सर्गः ।

प्रजानन ज्याच्या पुढे पुढे आहेत व ज्याचा वेग मंदावलेला आहे अशा त्या पुष्पकविमानातून अर्धा कोस दूर गेल्यानंतर पूजनीय व ककुत्स्यवंशोत्पन्न रामाने जेथे शत्रुघ्नाने तंबू इत्यादी भवने बनवलेली आहेत अशा अयोध्येतील विस्तीर्ण उपवनामध्ये निवास केला.

अशा रीतीने कविश्रेष्ठ कालिदास रचित रघुवंश नामक महाकाव्याचा 'प्रत्यागमननाम' नामक तेरावा सर्ग संपला.

Dr Shaikh Imran
Assistant Professor Urdu
Service Class-I
Institute of
Arts & ... Nagpur

चतुर्दशः सर्गः

भर्तुः प्रणाशादथ शोचनीयं दशान्तरं तत्र समं प्रपन्ने ।
अपश्यतां दाशरथी जनन्यौ छेदादिवोपप्लतरोर्व्रततौ ॥१ ॥

उपवनातील आश्रयवृक्ष तोडल्यामुळे त्यावर आश्रित वेलींची अवस्था जशी शोचनीय होते, त्याचप्रमाणे पतीच्या निधनामुळे शोचनीय स्थितीला प्राप्त झालेल्या आपल्या कौसल्या व सुमित्रा या मातांना राम व लक्ष्मणाने तेथे एकाच वेळी पाहिले.

उभावुभाभ्यां प्रणतौ हतारी यथाक्रमं विक्रमशोभिनौ तौ ।
विस्पष्टमस्रान्धतया न दृष्टौ ज्ञातौ सुतस्पर्शसुखोपलम्भात् ॥२ ॥

योग्य क्रमाने प्रणाम करीत असणाऱ्या, शत्रूंचा विनाश करणाऱ्या व पराक्रमाने शोभून दिसणाऱ्या त्या रामलक्ष्मणांना अश्रूंनी डोळे भरून आल्यामुळे त्यांच्या माता स्पष्टपणे पाहू शकल्या नाहीत पण पुत्रांना (केवळ) स्पर्श करून स्पर्शजनित सुखाच्या पूर्व अनुभवावरून त्यांनी पुत्रांना ओळखले.

आनन्दजः शोकजमश्रुबाष्पस्तयोरशीतं शिशिरो बिभेद ।
गङ्गासरय्वोर्जलमुष्णतप्तं हिमाद्रिनिस्यन्द इवावतीर्णः ॥३ ॥

Dr Sheikh Imran
Assistant Professor Urdu
Maharashtra Education Service Class-I
Vasantrao Naik Govt. Institute of
Arts & Social Sciences, Nagpur

ज्याप्रमाणे उष्णतेने तप्त असणाऱ्या गंगा व सरयू नद्यांच्या जलप्रवाहाला हिमालयातील झरा भेदून टाकतो (शीतल करतो) त्याचप्रमाणे त्या दोन मातांच्या शोकजन्य उष्ण अश्रूंना आनंदजन्य थंड अश्रूंनी भेदून टाकले (पुत्र मीलनाच्या आनंदाने पतिविरहाचा पूर्वशोक नष्ट झाला).

ते पुत्रयोर्नैर्ऋतशस्त्रमार्गानार्द्रानिवाङ्गे सदयं स्पृशन्तौ ।
अभीप्सितं क्षत्रकुलाङ्गनानां न वीरसूशब्दमकामयेताम् ॥४ ॥

आपल्या पुत्रांच्या शरीरावरील राक्षसांच्या शस्त्राघातांनी झालेले व्रण पाहून ते जणू काही ताजेच आहेत या भावनेने त्या दोघी माता मायेने त्या व्रणांना स्पर्श करू लागल्या. त्यावेळी क्षत्रियकुळातील स्त्रियांना अत्यंत अभीष्ट असणारे 'वीरमाता' हे विशेषणदेखील त्यांना नकोसे वाटले.

क्लेशावहा भर्तुरलक्षणाहं सीतेति नाम स्वमुदीरयन्ती ।
स्वर्गप्रतिष्ठस्य गुरोर्महिष्यावभक्तिभेदेन वधूर्ववन्दे ॥५ ॥

पतीच्या दुःखांना कारणीभूत असणारी व म्हणूनच कुलक्षणी असणारी मी सीता, असे स्वनाम उच्चारण करून स्वर्गवासी झालेल्या श्वशुर दशरथाच्या राण्यांना स्नुषा असणाऱ्या सीतेने सारख्याच भक्तिभावाने नमस्कार केला.

उत्तिष्ठ वत्से ननु सानुजोऽसौ वृत्तेन भर्ता शुचिना तवैव ।
कृच्छ्रं महत्तीर्ण इव प्रियार्हां तामूचतुस्ते प्रियमप्यमिथ्या ॥६ ॥

बाळे ऊठ! हा लहान भावासह असणारा तुझा पती खरोखर तुझ्याच पवित्र आचरणाच्या सामर्थ्याने या मोठया संकटातून तरून गेला, असे प्रिय पण सत्य प्रकारचे भाषण स्नेहपात्र असणाऱ्या सीतेजवळ त्या दोन मातांनी केले.

अथाभिषेकं रघुवंशकेतोः प्रारब्धमानन्दजलैर्जनन्योः ।
निर्वर्तयामासुरमात्यवृद्धास्तीर्थाहृतैः काञ्चनकुम्भतोयैः ॥७ ॥

त्यानंतर त्या दोन जननींनी रघुवंशाची पताका असणाऱ्या त्या रामाचा आनंदाश्रूंनी सुरू केलेला अभिषेक तीर्थक्षेत्रांमधून सुवर्णकलशांनी आणलेल्या जलाद्वारे ज्येष्ठ अमात्यांनी पूर्ण केला.

सरित्समुद्रान्सरसीश्च गत्वा रक्षःकपीन्द्रैरुपपादितानि ।
तस्यापतन्मूर्ध्नि जलानि जिष्णोर्विन्ध्यस्य मेघप्रभवा इवापः ॥८ ॥

राक्षसराज व वानरराज यांनी गंगा इत्यादी नद्या, समुद्र व सरोवरांमधून आणलेल्या जलाने विजयशील रामाच्या मस्तकावर त्याचप्रमाणे अभिषेक केला, ज्याप्रमाणे मेघांचे पाणी विंध्याचल पर्वतशिखरावर पडावे.

तपस्विवेषक्रिययापि तावद्यः प्रेक्षणीयः सुतरां बभूव ।
राजेन्द्रनेपथ्यविधानशोभा तस्योदितासीत्पुनरुक्तदोषा ॥९ ॥

प्रारंभी तपस्व्याचा वेष परिधान केल्यानंतरही जो रमणीय दिसत होता तो आता राजवस्त्रे परिधान केल्याने उत्पन्न झालेल्या शोभेमुळे अधिकच रमणीय दिसू लागला. हा जणू काही पुनरुक्ती दोषच झाला!

स मौलरक्षोहरिभिः ससैन्यस्तूर्यस्वनानन्दितपौरवर्गः ।
विवेश सौधोद्गतलाजवर्षामुत्तोरणामन्वयराजधानीम् ॥१० ॥

जेथील प्रासादांमधून लाह्यांची वृष्टी होत आहे व स्वागतासांठी जेथे तोरणे उभारलेली आहेत अशा आपल्या रघुवंशाच्या पारंपरिक राजधानी अयोध्येमध्ये तूर्य इत्यादीं वाद्यांच्या निनादाने नगरवासीयांना आनंद प्रदान करीत वृद्ध मंत्री, राक्षस वानरं व सैन्यासहित श्रीरामाने प्रवेश केला.

सौमित्रिणा सावरजेन मन्दमाधूतबालव्यजनो रथस्थः ।
धृतातपत्रो भरतेन साक्षादुपायसंघात इव प्रवृद्धः ॥११ ॥

कनिष्ठ भ्राता शत्रुघ्नासह लक्ष्मण ज्याच्यावर हळूवारपणे चवऱ्या ढाळीत आहे, भरताने ज्याच्यावर छत्र धरले आहे असा रथारूढ झालेला तो राम जणू काही साम, दाम, दंड आणि भेद या चार उपायांच्या संघाप्रमाणेच दिसत होता.

प्रासादकालागुरुधूमराजिस्तस्याः पुरो वायुवशेन भिन्ना ।
वनान्निवृत्तेन रघूत्तमेन मुक्ता स्वयं वेणिरिवाबभासे ॥१२ ॥

त्या नगरीच्या प्रासादांमधून निघालेले व वाऱ्याच्या वेगाने पसरलेले कालागुरूच्या धुराचे ते लोट असे दिसत होते की जणू काही वनातून परत आलेल्या श्रीरामाने त्या नगरीचा मोकळा केलेला केशपाशच वाऱ्याने उडत आहे.

श्वश्रूजनानुष्ठितचारुवेषां कर्णीरथस्थां रघुवीरपत्नीम् ।
प्रासादवातायनदृश्यबन्धैः साकेतनार्योऽञ्जलिभिः प्रणेमुः ॥१३ ॥

सासूबाईंनी नटवलेल्या व पालखीमध्ये आसनस्थ झालेल्या श्रीरामपत्नी सीतेला, अयोध्येतील स्त्रियांनी प्रासादांच्या खिडक्यांमधून हात जोडून वंदन केले.

स्फुरत्प्रभामण्डनमानसूयं सा बिभ्रती शाश्वतमङ्गरागम् ।
रराज शुद्धेति पुनः स्वपुर्यै संदर्शिता वह्निगतेव भर्त्रा ॥१४ ॥

अनसूयेने प्रदान केलेला, दैदीप्यमान तेजोवलयाने युक्त असणारा व चिरकालपर्यंत टिकणारा असा अंगराग धारण केल्यामुळे सीता अशी शोभून दिसत होती की जणू काही श्रीराम अयोध्यावासीयांना अग्निपरीक्षेद्वारे सिद्ध झालेली सीतेची शुद्धता पुन्हा दाखवित आहेत.

वेश्मानि रामः परिबर्हवन्ति विश्राण्य सौहार्दनिधिः सुहृद्भ्यः ।
बाष्पायमानो बलिमन्निकेतमालेख्यशेषस्य पितुर्विवेश ॥१५ ॥

०३३

सौजन्याचा सागर असणाऱ्या त्या श्रीरामाने आपल्या सुग्रीवादि मित्रमंडळींना सर्व साधनांनी संपन्न असणारी घरे प्रदान केली व नंतर केवळ चित्रामध्येच शिल्लक राहिलेल्या आपल्या पित्याच्या, पूजासाधनांनी युक्त असणाऱ्या घरामध्ये अश्रुपूर्ण नेत्रांनी प्रवेश केला.

कृताञ्जलिस्तत्र यदम्ब सत्यान्नाभ्रश्यत स्वर्गफलाद्गुरुर्नः ।
तच्चिन्त्यमानं सुकृतं तवेति जहार लज्जां भरतस्य मातुः ॥१६ ॥

अगं आई, स्वर्गगती हेच फळ असणाऱ्या सत्यापासून माझा पिता भ्रष्ट झाला नाही, हे विचार करायला गेले तर तुझेच पुण्यकृत्य आहे, असे म्हणून त्या ठिकाणी हात जोडून श्रीरामाने भरतमाता कैकेयीची लज्जा दूर केली.

तथैव सुग्रीवबिभीषणादीनुपाचरत्कृत्रिमसंविधाभिः ।
संकल्पमात्रोदितसिद्धयस्ते क्रान्ता यथा चेतसि विस्मयेन ॥१७ ॥

श्रीरामाने प्राकृतिक भोग्यवस्तूंच्या द्वारे सुग्रीव विभीषण इत्यादिकांचा असा काही आदरसत्कार केला की मनात येताक्षणीच इच्छापूर्ती होत असल्याने ते मनामध्ये आश्चर्यनि थक्कच झाले.

सभाजनायोपगतान्स दिव्यान्मुनीन्पुरस्कृत्य हतस्य शत्रोः ।
शुश्राव तेभ्यः प्रभवादि वृत्तं स्वविक्रमे गौरवमादधानम् ॥१८ ॥

श्रीरामाने अभिनंदन करण्यासाठी आलेल्या श्रेष्ठ मुनींचा आदर सत्कार केला व त्या मुनींकडून स्वतःच्या पराक्रमाचा गौरव वाढवणारा असा मृतशत्रू रावणाचा जन्मापासूनचा वृत्तांत श्रवण केला.

प्रतिप्रयातेषु तपोधनेषु सुखादविज्ञातगतार्धमासान् ।
सीतास्वहस्तोपहृताग्र्यपूजान्रक्षःकपीन्द्रान्विससर्ज रामः ॥१९ ॥

तप हेच धन मानणारे ऋषी निघून गेल्यानंतर अतिशय सुखात अर्धा महिना कसा निघून गेला हे ज्यांना समजलेही नाही व सीतेने स्वतःच्या हातांनी उपहार इत्यादी देऊन ज्यांचे पूजन केले आहे, अशा राक्षसराज विभीषण व वानरराज सुग्रीव यांना श्रीरामाने निरोप दिला.

तच्चात्मचिन्तासुलभं विमानं हृतं सुरारेः सह जीवितेन ।
कैलासनाथोद्वहनाय भूयः पुष्पं दिवः पुष्पकमन्वमंस्त ॥२० ॥

मनामध्ये इच्छा आणतांक्षणीच सुलभतेने प्राप्त होऊ शकणाऱ्या, देवशत्रू असणाऱ्या रावणाच्या प्राणांसोबतच हरण केले गेलेल्या, आकाशातील पुष्पांप्रमाणेच अलंकारस्वरूप असणाऱ्या त्या पुष्पक विमानाला श्रीरामाने परत, कैलासनाथ कुबेराचे वाहन होण्याचा आदेश दिला.

पितुर्नियोगाद्वनवासमेवं निस्तीर्य रामः प्रतिपन्नराज्यः ।
धर्मार्थकामेषु समां प्रपेदे यथा तथैवावरजेषु वृत्तिम् ॥२१ ॥

अशाप्रकारे, पित्याच्या आज्ञेवरून वनवास पूर्ण करून श्रीरामाने राज्याचा स्वीकार केला. ज्याप्रमाणे श्रीराम धर्म, अर्थ व काम या पुरुषार्थांविषयी समान वृत्तीने व्यवहार करीत होता, त्याचप्रमाणे कनिष्ठ भावांशीही तो समान वृत्तीनेच व्यवहार करीत होता.

सर्वासु मातृष्वपि वत्सलत्वात्स निर्विशेषप्रतिपत्तिरासीत् ।
षडाननापीतपयोधरासु नेता चमूनामिव कृत्तिकासु ॥२२ ॥

ज्याप्रमाणे देवांचे सेनापती कार्तिकेय आपल्या सहा मुखांनी ज्यांच्या स्तनातून दुग्धपान केले आहे अशा कृत्तिकांचा समान सन्मान करीत असत, त्याचप्रमाणे श्रीरामसुद्धा अंतःकरणातील वात्सल्यामुळे सर्व मातांचा एकसारखाच सन्मान करीत असत.

तेनार्थवाँल्लोभपराङ्मुखेन तेन घ्नता विघ्नभयं क्रियावान् ।
तेनास लोकः पितृमान्विनेत्रा तेनैव शोकापनुदेव पुत्री ॥२३ ॥

तो श्रीराम लोभाच्या विषयामध्ये निःस्पृह असल्यामुळे लोक धनवंत होते. श्रीरामाद्वारे (धर्मक्रियातील) विघ्नभय दूर केल्यामुळे ते धर्मविषयक कर्तव्य करणारे होते. तोच नियामक असल्यामुळे लोक त्याला पित्याप्रमाणे मानत होते, व तोच शोक निवारण करणारा असल्यामुळे लोक स्वतःला पुत्रवान् असल्याप्रमाणे (देखील) मानत होते.

स पौरकार्याणि समीक्ष्य काले रेमे विदेहाधिपतेर्दुहित्रा ।
उपस्थितश्चारु वपुस्तदीयं कृत्वोपभोगोत्सुकयेव लक्ष्म्या ॥२४ ॥

श्रीराम योग्य वेळी नगरवासियांची कार्ये पार पाडून, जणू काही आपल्याशी रममाण होण्यास उत्सुक असणाऱ्या राज्यलक्ष्मीनेच जिचा सुंदर देह धारण केला आहे अशा विदेहनगरीची राजपुत्री असणाऱ्या सीतेच्या सहवासात रममाण झाला.

तयोर्यथाप्रार्थितमिन्द्रियार्थानासेदुषोः सद्मसु चित्रवत्सु ।
प्राप्तानि दुःखान्यपि दण्डकेषु संचिन्त्यमानानि सुखान्यभूवन् ॥२५ ॥

वनवासाची वृत्तांतचित्रे रेखाटलेल्या सदनामध्ये इंद्रिय सुखांचे यथेष्ट सेवन करणाऱ्या त्या सीता व राम यांना दंडकारण्यात प्राप्त झालेल्या दुःखांच्या स्मृतीही सुखकारकच होऊ लागल्या.

अथाधिकस्निग्धविलोचनेन मुखेन सीता शरपाण्डुरेण ।
आनन्दयित्री परिणेतुरासीदनक्षरव्यञ्जितदोहदेन ॥२६ ॥

नंतर अतिशय स्निग्ध दृष्टी व शरनामक गवताप्रमाणे श्वेतवर्णीय झालेल्या मुखाने शब्दांच्या सहकार्याशिवाय आपण गर्भवती असल्याचे दर्शवून सीता पती श्रीरामासही आनंददायिनी ठरली. (ती गर्भवती असल्याने तिने न सांगताही, तिच्या फिकटलेल्या चेहऱ्यामुळे श्रीरामास कळले व तो आनंदित झाला.)

तामङ्कमारोप्य कृशाङ्गयष्टिं वर्णान्तराक्रान्तपयोधराग्राम् ।
विलज्जमानां रहसि प्रतीतः पप्रच्छ रामां रमणोऽभिलाषम् ॥२७ ॥

शरीरयष्टी कृश झालेल्या, स्तनाग्रांचा वर्ण परिवर्तित झालेल्या, अतिशय लज्जेने युक्त झालेल्या सीतेला एकांतामध्ये मांडीवर बसवून श्रीराम तिचे मनोरथ (डोहाळे) विचारू लागला.

सा दष्टनीवारबलीनि हिंस्रैः संबद्धवैस्वानसकन्यकानि ।
इयेष भूयः कुशवन्ति गन्तुं भागीरथीतीरतपोवनानि ॥२८ ॥

जेथे मुनीद्वारे समर्पित केल्या जाणाऱ्या अन्नाचे (गोग्रासाचे) भक्षण हिंस्र पशूच करतात, जेथील तापसकन्यकांशी स्नेहाचे संबंध जुळले आहेत, व जी दर्भांनी परिपूर्ण आहेत अशा गंगानदीच्या तीरावरील त्या तपोवनांमध्ये पुन्हा जाण्याची इच्छा सीतेने व्यक्त केली.

तस्यै प्रतिश्रुत्य रघुप्रवीरस्तदीप्सितं पार्श्वचरानुयातः ।
आलोकयिष्यन्मुदितामयोध्यां प्रासादमभ्रंलिहमारुरोह ॥२९ ॥

सीतेला तिचे मनोरथ पूर्ण करण्याचे वचन देऊन संतुष्ट असणाऱ्या त्या अयोध्या नगरीला पाहण्याच्या इच्छेने तो श्रीराम आपल्या निकटवर्तीय सैनिकांसोबत गगनचुंबी प्रासादाच्या पायऱ्या चढून वर गेला.

ऋद्धापणं राजपथं स पश्यन्विगाह्यमानां सरयूं च नौभिः ।
विलासिभिश्चाध्युषितानि पौरैः पुरोपकण्ठोपवनानि रेमे ॥३० ॥

समृद्धीने परिपूर्ण दुकानांनी सुशोभित झालेले रस्ते, नगरवासीयांकडून नौकांच्या द्वारे सरयूनदीमध्ये केला जाणारा संचार व विलासी नगरवासीयांनी विलासिनींसोवत आश्रय घेतलेली नगरांलगतची उपवने पाहून तो श्रीराम संतुष्ट झाला.

स किंवदन्तीं वदतां पुरोगः स्ववृत्तमुद्दिश्य विशुद्धवृत्तः ।
सर्पाधिराजोरुभुजोऽपसर्पं पप्रच्छ भद्रं विजितारिभद्रः ॥३१ ॥

वाग्मी (बोलण्यात चतुर) जनांमध्ये श्रेष्ठ असणाऱ्या, आचरणाने अत्यंत शुद्ध असणाऱ्या, सर्पाधिराज शेषनागाप्रमाणे भुजा व मांड्या असणाऱ्या व शत्रूवर विजय प्राप्त केलेल्या श्रीरामभद्राने भद्रनामक गुप्तहेराला प्रजेमध्ये आपल्याविषयी बोलल्या जाणाऱ्या वार्तेबद्दल विचारले.

निर्बन्धपृष्टः स जगाद सर्वं स्तुवन्ति पौराश्चरितं त्वदीयम् ।
अन्यत्र रक्षोभवनोषितायाः परिग्रहान्मानवदेव देव्याः ॥३२ ॥

आग्रहपूर्वक अनेक वेळा विचारल्यांतर तो भद्रनामक हेर म्हणाला की, हे मानवेश्वरा, राक्षसाच्या घरी राहिलेल्या सीतेचा (आपण केलेला) स्वीकार सोडल्यास आपल्या अन्य चरित्राची सर्व नगरवासीय प्रशंसा करीत आहेत.

कलत्रनिन्दागुरुणा किलैवमभ्याहतं कीर्तिविपर्ययेण ।
अयोघनेनाय इवाभितप्तं वैदेहिबन्धोर्हृदयं विदद्रे ॥३३ ॥

ज्याप्रमाणे घणाच्या आघाताने तापलेले लोखंड विदीर्ण व्हावे त्याचप्रमाणे असहनीय व अपकीर्तिकारक अशा पत्नीविषयक निंदेने धक्का बसलेले त्या वैदेहीवल्लभ श्रीरामाचे हृदय विदीर्ण झाले.

किमात्मनिर्वादकथामुपेक्षे जायामदोषामुत संत्यजामि ।
इत्येकपक्षाश्रयविक्लवत्वादासीत्स दोलाचलचित्तवृत्तिः ॥३४ ॥

मी स्वविषयक प्रवादाची उपेक्षा करावी की, दोषरहित असणाऱ्या पत्नी सीतेचा त्याग करावा? यापैकी कोणत्याच पक्षाचा आश्रय घेण्यामध्ये असमर्थ झालेली त्या श्रीरामाची चित्तवृत्ती हिंदोळ्या प्रमाणे हेलकावे खाऊ लागली.

निश्चित्य चानन्यनिवृत्ति वाच्यं त्यागेन पत्न्याः परिमार्ष्टुमैच्छत् ।
अपि स्वदेहात्किमुतेन्द्रियार्थाद्यशोधनानां हि यशो गरीयः ॥३५ ॥

श्रीरामाने कोणत्याही अन्य उपायाने या प्रवादाची निवृत्ती होऊ शकत नाही असा निश्चय करून पत्नीच्या परित्यागानेच या लोकापवादाचा परिहार करण्याचे ठरविले कारण, यशालाच धन मानणाऱ्या थोर लोकांना स्वतःच्या शरीरापेक्षादेखील यशच श्रेष्ठतर वाटते, तर मग तेथे इंद्रियविषयांची काय कथा?

स संनिपत्यावरजान्हतौजास्तद्विक्रियादर्शनलुप्तहर्षान् ।
कौलीनमात्माश्रयमाचचक्षे तेभ्यः पुनश्चेदमुवाच वाक्यम् ॥३६ ॥

निस्तेज झालेल्या त्या श्रीरामाने आपल्यावर झालेल्या आघाताच्या दर्शनाने खिन्न झालेल्या आपल्या कनिष्ठ भावांना एकत्र बोलावून कुलविषयक निंदेला आपणच कसे कारणीभूत आहोत हे सांगितले व हे वाक्य उच्चारले.

राजर्षिवंशस्य रविप्रसूतेरुपस्थितः पश्यत कीदृशोऽयम् ।
मत्तः सदाचारशुचेः कलङ्कः पयोदवातादिव दर्पणस्य ॥३७ ॥

ज्याप्रमाणे बाष्पयुक्त वाऱ्यामुळे दर्पण धूसर व्हावा त्याचप्रमाणे सूर्यापासून उत्पन्न झालेल्या, सदाचारामुळे पवित्र असलेल्या, राजर्षींच्या या रघुवंशाला माझ्यामुळे कसा कलंक लागला ते पहा.

पौरेषु सोऽहं बहुलीभवन्तमपां तरङ्गेष्विव तैलबिन्दुम् ।
सोढुं न तत्पूर्वमवर्णमीशे आलानिकं स्थाणुमिव द्विपेन्द्रः ॥३८ ॥

साखळदंडाचा खांब जसा गजराजाला असह्य वाटतो, तद्वत, प्रथमच उद्भवलेला आणि पाण्याच्या लाटांवर पडलेल्या तैलबिंदूप्रमाणे नगरवासी लोकात वेगाने पसरणारा हा लोकापवाद मला असह्य होत आहे .

तस्यापनोदाय फलप्रवृत्तावुपस्थितायामपि निर्व्यपेक्षः ।
त्यक्ष्यामि वैदेहसुतां पुरस्तात्समुद्रनेमिं पितुराज्ञयेव ॥३९ ॥

ज्याप्रमाणे पूर्वी पित्याच्या आज्ञेवरून समुद्राने वेढलेल्या (विशाल) पृथ्वीचा मी त्याग केला. त्याचप्रमाणे या लोकापवादाला दूर करण्यासही संतानरूपी फलप्राप्ती जवळ आली असतानादेखील निःस्पृह होऊन मी वैदेहपुत्री सीतेचा त्याग करेन.

अवैमि चैनामनघेति किन्तु लोकापवादो बलवान्मतो मे ।
छाया हि भूमेः शशिनो मलत्वेनारोपिता शुद्धिमतः प्रजाभिः ॥४० ॥

सीता दोषरहित आहे हे मी चांगलेच जाणतो तरीसुद्धा माझ्या मते लोकापवादच बलवान आहे कारण लोक विशुद्ध अशा चंद्रावर पडणाऱ्या पृथ्वीच्या छायेला देखील लोक चंद्रावरील कलंकच मानतात.

रक्षोवधान्तो न च मे प्रयासो व्यर्थः स वैरप्रतिमोचनाय ।
अमर्षणः शोणितकाङ्क्षया किं पदा स्पृशन्तं दशति द्विजिह्वः ॥४१ ॥

आणि यामुळे वधाद्वारे राक्षसांचा अंत करण्याचा माझा प्रयत्न व्यर्थ गेला असे नाही, तो तर शत्रूचा सूड घेण्याकरीताच होता. (कोणाचाही उद्धटपणा) सहन न करणारा सर्प पायाने स्पर्श केलेल्या पुरुषाला रक्तपानाच्या इच्छेने दंश करतो का? (नाही! तो तर प्रतिशोधाच्या भावनेनेच दंश करतो.)

तदेव सर्गः करुणार्द्रचित्तैर्न मे भवद्भिः प्रतिषेधनीयः ।
यद्यर्थिता निर्हृतवाच्यशल्यान्प्राणान्मया धारयितुं चिरं वः ॥४२ ॥

या निंदारूप शल्यांपासून (रक्षण करून) मी माझ्या प्राणांना चिरकाळपर्यंत धारण करावे अशी जर तुमची इच्छा असेल तर करुणेने आर्द्र हृदय झालेल्या तुम्ही या माझ्या निश्चयाचा विरोध करू नये.

इत्युक्तवन्तं जनकात्मजायां नितान्तरूक्षाभिनिवेशमीशम् ।
न कश्चन भ्रातृषु तेषु शक्तो निषेद्धुमासीदनुमोदितुं वा ॥४३ ॥

अशाप्रकारे जनकपुत्री सीतेच्या विषयी अत्यंत निष्ठुरपणे बोलणाऱ्या त्या स्वामी रामाला अनुमोदन देण्यासही त्या भावंडामधील कोणीच धजले नाहीत आणि विरोधही करू शकले नाहीत.

स लक्ष्मणं लक्ष्मणपूर्वजन्मा विलोक्य लोकत्रयगीतकीर्तिः ।
सौम्येति चाभाष्य यथार्थभाषी स्थितं निदेशे पृथगादिदेश ॥४४ ॥

तिन्ही लोकांमध्ये कीर्ती गायली जाणाऱ्या, लक्ष्मणाचा ज्येष्ठ भाऊ असणाऱ्या, यथार्थभाषण करणाऱ्या श्रीरामाने आज्ञा पाळण्यासाठी उभे असलेल्या लक्ष्मणाकडे पाहिले व "हे सौम्या" असे संबोधून स्वतंत्रपणे आदेश दिला.

प्रजावती दोहदशंसिनी ते तपोवनेषु स्पृहयालुरेव ।
स त्वं रथी तद्व्यपदेशनेयां प्रापय्य वाल्मीकिपदं त्यजैनाम् ॥४५ ॥

तुझ्या वहिनीला तपोवनामध्ये वास करण्याचे डोहाळे लागले आहेत, म्हणून तिचे डोहाळे पुरवण्याच्या निमित्ताने तू रथारूढ होऊन वाल्मीकींच्या आश्रमामध्ये नेऊन सीतेला तेथेच सोडून दे.

स शुश्रुवान्मातरि भार्गवेण पितुर्नियोगात्प्रहृतं द्विषद्वत् ।
प्रत्यग्रहीदग्रजशासनं तदाज्ञा गुरूणां ह्यविचारणीया ॥४६ ॥

पिता जमदग्नींच्या आदेशावरून परशुरामाने स्वजननीवर शत्रूप्रमाणे प्रहार केला हे लक्ष्मणाने ऐकले होते, म्हणून त्याने ज्येष्ठ भावाची ती आज्ञा शिरसावंद्य मानली, कारण, ज्येष्ठांची आज्ञा नेहमी पाळलीच पाहिजे.

अथानुकूलश्रवणप्रतीतामत्रस्नुभिर्युक्तधुरं तुरङ्गैः ।
रथं सुमन्त्रप्रतिपन्नरश्मिमारोप्य वैदेहसुतां प्रतस्थे ॥४७ ॥

735

त्यानंतर तपोवनवासाचे मनोरथ पूर्ण होण्याच्या अनुकूल वार्तेला ऐकून आनंदित झालेल्या सीतेला, गर्भिणीला घेऊन जाण्यास योग्य असे घोडे जोडलेल्या व सुमंत्र सारथ्य करत असणाऱ्या रथामध्ये बसवून लक्ष्मण निघाला.

सा नीयमाना रुचिरान्मदेशान्प्रियंकरो मे प्रिय इत्यनन्दत् ।
नाबुद्ध कल्पद्रुमतां विहाय जातं तमात्मन्यसिपत्रवृक्षम् ॥४८ ॥

अतिशय रमणीय प्रदेशांमधून नेली जात असणारी ती सीता आपला प्रिय पती आपले प्रियच करणारा आहे असे समजून आनंदित झाली पण तो प्रियपती आपल्याविषयी कल्पवृक्षाप्रमाणे नव्हे तर **असिपत्रवृक्षाप्रमाणे** वागत आहे हे मात्र तिला उमगले नाही. (**टीप.**- असिपत्रवन म्हणजे ज्या वनातील वृक्षांची पाने तलवारसमान तीक्ष्ण व टोकदार आहेत असे वन, हे दुःखदायी सघन वन आहेत.)

जुगूह तस्याः पथि लक्ष्मणो यत्सव्येतरेण स्फुरता तदक्ष्णा ।
आख्यातमस्यै गुरु भावि दुःखमत्यन्तलुप्तप्रियदर्शनेन ॥४९ ॥

मार्गामध्ये लक्ष्मणाने जे भविष्यकाळातील भीषण दुःख सीतेपासून लपविले होते ते दुःख प्रियकर रामाच्या दर्शनाला पूर्णपणे मुकलेल्या व फडफडणाऱ्या उजव्या डोळयाने जणू काही सीतेला आधीच सांगून टाकले.

सा दुर्निमित्तोपगताद्विषादात्सद्यःपरिम्लानमुखारविन्दा ।
राज्ञः शिवं सावरजस्य भूयादित्याशशंसे करणैरबाह्यैः ॥५० ॥

(उजवा डोळा फडकणे इत्यादी) अपशकुनांमुळे प्राप्त झालेल्या विषादाने मुखकमल म्लान झालेली ती सीता सर्व बांधवांसह श्रीरामराजाचे कल्याण होवो असे अंतःकरणापासून चिंतू लागली.

गुरोर्नियोगाद्वनितां वनान्ते साध्वीं सुमित्रातनयो विहास्यन् ।
अवार्यतेवोत्थितवीचिहस्तैर्जह्नोर्दुहित्रा स्थितया पुरस्तात् ॥५१ ॥

पतिव्रता असणाऱ्या त्या वनितेला ज्येष्ठ बंधु श्रीरामाच्या आज्ञेवरून वनप्रदेशात त्यागण्यास आलेल्या लक्ष्मणासमोर स्थित असणारी गंगा नदी उसळणाऱ्या लाटारूपी हातांनी जणू काही 'असे करू नकोस' असे सांगत होती.

रथात्स यन्त्रा निगृहीतवाहात्तां भ्रातृजायां पुलिनेऽवतार्य ।
गङ्गां निषादाहृतनौविशेषस्ततार सन्धामिव सत्यसन्धः ॥५२ ॥

सत्यप्रतिज्ञ असणाऱ्या त्या लक्ष्मणाने सारथ्याद्वारा ज्याचे घोडे आवरले गेले आहेत अशा रथातून वहिनी सीतेला वाळवंटामध्ये उतरवले आणि निषादाने आणलेल्या एका विशिष्ट नौकेतून गंगा नदी पार करून जणू काही स्वप्रतिज्ञा ही तडीस नेली.

अथ व्यवस्थापितवाक्यथंचित्सौमित्रिरन्तर्गतबाष्पकण्ठः ।
औत्पातिकं मेघ इवाश्मवर्षं महीपतेः शासनमुज्जगार ॥५३ ॥

नंतर कसेबसे आपल्या वाणीला मूळपदावर आणून कंठ दाटून आलेल्या लक्ष्मणाने त्या श्रीरामराजाचा तो कठोर आदेश उच्चारला. प्रलयकालीन मेघांनी पाषाणांची वृष्टी करावी तसाच तो आदेश होता.

ततोऽभिषङ्गानिलविप्रविद्धा प्रभ्रश्यमानाभरणप्रसूना ।
स्वमूर्तिलाभप्रकृतिं धरित्रीं लतेव सीता सहसा जगाम ॥५४ ॥

ज्याप्रमाणे एकाएकी आलेल्या (प्रचंड) वादळाचा तडाखा बसलेली एखादी वेल आपल्या पुष्परूपी आभूषणांच त्याग करीत स्व उत्पत्तीचे कारण असणाऱ्या जमिनीवरतीच धराशायी होते. त्याचप्रमाणे (पतीने केलेल्या परित्यागरूपी प्रखर आघाताने) आभूषणांचा त्याग करीत आत्म - उत्पत्तीचे कारण असणाऱ्या जमिनीवरती सीता कोसळली.

इक्ष्वाकुवंशप्रभवः कथं त्वां त्यजेदकस्मात्पतिरार्यवृत्तः ।
इति क्षितिः संशयितेव तस्यै ददौ प्रवेशं जननी न तावत् ॥५५ ॥

इक्ष्वाकुनामक महान वंशामध्ये जन्मास आलेला व अत्यंत उदात्त चारित्र्याने युक्त असणारा पति तुझा असा एकाएकी कसा बरे त्याग करेल. या संशयानेच जणू काही मातृस्वरूप पृथ्वीने तिला त्यावेळी आपल्या उदरात स्थान दिले नाही.

सा लुप्तसंज्ञा न विवेद दुःखं प्रत्यागतासुः समतप्यतान्तः ।
तस्याः सुमित्रात्मजयत्नलब्धो मोहादभूत्कष्टतरः प्रबोधः ॥५६ ॥

मूर्च्छित झाल्यानंतर सीतेला दुःखाची जाणीव झाली नव्हती, पण शुद्धीवर येताच मात्र दुःखाने तिचे अंतःकरण होरपळू लागले. लक्ष्मणाच्या प्रयत्नांमुळे प्राप्त झालेली चेतना (शुद्धीवर येणे) तिला मूर्च्छेपेक्षाही अधिक दुःखदायक वाटू लागली.

न चावदद्भर्तुरवर्णमार्या निराकरिष्णोर्वृजिनाद्दतेऽपि ।
आत्मानमेवं स्थिरदुःखभाजं पुनः पुनर्दुष्कृतिनं निनिन्द ॥५७ ॥

काहीच अपराध नसताना देखील आपला त्याग करणाऱ्या पतीची त्या पतिव्रता सीतेने निंदा केली नाही, पण अतिशय असहनीय दुःख प्राप्त झाल्यामुळे स्वतःलाच पापिणी समजून पुन्हा पुन्हा ती आत्मनिंदा (मात्र अवश्य) करू लागली.

आश्वास्य रामावरजः सतीं तामाख्यातवाल्मीकिनिकेतमार्गः ।
निघ्नस्य मे भर्तृनिदेशरौक्ष्यं देवि क्षमस्वेति बभूव नम्रः ॥५८ ॥

पतिव्रता सीतेचे सांत्वन करून तिला वाल्मीकींच्या आश्रमाचा मार्ग दाखवून, "हे देवी! पराधीन असलेल्या माझ्याकडून स्वामीच्या आदेशाचे पालन करताना कठोरपणाचा जो व्यवहार केला गेला त्याबद्दल मला क्षमा कर, असे म्हणून लक्ष्मण सीतेपुढे नतमस्तक झाला.

सीता तमुत्थाप्य जगाद वाक्यं प्रीतास्मि ते सौम्य चिराय जीव ।
बिडौजसा विष्णुरिवाग्रजेन भ्रात्रा यदित्थं परवानसि त्वम् ॥५९ ॥

(नतमस्तक झालेल्या त्या) लक्ष्मणाला वर उठवून सीता म्हणाली, हे सत्पुरुषा! मी तुझ्यावर प्रसन्न आहे. तुला दीर्घायुष्य लाभो. कारण ज्याप्रमाणे भगवान विष्णू ज्येष्ठ बंधू इंद्राच्या शासनात असतो, त्याचप्रमाणे तू (देखील) आपल्या ज्येष्ठ भावाच्या आज्ञेत आहेस.

श्वश्रूजनं सर्वमनुक्रमेण विज्ञापय प्रापितमत्प्रणामः ।
प्रजानिषेकं मयि वर्तमानं सूनोरनुध्यायत चेतसेति ॥६० ॥

सर्व सासूबाईंना यथायोग्य क्रमाने माझे नमस्कार सांगून माझ्या उदरात असलेल्या आपल्या पुत्राच्या गर्भाचे मंगल होण्यासाठी आपण अंतःकरणपूर्वक प्रार्थना करावी अशी विनंती देखील करा.

वाच्यस्त्वया मद्वचनात्स राजा वह्नौ विशुद्धामपि यत्समक्षम् ।
मां लोकवादश्रवणाददासीः श्रुतस्य किं तत्सदृशं कुलस्य ॥६१ ॥

(आणि) माझ्या सांगण्यावरून त्या रामराजाला (हा प्रश्न अवश्य) विचारा की, स्वतःच्या दृष्टीसमोर झालेल्या अग्निपरीक्षेमध्ये अत्यंत शुद्ध ठरून देखील (केवळ मिथ्या) लोकापवादाचे श्रवण करून जो माझा त्याग केलास, तो रघुवंशाला साजेसा आणि (धर्म इत्यादी) शास्त्रांना संमत आहे का?

कल्याणबुद्धेरथवा तवायं न कामचारो मयि शङ्कनीयः ।
ममैव जन्मान्तरपातकानां विपाकविस्फूर्जथुरप्रसह्यः ॥६२ ॥

किंवा सर्वांचे कल्याणच व्हावे अशी बुद्धी असणाऱ्या तुझ्या, माझ्याविषयीच्या स्वेच्छाव्यवहाराबद्दल शंका घेणेच (मुळी) योग्य नाही, कारण, हा तर माझ्याच कित्येक जन्मांमधील पातकांचा वज्रपाताप्रमाणे असह्य असणारा असा दुष्परिणाम आहे.

उपस्थितां पूर्वमपात्य लक्ष्मीं वनं मया सार्धमसि प्रपन्नः ।
तदास्पदं प्राप्य तयातिरोषात्सोढास्मि न त्वद्भवने वसन्ती ॥६३ ॥

पूर्वी (स्वतः हून) उपस्थित झालेल्या (व माझा स्वीकार करा असे म्हणणाऱ्या) राज्यलक्ष्मीला दूर सारून आपण माझ्याबरोबर वनात आला होतात. त्यामुळे आता त्या राज्यलक्ष्मीने (पुन्हा) स्वतःचे स्थान प्राप्त केल्यावर (पूर्वीच्या प्रसंग स्मरणाने उत्पन्न) अत्यधिक कोपामुळे आपल्या घरामध्ये वास्तव्य करत असणाऱ्या मला सहन केले नाही. (म्हणूनच मी राजभवनातून निष्कासित झाले.)

निशाचरोपप्लुतभर्तृकाणां तपस्विनीनां भवतः प्रसादात् ।
भूत्वा शरण्या शरणार्थमन्यं कथं प्रपत्स्ये त्वयि दीप्यमाने ॥६४ ॥

ज्यांच्या पतींना राक्षसांनी त्रस्त केले होते अशा तपस्विनी स्त्रियांसही मी आपल्याच कृपाशीर्वादामुळे शरण्य (आश्रय अथवा अभय देणारी) बनली होते. (असे असताना) आता आपण विद्यमान असताना मी अन्य कुणाला कसे बरे शरण जाईन ?

किंवा तवात्यन्तवियोगमोघे कुर्यामुपेक्षां हतजीवितेऽस्मिन् ।
स्याद्रक्षणीयं यदि मे न तेजस्तदीयमन्तर्गतमन्तरायः ॥६५ ॥

अथवा रक्षण करण्यास योग्य असलेले माझ्या गर्भात असणारे तुमचे तेज जर प्रतिबंधक नसते तर अत्यंत असहनीय अशा तुमच्या वियोगाने व्यर्थ झालेल्या माझ्या तुच्छ जीवनाची मी केव्हाच उपेक्षा केली असती.

साहं तपः सूर्यनिविष्टदृष्टिरूर्ध्वं प्रसूतेश्चरितुं यतिष्ये ।
भूयो यथा मे जननान्तरेऽपि त्वमेव भर्ता न च विप्रयोगः ॥६६ ॥

प्रसूती झाल्यानंतर मी सूर्याकडे दृष्टी लावून तप आचरण्याचा प्रयत्न करीन कारण (त्या तपाच्या सामर्थ्याने) मला पुढील अनेक जन्मांमध्ये देखील आपणच पतिस्वरूपात प्राप्त व्हावेत, पण पुन्हा (या जन्मातील वियोगाप्रमाणे, आपला परस्परांशी) वियोग होऊ नये.

नृपस्य वर्णाश्रमपालनं यत्स एव धर्मो मनुना प्रतीतः ।
निर्वासिताप्येवमतस्त्वयाहं तपस्विसामान्यमवेक्षणीया ॥६७ ॥

राजाने ब्राह्मण इत्यादी वर्णांचे आणि ब्रह्मचर्याश्रम इत्यादी आश्रमांचे पालन करावे असा धर्म श्रीमनूने सांगितला आहे. (म्हणून) त्यागले असले तरीही एका सर्वसाधारण तपस्व्यांप्रमाणे माझ्याकडे पहावे. (पत्नीस्वरूपातील मला जरी त्यागले असले तरीही वर्णाश्रमधर्मांचे पालन करण्याच्या दृष्टीने एक प्रजाजन म्हणून स्वीकारावे व तपस्विनी स्वरूपातील माझे रक्षण करावे.)

तथेति तस्याः प्रतिगृह्य वाचं रामानुजे दृष्टिपथं व्यतीते ।
सा मुक्तकण्ठं व्यसनातिभाराच्चक्रन्द विग्ना कुररीव भूयः ॥६८ ॥

ठीक आहे, असे म्हणून तिचा निरोप (संदेश) घेऊन (जेव्हा) लक्ष्मण (सीतेच्या) नजरेच्या पलिकडे गेला (तेव्हा) दुःखाचा अतिरेक झाल्यामुळे (दुःख असहनीय झाल्यामुळे) जणू काही भयभीत झालेल्या क्रौंच पक्षिणीप्रमाणेच ती (सीता) मुक्तकंठाने आक्रोश करु लागली.

नृत्यं मयूराः कुसुमानि वृक्षा दर्भानुपात्तान्विजहुर्हरिण्यः ।
तस्याः प्रपन्ने समदुःखभावमत्यन्तमासीद्रुदितं वनेऽपि ॥६९ ॥

मोरांनी नृत्य करणे सोडून दिले. वृक्षांनी धारण केलेल्या पुष्पांचा त्याग केला. आणि हरिणींनी तर मुखामध्ये घेतलेल्या दर्भांच्या घासांचाही त्याग केला. अशाप्रकारे सीतेप्रमाणेच दुःखी झालेल्या त्या वनामध्ये ही अत्यंत शोकमय वातावरण झाले होते.

तामभ्यगच्छद्रुदितानुकारी कविः कुशेध्माहरणाय यातः ।
निषादविद्धाण्डजदर्शनोत्थः श्लोकत्वमापद्यत यस्य शोकः ॥७० ॥

व्याधाने मारलेल्या (क्रौंच) पक्ष्यालाही पाहून ज्यांचा शोक श्लोकरूपाने प्रकट झाला ते कुश आणि समिधा आणण्यासाठी गेलेले कवी वाल्मीकी ज्या दिशेने रडण्याचा आवाज येत आहे त्या दिशेने मार्गक्रमण करीत सीतेजवळ येऊन पोहचले.

तमश्रु नेत्रावरणं प्रमृज्य सीता विलापाद्विरता ववन्दे ।
तस्यै मुनिर्दोहदलिङ्गदर्शी दाश्वान्सुपुत्राशिषमित्युवाच ॥७१ ॥

आपले रडणे थांबवून व दृष्टीला प्रतिबंधक ठरणाऱ्या अश्रूंना आवरून सीतेने त्या ऋषींना नमस्कार केला. सीता गर्भवती असल्याचे पाहून तिला सत्पुत्रप्राप्तीचा आशीर्वाद देऊन ते ऋषी सीतेला म्हणाले.

जाने विसृष्टां प्रणिधानतस्त्वां मिथ्यापवादक्षुभितेन भर्त्रा ।
तन्मा व्यथिष्ठा विषयान्तरस्त्वं प्राप्तासि वैदेहि पितुर्निकेतम् ॥७२ ॥

खोट्या लोकापवादाने व्यथित होऊन पतीने तुझा त्याग केलेला आहे हे मी योगसामर्थ्याने जाणतो. हे सीते, तू दुःखी होऊ नकोस. कारण तू अन्य देशामध्ये राहणाऱ्या तुझ्या वडिलांच्याच घरी आलेली आहेस.

उत्खातलोकत्रयकण्टकेऽपि सत्यप्रतिज्ञेऽप्यविकत्थनेऽपि ।
त्वां प्रत्यकस्मात्कलुषप्रवृत्तावस्त्येव मन्युर्भरताग्रजे मे ॥७३ ॥

तिन्ही लोकांना कंटकाप्रमाणे त्रासदायक असणाऱ्या रावणाचा जरी त्याने नाश केला असला, तो प्रतिज्ञा सत्यात उतरवणारा असला, आणि आत्मप्रौढी मिरवणारा नसला तरीही केवळ तुझ्याविषयी अचानकपणे निंदनीय व्यवहार केल्यामुळे माझा निश्चितच रामावरती क्रोध आहे.

तवोरुकीर्तिः श्वशुरः सखा मे सतां भवोच्छेदकरः पिता ते ।
धुरि स्थिता त्वं पतिदेवतानां किं तन्न येनासि ममानुकम्प्या ॥७४ ॥

अतिशय कीर्तिवंत असणारे तुझे सासरे दशरथ हे माझे मित्रच होते. तुझे पिता जनक हे (ज्ञानाच्या उपदेशाने) सज्जनांच्या संसारबंधनाचा नाश करणारे आहेत. अणि तू स्वतः तर पतिव्रतांच्या मध्ये अग्रगण्य आहेस. (असे असताना) तुझ्यावरती माझी कृपा का बरे होणार नाही ? (तू माझी निश्चितच कृपापात्र आहेस.)

तपस्विसंसर्गविनीतसत्त्वे तपोवने वीतभया वसास्मिन् ।
इतो भविष्यत्यनघप्रसूतेरपत्यसंस्कारमयो विधिस्ते ॥७५ ॥

तपस्वांच्या सहवासात राहिल्यामुळे शांत स्वभावाच्या प्राण्यांनी युक्त असलेल्या या तपोवनामध्ये तू निर्भयपणे वास्तव्य कर. तुझी सुखपूर्वक प्रसूती झाल्यावर तुझ्या बाळाचे जातकर्म इत्यादी सर्व संस्कारविधी या तपोवनामध्येच संपन्न होतील.

अशून्यतीरां मुनिसंनिवेशैस्तमोपहन्त्रीं तमसां वगाह्य ।
तत्सैकतोत्सङ्गबलिक्रियाभिः संपत्स्यते ते मनसः प्रसादः ॥७६ ॥

ऋषींच्या पर्णकुट्यांमुळे गजबजलेले तीर असलेल्या तसेच पापविनाशक असलेल्या तमसा नदीत स्नान करून तिच्या वाळवंटामध्ये इष्टदेवतांची पूजा केल्याने तुझे मन प्रसन्न होईल. (शांत होईल.)

पुष्पं फलं चार्तवमाहरन्त्यो बीजं च बालेयमकृष्टरोहि ।
विनोदयिष्यन्ति नवाभिषङ्गामुदारवाचो मुनिकन्यकास्त्वाम् ॥७७ ॥

ऋतुयोग्य फुले आणि फळे तसेच नांगरणी न केलेल्या जमिनीतून उगवलेले असे पूजेसाठी योग्य असणारे धान्य घेऊन मधुर भाषण करणाऱ्या त्या मुनिकन्या (तुझ्याकडे येऊन) नुकतेच दुःख प्राप्त झालेल्या तुझे मन रमवतील.

पयोघटैराश्रमबालवृक्षान्संवर्धयन्ती स्वबलानुरूपैः ।
असंशयं प्राक्तनयोपपत्तेः स्तनंधयप्रीतिमवाप्स्यसि त्वम् ॥७८ ॥

आपल्या शक्तीनुसार पाण्याच्या कुंभांद्वारे आश्रमातील लहान लहान रोपट्यांना (पाणी घालून) वाढवत असताना पुत्रोत्पत्ती होण्याच्या आधीच निःसंशयपणे स्तनपान करणाऱ्या अपत्यांचेच प्रेम तू प्राप्त करशील.

अनुग्रहप्रत्यभिनन्दिनीं तां वाल्मीकिरादाय दयार्द्रचेताः ।
सायं मृगाध्यासितवेदिपार्श्वं स्वमाश्रमं शान्तमृगं निनाय ॥७९ ॥

अनुग्रह केल्यामुळे कृतज्ञता भाव व्यक्त करणाऱ्या त्या सीतेला घेऊन अत्यंत दयाळू अंतःकरणाचे ते वाल्मीकी मुनी सायंकाळच्या वेळी, यज्ञवेदीच्या जवळ आश्रय घेणाऱ्या व शांत स्वभावाच्या प्राण्यांनी युक्त असलेल्या स्वतःच्या आश्रमामध्ये आले.

तामर्पयामास च शोकदीनां तदागमप्रीतिषु तापसीषु ।
निर्विष्टसारां पितृभिर्हिमांशोरन्त्यां कलां दर्श इवौषधीषु ॥८० ॥

ज्याप्रमाणे, दर्शकाळ पितरांद्वारे उपभोग घेतलेल्या चंद्राच्या शेवटच्या कलेला ओषधींच्या स्वाधीन करतो. त्याचप्रमाणे शोकामुळे दयनीय अवस्था झालेल्या त्या सीतेला वाल्मीकी ऋषींनी तिच्या आगमनामुळे संतुष्ट झालेल्या तापसींच्या स्वाधीन केले. (**टीप.** - दर्शकाळ.)

ता इङ्गुदीस्नेहकृतप्रदीपमास्तीर्णमेध्याजिनतल्पमन्तः ।
तस्यै सपर्यानुपदं दिनान्ते निवासहेतोरुटजं वितेरुः ॥८१ ॥

त्या तापसींनी सीतेचा आदरसत्कार इत्यादी पूजाविधी संपन्न झाल्यानंतर सायंकाळच्या वेळी वास्तव्य करण्यासाठी इंगुदीच्या तेलाचा दिवा तेवत असणारी व आतमध्ये पवित्र मृगचर्मांची शय्या अंथरलेली पर्णकुटी सीतेसाठी सज्ज केली.

तत्राभिषेकप्रयता वसन्ती प्रयुक्तपूजा विधिनातिथिभ्यः ।
वन्येन सा वल्कलिनी शरीरं पत्युः प्रजासन्ततये बभार ॥८२ ॥

त्या आश्रमामध्ये स्नान (इत्यादी व्रतांच्या द्वारे) इंद्रियनिग्रह करीत वास्तव्य करून, विधिपूर्वक अतिथींची अर्चना करून आणि वल्कले धारण करून त्या सीतेने पतीचा वंशविच्छेद होऊ नये म्हणून कंदमुळे इत्यादींच्या सेवनाने स्वतःचे शरीर तगवले.

अपि प्रभुः सानुशयोऽधुना स्यात्किमुत्सुकः शक्रजितोऽपि हन्ता ।
शशंस सीतापरिदेवनान्तमनुष्ठितं शासनमग्रजाय ॥८३ ॥

श्रीराजाराम आता तरी पश्चात्तापाने त्रस्त झाला असेल काय? हे जाणण्यास उत्सुक असलेल्या व त्या शक्रजितारीने (इंद्रजिताचा संहार करणाऱ्या) लक्ष्मणाने देखील सीतेने केलेल्या (वनामधील) विलापापर्यंत सर्व वृत्तांत ज्येष्ठ बंधू रामाला कथन केला.

बभूव रामः सहसा सबाष्पस्तुषारवर्षीव सहस्यचन्द्रः ।
कौलीनभीतेन गृहान्निरस्ता न तेन वैदेहसुता मनस्तः ॥८४ ॥

(तो वृत्तांत ऐकून) श्रीराम पौष महिन्यातील तुषारांची वृष्टी करणाऱ्या चंद्राप्रमाणेच अश्रू गाळू लागले. (कारण) त्यांनी लोकापवादाच्या भीतीने सीतेला (केवळ) घरातूनच बाहेर काढले होते, मनातून नव्हे.

निगृह्य शोकं स्वयमेव धीमान्वर्णाश्रमावेक्षणजागरूकः ।
स भ्रातृसाधारणभोगमृद्धं राज्यं रजोरिक्तमनाः शशास ॥८५ ॥

बुद्धिमान् व वर्णाश्रमधर्मांचे पालन करण्याविषयी दक्ष असणाऱ्या त्या श्रीरामाने (सीताविषयक वृत्तांतश्रवणाने उत्पन्न झालेला) शोक आवरला व रजोगुणापासून स्वचित्तास विमुक्त करून स्वबांधवांप्रमाणेच (शरीरयात्रा चालवण्यास आवश्यक इतक्याच) साधारण भोगांचे सेवन करीत राज्यकारभार केला.

तामेकभार्यां परिवादभीरोः साध्वीमपि त्यक्तवतो नृपस्य ।
वक्षस्यसंघट्टसुखं वसन्ती रेजे सपत्नीरहितेव लक्ष्मीः ॥८६ ॥

लोकापवादाची चिंता असलेल्या व (त्यामुळेच) स्वतःच्या एकुलत्या एक पत्नीचा (ती) पतिव्रता असतानाही त्याग करणाऱ्या त्या श्रीरामराजाच्या हृदयामध्ये अवर्णनीय सुखाचा अनुभव घेत वास्तव्य करणारी राज्यलक्ष्मी (सीतेच्या अभावामुळे) सपत्नी (सवत) नसलेल्या (सौभाग्यवती) प्रमाणेच शोभून दिसू लागली. (राज्यांची भरभराट झाली)

सीतां हित्वा दशमुखरिपुर्नोपयेमे यदन्यां-
तस्या एव प्रतिकृतिसखो यत्क्रतूनाजहार ।
वृत्तान्तेन श्रवणविषयप्रापिणा तेन भर्तुः
सा दुर्वारं कथमपि परित्यागदुःखं विषेहे ॥८७ ॥

इति श्रीरघुवंशे महाकाव्ये कविश्रीकालिदासकृतौ सीतापरित्यागो नाम चतुर्दशः सर्गः ।

रावणाचा शत्रू असलेल्या श्रीरामाने सीतेच्या त्यागानंतर (जरी त्याग केला असला तरी) अन्य कोणत्याही स्त्रीशी विवाह केला नाही. (आणि) त्या सीतेचीच (सुवर्णमयी) मूर्ती निर्माण करून, त्या मूर्तीसोबतच यज्ञकार्य संपन्न केले. कानावर येणारे पतीचे अशा प्रकारचे वृत्तांत ऐकून त्या सीतेने असहनीय असणारे ते परित्यागाचे दुःख कसेबसे सहन केले.

अशा रीतीने कविश्रेष्ठ कालिदास रचित रघुवंश नामक महाकाव्याचा सीतापरित्याग नामक चौदाव सर्ग संपला.

Dr Shaikh Imran
Assistant Professor Urdu
Maharashtra Education Service Class-I
Govt. Institute of
Sciences, Nagpur

Chapter in book

कालिदास समग्र वाङ्मय प्रकाशनमाला - १

महाकवी कालिदास विरचित

रघुवंश

मूळ संस्कृत संहिता व मराठी अनुवाद

प्रधान संपादक

आचार्य श्रीनिवास वरखेडी

पुरोवाक्	संपादक	कार्यकारी संपादक
पं. वसन्त अनन्त गाडगीळ	डॉ. लीना रस्तोगी	डॉ. पराग जोशी

अनुवाद

डॉ. पराग जोशी — डॉ. संभाजी पाटील

प्रा. पल्लवी कर्वे ✓ — प्रा. पल्लवी कावळे

मधुरा कायंदे

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय
रामटेक
२०१९

Dr Shaikh Imran
Assistant Professor Urdu
Maharashtra Education Service Class-I
Rashtrasant Naik Govt. Institute of Arts & Sciences, Nagpur

19-20
Chapter in Book
3.3.4

कालिदास समग्र वाङ्मय प्रकाशनमाला - १

रघुवंश – महाकवी कालिदास

© क. का. सं. वि. सर्वाधिकार सुरक्षित

मौदा रोड, रामटेक,
जि. नागपुर - ४४११०६
महाराष्ट्र.

ISBN: 978-93-85710-26-1

प्रथम आवृत्ती : २०१९, रामटेक नागपुर.

प्रती - ५००

किंमत : संपूर्ण संच- ₹२५००

सदर पुस्तक क.का.सं.वि. च्या कालिदास समग्र वाङ्मय प्रकाशन प्रकल्पांतर्गत प्रकाशित झालेले असून या प्रकल्पास यु.जी.सी. च्या १२व्या योजने अंतर्गत संशोधन प्रकल्पाचे आर्थिक सहाय्य प्राप्त झाले आहे. या संपूर्ण प्रकाशनाचे काम LATEX व UTF-8 द्वारे करण्यात आले आहे.

प्राप्तीस्थान : प्रकाशन विभाग, क.का.सं.वि.,
मौदा रोड, रामटेक,
जि. नागपुर– ४४११०६, महाराष्ट्र
ई-मेल : pgtd@kksu.org, दूर. - ०७११४ - २५६४७६

मुद्रक : अनुवाक् टेक्नॉलॉजी प्रा. लि., टाईड-यूओएच (TIDE-UoH), हैदराबाद विश्वविद्यालय, गच्चीबौली, हैदराबाद- ५०००४६, तेलंगाना

षष्ठ : सर्गः

स तत्र मञ्चेषु मनोज्ञवेषान्सिंहासनस्थानुपचारवत्सु ।
वैमानिकानां मरुतामपश्यदाकृष्टलीलान्नरलोकपालान् ॥ १ ॥

त्या (रघुपुत्र अजाने) स्वयंवराच्या ठिकाणी राजोपचाराने युक्त केलेल्या सिंहासनावर राजांना बसलेले पाहिले. ते राजे चित्ताकर्षक वेषभूषा केलेल्या, विमानातून विहार करीत असलेल्या देवांच्याही भाग्याला आकृष्ट करीत होते.

रतेर्गृहीतानुनयेन कामं प्रत्यर्पितस्वाङ्गमिवेश्वरेण ।
काकुत्स्थमालोकयतां नृपाणां मनो बभूवेन्दुमतीनिराशम् ॥ २ ॥

कामदेवाच्या पत्नीची रतीची प्रार्थना ऐकून महादेवाने जणू काही शरीर परत दिलेल्या कामदेवाप्रमाणे शोभून दिसणाऱ्या, ककुत्स्थ गोत्रात जन्मास आलेल्या अजाला पाहून (इतर) राजांचे मन इंदुमतीबाबत (ती आता ह्यालाच वरेल, आपल्याला प्राप्त होणार नाही या शंकेने) निराश झाले.

वैदर्भनिर्दिष्टमसौ कुमारः क्लृप्तेन सोपानपथेन मञ्चम् ।
शिलाविभङ्गैर्मृगराजशावस्तुङ्गं नगोत्सङ्गमिवारुरोह ॥ ३ ॥

जसा सिंहाचा छावा मोठमोठ्या शिळांच्या मार्गावरून अत्यंत उंच पर्वत शिखरावर चढून जातो. तसा तो कुमार अज, विदर्भाधिपती भोजराजाद्वारा दाखविलेल्या रेखीव पायऱ्यांवरून मंचावर चढला.

परार्ध्यवर्णास्तरणोपपन्नमासेदिवान्रत्नवदासनं सः ।
भूयिष्ठमासीदुपमेयकान्तिर्मयूरपृष्ठाश्रयिणा गुहेन ॥ ४ ॥

अत्यंत मौल्यवान, विविध रंगांच्या गाद्यागिर्द्यांनी युक्त, विविध रत्नजडित अशा सोन्याच्या सिंहासनावर बसल्याने तो अज, विविधरंगी मोराच्या पृष्ठासनाचा आश्रय घेणाऱ्या, पार्वतीपुत्र स्वामी कार्तिकेयाची उपमा देण्यायोग्य झाला. (मोरावर आरूढ कार्तिकेयाप्रमाणे शोभत होता.)

तासु श्रिया राजपरम्परासु प्रभाविशेषोदयदुर्निरीक्ष्यः ।
सहस्रधात्मा व्यरुचद्विभक्तः पयोमुचां पङ्क्तिषु विद्युतेव ॥ ५ ॥

विजेचा प्रकाश (वीज) जसा मेघांच्या समूहांमध्ये हजारो भागांमध्ये विभक्त होऊन चमकून उठतो तसा (राजकुमारी इंदुमतीच्या स्वयंवरात) स्वयंवर सभेत (जमलेल्या हजारो राजांमध्ये) लक्ष्मीने (अजराजाच्या देहकांतीने म्हणजेच त्याच्या सौंदर्यश्रीने) हजारो भागांमध्ये आत्मस्वरूप विभक्त केल्यामुळे तिच्या प्रभेने (अजराजास) कोणीही सहजपणे पाहू शकत नव्हते. (अज तेजस्वी असल्याने पाहणाऱ्यांचे डोळे त्याच्या सौंदर्याने दिपून जात होते.)

तेषां महार्हासनसंस्थितानामुदारनेपथ्यभृतां स मध्ये ।
रराज धाम्ना रघुसूनुरेव कल्पद्रुमाणामिव पारिजातः ॥ ६ ॥

कल्पवृक्षांमध्ये पारिजात शोभून दिसावा त्याप्रमाणे अत्यंत मौल्यवान आसनांवर विराजमान, शोभिवन्त वेशभूषा परिधान केलेल्या त्या राजांमध्ये रघुपुत्र अजराजाच आपल्या विशेष तेजाने शोभून दिसला.

नेत्रव्रजाः पौरजनस्य तस्मिन्विहाय सर्वान्नृपतीन्निपेतुः ।
मदोत्कटे रेचितपुष्पवृक्षा गन्धद्विपे वन्य इव द्विरेफाः ॥ ७ ॥

फुलांनी बहरलेल्या वृक्षांचा त्याग करून भुंग्यांनी मदजल स्रवणाऱ्या वन्य गंधगजावर रुंजी घालावी त्याप्रमाणे नागरिकांचे नेत्रसमुदाय इतर सर्व राजांना पाहण्याचे सोडून एकट्या अजराजावरच खिळून राहिले.

अथ स्तुते बन्दिभिरन्वयज्ञैः सोमार्कवंश्ये नरदेवलोके ।
संचारिते चागुरुसारयोनौ धूपे समुत्सर्पति वैजयन्तीः ॥ ८ ॥
पुरोपकण्ठोपवनाश्रयाणां कलापिनामुद्धतनृत्तहेतौ ।
प्रध्मातशङ्खे परितो दिगन्तांस्तूर्यस्वने मूर्च्छति मङ्गलार्थे ॥ ९ ॥
मनुष्यवाह्यं चतुरन्तयानमध्यास्य कन्या परिवारशोभि ।
विवेश मञ्चान्तरराजमार्गं पतिंवरा कृतविवाहवेषा ॥ १० ॥

त्यानंतर जेथे राजांच्या कुलपरंपरेस जाणणाऱ्या स्तुतिपाठकांद्वारा चंद्रवंशीय आणि सूर्यवंशीय राजांचे स्तुतिगान होत होते, जेथे सुगंधी धूप फडफडणाऱ्यां पताकांवरून संचारत होता, ९. नगराच्या जवळच असणाऱ्या उपवनांमध्ये निवास करणाऱ्यां मोरांच्या उद्धतनृत्यास कारणीभूत अशा मेघध्वनीप्रमाणे शंखध्वनी जेथे होत होता, मंगलवाद्यांनी सर्व दिशा आणि आसमंत भरून चालला होता १०. त्याठिकाणी अर्थात मंचांच्या मध्यभागी असणाऱ्या राजमार्गावर पतीचे वरण करण्यास योग्य अशी, विवाहाची वेशभूषा धारण केलेली राजकुमारी इंदुमती, भोयांनी वाहून आणलेल्या, नातेवाईकांद्वारा सजविलेल्या मेण्यात बसून आली.

तस्मिन्विधानातिशये विधातुः कन्यामये नेत्रशतैकलक्ष्ये ।
निपेतुरन्तःकरणैर्नरेन्द्रा देहैः स्थिताः केवलमासनेषु ॥ ११ ॥

शेकडो डोळ्याचे एकमात्र लक्ष्य असलेल्या, विधात्याच्या त्या कन्यारूपी विशेष निर्मितीवर (इंदुमतीवर) राजे लोकांचे समूह अंतःकरणाने तुटून पडले (तिच्यावर

डोळे खिळून राहिले). ते केवळ शरीरानेच आपापल्या आसनांवर बसलेले होते. (सभेतील सर्वच राजांचे मन इंदुमतीने आपल्या सौंदर्याने स्वतःकडे खेचून घेतले होते.)

तां प्रत्यभिव्यक्तमनोरथानां महीपतीनां प्रणयाग्रदूत्यः ।
प्रवालशोभा इव पादपानां शृङ्गारचेष्टा विविधा बभूवुः ॥ १२ ॥

त्या इंदुमतीविषयी आपल्या मनातील भाव व्यक्त करणाऱ्या त्या राजे लोकांच्या प्रेमाचे निवेदन करणाऱ्या प्रथम दूतींच्या रूपातील विविध शृंगारिक क्रियांनी वृक्षाच्या नवीन पालवीची शोभा धारण केली.

कश्चित्कराभ्यामुपगूढनालमालोलपत्राभिहतद्विरेफम् ।
रजोभिरन्तःपरिवेषबन्धि लीलारविन्दं भ्रमयांचकार ॥ १३ ॥

कोणी एका राजाने आपल्या दोन्ही हातांनी धरलेल्या लीलाकमलाचे देठ अशाप्रकारे फिरवले की त्याच्या पाकळ्या हलल्यामुळे भुंगे दुखावले गेले आणि आत (परागकणांचे) एक सुंदर वलय तयार झाले.

विस्रस्तमंसादपरो विलासी रत्नानुविद्धाङ्गदकोटिलग्नम् ।
प्रालम्बमुत्कृष्य यथावकाशं निनाय साचीकृतचारुवक्त्रः ॥ १४ ॥

दुसऱ्या एका विलासी राजाने खांद्यावरून घसरलेली, रत्नजडित बाजूबंदाच्या टोकात अडकलेली, रत्नांची लांब माळ उचलून आपला चेहरा थोडा तिरका करत गळ्यात व्यवस्थित घातली.

आकुञ्चिताग्राङ्गुलिना ततोऽन्यः किञ्चित्समावर्जितनेत्रशोभः ।
तिर्यग्विसंसर्पिनखप्रभेण पादेन हैमं विलिलेख पीठम् ॥ १५ ॥

दुसरा कोणी एक राजा तिरके कटाक्ष टाकीत, वाकविलेल्या बोटाच्या नखाच्या तिरक्या दिशेने पसरणाऱ्या प्रभायुक्त चरणाने सोन्याचे पादपीठ कोरू लागला.

निवेश्य वामं भुजमासनार्धे तत्संनिवेशात् अधिकोन्नतांसः ।
कश्चिद्विवृत्तत्रिकभिन्नहारः सुहृत्समाभाषणतत्परोऽभूत् ॥ १६ ॥

कोणी एक राजा आपला डावा हात आसनाच्या बाजूवर ठेवून शेजारी बसलेल्या मित्राशी बोलण्यात दंग झाला. डावा हात आसनावर ठेवल्याने त्याचा खांदा जास्त उंच झाला त्यामुळे त्याच्या गळ्यातील हार वळून पाठीवर रुळू लागला.

विलासिनीविभ्रमदन्तपत्रमापाण्डुरं केतकबर्हमन्यः ।
प्रियानितम्बोचितसंनिवेशैर्विपाटयामास युवा नखाग्रैः ॥ १७ ॥

एक दुसरा तरुण आपल्या विलासिनी प्रियेच्या विलासासाठी असलेल्या कर्णकुंडलास केवड्याचे पान समजून प्रियतमेच्या नितंबावर चिह्नांकित करण्याचा सराव असणाऱ्या नखांच्या टोकांनी विदीर्ण करू लागला.

कुशेशयाताम्रतलेन कश्चित्करेण रेखाध्वजलाञ्छनेन ।
रत्नाङ्गुलीयप्रभयानुविद्धानुदीरयामास सलीलमक्षान् ॥ १८ ॥

कोणी एका राजाने कमळाप्रमाणे लालसर रेखारूपी ध्वजेच्या लक्षणांनी युक्त असणाऱ्या तळहाताने रत्नजडित अंगठीच्या प्रभेने झळकणाऱ्या द्यूताच्या सोंगट्या वर उडविल्या.

कश्चिद्यथाभागमवस्थितेऽपि स्वसंनिवेशाद्व्यतिलङ्घिनीव ।
वज्रांशुगर्भाङ्गुलिरन्ध्रमेकं व्यापारयामास करं किरीटे ॥ १९ ॥

कोणी एक राजा यथायोग्य स्थानी सुस्थित असूनही जणू आपल्या जागेहून सरकणाऱ्या मुकुटास एका हाताने सावरू लागला. त्यावेळी मुकुटात जडलेल्या रत्नांची आभा त्याच्या बोटांवर झळकू लागली.

ततो नृपाणां श्रुतवृत्तवंशा पुंवत्प्रगल्भा प्रतिहाररक्षी ।
प्राक्संनिकर्षं मगधेश्वरस्य नीत्वा कुमारीमवदत्सुनन्दा ॥ २० ॥

त्यानंतर राजांचे चरित्र, कुळ आणि शील जाणणारी, पुरुषाप्रमाणे प्रगल्भ, सुनन्दा नावाची द्वारपालिका सर्वप्रथम मगधाधिपतीच्या जवळ राजकन्या इंदुमतीला नेऊन म्हणाली.

असौ शरण्यः शरणोन्मुखानामगाधसत्त्वो मगधप्रतिष्ठः ।
राजा प्रजारञ्जनलब्धवर्णः परन्तपो नाम यथार्थनामा ॥ २१ ॥

हा राजा शरण आलेल्यांना सुरक्षा देण्याकरिता समर्थ असून, अत्यंत गम्भीर स्वभावाचा (अत्यंत बलशाली) आहे. तो म्हणजे मगध साम्राज्याची प्रतिष्ठा आहे. प्रजेच्या अनुरंजनात निपुण, स्वतःच्या नावास सार्थ करणारा हा राजा शत्रूना संताप देणारा असल्याने याचे परंतप हे नाव यथार्थ आहे.

कामं नृपाः सन्तु सहस्रशोऽन्ये राजन्वतीमाहुरनेन भूमिम् ।
नक्षत्रताराग्रहसंकुलापि ज्योतिष्मती चन्द्रमसैव रात्रिः ॥ २२ ॥

इतर अनेक राजे असले तरी लोक पृथ्वीला राजन्वती (सुराजयुक्ता) याच्यामुळेच म्हणतात. जसे नक्षत्र, तारकांचे समूह, ग्रह यांनी युक्त असली तरी चंद्रामुळेच रात्र 'ज्योतिष्मती' म्हणवली जाते.

क्रियाप्रबन्धादयमध्वराणामजस्रमाहूतसहस्रनेत्रः ।
शच्याश्चिरं पाण्डुकपोललम्बान्मन्दारशून्यानलकांश्चकार ॥ २३ ॥

याने सातत्याने यज्ञानुष्ठान करून सहस्रनेत्रधारी इंद्राचे आपल्या यज्ञांमध्ये आवाहन केल्याने इंद्रपत्नी शचीच्या गोऱ्या गालांवर रुळणाऱ्या केसांना मंदारपुष्पांनी विरहित केले.

अनेन चेदिच्छसि गृह्यमाणं पाणिं वरेण्येन कुरु प्रवेशे ।
प्रासादवातायनसंस्थितानां नेत्रोत्सवं पुष्पपुराङ्गनानाम् ॥ २४ ॥

वरण्यास योग्य अशा राजा परंतपाचे पाणिग्रहण करू इच्छित असशील तर (विवाहानंतर) त्याच्या राजधानीत प्रवेश करते वेळी राजमहालाच्या खिडक्यांजवळ बसलेल्या सुंदर स्त्रियांच्या नयनांना तू सुख दे.

एवं तयोक्ते तमवेक्ष्य किंचिद्विस्रंसिदूर्वाङ्कमधूकमाला ।
ऋजुप्रणामक्रिययैव तन्वी प्रत्यादिदेशैनमभाषमाणा ॥ २५ ॥

अशाप्रकारे सुनंदेने सांगितल्यावर त्या परंतपराजास पाहून काहीशा विकीर्ण झालेल्या दूर्वांनी चिह्नांकित असलेली मधूकपुष्पांची माळा हातात घेतलेली इंदुमती त्याच्याशी काहीही न बोलता भावशून्य दृष्टीने नमन करून पुढे निघाली.

तां सैव वेत्रग्रहणे नियुक्ता राजान्तरं राजसुतां निनाय ।
समीरणोत्थेव तरङ्गरेखा पद्मान्तरं मानसराजहंसीम् ॥ २६ ॥
जगाद चैनामयमङ्गनाथः सुराङ्गनाप्रार्थितयौवनश्रीः ।
विनीतनागः किल सूत्रकारैरैन्द्रं पदं भूमिगतोऽपि भुङ्क्ते ॥ २७ ॥

ज्याप्रकारे वाऱ्याच्या झुळकेने हालवलेली तरंगांची मालिका मानसरोवरातील राजहंसींना दुसऱ्या कमळाजवळ घेऊन जाते त्याप्रकारेच द्वारपालिका म्हणून नियुक्त केलेली सुनंदा राजकुमारी इंदुमतीला दुसऱ्या राजाजवळ घेऊन गेली.

आणि म्हणाली, हा अंग देशाचा अधीश्वर आहे. देवांगनांनाही याच्या सौंदर्याची अभिलाषा आहे. इतिहासातही नोंद घेतलेली आहे की, गजशास्त्राच्या जाणकारांद्वारा याचे हत्ती प्रशिक्षित केलेले आहेत. त्यामुळे पृथ्वीवर राहत असून देखील इंद्रपदाचे सुख हा उपभोगत आहे.

अनेन पर्यासयताश्रुबिन्दून्मुक्ताफलस्थूलतमान्स्तनेषु ।
प्रत्यर्पिताः शत्रुविलासिनीनामुन्मुच्य सूत्रेण विनैव हाराः ॥ २८ ॥

(युद्धात याच्याद्वारा शत्रूचा संहार झाल्यामुळे) शत्रूच्या विलासिनी स्त्रियांच्या वक्षस्थलावर मोत्यांप्रमाणे टपोऱ्या अश्रुबिंदूंना पसरवणाऱ्या या राजाने त्यांच्या गळ्यातील मोत्यांची माळा वैधव्यामुळे उतरवून सूत्राविनाच केवळ अश्रुबिंदूंचेच हार घातलेत.

निसर्गभिन्नास्पदमेकसंस्थमस्मिन्द्वयं श्रीश्च सरस्वती च ।
कान्त्या गिरा सूनृतया च योग्या त्वमेव कल्याणि तयोस्तृतीया ॥ २९ ॥

मुळातच भिन्न भिन्न स्थानी आश्रय घेणाऱ्या लक्ष्मी आणि सरस्वती या दोघी या राजाजवळ एकत्रच नांदतात. हे कल्याणी ! आपल्या शारीरिक सौंदर्याच्या आभेने आणि सत्यप्रिय वाणीने तू या दोघींना अनुगुण आहेस त्यामुळे तू यांच्यात तिसरी हो.

अथाङ्गराजादवतार्य चक्षुर्याहीति जन्यामवदत्कुमारी ।
नासौ न काम्यो न च वेद सम्यग्द्रष्टुं न सा भिन्नरुचिर्हि लोकः ॥ ३० ॥

सुनंदेचे बोलणे ऐकल्यावर इंदुमती त्या अंगराजावरची आपली दृष्टी फिरवून दुसऱ्या ठिकाणी चल असे सुनंदेस म्हणाली. हा राजा तेजस्वी नाही असे नाही आणि इंदुमती चांगल्या रीतीने पाहू शकत नाही असेही नाही. परंतु मनुष्याची आवड वेगवेगळी असते हेच खरे.

ततः परं दुःप्रसहं द्विषद्भिर्नृपं नियुक्ता प्रतिहारभूमौ ।
निदर्शयामास विशेषदृश्यमिन्दुं नवोत्थानमिवेन्दुमत्यै ॥ ३१ ॥

त्यानंतर द्वारपालिकेच्या पदी नियुक्त सुनंदेने शत्रूद्वारा असहनीय असा, शूर, विशेषत्वाने पाहण्याजोगा, नव्यानेच उदय पावणाऱ्या चंद्राप्रमाणे असणारा दुसरा एक राजा इंदुमतीला दाखविला.

अवन्तिनाथोऽयमुदग्रबाहुर्विशालवक्षास्तनुवृत्तमध्यः ।
आरोप्य चक्रभ्रममुष्णतेजास्त्वष्ट्रेव यत्नोल्लिखितो विभाति ॥ ३२ ॥

दीर्घ बाहू असलेला, रुंद वक्षस्थल असलेला, सिंहकटी असणारा हा अवंती देशाचा स्वामी आहे. हा विश्वकर्माद्वारा चक्राप्रमाणे तीक्ष्ण अशा यंत्रावर ठेवून प्रयत्नपूर्वक पैलू पाडलेल्या सूर्यासारखा तळपत आहे. (**टीप.** - विश्वकर्माच्या कन्येचा विवाह सूर्यासोबत झाल्यावर, त्याची कन्या संज्ञा सूर्याचे तेज सहन करण्यास समर्थ न्वहती म्हणून तिच्या प्रार्थनेनुसार विश्वकर्मा शाकद्वीपात सूर्याला चक्राप्रमाणे तीक्ष्ण अशा यंत्रावर ठेवून प्रयन्तपूर्वक त्याला लहान करतो अशी पौराणिक कथा आहे.)

अस्य प्रयाणेषु समग्रशक्तेरग्रेसरैर्वाजिभिरुत्थितानि ।
कुर्वन्ति सामन्तशिखामणीनां प्रभाप्ररोहास्तमयं रजांसि ॥ ३३ ॥

सर्व शक्तींनी युक्त अशा या राजाच्या विजय मोहिमेच्या वेळी अग्रभागी असणाऱ्या घोड्यांद्वारा उडविलेल्या धुळीच्या राशी मांडलिक राजांच्या मस्तकावरील रत्नांची आभा नाहीशा करतात. (राजांना निस्तेज करतात.)

असौ महाकालनिकेतनस्य वसन्नदूरे किल चन्द्रमौलेः ।
तमिस्रपक्षेऽपि सहप्रियाभिर्ज्योत्स्नावतो निर्विशति प्रदोषान् ॥ ३४ ॥

हा अवंतिनरेश महाकालाच्या मंदिरात निवास करणाऱ्या भगवान शंकराच्या जवळ निवास करतो. त्यामुळे कृष्णपक्षात देखील (शंकराच्या जटेवरील चंद्रकोरीच्या प्रकाशामुळे) आपल्या प्रेयसींसह चांदण्या रात्रीचा आनंद उपभोगतो. (भगवान शंकराचे सांन्निध्य याला प्राप्त झाले आहे.)

अनेन यूना सह पार्थिवेन रम्भोरु कच्चिन्मनसो रुचिस्ते ।
सिप्रातरङ्गानिलकम्पितासु विहर्तुमुद्यानपरम्परासु ॥ ३५ ॥

हे रंभोरु ! या तरुण पृथ्वीपतीसह क्षिप्रानदीच्या प्रवाहावरून वाहणाऱ्या वाऱ्याने हालविल्या जाणाऱ्या उद्यान रांगांमध्ये विहार करण्याची तुझी मनापासून इच्छा आहे काय ?

तस्मिन्नभिद्योतितबन्धुपद्मे प्रतापसंशोषितशत्रुपङ्के ।
बबन्ध सा नोत्तमसौकुमार्या कुमुद्वती भानुमतीव भावम् ॥ ३६ ॥

ज्याप्रमाणे आपल्या बंधूरूपी कमळांना प्रफुल्लित करणाऱ्या, आपल्या प्रचंड तापाने शत्ररूप चिखलाला सुकविणाऱ्या अशा सूर्याविषयी कुमुदिनीला आकर्षण वाटत नाही त्याप्रमाणे अतिशय सुकुमार त्या राजकुमारी इंदुमतीच्या मनात त्या अवंतिनरेशाविषयी प्रेमभाव निर्माण झाला नाही. (सुकुमार कुमुदिनी ही चंद्रविकासी असते. तिला सूर्याचा दाह असहनीय असतो, सूर्याच्या उष्णतेने कुमुदिनीला पोषक अशा चिखलाचा नाश होतो हे ही तिच्याकरिता क्लेशकारक असते. त्यामुळे शत्रूंना नष्ट करणाऱ्या अत्यंत दाहक तेजाने युक्त अशा अवंतिनरेशाबाबत कुमुदिनीप्रमाणे असलेल्या इंदुमतीला आकर्षण वाटले नाही.)

तामग्रतस्तामरसान्तराभामनूपराजस्य गुणैरनूनाम् ।
विधाय सृष्टिं ललितां विधातुर्जगाद भूयः सुदतीं सुनन्दा ॥ ३७ ॥

ती सुनंदा कमळाच्या मध्यभागाच्या रंगाच्या आभेप्रमाणे कांती असणाऱ्या, परमगुणशालिनी, सुंदर दात असणाऱ्या, ब्रह्मदेवाची सुमधुर निर्मिती असलेल्या त्या इंदुमतीला अनुपम सुंदर अशा अनूप देशाच्या राजापुढे आणून पुन्हा बोलली.

सङ्ग्रामनिर्विष्टसहस्रबाहुरष्टादशद्वीपनिखातयूपः ।
अनन्यसाधारणराजशब्दो बभूव योगी किल कार्तवीर्यः ॥ ३८ ॥

युद्धभूमीत हजारो हात असल्याचा अनुभव घेणारा, अठरा द्वीपांमध्ये विजयाचे प्रतीक म्हणून यज्ञ स्तंभ रोवणारा, असामान्य, अद्वितीय, प्रजानुरंजनकारी असल्याने राजा शब्दाने गौरवान्वित, योगी असा कृतवीर्याचा पुत्र कार्तवीर्य जन्मास आला.

अकार्यचिन्तासमकालमेव प्रादुर्भवंश्चापधरः पुरस्तात् ।
अन्तःशरीरेष्वपि यः प्रजानां प्रत्यादिदेशाविनयं विनेता ॥ ३९ ॥

(तो कार्तवीर्य राजा) प्रजाजनांच्या मनात अयोग्य अशा कृत्याचा केवळ विचार जरी आला तरी त्यांच्यापुढे धनुष्य धारण करून प्रकट होऊन लोकांच्या अंतःकरणातील (बुद्धी, मन आणि चित्तातील) अपराधांचे निवारण करीत असे.

ज्याबन्धनिष्पन्दभुजेन यस्य विनिःश्वसद्वक्त्रपरम्परेण ।
कारागृहे निर्जितवासवेन लङ्केश्वरेणोषितमा प्रसादात् ॥ ४० ॥

इंद्रालाही पराभूत करणारा लंकेश्वर रावण धनुष्याच्या प्रत्यंचेने बांधल्यामुळे बाहू न हालविता, बंधनात असल्यामुळे दहाही मुखांनी धापा टाकत, कार्तवीर्य प्रसन्न होईपर्यंत त्याच्या कारागृहात बंदी म्हणून राहिला होता.

तस्यान्वये भूपतिरेष जातः प्रतीप इत्यागमवृद्धसेवी ।
येनः श्रियः संश्रयदोषरूढं स्वभावलोलेत्ययशं प्रमृष्टम् ॥ ४१ ॥

शास्त्रपारंगत असून वृद्धांची सेवा करणारा, प्रतीप नावाचा हा भूपाल त्याच कार्तवीर्याच्या कुळात उत्पन्न झाला आहे. याने आश्रयसंसर्गाच्या दोषाने उत्पन्न लक्ष्मीच्या स्वभावतः चंचल असण्याच्या दोषाचे परिमार्जन केले. (लक्ष्मीचा चांचल्याचा दोष दूर करून त्याने तिला आपल्याजवळ स्थिर केले.)

आयोधने कृष्णगतिं सहायमवाप्य यः क्षत्रियकालरात्रिम् ।
धारां शितां रामपरश्वधस्य संभावयत्युत्पलपत्रसाराम् ॥ ४२ ॥

या प्रतीप राजाला युद्धप्रसंगी अग्नीचे साहाय्य प्राप्त होत असल्यामुळे परशुरामाच्या परशूच्या क्षत्रियांकरिता काळरात्रीसारख्या विनाशकारिणी असणाऱ्या तीक्ष्ण धारेस ही हा कमळाच्या पाकळीच्या धारेप्रमाणे मृदू मानतो.

अस्याङ्कलक्ष्मीर्भव दीर्घबाहोर्माहिष्मतीवप्रनितम्बकाञ्चीम् ।
प्रासादजालैर्जलवेणिरम्यां रेवां यदि प्रेक्षितुमस्ति कामः ॥ ४३ ॥

जर तुला माहिष्मतीच्या कंबरपट्ट्याच्या स्वरूपात असलेल्या रेवा नदीचा रमणीय जलप्रवाह राजप्रासादाच्या खिडक्यांमधून पाहण्याची कामना असेल तर या विशालबाहू प्रतीपाची अंकलक्ष्मी (पत्नी) हो.

तस्याः प्रकामं प्रियदर्शनोऽपि न स क्षितीशो रुचये बभूव ।
शरत्प्रमृष्टाम्बुधरोपरोधः शशीव पर्याप्तकलो नलिन्याः ॥ ४४ ॥

शरद ऋतूत मेघरूपी आवरणास दूर सारले असताही कमलिनीस तो संपूर्ण कलांनी युक्त चंद्र रुचत नाही त्याप्रमाणे अत्यंत प्रियदर्शन असून देखील तो राजा त्या इंदुमतीला रुचला नाही.

सा शूरसेनाधिपतिं सुषेणमुद्दिश्य लोकान्तरगीतकीर्तिम् ।
आचारशुद्धोभयवंशदीपं शुद्धान्तरक्ष्या जगदे कुमारी ॥ ४५ ॥

राजाच्या अंतःपुराचे संरक्षण करणारी ती सुनंदा त्या राजकुमारी इंदुमतीस शूरसेन देशाचा अधीश्वर असलेल्या सुषेण नावाच्या राजास दाखवित म्हणाली, हा आपल्या सदाचरणाने माता आणि पित्याच्या कुळांना पवित्र करणारा तेजोमय कुलदीपक आहे. याच्या कीर्तीचे अन्य लोकातही गान होत असते.

नीपान्वयः पार्थिव एष यज्वा गुणैर्यमाश्रित्य परस्परेण ।
सिद्धाश्रमं शान्तमिवेत्य सत्त्वैर्नैसर्गिकोऽप्युत्ससृजे विरोधः ॥ ४६ ॥

शास्त्रीय पद्धतीने यज्ञ करणारा हा पृथ्वीपती नीप नावाच्या वंशात उत्पन्न झाला आहे. ज्याप्रमाणे शांत सिद्धांच्या आश्रमात येऊन हत्ती आणि सिंह इत्यादी हिंस्र पशू पारस्परिक शाश्वत वैरभाव त्यागतात त्याप्रमाणेच या सुषेणाचा आश्रय घेऊन ज्ञान आणि मौन इत्यादी सद्गुणांनी अथवा सत्त्व, रज आणि तम या गुणांनी परस्परांमधील स्वाभाविक विरोध त्यागला आहे.

यस्यात्मगेहे नयनाभिरामा कान्तिर्हिमांशोरिव संनिविष्टा ।
हर्म्याग्रसंरूढतृणाङ्कुरेषु तेजोऽविषह्यं रिपुमन्दिरेषु ॥ ४७ ॥

शीतल किरण देणाऱ्या चंद्राच्या कांतीप्रमाणे ज्याची अत्यंत आह्लादकारिणी शोभा स्वतःच्या घरात प्रविष्ट झाली आणि ज्याचे असहनीय असे तेज शत्रूच्या नगरातील धनिकांच्या घराच्या आंगणातील गवताच्या टोकांवर पडले. (ज्याचे शत्रू नष्ट झाले आहेत असा हा राजा आहे.)

यस्यावरोधस्तनचन्दनानां प्रक्षालनाद्वारिविहारकाले ।
कलिन्दकन्या मथुरां गतापि गङ्गोर्मिसंसक्तजलेव भाति ॥ ४८ ॥

ज्या सुषेण राजाच्या जलक्रीडेच्या वेळी अंतःपुरातील स्त्रियांच्या वक्षस्थळावर लेपलेले चंदन धुतले गेल्यामुळे कलिंद पर्वताची कन्या कालिंदी मथुरेतच असताही गंगेच्या प्रवाहाशी संगम झाल्याप्रमाणे सुशोभित होते. (या राजाच्या अंतःपुरात अनेकानेक स्त्रिया आहेत त्या आपल्या वक्षस्थळावर चंदनाची उटी लावतात, त्या सगळ्या या सुषेणासह जलक्रीडेकरिता यमुनेत येतात जलक्रीडा करताना त्यांची चंदनाची उटी पाण्यात मिसळल्याने यमुनेचे मुळात काळसर पाणी पांढरे होत असल्याने तो प्रवाह अस्थानीही गंगेशी संगमित झाल्याप्रमाणे सुंदर दिसतो.)

त्रस्तेन ताक्ष्र्यात्किल कालियेन मणिं विसृष्टं यमुनौकसा यः ।
वक्षःस्थलव्यापिरुचं दधानः सकौस्तुभं क्षेपयतीव कृष्णम् ॥ ४९ ॥

यमुनेच्या डोहात राहणाऱ्या, गरुडाद्वारा त्रस्त झालेल्या कालियानागाने त्यास रत्न दिले हे इतिहास प्रसिद्धच आहे. ते रत्न आपल्या वक्षस्थळावर धारण केल्याने ज्याचे वक्षस्थळ कान्तिमान झाले आहे त्यामुळे जणू कौस्तुभमणी धारण करणाऱ्या श्रीकृष्णालाही ज्याने लाजविले आहे.

संभाव्य भर्तारममुं युवानं मृदुप्रवालोत्तरपुष्पशय्ये ।
वृन्दावने चैत्ररथादनूने निर्विश्यतां सुन्दरि यौवनश्रीः ॥ ५० ॥

अशा या तरुण सुषेणाचा (तू) पती म्हणून स्वीकार केल्यास कुबेराच्या चैत्ररथ उद्यानाहून कोणत्याही बाबतीत काहीही कमी नसलेल्या अशा (या राजाच्या) वृंदावन नामक उद्यानात कोमल पालवीरूपी चादरीने आच्छादित पुष्पमय शय्या असलेल्या त्या ठिकाणी हे सुंदरी! यौवनाच्या मनोरमतेचा उपभोग घे.

अध्यास्य चाम्भःपृषतोक्षितानि शैलेयगन्धीनि शिलातलानि ।
कलापिनां प्रावृषि पश्य नृत्यं कान्तासु गोवर्धनकन्दरासु ॥ ५१ ॥

आणि वर्षा ऋतूत रम्य अशा गोवर्धनपर्वताच्या गुहांमध्ये जलबिंदूंनी ओलसर झालेल्या शैलेयगंधी शिलांवर बसून मोरांचे मनोरम नृत्य पाहा.

नृपं तमावर्तमनोज्ञनाभिः सा व्यत्यगादन्यवधूर्भवित्री ।
महीधरं मार्गवशादुपेतं स्रोतोवहा सागरगामिनीव ॥ ५२ ॥

ज्याप्रमाणे पाण्यातील भोवरारूपी सुंदर नाभी असलेली, धारांनी प्रवाहित होणारी, समुद्राच्या दिशेने जाणारी नदी तिच्या वाटेत आलेल्या पर्वताला ओलांडून पुढे निघून जाते त्याप्रमाणे जलप्रवाहातील भोवऱ्याप्रमाणे नाभी असणारी, दुसऱ्याची पत्नी होणारी ती इंदुमती त्या राजाला सोडून पुढे निघून गेली.

अथाङ्गदाश्लिष्टभुजं भुजिष्या हेमाङ्गदं नाम कलिङ्गनाथम् ।
आसेदुषीं सादितशत्रुपक्षं बालामबालेन्दुमुखीं बभाषे ॥ ५३ ॥

त्यानंतर बाजूबंदांनी युक्त अशा भुजा असलेल्या, शत्रुपक्षाचा विनाश करणाऱ्या हेमांगद नावाच्या कलिंगदेशाच्या राजाजवळ जाऊन पूर्णचंद्राप्रमाणे सुंदर मुख असणाऱ्या त्या बाला इंदुमतीला दासी सुनंदा म्हणाली.

असौ महेन्द्राद्रिसमानसारः पतिर्महेन्द्रस्य महोदधेश्च ।
यस्य क्षरत्सैन्यगजच्छलेन यात्रासु यातीव पुरो महेन्द्रः ॥ ५४ ॥

महेंद्र नावाच्या कुलपर्वताप्रमाणे बलशाली हा हेमांगद नावाचा राजा महेंद्रकुलाचल आणि महासागराचा स्वामी आहे. ज्याच्या विजययात्रेच्या वेळी (युद्धप्रसंगी) सेनेसह असणाऱ्या, मदस्राव करणाऱ्या हत्तींच्या रूपाने जणू काही महेंद्रपर्वतच पुढे चालत असतो.

ज्याघातरेखे सुभुजो भुजाभ्यां बिभर्ति यश्चापभृतां पुरोगः ।
रिपुश्रियां साञ्जनबाष्पसेके बन्दीकृतानामिव पद्धती द्वे ॥ ५५ ॥

बलशाली बाहू असलेला, धनुर्धाऱ्यांमध्ये अग्रगामी असा हा हेमांगद बंदी बनविलेल्या शत्रूंच्या राजलक्ष्मीच्या काजळयुक्त अश्रूंनी भिजलेल्या मार्गाप्रमाणे असणारे, प्रत्यंचा खेचून तयार झालेले दोन घट्टे दोन्ही हातांवर धारण करतो.

यमात्मनः सद्मनि संनिकृष्टो मन्द्रध्वनित्याजितयामतूर्यः ।
प्रासादवातायनदृश्यवीचिः प्रबोधयत्यर्णव एव सुप्तम् ॥ ५६ ॥

ज्याच्या लाटा राजप्रासादाच्या खिडक्यातून पाहता येऊ शकतात आणि ज्याने आपल्या गंभीर ध्वनीने प्रहर संपल्याची सूचना देणाऱ्या वाद्यांना बंद केले आहे असा महासागरच, स्वतःच्या राजप्रासादात झोपलेल्या या हेमांगद राजाला जागे करतो.

अनेन सार्धं विहराम्बुराशेस्तीरेषु तालीवनमर्मरेषु ।
द्वीपान्तरानीतलवङ्गपुष्पैरपाकृतस्वेदलवा मरुद्भिः ॥ ५७ ॥

या हेमांगद राजासह (विवाह करून) (त्याच्या राज्यातील) तालवृक्षांच्या राईत तू विहार कर. त्याठिकाणी मर्मर असा आवाज करणा-या समुद्राच्या किनाऱ्यावर (लाटांचा सुमधुर आवाज येत असेल), अन्य द्वीपातून लवंगलतेच्या फुलांना वाहून आणणारा (आह्लादक असा) वायू तुझ्या घर्मबिंदूंना पुसून टाकेल.

प्रलोभिताप्याकृतिलोभनीया विदर्भराजावरजा तयैवम् ।
तस्मादपावर्तत दूरकृष्टा नीत्येव लक्ष्मीः प्रतिकूलदैवात् ॥ ५८ ॥

ज्याप्रमाणे पुरुषार्थाच्या बळावर बऱ्याच दूरवर खेचून आणलेली लक्ष्मी प्रतिकूल भाग्य असणाऱ्या पुरुषास प्राप्त होऊनही त्याला सोडून जाते त्याप्रमाणेच त्या सुनंदादासीद्वारा पूर्वी सांगितलेल्या माहितीने जिच्या ठायी प्रलोभन उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला गेला अशी आपल्या आकृतीने मोहविणारी, विदर्भराज भोजाची धाकटी बहीण इंदुमती हेमांगदाच्या जवळ येऊनही विपरीत भाग्यामुळे त्याला सोडून पुढे निघून गेली.

अथोरगाख्यस्य पुरस्य नाथं दौवारिकी देवसरूपमेत्य ।
इतश्चकोराक्षि विलोकयेति पूर्वानुशिष्टां निजगाद भोज्याम् ॥ ५९ ॥

त्यानंतर द्वारपालिका सुनंदा देवतेप्रमाणे सुंदर, रूपवान, उरगनावाच्या नगराच्या (म्हणजेच कन्नौजजवळील नागपुरच्या) स्वामीजवळ येऊन, 'हे चकोराच्या नेत्रांप्रमाणे नेत्र असणाऱ्या इंदुमती ! त्याच्याकडे पाहा असे पूर्वी वर्णिलेल्या भोजवंशातल्या राजकुमारीला पुन्हा म्हणाली.

पाण्ड्योऽयमंसार्पितलम्बहारः क्लृप्ताङ्गरागो हरिचन्दनेन ।
आभाति बालातपरक्तसानुः सनिर्झरोद्गार इवाद्रिराजः ॥ ६० ॥

ज्याप्रमाणे प्रातःकालीन सूर्याच्या लालसर किरणांनीं लालिमा प्राप्त झालेल्या शिखरांनी आणि धबधब्यांच्या प्रवाहाने पर्वतराज शोभून दिसावा त्याप्रमाणे आपल्या खांद्यावर लटकणाऱ्या दीर्घ माळा धारण करणारा, हरिचंदनाचा लेप धारण करणारा हा पाण्डुदेशाचा राजा शोभून दिसतो आहे.

विन्ध्यस्य संस्तम्भयिता महाद्रेर्निःशेषपीतोज्झितसिन्धुराजः ।
प्रीत्याश्वमेधावभृथार्द्रमूर्तेः सौस्नातिको यस्य भवत्यगस्त्यः ॥ ६१ ॥

विंध्य पर्वताला अडविणारे, संपूर्ण सागरांचे आचमन करून पुन्हा उत्सर्जित करणारे (असे अगाध सामर्थ्य असणारे) अगस्त्यमुनी अश्वमेध यज्ञाच्या समाप्तीच्या

वेळी अवभृथ स्नानाने ओले शरीर असलेल्या ज्या पाण्ड्य नरेशाची 'आपण सुस्नात झालात' अशी प्रेमाने विचारपूस करतात. (असा हा श्रेष्ठ राजा आहे.)

अस्त्रं हरादाप्तवता दुरापं येनेन्द्रलोकावजयाय दृप्तः ।
पुरा जनस्थानविमर्दशङ्की संधाय लङ्काधिपतिः प्रतस्थे ॥ ६२ ॥

पूर्वीच्या काळी (खर आणि दूषणांच्या ताब्यातील) जनस्थानाच्या विनाशाच्या शंकेने लंकाधीश्वर उद्धट रावणाने शिवाकडून (शिवाराधना करून) दुर्लभ अशा अस्त्राची प्राप्ती करून घेणाऱ्या, ज्या पाण्ड्य नरेशाशी संधी करून इंद्रलोकास जिंकण्यासाठी प्रस्थान केले. (रावणालाही ज्याच्या साहाय्याची अपेक्षा आहे असा हा श्रेष्ठ, बलवान राजा आंहे.)

अनेन पाणौ विधिवद्गृहीते महाकुलीनेन महीव गुर्वी ।
रत्नानुविद्धार्णवमेखलाया दिशः सपत्नी भव दक्षिणस्याः ॥ ६३ ॥

या उत्तम कुळात जन्मास आलेल्या सज्जन अशा पाण्ड्य नरेशाशी विवाह करून तू विशाल पृथ्वीप्रमाणे रत्नांनी परिपूर्ण सागराची मेखला असलेल्या दक्षिण दिशेची सपत्नी हो. (या राजाशी विवाह करणारी तू पहिलीच आहेस तुला कोणीही सवत नाही याचा हा प्रथमच विवाह आहे त्यामुळे याला तू अत्यंत प्रिय होशील.)

ताम्बूलवल्लीपरिणद्धपूगास्वेलालतालिङ्गितचन्दनासु ।
तमालपत्रास्तरणासु रन्तुं प्रसीद शश्वन्मलयस्थलीषु ॥ ६४ ॥

(याच्याशी विवाह करून तू) जेथे पानांच्या वेलींनी वेढलेल्या सुपारीच्या बागा आहेत, वेलदोड्याच्या वेलींनी अलिंगन दिलेले चंदनवृक्ष आहेत अशा, तमालवृक्षांची चादर पांघरलेल्या अशा मलय पर्वताच्या वनराजीत सदैव रमण करण्याकरिता प्रसन्न हो. (आनंदानें तयार हो.)

इन्दीवरश्यामतनुर्नृपोऽसौ त्वं रोचनागौरशरीरयष्टिः ।
अन्योन्यशोभापरिवृद्धये वां योगस्तडित्तोयदयोरिवास्तु ॥ ६५ ॥

नीलकमळाप्रमाणे श्यामल रंगाचा हा देखणा पाण्ड्यनरेश आणि गौरवर्णीय तू असे तुम्ही दोघेही वीज आणि मेघाप्रमाणे परस्परांचे सौंदर्य वाढविणारे व्हा.

स्वसुर्विदर्भाधिपतेस्तदीयो लेभेऽन्तरं चेतसि नोपदेशः ।
दिवाकरादर्शनबद्धकोशे नक्षत्रनाथांशुरिवारविन्दे ॥ ६६ ॥

ज्याप्रमाणे सूर्यदर्शन न झाल्याने न उमललेल्या कमळात नक्षत्रांच्या स्वामीची (चंद्राची) किरणे प्रवेश करू शकत नाहीत त्याप्रमाणे विदर्भाधिपतीच्या बहिणीच्या (इंदुमतीच्या) मनात सुनंदेचे बोलणे शिरू शकले नाही.

संचारिणी दीपशिखेव रात्रौ यं यं व्यतीयाय पतिंवरा सा ।
नरेन्द्रमार्गाट्ट इव प्रपेदे विवर्णभावं स स भूमिपालः ॥ ६७ ॥

पतीला वरू इच्छिणारी ती इंदुमती रात्री (राजप्रासादांपुढून) संचार करणाऱ्या दीपशिखेसारखी (मशालीच्या ज्योतीप्रमाणे) ज्या ज्या म्हणून राजाला नाकारून पुढे निघाली तो तो राजा राजमार्गावरील राजप्रासादाप्रमाणे काळवंडला. (रात्रीच्यावेळी मशाल पुढे निघून गेल्यामुळे काळोखात आलेल्या राजवाड्याप्रमाणे इंदुमतीने नाकारल्यामुळे हताश होऊन विवर्ण झाला. या वर्णनामुळेच महाकवी कालिदासाला **'दीपशिखा** कालिदास' अशी उपाधी प्राप्त झाली.)

तस्यां रघोः सूनुरुपस्थितायां वृणीत मां नेति समाकुलोऽभूत् ।
वामेतरः संशयमस्य बाहुः केयूरबन्धोच्छ्वसितैर्ननोद ॥ ६८ ॥

पतीला वरू इच्छिणारी ती इंदुमती जवळ येऊन थांवल्याने रघूचा पुत्र अज 'ही मला वरेल की नाही' या शंकेने व्याकुळ झाला. त्यावेळी त्याचा उजवा हात

बाजुबंदाच्या जागी स्फुरण पावल्याने त्याच्या मनातील संशय दूर झाला. (उजवा हात स्फुरण पावणे हा शुभशकुन झाल्यामुळे त्याला विश्वास वाटू लागला की मलाच वरेल.)

तं प्राप्य सर्वावयवानवद्यं व्यावर्ततान्योपगमात्कुमारी ।
न हि प्रफुल्लं सहकारमेत्य वृक्षान्तरं काङ्क्षति षट्पदाली ॥ ६९ ॥

ती राजकुमारी इंदुमती इतर राजांकडे न जाता सर्वांग सुंदर (पूर्ण निर्दोष) त्या अजराजा जवळ येऊन थांबली कारण भ्रमरांची रांग मोहरलेल्या आंब्याच्या वृक्षाजवळ आल्यावर इतर वृक्षाची कामना करीत नाही.

तस्मिन्समावेशितचित्तवृत्तिमिन्दुप्रभामिन्दुमतीमवेक्ष्य ।
प्रचक्रमे वक्तुमनुक्रमज्ञा सविस्तरं वाक्यमिदं सुनन्दा ॥ ७० ॥

त्या अजराजावर मन जडलेल्या, चंद्राच्या कांतीप्रमाणे कांती असलेल्या त्या इंदुमतीला पाहून राजांच्या वंशावळींचे ज्ञान असलेल्या (पूर्वापर वाक्यांच्या क्रमाचे ज्ञान असलेल्या) सुनंदेने सविस्तर बोलण्यास सुरुवात केली.

इक्ष्वाकुवंश्यः ककुदं नृपाणां ककुत्स्थ इत्याहितलक्षणोऽभूत् ।
काकुत्स्थशब्दं यत उन्नतेच्छाः श्लाघ्यं दधत्युत्तरकोसलेन्द्राः ॥ ७१ ॥

इक्ष्वाकु वंशातील राजांमध्ये श्रेष्ठ, वाखाणण्याजोग्या गुणांनी युक्त असा ककुत्स्थ नावाचा प्रसिद्ध राजा झाला, ज्यामुळे महत्वाकांक्षी उत्तरकोसल प्रदेशाचे इंद्र (स्वामी, प्रशासनकर्ते) दिलीपादी राजे प्रसिद्ध काकुत्स्थ हे नाम धारण करतात. (ते नाम धारण करणे हे वंशजास प्रतिष्ठेचे, कीर्तिकर आहे.)

महेन्द्रमास्थाय महोक्षरूपं यः संयति प्राप्तपिनाकिलीलः ।
चकार बाणैरसुराङ्गनानां गण्डस्थलीः प्रोषितपत्रलेखाः ॥ ७२ ॥

युद्धात ककुत्स्थ राजाने वृषभाचे रूप धारण केलेल्या महेंद्रावर बसून भगवान शंकरांप्रमाणे लीला करीत बाणांनी दैत्यांच्या स्त्रियांच्या गालांना पत्ररचनाविरहित (साज शृंगार, प्रसाधनरहित केले.) केले. (युद्धात केवळ बाणांच्या साहाय्याने दैत्यांचा संहार करून त्यांच्या स्त्रियांना विधवा केले त्यामुळे त्या प्रसाधन करू शकल्या नाहीत.)

ऐरावतस्फालनविक्लथं यः संघट्टयन्नङ्गदमङ्गदेन ।
उपेयुषः स्वामपि मूर्तिमग्र्यामर्धासनं गोत्रभिदोऽधितष्ठौ ॥ ७३ ॥

(हा राजा ककुत्स्थ) ऐरावताला (नियंत्रणात आणण्यासाठी) ताडन केल्यामुळे सैल झालेल्या इंद्राच्या बाजुबंदाला आपला बाजुबंद घासत (इंद्रतुल्य होऊन) आपली श्रेष्ठ मूर्ती निर्माण करूनच (श्रेष्ठ पदाला प्राप्त होऊनच) पृथ्वीला धारण करणाऱ्या पर्वतांना भेदणाऱ्या इंद्राच्या अर्ध्या सिंहासनावर विराजमान झाला.

जातः कुले तस्य किलोरुकीर्तिः कुलप्रदीपो नृपतिर्दिलीपः ।
अतिष्ठदेकोनशतक्रतुत्वे शक्राभ्यसूयाविनिवृत्तये यः ॥ ७४ ॥

त्या महान यशस्वी (ककुत्स्थ) वंशाला दीपकाप्रमाणे उजळवणारा दिलीप नावाचा राजा ककुत्स्थ कुळात जन्मास आला. तो शंभर यज्ञ करणाऱ्या इंद्राची असूया दूर करण्याकरिता नव्याण्णव यज्ञ करूनच थांबला.

यस्मिन्महीं शासति वाणिनीनां निद्रां विहारार्धपथे गतानाम् ।
वातोऽपि नाक्षंसयदंशुकानि को लम्बयेदाहरणाय हस्तम् ॥ ७५ ॥

तो अत्यंत पराक्रमी राजा दिलीप पृथ्वीवर शासन करीत असता विहाराच्या (मनोविनोदनाकरिता असलेल्या स्थळांमधील मार्गात) मार्गातच झोपलेल्या नर्तकींची वस्त्रे वाऱ्याद्वाराही हालविली जाऊ शकत नव्हती तर त्यांच्या अपहरणासाठी कोण बरे हात पुढे करीत असेल? (गैरवर्तनाची कोणाचीही ताकद

नव्हती. दिलीप राजाचे राज्य नैतिक अधिष्ठानावर होते आणि त्याच्या राज्यात उत्तम सुशासन, स्त्रियांकरिता सुरक्षित व्यवस्था होती.)

पुत्रो रघुस्तस्य पदं प्रशास्ति महाक्रतोर्विश्वजितः प्रयोक्ता ।
चतुर्दिगावर्जितसंभृतां यो मृत्पात्रशेषामकरोद्विभूतिम् ॥ ७६ ॥

विश्वजित नामक यज्ञाचे अनुष्ठान करणारा, दिलीप राजाचा सुपुत्र रघू हा आपल्या पित्याकडून वारसाहक्काने प्राप्त झालेल्या राज्याचे (उत्तमपणे) शासन करतो. त्याने चारही दिशांतून मिळविलेले आणि वाढविलेले धन केवळ मातीचे मडके शिल्लक राही पर्यंतच राखले. (रघुराजाने स्वपराक्रमाने चारही दिशातील राज्यांकडून प्राप्त संपत्तीचे यज्ञ केल्यावर दान केले आणि केवळ अन्न शिजविण्यासाठी एक मडके स्वतःजवळ बाळगले.)

आरूढमद्रीनुदधीन्वितीर्णं भुजङ्गमानां वसतिं प्रविष्टम् ।
ऊर्ध्वं गतं यस्य न चानुबन्धि यशः परिच्छेत्तुमियत्तयालम् ॥ ७७ ॥

या महाराज रघूचे यश पर्वत शिखरांवर समारूढ झाले आहे, समुद्रापर्यंत पसरले आहे, आणि नागलोकात अर्थात पाताळात पोहोचले आहे तसेच स्वर्गादिलोकात पोहोचल्यामुळे सर्वव्यापक आहे. (अर्थात याचे यश तिन्ही काळ आणि तिन्ही लोक व्यापून राहिले आहे.) त्यामुळे अशाप्रकारचे ज्याचे यश सर्वव्यापक आहे ते मोजण्यास अथवा अडविण्यास कोण समर्थ आहे ? (रघुराजाचे यश असीम आहे.)

असौ कुमारस्तमजोऽनुजातस्त्रिविष्टपस्येव पतिं जयन्तः ।
गुर्वीं धुरं यो भुवनस्य पित्रा धुर्येण दम्यः सदृशं बिभर्ति ॥ ७८ ॥

ज्याप्रमाणे स्वर्गाच्या स्वामीचा (इंद्राचा) जयंत नावाचा पुत्र आहे त्याप्रमाणेच हा कुमार अज पृथ्वीच्या स्वामीचा (रघूचा) पुत्र आहे. जसे लहानसे वासरू मोठ्या, वयस्क बैलासोबत गाडीचे जू (मानेवर) पेलते तसा तो (रघुपुत्र अज) प्रशिक्षण

प्राप्त करण्याच्या वयात असताना देखील ह्या विश्वाचा अत्यंत मोठा भार आपल्या पित्याप्रमाणेच वाहतो आहे.

कुलेन कान्त्या वयसा नवेन गुणैश्च तैस्तैर्विनयप्रधानैः ।
त्वमात्मनस्तुल्यममुं वृणीष्व रत्नं समागच्छतु काञ्चनेन ॥ ७९ ॥

कुळ, कांती, तारुण्य आणि विनयादी प्रमुख गुणांनी तू स्वतःला साजेशा अशा या अज राजाला वररूपात स्वीकार, रत्न आणि सुवर्ण यांच्या सारखाच तुमचाही समागम होवो. (अशी प्रार्थना आहे.)

ततः सुनन्दावचनावसाने लज्जां तनूकृत्य नरेन्द्रकन्या ।
दृष्ट्या प्रसादामलया कुमारं प्रत्यग्रहीत्संवरणस्रजेव ॥ ८० ॥

(त्यानंतर) असे सुनंदेचे बोलणे झाल्यावर (सुनंदा प्रार्थना करून थांबल्यावर) राजकुमारी इंदुमतीने लज्जा आवरत प्रसन्नतेने, (अत्यंत) निर्मळ दृष्टीनेच जणू स्वयंवराच्या माळेप्रमाणे सुकुमार अजाला वररूपात स्वीकारले.

सा यूनि तस्मिन्नभिलाषबन्धं शशाक शालीनतया न वक्तुम् ।
रोमाञ्चलक्ष्येण स गात्रयष्टिं भित्त्वा निराक्रामदरालकेश्याः ॥ ८१ ॥

ती राजकुमारी इंदुमती त्या तरुण अजाबावतची प्रेमाभिलाषा शालीनतेमुळे वाचेने प्रकट करू शकली नाही पण कुरळ्या केसांच्या इंदुमतीची ती अभिलाषा रोमांच नामक सात्विक भावाच्या मिषाने शरीररूपी यष्टीला भेदून बाहेर प्रकटलीच. (अजाला पाहून ती रोमांचित झाली आणि तिने आपल्या मनातील अजराजाविषयीचे प्रेम न बोलता प्रकट केले.)

तथागतायां परिहासपूर्वं सख्यां सखी वेत्रभृदाबभाषे ।
आर्ये व्रजामोऽन्यत इत्यथैनां वधूरसूयाकुटिलं ददर्श ॥ ८२ ॥

सखी इंदुमतीचा अशाप्रकारचे (अजराजाविषयीचे) प्रेम प्रकट झालेले पाहून ती दंडधारिणी (सुनंदा) थट्टेने हसत म्हणाली, 'आर्ये ! आपण आता दुसऱ्या ठिकाणी (इतर राजांजवळ जाऊ) जाऊ या.' त्यावेळी (सुनंदा असे बोलल्यावर) त्या वधूने (इंदुमतीने) कृतककोपाने आणि तिरक्या नजरेने सुनंदेकडे पाहिले. (आता इष्ट प्राप्ती झाल्यावर त्यापासून मला दूर नेत आहे असे मानून इंदुमतीने सुनंदेकडे रागाने पाहिले.)

सा चूर्णगौरं रघुनन्दनस्य धात्रीकराभ्यां करभोपमोरूः ।
आसञ्जयामास यथाप्रदेशं कण्ठे गुणं मूर्तमिवानुरागम् ॥ ८३ ॥

त्या करभोरू (लावण्यवती) इंदुमतीने कुंकुमाने रंगलेली, प्रेमाचेच जणू मूर्त स्वरुप असलेली ती माळा सुनंदेच्या दोन्ही हातांनीं रघुपुत्र अजाच्या गळ्यात यथास्थान घातली. (सुनंदेच्या मदतीने वरमाळा अजाला घातली.)

तया स्रजा मङ्गलपुष्पमय्या विशालवक्षःस्थललम्बया सः ।
अमंस्त कण्ठार्पितबाहुपाशां विदर्भराजावरजां वरेण्यः ॥ ८४ ॥

वरण्यास योग्य त्या श्रेष्ठ वर अजाने विशाल वक्षस्थळावर लटकणारी मंगल पुष्पांची ती माळ धारण केल्यावर विदर्भराज भोजाच्या धाकट्या बहिणीचा बाहुपाश गळ्याभोवती समर्पित केल्याप्रमाणे आलिंगनाचे सुख अनुभवले.

शशिनमुपगतेयं कौमुदी मेघमुक्तं जलनिधिमनुरूपं जह्नुकन्यावतीर्णा ।
इति समगुणयोगप्रीतयस्तत्र पौराः श्रवणकटु नृपाणामेकवाक्यं विवव्रुः ॥ ८५ ॥

त्या स्वयंवरात समान गुण असणाऱ्या त्या दोघांच्या संयोगाने आनंदित झालेल्या नगरवासी जनांनी ही इंदुमती मेघांनी मुक्त चंद्राच्या सान्निध्यातील चंद्रिका आणि अनुरूप समुद्रात अवतीर्ण गंगा आहे अशी इतर राजांकरिता ऐकण्यास क्लेशकारक अशी वाक्ये एका स्वरात बोलण्यास सुरुवात केली.

प्रमुदितवरपक्षमेकतस्तत्क्षितिपतिमण्डलमन्यतो वितानम् ।
उषसि सर इव प्रफुल्लपद्मं कुमुदवनप्रतिपन्ननिद्रमासीत् ॥ ८६ ॥

इति श्रीरघुवंश महाकाव्ये कविश्रीकालिदासकृतौ स्वयंवरवर्णनो नाम षष्ठः सर्गः ।

प्रातःकाळी कमळांचे सरोवर प्रफुल्लित असते आणि दुसरीकडे सौंदर्य नष्ट झालेले कुमुदवन निद्रावस्थेत असते. त्याप्रमाणे (त्या स्वयंवर सभेत) एकीकडे प्रसन्नचित्त वरपक्ष आणि दुसरीकडे निराश राजांचा समूह दिसत होता.

अशा रीतीने कविश्रेष्ठ कालिदास रचित रघुवंश नामक महाकाव्यातील स्वयंवरवर्णन नामक सहावा सर्ग संपला.

सप्तमः सर्गः

अथोपयन्त्रा सदृशेण युक्तां स्कन्देन साक्षादिव देवसेनाम् ।
स्वसारमादाय विदर्भनाथः पुरप्रवेशाभिमुखो बभूव ॥१ ॥

(राजकुमारी इंदुमतीने सुनंदेच्या हातांनी अजराजाच्या कंठात यथास्थान वरमाला अर्पित केल्यावर) संबद्ध असलेल्या रूप, गुण, शील, वय इत्यादी गुणांनी समान वराशी संबंध जोडलेल्या साक्षात् सेनापती कार्तिकेयाशी देवसेनेप्रमाणे असणाऱ्या आपल्या धाकट्या बहिणीला इंदुमतीला घेऊन विदर्भनरेश (भोज) नगरात प्रवेश करण्याकरिता सामोरा आला.

सेनानिवेशान्पृथिवीक्षितोऽपि जग्मुर्विभातग्रहमन्दभासः ।
भोज्यां प्रति व्यर्थमनोरथत्वाद्रूपेषु वेशेषु च साभ्यसूयाः ॥२ ॥

भोजराजाच्या गोत्रात जन्मलेल्या (स्त्री अपत्याविषयी) इंदुमतीविषयी मनोरथ व्यर्थ झाल्याने आपल्या रूप आणि वेशभूषेची निंदा करीत प्रातःकालीन (सूर्योदयापूर्वीच्या) चंद्र इत्यादी ग्रहांप्रमाणे क्षीण कांती झालेल्या राजांचे समूह

(इंदुमतीची प्राप्ती न झाल्याने निराश झालेले स्वयंवरास आलेले इतर राजे) आपापल्या सेनेच्या शिबिरात परतले.

सान्निध्ययोगात्किल तत्र शच्याः स्वयंवरक्षोभकृतामभावः ।
काकुत्स्थमुद्दिश्य समत्सरोऽपि शशाम तेन क्षितिपाललोकः ॥३ ॥

तेथे (स्वयंवरात) शचीच्या सान्निध्यामुळे स्वयंवरात क्षोभ उत्पन्न करणा-यांचा अभावच होता. (कारण स्वयंवरात विघ्न निर्माण करणाऱ्यांना इंद्राणी नष्ट करते असे शास्त्र वचन आहे). त्यामुळेच अजराजाविषयी मत्सरभाव ठेवणारे राजे लोक शांत होते.

तावत्प्रकीर्णाभिनवोपचारमिन्द्रायुधद्योततोरणाङ्कम् ।
वरः सवध्वा सह राजमार्गं प्राप ध्वजच्छायनिवारितोष्णम् ॥४ ॥

ज्या राजमार्गावर फुलांच्या नावीन्यपूर्ण अशा पायघड्या घातल्या जात होत्या (पुष्पवृष्टी केली जात होती) तसेच इंद्रधनुष्याप्रमाणे रंगीबेरंगी तोरणांनी (तो राजमार्ग) सुशोभित होत होता आणि पताकांच्या सावलीने उन्ह अडविले जात होते अशा त्या राजमार्गावर तो वर अज नववधू इंदुमतीसह पोहोचला.

ततस्तदालोकनतत्पराणां सौधेषु चामीकरजालवत्सु ।
बभूवुरित्थं पुरसुन्दरीणां त्यक्तान्यकार्याणि विचेष्टितानि ॥५ ॥

राजमार्गावर पोहोचल्यावर सोन्याने बनविलेल्या जाळीदार (नक्षीच्या) खिडक्या असलेल्या प्रासादांतून त्या (नवीन) वर-वधूला पाहण्यासाठी नगरातील सुंदर स्त्रिया इतक्या उत्सुक होत्या की त्यांची (नित्याची) इतर सर्व कामे तशीच राहून गेली. (त्या नवदाम्पत्याला पाहण्याच्या ओढीने बाकी कामे त्या स्त्रियांनी केलीच नाहीत.)

आलोकमार्गं सहसा व्रजन्त्या कयाचिदुद्वेष्टनवान्तमाल्यः ।
बद्धुं न संभावित एव तावत्करेण रुद्धोऽपि च केशपाशः ॥६ ॥

अजराजाला पाहण्यासाठी घाईघाईने खिडकीजवळ (वर-वधूंना पाहण्याच्या मार्गा कडे -सज्जाकडे) जाण्याच्या गडबडीत (धांदल उडाल्याने) एका सुंदरीचा केशपाश सुटला त्यातून फुलं गळू लागल्यावर तिने केस हाताने सावरून धरले पण अजराजाला मन भरून बघेपर्यंत तिने तो केशपाश बांधण्याचा विचार देखील केला नाही. (अजराजाला बघण्याच्या ओढीने तिला बाकी कशाचे भानच उरले नव्हते.)

प्रसाधिकालम्बितमग्रपादमाक्षिप्य काचिद्वरागमेव ।
उत्सृष्टलीलागतिरागवाक्षादलक्तकाङ्कां पदवीं ततान ॥७ ॥

आणखी कोण्या एका दुसऱ्या सुंदरीने (आळत्याने) पाय रंगवणाऱ्या दासीच्या हातात आळता तसाच असताना (पायांना आळता लावणे अर्धवट टाकूनच) पाऊल खेचून मंदगतीने चालणे सोडून अगदी घाईने (वेगाने) खिडकीजवळ पोहोचण्याच्या नादात, जमिनीवर आळत्याने रंगलेली पावले उमटविली.

विलोचनं दक्षिणमञ्जनेन संभाव्य तद्वञ्चितवामनेत्रा ।
तथैव वातायनसंनिकर्षं ययौ शलाकामपरा वहन्ती ॥८ ॥

शास्त्रानुसार स्त्रियांनी सुरुवातीला आपल्या डाव्या डोळ्यात काजळ घातले पाहिजे पण (अजराजाला पाहण्याच्या लगबगीत) घाईने कोणी एक सुंदरी उजव्या डोळ्यात काजळ घालून डाव्या डोळ्यात काजळ न घालताच काजळ लावण्याची शलाका (काजळ लावण्याची लहानशी तार किंवा काडी) घेऊन तशीच खिडकीजवळ गेली.

जालान्तरप्रेषितदृष्टिरन्या प्रस्थानभिन्नां न बबन्ध नीवीम् ।
नाभिप्रविष्टाभरणप्रभेण हस्तेन तस्थाववलम्ब्य वासः ॥९ ॥

दुसरी एक सुंदरी खिडकीच्या मध्यभागी आपली नजर टाकीत जात असता (आपल्या कमरेच्या) वस्त्राची सुटलेली गाठ न बांधता नाभिप्रदेशात कंकण इत्यादी (हातातील) दागिन्यांची प्रभा पडत असलेल्या हातांनी वस्त्र सावरून तशीच उभी राहिली. (तिला वस्त्र व्यवस्थित करण्याचेही भान राहिले नाही.)

अर्धाञ्चिता सत्वरमुत्थितायाः पदे पदे दुर्निमिते गलन्ती ।
कस्याश्चिदासीद्रशना तदानीमङ्गुष्ठमूलार्पितसूत्रशेषा ॥१० ॥

लगबगीने उठलेल्या कोण्या एका सुंदरीची अर्धवटच गुंफलेली मेखला (गोंधळून धावत गेल्यामुळे) पावला पावलावर गळून विखुरली गेली. रत्नांची ती मेखला (गळून विखुरल्यानंतर) त्यावेळी अंगठ्यात अडकलेल्या दोऱ्याच्या रूपातच शिल्लक राहिली.

तासां मुखैरासवगन्धगर्भैर्व्याप्तान्तराः सान्द्रकुतूहलानाम् ।
विलोलनेत्रभ्रमरैर्गवाक्षाः सहस्रपत्राभरणा इवासन् ॥११ ॥

(राजा अज आणि इंदुमती हे दोघे नगरप्रवेश करीत असताना त्यावेळी अत्यधिक उत्सुकतेने (खिडक्यांजवळ उभ्या असलेल्या) त्या सुंदर स्त्रियांच्या आसवगंधाने परिपूर्ण, चंचल नेत्ररूपी भ्रमरांनी युक्त मुखांमुळे त्या खिडक्या कमळांनी सजविल्याप्रमाणे दिसत होत्या.

ता राघवं दृष्टिभिरापिबन्त्यो नार्यो न जग्मुर्विषयान्तराणि ।
तथा हि शेषेन्द्रियवृत्तिरासां सर्वात्मना चक्षुरिव प्रविष्टा ॥१२ ॥

त्या लावण्यवती स्त्रिया एकटक नजरेने अजाच्या सौंदर्याचे पान करीत होत्या (अजाला न्याहाळत होत्या) इतर शब्द, स्पर्शादी विषयांचे त्यांना भानच उरले नव्हते कारण त्यांच्या इतर ज्ञानेंद्रियांची वृत्ती नेत्रांमध्येच एकवटली होती.

स्थाने वृता भूपतिभिः परोक्षैः स्वयंवरं साधुममंस्त भोज्या ।
पद्मेव नारायणमन्यथासौ लभेत कान्तं कथमात्मतुल्यम् ॥१३ ॥

भोजराजाच्या गोत्रात उत्पन्न झालेल्या इंदुमतीने न पाहताच मागणी घालणाऱ्या राजांच्या प्रस्तावापेक्षा स्वयंवरासच योग्य मानले हे एकप्रकारे बरेच झाले नाही तर जसे लक्ष्मीने नारायणास मिळविले तसे ह्या लावण्यवतीने (स्वतःस योग्य अशा) देखण्या पतीला कसे बरे प्राप्त केले असते?

परस्परेण स्पृहणीयशोभं न चेदिदं द्वन्द्वमयोजयिष्यत् ।
अस्मिन्द्वये रूपविधानयत्नः पत्युः प्रजानां वितथोऽभविष्यत् ॥१४ ॥

सर्वांना हव्याहव्याशा वाटणाऱ्या, शोभून दिसणाऱ्या या वधूवरांस जर विधात्याने एकत्र आणले नसते तर त्याचा (प्रजापतीचा) जोड्या जुळविण्याचा प्रयत्न निष्फळ ठरला असता. (अज इंदुमतीला एकत्र आणूनच विधात्याचा प्रयत्न सफळ झाला आहे.)

रतिस्मरौ नूनमिमावभूतां राज्ञां सहस्रेषु तथा हि बाला ।
गतेयमात्मप्रतिरूपमेव मनो हि जन्मान्तरसंगतिज्ञम् ॥१५ ॥

कामदेव आणि रती हे दोघेच निश्चितपणे अज आणि इंदुमती या जोडप्याच्या रूपात आले आहेत. कारण ही लावण्यवती हजारो राजांमधून स्वतःला अनुरूप अशाच वरास प्राप्त झाली. खरंच आहे मन जन्मजन्मांतरीच्या संगतीला जाणणारे असते.

इत्युद्गताः पौरवधूमुखेभ्यः शृण्वन्कथाः श्रोत्रसुखाः कुमारः ।
उद्भासितं मङ्गलसंविधाभिः संबन्धिनः सद्म समाससाद ॥१६ ॥

अशाप्रकारे नगरवासी सौंदर्यवती स्त्रियांचे कानाला सुखावणारे बोलणे ऐकत राजकुमार अज मंगलमय सजावटीने शोभून दिसणाऱ्या (नव्याने नाते जोडलेल्या) आप्त (मेहुणा झालेल्या) भोजाच्या भवनात पोहोचला.

ततोऽवतीर्याशु करेणुकायाः स कामरूपेश्वरदत्तहस्तः ।
वैदर्भनिर्दिष्टमथो विवेश नारीमनांसीव चतुष्कमन्तः ॥१७ ॥

तेव्हा हत्तीणीवरून पटकन उतरून कामरूपदेशाच्या राजाच्या हाताचा आधार घेत चालणाऱ्या (खांद्यावर हात ठेवून चालणारा) त्या अजाने नंतर जसा स्त्रियांच्या मनात, तसा, विदर्भ नरेश भोजाने दाखविलेल्या, अंगणात प्रवेश केला.

महार्हसिंहासनसंस्थितोऽसौ सरत्नमर्घ्यं मधुपर्कमिश्रम् ।
भोजोपनीतं च दुकूलयुग्मं जग्राह सार्धं वनिताकटाक्षैः ॥१८ ॥

अत्यंत मौल्यवान अशा सिंहासनावर विराजमान अजाने भोजराजाने आणलेल्या घृतशर्करादी मधुपर्कासह रत्नयुक्त पूजन सामग्रीचा आणि रेशमी वस्त्रांच्या जोडीचा सुंदर स्त्रियांच्या नेत्र कटाक्षांसह स्वीकार केला.

दुकूलवासाः स वधूसमीपं निन्ये विनीतैरवरोधरक्षैः ।
वेलासकाशं स्फुटफेनराशिर्नवैरुदन्वानिव चन्द्रपादैः ॥१९ ॥

ज्याप्रमाणे चंद्राचे किरण अधिकच फेसाळलेल्या समुद्राच्या लाटांना किनाऱ्यापर्यंत पोहचवितात त्याप्रमाणेच विनम्र अशा अन्तःपुरातील अधिकाऱ्यांनी रेशमी वस्त्र धारण केलेल्या अजाला वधू इंदुमतीजवळ पोहचविले.

तत्रार्चितो भोजपतेः पुरोधा हुत्वाग्निमाज्यादिभिरग्निकल्पः ।
तमेव चाधाय विवाहसाक्ष्ये वधूवरौ संगमयांचकार ॥२० ॥

तेथे (भोजराजाच्या भवनप्रांगणात) पूजित, अग्नीप्रमाणे तेजस्वी भोजराजाच्या पुरोहिताने आज्यादी (तूप इत्यादी) हवन सामग्रीने अग्नीत आहुती देऊन त्याच अग्नीला विवाहाचा साक्षी बनवून वधू आणि वरांचे संयोजन केले. (विवाहाकरिता गाठ बांधली.)

हस्तेन हस्तं परिगृह्य वध्वाः स राजसूनुः सुतरां चकासे ।
अनन्तराशोकलताप्रवालं प्राप्येव चूतः प्रतिपल्लवेन ॥२१ ॥

जवळच असलेल्या अशोकाची पोवळ्यासारखी पालवी स्वीकारून आम्रवृक्ष ज्याप्रमाणे सुशोभित होतो त्याप्रमाणे तो राजकुमार अज आपल्या हातात वधू इंदुमतीचा हात ग्रहण करून अतिशय शोभून दिसत होता.

आसीद्वरः कण्टकितप्रकोष्ठः स्विन्नाङ्गुलिः संववृते कुमारी ।
तस्मिन्द्वये तत्क्षणमात्मवृत्तिः समं विभक्तेव मनोभवेन ॥२२ ॥

(इंदुमतीचा हात हातात आल्यावर) वर अजराजाचे मनगट शहारले आणि वधू इंदुमतीची बोटे घामाने भिजली. त्यावेळी त्या जोडप्यात जणू काही कामदेवाने आपली वृत्ती समानपणे विभागून दिली होती. (वधूवरांनी परस्परांना स्पर्श करताच त्यांच्यामध्ये प्रेमाचे सात्विकभाव प्रकटले.)

तयोरपाङ्गप्रतिसारितानि क्रियासमापत्तिनिवर्तितानि ।
ह्रीयन्त्रणामानशिरे मनोज्ञामन्योन्यलोलानि विलोचनानि ॥२३ ॥

डोळ्यांच्या कडांतून (टोकांतून) परतवलेले, परस्परांना पाहण्यास उत्कंठित झालेले त्या दोघांचे कटाक्ष मनोहारी संकोचामुळे मिटले. (वधूवर परस्परांना बघण्याकरिता उत्कंठित झाले मात्र, परंतु स्वाभाविक लज्जाभावाने पाहू शकले नाहीत.)

प्रदक्षिणप्रक्रमणात्कृशानोरुदर्चिषस्तन्मिथुनं चकासे ।
मेरोरुपान्तेष्विव वर्तमानमन्योन्यसंसक्तमहस्त्रियामम् ॥२४ ॥

त्या दांपत्याने अग्नीची प्रदक्षिणा केल्यावर ते जोडपे (अज आणि इंदुमती) सुमेरु पर्वताजवळ परस्परांना भेटलेल्या (एकत्र आलेल्या) दिवस आणि रात्रीप्रमाणे तेजस्वी दिसू लागले.

नितम्बगुर्वी गुरुणा प्रयुक्ता वधूर्विधातृप्रतिमेन तेन ।
चकार सा मत्तचकोरनेत्रा लज्जावती लाजविसर्गमग्नौ ॥२५ ॥

मोठे नितंब असलेल्या, उन्मत्त चकोराप्रमाणे नेत्र असलेल्या, त्या लाजऱ्या (सर्वांग सुंदरी) वधू इंदुमतीने ब्रह्मदेवाप्रमाणे असलेल्या त्या पुरोहिताच्या प्रेरणेने अग्नीत लाह्या अर्पिल्या. (लाजाहोमातील विधी पूर्ण केला.)

हविःशमीपल्लवलाजगन्धी पुण्यः कृशानोरुदियाय धूमः ।
कपोलसंसर्पिशिखः स तस्या मुहूर्तकर्णोत्पलतां प्रपेदे ॥२६ ॥

आज्यादी हवनीय पदार्थ, शमीच्या पत्री आणि तांदळाच्या लाह्या यांच्या सुगंधाने युक्त पवित्र धूर अग्नीतून उत्पन्न झाला आणि त्याने इंदुमतीच्या गालांवर स्पर्श करून क्षणभरासाठी कर्णभूषणरूप नीलकमलाची शोभा धारण केली.

तदञ्जनक्लेदसमाकुलाक्षं प्रस्थानबीजाङ्कुरकर्णपूरम् ।
वधूमुखं पाटलगन्धलेखमाचारधूमग्रहणाद्बभूव ॥२७ ॥

त्या मंगलकारक धुराचा स्पर्शामुळे इन्दुमतीच्या डोळ्यातून काजळयुक्त अश्रू वाहू लागले, कानातील यवांकुरांची कर्णफुले कोमेजली आणि गालांवर लाल रंग चढला.

तौ स्नातकैर्बन्धुमता च राज्ञा पुरंध्रिभिश्च क्रमशः प्रयुक्तम् ।
कन्याकुमारौ कनकासनस्थावार्द्राक्षतारोपणमन्वभूताम् ॥२८ ॥

सोन्याच्या चौरंगावर बसलेल्या त्या दोघांनी (अज आणि इंदुमती यांनी) भोजराजा सह व्रतधाऱ्यांनी, नातेवाईकांनी, पतिपुत्र असलेल्या गृहिणींनी अनुक्रमे दिलेल्या आशीर्वादांसह आर्द्र अक्षतांचे दान अनुभवले. (आशीर्वाद देऊन मस्तकावर, अंगावर टाकलेल्या ओलसर अक्षतांचा स्पर्श अनुभवला.)

इति स्वसुर्भोजकुलप्रदीपः संपाद्य पाणिग्रहणं स राजा ।
महीपतीनां पृथगर्हणार्थं समादिदेशाधिकृतानधिश्रीः ॥२९ ॥

श्री (संपत्ती आणि सौंदार्य) संपन्न भोजवंशाचा कुलदीपक असलेल्या, प्रदीपाप्रमाणे तेजस्वी राजा भोजाने अशाप्रकारे (उपर्युक्त वर्णिल्याप्रमाणे) आपल्या धाकट्या बहिणीचा विवाह सोहळा संपन्न करून स्वतंत्रपणे इतर राजांच्या पूजनाकरिता - सत्काराकरिता अधिकाऱ्यांना आदेश दिले.

लिङ्गैर्मुदः संवृतविक्रियास्ते ह्रदाः प्रसन्ना इव गूढनक्राः ।
वैदर्भमामन्त्र्य ययुस्तदीयां प्रत्यर्प्य पूजामुपदाछलेन ॥३० ॥

हर्ष इत्यादी प्रकट करून मत्सरादी भाव लपविणाऱ्या आणि म्हणूनच वरवर प्रसन्न दिसणाऱ्या, आत मगरी लपून बसल्या आहेत असे जलाशयही वरून प्रसन्न दिसतात, तद्वत् त्या राजांनी विदर्भेश्वर भोजाला बोलावून त्याने केलेल्या सत्काराला प्रत्युत्तर म्हणून भेटी देऊन ते आपापल्या जागी परतण्याकरिता निघाले.

स राजलोकः कृतपूर्वसंविदारम्भसिद्धौ समयोपलभ्यम् ।
आदास्यमानः प्रमदामिषं तदावृत्य पन्थानमजस्य तस्थौ ॥३१ ॥

कार्यसिद्धीच्या बाबतीत आधीच विचार करणारा तो राजांचा समूह भोजराजा निघून जाण्याची वेळ आल्यावर तो स्त्रीरूपी भोग्य पदार्थ मिळविण्याच्या इच्छेने (वाईट वासनेने) अजराजाचा मार्ग अडवून उभा राहिला.

भर्तापि तावत्क्रथकैशिकानामनुष्ठितानन्तरजाविवाहः ।
सत्त्वानुरूपाहरणीकृतश्रीः प्रास्थापयद्राघवमन्वगाच्च ॥३२ ॥

आपल्या धाकट्या बहिणीचा इंदुमतीचा विवाह सोहळा संपन्न करणाऱ्या विदर्भाधिपती भोजाने त्यावेळी (इंदुमतीची पाठवणी करतेवेळी) आपल्या उत्साहानुरूप यथाशक्ती हुंड्याचे धन भेट म्हणून देऊन रघुपुत्र अजाची पाठवणी केली आणि स्वतःदेखील त्याच्या मागोमाग निघाला.

तिस्रस्त्रिलोकप्रथितेन सार्धमजेन मार्गे वसतीरुषित्वा ।
तस्मादपावर्तत कुण्डिनेशः पर्वात्यये सोम इवोष्णरश्मेः ॥३३ ॥

ज्याप्रमाणे पर्वाची समाप्ती झाल्यावर (अमावास्या झाल्यावर) प्रखर किरणांच्या सूर्यापासून चंद्र परत येतो त्याप्रमाणे कुंडिन नगराचा स्वामी भोजराजा त्रैलोक्य प्रसिद्ध अजराजा सोबत मार्गात तीन रात्री निवास करून त्याचा निरोप घेऊन परत आला.

प्रमन्यवः प्रागपि कोसलेन्द्रे प्रत्येकमात्तस्वतया बभूवुः ।
अतो नृपाश्चक्षमिरे समेताः स्त्रीरत्नलाभं न तदाजतत्मस्य ॥३४ ॥

या स्वयंवराच्या पूर्वीही दिग्विजयाच्या वेळी एकेक करून (एकेकट्याला पराभूत करून प्रत्येकाकडून) धन हरल्यामुळे दुःखी झालेले (इंदुमतीकडून नाकारलेले) ते राजे कोसलपती रघूवर अत्यधिक रागावले होतेच. त्यामुळे त्याच्याच पुत्राला (इन्दुमतीरूपी) स्त्रीरत्नाची प्राप्ती झाली हे त्या एकत्र आलेल्या राजांना सहन झाले नाही.

तमुद्वहन्तं पथि भोजकन्यां रुरोध राजन्यगणः स दप्तः ।
बलिप्रदिष्टां श्रियमाददानं त्रैविक्रमं पादमिवेन्द्रशत्रुः ॥३५ ॥

ज्याप्रमाणे दैत्यराज बळीने दिलेल्या संपत्तीचा स्वीकार करणाऱ्या वामनावतारी त्रिविक्रम भगवान विष्णूच्या चरणांना इंद्रशत्रूने अडविले होते त्याप्रमाणेच भोजकुमारी इंदुमतीला सोबत घेऊन जाणाऱ्या अजराजाला उद्दाम राजांच्या त्या समूहाने मार्गात अडविले.

तस्याः स रक्षार्थमनल्पयोधमादिश्य पित्र्यं सचिवं कुमारः ।
प्रत्यग्रहीत्पार्थिववाहिनीं तां भागीरथीं शोण इवोत्तरङ्गः ॥३६ ॥

त्या श्रेष्ठ पराक्रमी राजा अजाने त्या नववधू इंदुमतीच्या संरक्षणासाठी अधिकाधिक योद्ध्यांनी युक्त असणाऱ्या अशा वडिलांपासून परंपरेने आलेल्या मंत्र्यांना आदेश दिले आणि ज्याप्रमाणे मोठमोठ्या लाटा उसळणारा शोणभद्र जलाशय गंगेला रोखून धरतो त्याप्रमाणे राजा अजाने त्या (विरोधक राजांच्या) राजसेनेला अडवून धरले.

पत्तिः पदातिं रथिनं रथेशस्तुरंगसादी तुरगाधिरूढम् ।
यन्ता गजस्याभ्यपतद्गजस्थं तुल्यप्रतिद्वन्द्वि बभूव युद्धम् ॥३७ ॥

पायदळातील सैनिक पायदळातील सैनिकांशी, रथी रथींशी, घोड्यावर बसलेले सैनिक घोड्यावर बसलेल्या सैनिकांशी आणि हत्तींवरील सैनिक हत्तींवरील सैनिकांशी लढू लागले. अशाप्रकारे समान योद्धे असणाऱ्यांचे हे बरोबरीचे युद्ध झाले.

नदत्सु तूर्येष्वविभाव्यवाचो नोदीरयन्ति स्म कुलोपदेशान् ।
बाणाक्षरैरेव परस्परस्य नामोर्जितं चापभृतः शशंसुः ॥३८ ॥

रणांगणात युद्धभेरींच्या प्रचंड कोलाहलाने आपला की परका असा फरक करू न शकणारे धनुर्धारी कुलोपदेशाचा उच्चार करीत नव्हते पण बाणांवर कोरलेल्या अक्षरांनीच शत्रू किंवा मित्र परस्परांचे प्रसिद्ध नाव सांगत होते.

उत्थापितः संयति रेणुरश्वैः सान्द्रीकृतः स्यन्दनवंशचक्रैः ।
विस्तारितः कुञ्जरकर्णतालैर्नेत्रक्रमेणोपरुरोध सूर्यम् ॥३९ ॥

युद्धात घोड्यांच्या टापांनी उधळलेल्या, रथसमूहांच्या चाकांनी अधिकच दाट केलेल्या आणि हत्तींच्या कानरूपी पंख्यांनी पसरविलेल्या धुळीने नेत्रक्रमाने (वस्त्राप्रमाणे) सूर्याला झाकून टाकले.

मत्स्यध्वजा वायुवशाद्विदीर्णैर्मुखैः प्रवृद्धध्वजिनीरजांसि ।
बभुः पिबन्तः परमार्थमत्स्याः पर्याविलानीव नवोदकानि ॥४० ॥

वाऱ्यामुळे अधिकच वाढलेली, सेनेद्वारा उडविलेली धूळ उघड्या मुखांनी ग्रहण करणाऱ्या माशांच्या आकाराच्या पताका चहू बाजूंनी गढूळ असलेले नवीन जल पिणाऱ्या खऱ्याखुऱ्या माशांप्रमाणे वाटू लागल्या.

रथो रथाङ्गध्वनिना विजज्ञे विलोलघण्टाक्वणितेन नागः ।
स्वभर्तुनामग्रहणाद्बभूव सान्द्रे रजस्यात्मपरावबोधः ॥४१ ॥

धुळीच्या प्रचंड लोटांमध्ये रथाचे ज्ञान चाकाच्या आवाजाने आणि हत्तींचे ज्ञान चंचल घंटानादाने होत होते. आपला की परका हा फरक आपापल्या स्वामीचे नाव घेतल्याने करता येत होता. धुळीने अंधारून आल्यामुळे डोळ्यांनी काहीच पाहता येत नव्हते म्हणून सैनिक आपला की परका याची खात्री (ज्ञान) आवाजाच्या आधारे करून घेऊन आघात करीत होते.

आवृण्वतो लोचनमार्गमाजौ रजोन्धकारस्य विजृम्भितस्य ।
शस्त्रक्षताश्वद्विपवीरजन्मा बालारुणोऽभूद्रुधिरप्रवाहः ॥४२ ॥

डोळ्यांचा मार्ग अडविणाऱ्या, युद्धात व्याप्त धूळरूपी अंधाराच्या शस्त्रांनी छेदलेल्या घोडे, हत्ती आणि वीर यांच्या जखमांतून निघालेल्या रक्ताचा बालरवी सारखा लाल पाट वाहू लागला.

स च्छिन्नमूलः क्षतजेन रेणुस्तस्योपरिष्टात्पवनापधूतः ।
अङ्गारशेषस्य हुताशनस्य पूर्वोत्थितो धूम इवाबभासे ॥४३ ॥

(शस्त्रांनी छेदलेल्या घोडे, हत्ती आणि सैनिकांच्या) रक्तामुळे (जमिनीवरून रक्त वाहत असल्यामुळे) भूतलावरून, वाऱ्याने उडविली गेलेली धूळ निखाऱ्याच्या रूपात शिल्लक राहिलेल्या अग्नीतून आधी निघालेल्या धुराप्रमाणे भासत होती.

प्रहारमूर्च्छापगमे रथस्था यन्तॄनुपालभ्य निवर्तिताश्वान् ।
यैः सादिता लक्षितपूर्वकेतूंस्तानेव सामर्षतया निजघ्नुः ॥४४ ॥

रथावर बसलेल्या, शस्त्रप्रहारांनी बेशुद्ध झालेल्या योद्ध्यांनी (काही वेळाने) शुद्धीवर आल्यावर रणांगणापासून सुरक्षित ठिकाणी घोड्यांना पोहोचविणाऱ्या सारथ्यांना 'तू हे योग्य केले नाहीस' अशाप्रकारे दटावल्यावर ज्यांनी त्यांच्यावर हल्ला केला होता आणि ज्यांच्या पताकांना या योद्ध्यांनी पूर्वीच लक्ष्य बनविले होते अशा त्यांच्यावर (शत्रूवर) क्रुद्ध होऊन प्रहार केले.

अप्यर्धमार्गे परबाणलूना धनुर्भृतां हस्तवतां पृषत्काः ।
संप्रापुरेवात्मजवानुवृत्त्या पूर्वार्धभागैः फलिभिः शरव्यम् ॥४५ ॥

अर्ध्या रस्त्यात शत्रूच्या बाणांनी छिन्न भिन्न केल्यावरही सिद्धहस्त धनुर्धाऱ्यांचे बाण आपल्या प्रबळ वेगाच्या सातत्यामुळे लोखंडाच्या टोकांनी लक्ष्य भेदतच असत. (मध्येच गळून पडत नसत.)

आधोरणानां गजसंनिपाते शिरांसि चक्रैर्निशितैः क्षुराग्रैः ।
हतान्यपि श्येननखाग्रकोटिव्यासक्तकेशानि चिरेण पेतुः ॥४६ ॥

हत्तींच्या युद्धात तासलेल्या वस्तऱ्याच्या धारेप्रमाणे असलेल्या चक्रांनी छेदल्यावरही बहिरी ससाण्याच्या नखांच्या अग्रभागी अडकलेल्या केसांनी युक्त माहुतांची मस्तकं खूप वेळाने खाली पडत होती. (ससाणे छेदलेल्या मस्तकावर बसून नंतर उडाल्याने त्यांच्या नखांच्या टोकांमध्ये केस रुतल्यामुळे माहुतांची मस्तके खाली पडत होती.)

पूर्वं प्रहर्ता न जघान भूयः प्रतिप्रहाराक्षममश्वसादी ।
तुरङ्गमस्कन्धनिषण्णदेहं प्रत्याश्वसन्तं रिपुमाचकाङ्क्ष ॥४७ ॥

पहिला आघात करणाऱ्या घोडेस्वाराने प्रहाराच्या प्रतिसादात प्रतिप्रहार करण्यात असमर्थ असणाऱ्या, घोड्याच्या खांद्यांवर वाकलेल्या, बेशुद्ध शत्रूवर पुन्हा प्रहार केला नाही परंतु त्याच्या शुद्धीवर येण्याची इच्छा मात्र व्यक्त केली.

तनुत्यजां वर्मभृतां विकोशैर्बृहत्सु दन्तेष्वसिभिः पतद्भिः ।
उद्यन्तमग्निं शमयांबभूवुर्गजा विविग्नाः करशीकरेण ॥४८ ॥

देहाची तमा न बाळगणाऱ्या कवचधारी पदाती वीर सैनिकांद्वारा म्यानातून उपसलेल्या तलवारींनी (रणांगणातील हत्तींच्या) मोठमोठ्या दातांवर आघात केल्याने निघणाऱ्या ठिणग्या भयभीत झालेल्या हत्तींनी आपल्या सोंडेतील जलबिंदूंनी शांत केल्या.

शिलीमुखोत्कृत्तशिरःफलाढ्या च्युतैः शिरस्त्रैश्चषकोत्तरेव ।
रणक्षितिः शोणितमद्यकुल्या रराज मृत्योरिव पानभूमिः ॥४९ ॥

बाणांनी छाटलेल्या मस्तकरूपी फळांनी, आणि मद्यपानाच्या पात्रांप्रमाणे भासणाऱ्या खाली पडलेल्या शिरस्त्राणांनी आणि वाहणाऱ्या रक्तरूपी मदिरेच्या ओहोळांनी ती रणभूमी मृत्यूच्या मधुशालेप्रमाणे (मद्यालयाप्रमाणे) भासू लागली.

उपान्तयोर्निष्कुषितं विहंगैराक्षिप्य तेभ्यः पिशितप्रियापि ।
केयूरकोटिक्षततालुदेशा शिवा भुजच्छेदमपाचकार ॥५० ॥

दोन्ही किनाऱ्यावर पक्ष्यांनी कुरतडलेले भुजांचे तुकडे (पक्ष्यांकडून) हिसकावून मांस आवडते असून देखील कोल्हीण (हातांवरील) बाजुबंदांच्या तीक्ष्ण टोकांनी टाळूचा एक भाग कापला गेल्यामुळे (मांस न खाताच) दुसरीकडे निघून गेली.

कश्चिद्विषत्खड्गहृतोत्तमाङ्गः सद्यो विमानप्रभुतामुपेत्य ।
वामाङ्गसंसक्तसुराङ्गनः स्वं नृत्यत्कबन्धं समरे ददर्श ॥५१ ॥

शत्रूच्या तलवारीने मस्तक उखडलेला कोणी एक वीर त्याच क्षणी विमानाचे स्वामित्व मिळवून वामभागी देवांगनांनी युक्त होऊन शोभत असतानांच युद्धात मस्तकापासून वेगळे झालेले नाचणारे स्वतःचे धड पाहू लागला.

अन्योन्यसूतोन्मथनादभूतां तावेव सूतौ रथिनौ च कौचित् ।
व्यश्वौ गदाव्यायतसंप्रहारौ भग्नायुधौ बाहुविमर्दनिष्ठौ ॥५२ ॥
परस्परेण क्षतयोः प्रहर्त्रोरुत्क्रान्तवाग्वोः समकालमेव ।
अमर्त्यभावेऽपि कयोश्चिदासीदेकाप्सरःप्रार्थितयोर्विवादः ॥५३ ॥

(दोघांचेही) सारथी मृत्युमुखी पडल्याने कोणी दोन वीर स्वतःच सारथ्य करीत रथावरील योद्धा झाले. तेच दोघे वीर घोडे नष्ट झाल्यावर गदायुद्धात मग्न झाले आणि शस्त्रेही नष्ट झाल्यावर बाहुयुद्धात परस्परांचा चेंदामेंदा करण्यात तल्लीन झाले. परस्परांकडून मारले गेलेल्या त्या दोन सैनिकांचा प्राण एकाच वेळी बाहेर पडल्याने एकाच अप्सरेची प्रार्थना करणाऱ्या त्या दोन सैनिकांमध्ये देवत्व प्राप्त झाल्यावरही (एकाच अप्सरेच्या प्राप्तीकरिता) विवाद होत होता.

व्यूहावुभौ तावितरेतरस्माद्भग्नं जयं चापतुरव्यवस्थम् ।
पश्चात्पुरोमारुतयोः प्रवृद्धौ पर्यायवृत्त्येव महार्णवोर्मी ॥५४ ॥

त्या दोन्ही समान बलवान सैन्य व्यूहांमध्ये सतत मागेपुढे वाहणाऱ्या वाऱ्याने खवळलेल्या महासागराच्या लाटांप्रमाणे परस्परांकडून अनिश्चित विजय पराजय प्राप्त केला. (दोन्ही गटांमध्ये परस्परांना रेटत तुंबळ युद्ध झाले.)

परेण भग्नेऽपि बले महौजा ययावजः प्रत्यरिसैन्यमेव ।
धूमो निवर्त्येत समीरणेन यतस्तु कक्षस्तत एव वह्निः ॥५५ ॥

आपली सेना शत्रुसेनेद्वारा नष्ट झाल्यावरही महान ओजस्वी अज शत्रुसेनेवर चढाई करून गेला. कारण प्रबळ वायूने धूर भलेही दूरवर नेला जाऊ शकतो (पण) अग्नी तर जेथे गवत लाकडे इत्यादी इंधन असते तेथेच निर्माण होतो (प्रज्वलित असतो.)

रथी निषङ्गी कवची धनुष्मान्दृप्तः स राजन्यकमेकवीरः ।
निवारयामास महावराहः कल्पक्षयोद्वृत्तमिवार्णवाम्भः ॥५६ ॥

ज्याप्रमाणे महावराह अवतार घेतलेल्या महाविष्णूने कल्पांती सीमातीत समुद्राचे पाणी अडविले त्याप्रमाणे रथावर आरूढ, भाता बांधलेल्या कवचधारी, धनुर्धारी, रणदुर्मद (रणात लढत असल्यामुळे आनंदित, अभिमानी असलेला), अद्वितीय वीर अज राजाने क्षत्रियांच्या समूहाला नियंत्रित केले.

स दक्षिणं तूणमुखेन वामं व्यापारयन्हस्तमलक्ष्यताजौ ।
आकर्णकृष्टा सकृदस्य योद्धुर्मौर्वीव बाणान्सुषुवे रिपुघ्नान् ॥५७ ॥

तो अजराजा युद्धात आपल्या उजव्या हाताने भात्यातील बाण अतिशय कौशल्याने (चित्ताकर्षक पद्धतीने) काढून इतक्या वेगाने शरसंधान करीत होता की कानापर्यंत एकदाच खेचलेली प्रत्यंचा जणू शत्रुनाशक बाणांना जन्मच देत होती असे वाटत होते.

स रोषदष्टाधिकलोहितोष्ठैर्व्यक्तोध्वरेखा भृकुटीर्वहद्भिः ।
तस्तार गां भल्लनिकृत्तकण्ठैर्हूंकारगर्भैर्द्विषतां शिरोभिः ॥५८ ॥

ज्याचे ओठ त्वेषाने चावल्यामुळे लालबुंद झाले आहेत, क्रोधाने भुवया ताणल्या आहेत आणि संतापाने जे हुंकार भरत आहेत, अशा शत्रूंची मस्तके भाल्याने तोडून (अजाने) त्या मस्तकांनी धरती झाकून टाकली.

सर्वैर्बलाङ्गैर्द्विरदप्रधानैः सर्वायुधैः कङ्कटभेदिभिश्च ।
सर्वप्रयत्नेन च भूमिपालास्तस्मिन्प्रजह्रुर्युधि सर्व एव ॥५९ ॥

त्या युद्धात (अजराजा एकेकट्याला पुरून उरतो आहे हे लक्षात येताच) सर्वच्या सर्व राजे (आपल्या चतुरंग सेनेसह) गजदळाच्या प्रमुख आपल्या सेनेच्या सर्व अंगांसह, घोडे, रथ, पदाती सैनिकांद्वारा कवच भेदण्याच्या सर्व शस्त्रास्त्रांसह अजराजावर चालून गेले.

सोऽस्त्रव्रजैश्छन्नरथः परेषां ध्वजाग्रमात्रेण बभूव लक्ष्यः ।
नीहारमग्नो दिनपूर्वभागः किंचित्प्रकाशेन विवस्वतेव ॥६० ॥

ज्याप्रमाणे धुक्याने आच्छादलेल्या दिवशी सूर्याच्या धूसर प्रकाशानेच सकाळ झाल्याचे कळून येते, त्याप्रमाणे शत्रूच्या शस्त्रांच्या समूहांनी संपूर्णपणे रथ घेरलेला (शस्त्रांनी आच्छादलेला) असा अजराजा केवळ त्याच्या पताकेचे टोकच दिसत असल्यामुळे लक्षात येत होता.

प्रियंवदात्प्राप्तमसौ कुमारः प्रायुङ्क राजस्वधिराजसूनुः ।
गान्धर्वमस्त्रं कुसुमास्त्रकान्तः प्रस्वापनं स्वप्ननिवृत्तलौल्यः ॥६१ ॥

महाराजाधिराज रघूच्या, नेहमीच जागरूक असलेल्या कामदेवाप्रमाणे मनोहारी अशा पुत्राने प्रियंवद नावाच्या गंधर्वाकडून प्राप्त झालेल्या शत्रूला संमोहित करणाऱ्या प्रस्वापन अस्त्राचा प्रयोग (त्याच्यावर चालून आलेल्या) राजांवर केला.

ततो धनुष्कर्षणमूढहस्तमेकांसपर्यस्तशिरस्त्रजालम् ।
तस्थौ ध्वजस्तम्भनिषण्णदेहं निद्राविधेयं नरदेवसैन्यम् ॥६२ ॥

गांधर्वास्त्र सोडल्यावर धनुष्याची प्रत्यंचा खेचणारे त्यांचे (शत्रूराजांच्या सेनेतील सैनिकांचे) हात निष्क्रिय झाले, त्यांची शिरस्त्राणे त्यांच्या एका खांद्यावर लटकू लागली आणि त्यांचे देह ध्वजांच्या काठ्यांचा आधार घेऊन निष्क्रिय झाले. अशाप्रकारे त्या राजांची सेना निद्राधीन झाली.

ततः प्रियोपात्तरसेऽधरोष्ठे निवेश्य दध्मौ जलजं कुमारः ।
तेन स्वहस्तार्जितमेकवीरः पिबन्यशो मूर्तमिवाबभासे ॥६३ ॥

शत्रुसेना निद्राधीन झाल्यावर कुमार अजाने आपल्या प्रियेच्या अधरामृताचा रस चाखलेल्या ओठांवर जलातून (समुद्रातून) उत्पन्न झालेला शंख ठेवून वाजविला (विजयाचा शंखनाद केला). त्यामुळे तो अद्वितीय वीर आपल्या हातांनी कमावलेल्या मूर्तिमान यशाचेच जणू पान करीत आहे असा भासू लागला.

शङ्खस्वनाभिज्ञतया निवृत्तास्तं सन्नशत्रुं ददृशुः स्वयोधाः ।
निमीलितानामिव पङ्कजानां मध्ये स्फुरन्तं प्रतिमाशशाङ्कम् ॥६४ ॥

शंखनाद ओळखून परतलेल्या अजराजाच्या सेनेतील वीरांना निद्राधीन शत्रू असलेल्या तो अजराजा मिटलेल्या कमळांच्या मध्यभागी चमकणाऱ्या चंद्राच्या प्रतिबिंबासारखा दिसला.

सशोणितैस्तेन शिलीमुखाग्रैर्निक्षेपिताः केतुषु पार्थिवानाम् ।
यशो हृतं संप्रति राघवेण न जीवितं वः कृपयेति वर्णाः ॥६५ ॥

'हे राजांनों! रघुपुत्र अजाद्वारा तुम्हा सर्वांच्या यशाचे हरण केले गेले पण दया उत्पन्न झाल्याने प्राण घेतले नाही '. या अर्थाचे प्रतिपादक वाक्य रक्ताने रंगलेल्या बाणांच्या टोकांनी अजाने राजांच्या ध्वजांवर लिहिले.

स चापकोटीनिहितैकबाहुः शिरस्त्रनिष्कर्षणभिन्नमौलिः ।
ललाटबद्धश्रमवारिबिन्दुर्भीतां प्रियामेत्य वचो बभाषे ॥६६ ॥
इतः परानर्भकहार्यशस्त्रान्वैदर्भि पश्यानुमता मयासि ।
एवंविधेनाहवचेष्टितेन त्वं प्रार्थ्यसे हस्तगता ममैभिः ॥६७ ॥

धनुष्याच्या एका टोकावर हात टेकवून मस्तकावरील लोखंडी टोप काढल्यामुळे विखुरलेले केस असलेला, कपाळावर ओघळणाऱ्या घामाच्या बिंदूंनी शोभून दिसणारा तो अज भयभीत झालेल्या प्रिया इंदुमतीच्या जवळ येऊन म्हणाला, 'हे

विदर्भराजकन्ये ! आता लहान मुलांनीही ज्यांची शस्त्रे हिसकावून घ्यावीत असे हे (दयनीय अवस्थेस पोहोचलेले) शत्रू बघ. माझी तुला अनुमती आहे. अशाप्रकारेच निद्रारूपी युद्धकर्माच्या बळावर हे माझ्यापासून तुला हिरावून घेऊ इच्छीत होते!

तस्याः प्रतिद्वन्द्विभवाद्विषादात्सद्यो विमुक्तं मुखमाबभासे ।
निःश्वासबाष्पापगमात्प्रपन्नः प्रसादमात्मीयमिवात्मदर्शः ॥६८ ॥

शत्रूंमुळे निर्माण झालेल्या विषादापासून तत्क्षणी मुक्त झालेला इंदुमतीचा चेहरा निःश्वासाचे बाष्प पुसून टाकल्यामुळे आपल्या स्वच्छ स्वरूपात आलेल्या आरशाप्रमाणे चमकू लागला.

हृष्टापि सा ह्रीविजिता न साक्षाद्वाग्भिः सखीनां प्रियमभ्यनन्दत् ।
स्थली नवाम्भःपृषताभिवृष्टा मयूरकेकाभिरिवाभ्रवृन्दम् ॥६९ ॥

पतीच्या पराक्रमाने (विजयाने) अत्यंत आनंदित झालेल्या पण (स्त्रीसुलभ स्वभावाने) लज्जाभिभूत झालेल्या इंदुमतीने आपल्या प्राणप्रियाचे अभिनंदन स्वतःच न करता तर ज्याप्रमाणे (मेघांद्वारा वर्षिलेल्या) जलबिंदूंनी चिंब भिजलेली पृथ्वी मोरांच्या वाणीने मेघसमूहांचे अभिनंदन करते त्याप्रमाणे मैत्रिणींच्या माध्यमाने अजाचे अभिनंदन केले.

इति शिरसि स वामं पादमाधाय राज्ञा-
मुदवहदनवद्यां तामवद्यादपेतः ।
रथतुरगरजोभिस्तस्य रूक्षालकाग्रा
समरविजयलक्ष्मीः सैव मूर्ता बभूव ॥७० ॥

अशा प्रकारे प्रशंसनीय त्या अजराजाने (विरोधक) राजांच्या मस्तकावर आपला डावा पाय ठेवीत अनिंद्य सुंदरी इंदुमतीचा स्वीकार केला. रथाच्या घोड्यांच्या टापांनी

उडालेल्या धुळीमुळे जिच्या केसांची टोकं रुक्ष झाली आहेत अशी ती इंदुमती जणू काही युद्धाची मूर्तिमती विजयलक्ष्मीच दिसत होती.

प्रथमपरिगतार्थस्तं रघुः संनिवृत्तं
विजयिनमभिनन्द्य श्लाघ्यजायासमेतम् ।
तदुपहितकुटुम्बः शान्तिमार्गोत्सुकोऽभू-
न्न हि सति कुलधुर्ये सूर्यवंश्या गृहाय ॥७१ ॥

इति श्रीरघुवंशे महाकाव्ये कविश्रीकालिदासकृतौ अजपाणिग्रहणं नाम सप्तमः सर्गः ।

(पुन्हा स्वगृही) येण्यापूर्वीच अजाच्या विवाहरूप अर्थास जाणणाऱ्या रघूने विजयी, स्तुत्य पत्नी सह आलेल्या त्या अजाचे अभिनंदन केले आणि त्याच्यावर राजपरिवाराचे दायित्व (जबाबदारी) सोपवून तो (रघुराजा) शांतीचा मार्ग असलेल्या मोक्षासाठी उत्सुक झाला कारण कुलपरंपरेला चालविण्यास पात्र पुत्र असतानां सूर्यवंशी राजे गृहस्थाश्रमात राहात नाहीत.

अशी रीतीने कविश्रेष्ठ कालिदास रचित रघुवंश नामक महाकाव्यातील
अजपाणिग्रहण नामक सातवा सर्ग संपला.

अष्टमः सर्गः

अथ तस्य विवाहकौतुकं ललितं बिभ्रत एव पार्थिवः ।
वसुधामपि हस्तगामिनीमकरोदिन्दुमतीमिवापराम् ॥१ ॥

(अजराजाचा इंदुमतीशी विवाह झाल्यानंतर) विवाहाचे सुंदर, मंगल असे कंकण घातले असतानांच अजराजाच्या हातात रघुराजाने जणू दुसरी इंदुमतीच अशी पृथ्वी सोपविली.

दुरितैरपि कर्तुमात्मसात्प्रयतन्ते नृपसूनवो हि यत् ।
तदुपस्थितमग्रहीदजः पितुराज्ञेति न भोगतृष्णया ॥२ ॥

राजपुत्र जे राज्य (विषप्रयोगादी निषिद्ध अशा) पापकृत्यांद्वारा मिळवू पाहतात अशा प्राप्त राज्याधिकारास अजराजाने पित्याची आज्ञा मानून स्वीकारले. राज्यभोगाच्या तृष्णेने नव्हे.

अनुभूय वसिष्ठसंभृतैः सलिलैस्तेन सहाभिषेचनम् ।
विशदोच्छ्वसितेन मेदिनी कथयामास कृतार्थतामिव ॥३ ॥

महर्षी वसिष्ठांद्वारा अभिमंत्रित जलाने राजा अजाबरोबरच वसुंधरेनेही (पृथ्वीने) अभिषेक अनुभवला आणि विमल आनंदोच्छ्वासाद्वारे जणू कृतार्थता प्रकट केली (हे अजराजाच्या राज्याभिषेकाचे वर्णन आहे.)

स बभूव दुरासदः परैर्गुरुणाऽथर्वविदा कृतक्रियः ।
पवनाग्निसमागमो ह्ययं सहितं ब्रह्म यदस्त्रतेजसा ॥४ ॥

अथर्ववेदाच्या जाणकार वसिष्ठ ऋषींद्वारा राज्याभिषेक झालेला अजराजा त्याच्या शत्रूंकरिता दुर्धर्ष म्हणजेच अंजिक्य ठरला कारण की अस्त्रतेजाने युक्त ब्रह्मतेज वायू आणि अग्नीच्या संगमासारखे असते. (टीपः-ऋषी वसिष्ठांच्या मार्गदर्शनाचा लाभ अजराजाला होत होता हे सूचित केले आहे)

रघुमेव निवृत्तयौवनं तममन्यन्त नवेश्वरं प्रजाः ।
स हि तस्य न केवलां श्रियं प्रतिपेदे सकलान्गुणानपि ॥५ ॥

अजराजाने रघुराजाची केवळ राज्यलक्ष्मीच नव्हे तर त्याचे शौर्य, औदार्य यांसारख्या समस्त गुणांचाच स्वीकार केला होता, त्यामुळे प्रजा त्या नवीन सम्राट अजास पुन्हा तरुण झालेला रघुराजाच समजू लागली.

अधिकं शुशुभे शुभंयुना द्वितयेन द्वयमेव संगतम् ।
पदमृद्धमजेन पैतृकं विनयेनास्य नवं च यौवनम् ॥६ ॥

दोन गोष्टी शुभ असलेल्या दोन अन्य गोष्टींशी युक्त झाल्यामुळे अधिक शोभू लागल्या. पित्याकडून मिळालेले समृद्ध राज्यपद अजराजामुळे आणि अजराजाचे तारुण्य विनयीपणामुळे सुशोभित झाले.

सदयं बुभुजे महाभुजः सहसोद्वेगमियं व्रजेदिति ।
अचिरोपनतां स मेदिनीं नवपाणिग्रहणां वधूमिव ॥७ ॥

नववधू जशी बळजबरीमुळे उद्विग्न होऊ नये म्हणून दयायुक्त होऊनच तिचा उपभोग घेतला जातो तसा बलशाली बाहू असलेल्या अजराजाने नव्यानेच प्राप्त झालेल्या पृथ्वीचा उपभोग नववधूप्रमाणे घेतला.

अहमेव मतो महीपतेरिति सर्वः प्रकृतिष्वचिन्तयत् ।
उदधेरिव निम्नगाशतेष्वभवन्नास्य विमानना क्वचित् ॥८ ॥

प्रजाजनांपैकी प्रत्येक जण हेच समजत होता की मीच अजराजाचा अत्यंत प्रिय आहे. शेकडो नद्यांच्या बाबतीत समुद्राप्रमाणेच (समुद्र जसा प्रत्येक नदीचा मोठ्या मनाने, प्रेमाने स्वीकार करतो तसा अज राजा प्रत्येकाच्या मताचा आदराने स्वीकार करीत असे) त्याच्या द्वारा कधीही कोणाचीही अवहेलना झाली नाही.

न खरो न च भूयसा मृदुः पवमानः पृथिवीरुहानिव ।
स पुरस्कृतमध्यमक्रमो नमयामास नृपानवुद्धरन् ॥९ ॥

ज्याप्रमाणे जास्त सोसाट्याचा नसलेला किंवा अगदीच संथ वाहत नसलेला असा वारा मोठमोठ्या वृक्षांना मुळासकट न उपटता वाकवितो त्याप्रमाणेच अधिक कठोर अथवा अधिक कोमल न राहता मध्यममार्गाचे अनुसरण करीत अजराजा (इतर) राजांना विनष्ट न करता नमवत असे.

अथ वीक्ष्य रघुः प्रतिष्ठितं प्रकृतिष्वात्मजमात्मवत्तया ।
विषयेषु विनाशधर्मसु त्रिदिवस्थेष्वपि निःस्पृहोऽभवत् ॥१० ॥
गुणवत्सुतरोपितश्रियः परिणामे हि दिलीपवंशजाः ।
पदवीं तरुवल्कवाससां प्रयताः संयमिनां प्रपेदिरे ॥११ ॥

(अजराजाचे राज्यशासन पाहून) त्यानंतर रघुराजा आपला पुत्र अज अमात्यादी लोकांमध्ये रुळलेला आहे (अमात्यादींवर प्रभावी ठरत आहे) असे पाहून अनित्य

अशा स्वर्गीय शब्दादिविषयांपासूनही विरक्त झाला. कारण दिलीपराजाच्या वंशात जन्मास आलेले राजे वृद्धावस्थेत आपल्या गुणी पुत्रांवर राज्यश्री सोपवून संयमाने वल्कले धारण करून संन्याशांचा मार्ग स्वीकारीत असत. (म्हणून रघुराजा लौकिक विषयांपासून विरक्त होणे साहजिकच होते.)

तमरण्यसमाश्रयोन्मुखं शिरसा वेष्टनशोभिना सुतः ।
पितरं प्रणिपत्य पादयोरपरित्यागमयाचतात्मनः ॥१२ ॥

(आपल्या पित्याच्या म्हणजेच रघुराजाच्या) दोन्ही चरणांवर आपले मुकुटाने सुशोभित मस्तक झुकवून नमस्कार करीत अजराजाने वनवासाकरिता उद्युक्त आपल्या पित्यास 'मला सोडून जाऊ नका' अशी विनंती केली.

रघुरश्रुमुखस्य तस्य तत्कृतवानीप्सितमात्मजप्रियः ।
न तु सर्प इव त्वचं पुनः प्रतिपेदे व्यपवर्जितां श्रियम् ॥१३ ॥

आपल्या पुत्रावर जिवापाड प्रेम करणाऱ्या रघूने डोळे पाणावलेल्या अजराजाची ती विनंती मान्य केली पण ज्याप्रमाणे एकदा टाकलेली कात साप पुन्हा धारण करीत नाही त्याप्रमाणे एकदा जिचा त्याग केला ती राज्यश्री रघूने पुन्हा स्वीकारली नाही.

स किलाश्रममन्त्यमाश्रितो निवसन्नावसथे पुराद्बहिः ।
समुपास्यत पुत्रभोग्यया स्नुषयेवाविकृतेन्द्रियः श्रिया ॥१४ ॥

तो रघुराजा अंतिम आश्रमाचा अर्थात संन्यासाश्रमाचा आश्रय घेऊन नगराच्या बाहेरील जागी जितेंद्रिय होऊन राहिला. आणि म्हणून पुत्राद्वारा उपभोग्य सुनेप्रमाणे असणाऱ्या राज्यश्रीने सुशोभित झाला. (ही राज्यश्री पुत्रवधू असल्याने आपल्या मुलाद्वारा उपभोग्य असे रघूने मानले आणि संतुष्ट मनाने त्याच्या उत्कर्षाची इच्छा मनात बाळगली.)

प्रशमस्थितपूर्वपार्थिवं कुलमभ्युद्यतनूतनेश्वरम् ।
नभसा निभृतेन्दुना तुलामुदितार्केण समारुरोह तत् ॥१५ ॥

ज्याप्रमाणे अस्त पावणारा चंद्र आणि उदयगामी सूर्य या दोहोंमुळे आकाश शोभून दिसते त्याप्रमाणेच निवृत्तावस्थेतील पूर्वीचा राजा रघू आणि अभ्युदयोन्मुख अभिनव राजा अज यांच्यामुळे प्रसिद्ध वैवस्वत मनूचे कुळ शोभू लागले.

यतिपार्थिवलिङ्गधारिणौ ददृशाते रघुराघवौ जनैः ।
अपवर्गमहोदयार्थयोर्भुवमंशाविव धर्मयोर्गतौ ॥१६ ॥

सर्व प्रजा संन्याशाची चिह्ने धारण केलेल्या रघूस आणि सम्राटाची चिह्ने धारण केलेल्या रघुपुत्र अजास पृथ्वीवर अवतरलेल्या मोक्ष आणि अभ्युदय स्वरूपातील धर्माचे अंश समजू लागली.

अजिताधिगमाय मन्त्रिभिर्युयुजे नीतिविशारदैरजः ।
अनुपायिपदोपपत्तये रघुराप्तैः समियाय योगिभिः ॥१७ ॥

अजराजाने अजितपद प्राप्त व्हावे म्हणून नीतिनिपुण मंत्र्यांशी सल्लामसलत केली आणि रघूने अक्षय मोक्षपदाचा लाभ व्हावा म्हणून यथार्थदर्शी तत्त्वज्ञानी योग्यांचे सान्निध्य स्वीकारले.

नृपतिः प्रकृतीरवेक्षितुं व्यवहारासनमाददे युवा ।
परिचेतुमुपांशु धारणां कुशपूतं प्रवयास्तु विष्टरम् ॥१८ ॥

तरुण सम्राट अजाने प्रजाजनांच्या व्यवहाराचे निरीक्षण करता यावे म्हणून धर्मासन स्वीकारले आणि वृद्ध राजा रघूने मनाचे स्थैर्य प्राप्त व्हावे म्हणून निर्जन एकांत अशा ठिकाणी कुशांनी पवित्र अशा आसनाचा अंगीकार केला.

अनयत्प्रभुशक्तिसंपदा वशमेको नृपतीननन्तरान् ।
अपरः प्रणिधानयोग्यया मरुतः पञ्च शरीरगोचरान् ॥१९ ॥

एकाने (अजराजाने) इतर राजांना प्रभुशक्तिसंपदेने (कोश, दंड, बल इत्यादी राजनीतीतील उपायांनी) आत्मवश करून घेतले (स्वतःच्या नियंत्रणात आणले) आणि दुसऱ्याने (रघुराजाने) समाधीच्या अभ्यासाने शरीरातील प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान इत्यादी वायूंना नियंत्रणात आणले.

अकरोदचिरेश्वरः क्षितौ द्विषदारम्भफलानि भस्मसात् ।
इतरो दहने स्वकर्मणां ववृते ज्ञानमयेन वह्निना ॥२० ॥

नव्याने राजपद स्वीकारलेल्या अजराजाने पृथ्वीवर शत्रूंनी आरंभिलेल्या कार्यांच्या परिणामांना जाळून नष्ट केले. आणि दुसरा (रघुराजा) ज्ञानमय अग्नीद्वारे स्वतःच्या कर्माना जाळण्यास प्रवृत्त झाला.

पणबन्धमुखान्गुणानजः षडुपायुङ्क्त समीक्ष्य तत्फलम् ।
रघुरप्यजयत्गुणत्रयं प्रकृतिस्थं समलोष्टकाञ्चनः ॥२१ ॥

अजराजाने संधी इत्यादी षड्गुण आणि त्यांच्या फळांचे यथायोग्य चिंतन करून त्यांचा (राज्यकारभारात) उपयोग केला (आणि) माती व सोने यांबाबत समदृष्टी ठेवणाऱ्या रघूने सत्त्व, रज आणि तम यांची साम्यावस्था असणारी प्रकृती जिंकली.

न नवः प्रभुराफलोदयात्स्थिरकर्मा विरराम कर्मणः ।
न च योगविधेर्नवेतरः स्थिरधीरा परमात्मदर्शनात् ॥२२ ॥

स्थिरकर्म करणाऱ्या (फळाची प्राप्ती होईपर्यंत सातत्याने काम करीत राहण्याची वृत्ती व चिकाटी धारण करणाऱ्या) नवीन सम्राट अजाने कार्याच्या फळाची प्राप्ती

होईपर्यंत कार्य सुरूच ठेवले (मध्येच कार्याचा त्याग केला नाही) आणि दुःखात होरपळून न जाणाऱ्या आणि सुखात हुरळून न जाणाऱ्या असा रघूने परमात्म्याचे दर्शन होईपर्यंत योगविधी थांबविले नाहीत.

इति शत्रुषु चेन्द्रियेषु च प्रतिषिद्धप्रसरेषु जाग्रतौ ।
प्रसितावुदयापवर्गयोरुभयीं सिद्धिमुभाववापतुः ॥२३ ॥

अशाप्रकारे आपापल्या पुरुषार्थांमध्ये अडथळे उत्पन्न करणाऱ्या शत्रूच्या आणि इंद्रियांच्या बाबतीत सजग राहणाऱ्या, अभ्युदय आणि मोक्षात आसक्त असणाऱ्या त्या दोघांनी (धर्माबाबतच्या) दोन्ही सिद्धी प्राप्त केल्या.

अथ काश्चिदजव्यपेक्षया गमयित्वा समदर्शनः समाः ।
तमसः परमापदव्ययं पुरुषं योगसमाधिना रघुः ॥२४ ॥

त्यानंतर रघूने सर्वांना समदृष्टीने पाहून अजाची इच्छा राखून काही वर्षे (अजाच्या सान्निध्यात) व्यतीत करून योगसमाधीद्वारा अविनाशी, तमोगुणाच्या पलिकडे असणाऱ्या परम पुरुष परमात्म्यास प्राप्त केले.

श्रुतदेहविसर्जनः पितुश्चिरमश्रूणि विमुच्य राघवः ।
विदधे विधिमस्य नैष्ठिकं यतिभिः सार्धमनग्निरग्निचित् ॥२५ ॥

अग्निहोत्री रघुनंदन अजाने पित्याच्या मृत्यूची बातमी ऐकून बराच काळपर्यंत अश्रुपात केला व त्यानंतर त्यावर (रघूवर) अग्निसंस्कार न करता (देहाचे दहन न करता) संन्याशास उचित असे नैष्ठिक विधी केले.

अकरोत्स तदौर्ध्वदैहिकं पितृभक्त्या पितृकार्यकल्पवित् ।
न हि तेन पथा तनुत्यजस्तनयावर्जितपिण्डकाङ्क्षिणः ॥२६ ॥

पित्याच्या श्राद्धकर्माचा विधी जाणणाऱ्या त्या अजराजाने पित्याचे देहावसान झाल्यावर करण्यात येणारी श्राद्ध, पिण्डदान, तर्पण व तिलांजली इत्यादी कर्मे आत्यंतिक भक्तीने केली वस्तुतः. योगमार्गाने शरीराचा त्याग करणारे पुत्राद्वारा पिंडदानाची अपेक्षा करीत नाहीत.

स परार्ध्यगतेरशोच्यतां पितुरुद्दिश्य सदर्थवेदिभिः ।
शमिताधिरधिज्यकार्मुकः कृतवानप्रतिशासनं जगत् ॥२७ ॥

उत्तमगती प्राप्त झालेल्या पित्याबाबत दुःख करता कामा नये असे तत्त्ववेत्त्यांद्वारा समजावून सांगितल्यावर मानसिक वेदना दूर सारून त्याने (अजराजाने) धनुष्यावर प्रत्यंचा चढवून विश्वाला अद्वितीय शासक असणारे असे बनविले. (दुःखावर मात करून विश्वाच्या संरक्षणाचे दायित्व स्वीकारले.)

क्षितिरिन्दुमती च भामिनी पतिमासाद्य तमप्रयपौरुषम् ।
प्रथमा बहुरत्नसूरभूदपरा वीरमजीजनत्सुतम् ॥२८ ॥

पृथ्वी आणि लावण्यवती इंदुमती यांनी महापराक्रमी आणि पुरुषार्थसंपन्न असलेल्या अजराजाला पतिरूपात प्राप्त केले. त्यापैकी पहिली (पृथ्वी) अनंत रत्नांना उत्पन्न करणारी झाली आणि दुसरी (सम्राज्ञी इंदुमती) वीरपुत्राला जन्म देणारी ठरली.

दशरश्मिशतोपमद्युतिं यशसा दिक्षु दशस्वपि श्रुतम् ।
दशपूर्वरथं यमाख्यया दशकण्ठारिगुरुं विदुर्बुधाः ॥२९ ॥

इंदुमतीने ज्या पुत्राला जन्म दिला त्याला सर्व विद्वान लोक सहस्ररश्मी सूर्याप्रमाणे तेजस्वी, यशाने दाही दिशांमध्ये विख्यात, रावणाच्या शत्रूचा पिता दशरथ या नावाने ओळखतात.

ऋषिदेवगणस्वधाभुजां श्रुतयागप्रसवैः स पार्थिवः ।
अनृणत्वमुपेयिवान्बभौ परिधेर्मुक्त इवोष्णदीधितिः ॥३० ॥

वेदाध्ययन, यज्ञ आणि पुत्र यांद्वारा ऋषी, देव आणि पितर यांच्या ऋणातून मुक्त झालेला राजा अज खळे नसलेल्या सूर्याप्रमाणे शोभून दिसू लागला.

बलमार्तभयोपशान्तये विदुषां सत्कृतये बहु श्रुतम् ।
वसु तस्य विभोर्न केवलं गुणवत्तापि परप्रयोजना ॥३१ ॥

त्या सामर्थ्यशाली महाराज अजाचे केवळ धनच परोपकाराकरिता नव्हते. तर त्याचे सद्गुणी असणे हे देखील दुसऱ्यांच्या हिताचे सिद्ध झाले. त्याचा पराक्रम (पौरुष) पीडितांचे भय शमवण्याकरिता आणि त्याचे बहुश्रुतत्व (ज्ञानीपणा) विद्वानांच्या सत्काराकरिता (गुणग्राहकत्वासाठी) होते.

स कदाचिदवेक्षितप्रजः सह देव्या विजहार सुप्रजाः ।
नगरोपवने शचीसखो मरुतां पालयितेव नन्दने ॥३२ ॥

ज्याप्रमाणे देवतांचा प्रतिपाळ करणारा इंद्र आपल्या राणी शचीसह अमरावती नगरीतील नंदनवनात विहार करतो त्याप्रमाणे प्रजापालक, सुपुत्र असणारे महाराज अज आपल्या पट्टराणी इंदुमतीसह एकदा नगरातील उपवनात विहाराकरीता गेले.

अथ रोधसि दक्षिणोदधेः श्रितगोकर्णनिकेतमीश्वरम् ।
उपवीणयितुं ययौ रवेरुदयावृत्तिपथेन नारदः ॥३३ ॥

त्या वेळी दक्षिणेकडील समुद्रकिनाऱ्यावर गोकर्ण नावाच्या स्थानी प्रतिष्ठित शिवाची वीणेद्वारा स्तुती करण्याकरिता देवर्षी नारद सूर्याच्या भ्रमणमार्गाने चालले होते.

कुसुमैर्ग्रथितामपार्थिवैः स्रजमातोद्यशिरोनिवेशिताम् ।
अहरत्किल तस्य वेगवानधिवासस्पृहयेव मारुतः ॥३४ ॥

त्या नारदांच्या वीणेच्या टोकाला दिव्य फुलांनी गुंफलेली माळ लावली होती. ती सोसाट्याच्या वाऱ्याने सुगंध घेण्याच्या इच्छेनेच जणू उडवून नेली.

भ्रमरैः कुसुमानुसारिभिः परिकीर्णा परिवादिनी मुनेः ।
ददृशे पवनापलेपजं सृजती बाष्पमिवाङ्गनाविलम् ॥३५ ॥

फुलांचे अनुसरण करणाऱ्या भुंग्यांनी घेरलेली मुनींची वीणा वाऱ्याने केलेल्या या अपमानामुळे (उत्पन्न झालेली) काजळ मिसळलेली आसवे ढाळीत असल्याप्रमाणे दिसत होती.

अभिभूय विभूतिमार्तवीं मधुगन्धातिशयेन वीरुधाम् ।
नृपतेरमरस्रगाप सा दयितोरुस्तनकोटिसुस्थितिम् ॥३६ ॥

स्वतःच्या मध आणि सुगंधाच्या तीव्रतेने वेलींच्या ऋतूंद्वारा होणाऱ्या बहरालही मागे टाकणारी ती दिव्य माळ अजराजाच्या प्रियेच्या (इंदुमतीच्या) उन्नत वक्षस्थळावर स्थिरावली.

क्षणमात्रसखीं सुजातयोः स्तनयोस्तामवलोक्य विह्वला ।
निमिमील नरोत्तमप्रिया हृतचन्द्रा तमसेव कौमुदी ॥३७ ॥

आपल्या सुंदर स्तनांशी क्षणभरच सख्य केलेल्या त्या माळेला पाहून नरश्रेष्ठ अजाच्या प्रियेने (इंदुमतीने) व्याकुल होऊन राहूने ग्रासलेल्या चंद्राच्या चंद्रिकेप्रमाणे आपले नेत्र दीर्घकालिक निद्रेत मिटले. (ती मरण पावली.)

वपुषा करणोज्झितेन सा निपतन्ती पतिमप्यपातयत् ।
ननु तैलनिषेकबिन्दुना सह दीपार्चिरुपैति मेदिनीम् ॥३८ ॥

गलितगात्र देहाने कोसळणाऱ्या त्या इंदुमतीने (स्वतः पडत असता स्वतः सोवत) आपल्या पतीला अजालाही पाडले (तिला सावरता सावरता तोही शोकात व्याकुळ होऊन पडला) (दिव्यातून किंवा मशालीतून) दिव्याची ज्योत तेलाचा बिंदू घेऊनच जमिनीवर पडते.

उभयोरपि पार्श्ववर्तिनां तुमुलेनार्तरवेण वेजिताः ।
विहगाः कमलाकरालयाः समदुःखा इव तत्र चुक्रुशुः ॥३९ ॥

त्या दोघांच्या (राजा अज आणि राणी इंदुमतीच्या) अवती भवती असलेल्या सेवकांच्या करुण स्वराने तेथे कमळांच्या सरोवरात निवासास असलेले पक्षीदेखील उद्विग्न होऊन जणू समदुःखी असल्याप्रमाणे करुण कूजन करू लागले.

नृपतेर्व्यजनादिभिस्तमो नुनुदे सा तु तथैव संस्थिता ।
प्रतिकारविधानमायुषः सति शेषे हि फलाय कल्पते ॥४० ॥

पंख्याने वारा घालणे, अंगावर थंड पाणी शिंपडणे इत्यादी उपायांनी अजराजाची जडता दूर झाली (वेशुद्ध झालेल्या राजाला विविध उपायांनी शुद्धीवर आणले) पण राणी इंदुमती तशीच पडून राहिली (जागी झाली नाही किंवा शुद्धीवरही आली नाही) कारण उपचार इत्यादींचा प्रयोग देहात प्राण असेपर्यंतच सफल होतो. (राजाचे आयुष्य शिल्लक असल्याने त्याच्यावर केलेल्या प्रयोगांना यश आले पण राणीचा मृत्यू झाल्याने ते असफल झाले.)

प्रतियोजयितव्यवल्लकीसमवस्थामथ सत्त्वविप्लवात् ।
स निनाय नितान्तवत्सलः परिगृह्योचितमङ्कमङ्गनाम् ॥४१ ॥

तार चढविण्याकरिता ज्यापद्धतीने वीणा मांडीवर घ्यावी तसेच चेतना नष्ट झालेल्या आपल्या प्रियेला उत्कट प्रेम करणाऱ्या अजाने (आपल्या दोन्ही हातांनी) धरून आपल्या मांडीवर घेतले.

पतिरङ्कनिषण्णया तया करणापायविभिन्नवर्णया ।
समलक्ष्यत बिभ्रदाविलां मृगलेखामुषसीव चन्द्रमाः ॥४२ ॥

गालितगात्र झाल्यामुळे फिकुटलेल्या, (विवर्ण) तिला पतीने (अजाने) मांडीवर घेतल्यावर तो (अज) पहाटेच्या वेळी फिकट झालेले मृगलांछन धारण करणाऱ्या चंद्राप्रमाणे वाटत होता.

विललाप स बाष्पगद्गदं सहजामप्यपहाय धीरताम् ।
अभितप्तमयोऽपि मार्दवं भजते कैव कथा शरीरिषु ॥४३ ॥

महाराज अज आपले सहज धैर्य त्यागून अश्रूंमुळे दाटून आलेल्या गद्गद स्वरात विलाप करू लागले (धाय मोकलून रडू लागले.) आगीत तापलेले लोखंडही वितळून मऊ होते तर मग दुःखाने होरपळलेल्या माणसाची काय कथा ?

कुसुमान्यपि गात्रसंगमात्प्रभवन्त्यायुरपोहितुं यदि ।
न भविष्यति हन्त साधनं किमिवान्यत्प्रहरिष्यतो विधेः ॥४४ ॥

(मानवी) देहाला फुलांच्या स्पर्शानेही जर मृत्यू येत असेल तर अरेरे! आघात करू इच्छिणाऱ्या विधात्याजवळची अशी कोणती वस्तू आहे जी प्राणघातक साधन ठरणार नाही? (विधाता कोणतीही वस्तू प्राण घेण्याकरिता साधन म्हणून वापरू शकतो.)

अथवा मृदु वस्तु हिंसितुं मृदुनैवारभते प्रजान्तकः ।
हिमसेकविपत्तिरत्र मे नलिनी पूर्वनिदर्शनं मता ॥४५ ॥

अथवा प्रजेचा संहारक 'काळ' कोमल वस्तूला कोमल वस्तूनेच नष्ट करण्याचे काम करतो. याबाबतीत पहिले उदाहरण म्हणजे हिमवर्षावानेही नष्ट होणारी कमलिनी (आणि दुसरे म्हणजे पुष्पमालेल्या स्पर्शाने गतप्राण झालेली इंदुमती).

स्रगियं यदि जीवितापहा हृदये किं निहिता न हन्ति माम् ।
विषमप्यमृतं क्वचिद्भवेदमृतं वा विषमीश्वरेच्छया ॥४६ ॥

जर ही (फुलांची) माळ प्राण घेणारी असेल तर माझ्या छातीला हिचा स्पर्श होऊनही माझा मृत्यू का झाला नाही ? (खरेच आहे की) ईश्वराच्या इच्छेनेच विषाचेही अमृत होते आणि अमृताचेही विष होते.

अथवा मम भाग्यविप्लवादशनिः कल्पित एष वेधसा ।
यदनेन तरुर्न पातितः क्षपिता तद्विटपाश्रिता लता ॥४७ ॥

किंवा माझ्या दुर्दैवामुळे ही माळ विधात्याने वज्ररूप केली असेल, ज्याने (माझ्यासारखा) वृक्ष न तोडता त्याच्या आश्रयाने असलेल्या वेलीलाच नष्ट केले.

कृतवत्यसि नावधीरणामपराद्धेऽपि यदा चिरं मयि ।
कथमेकपदे निरागसं जनमाभाष्यमिमं न मन्यसे ॥४८ ॥

(हे इंदुमती) अनेकदा माझ्याकडून अपराध घडूनही (तू कधीच) माझा अपमान केला नाहीस आणि अचानकच कोणताही अपराध न करता या माणसाला (मला अजाला) बोलण्यास पात्रही का समजत नाहीस ?

ध्रुवमस्मि शठः शुचिस्मिते विदितः कैतववत्सलस्तव ।
परलोकमसंनिवृत्तये यदनापृच्छ्य गतासि मामितः ॥४९ ॥

हे निर्मल हास्य असलेल्या प्राणप्रिये ! तू निश्चितपणे हे जाणले असावेस की, मी लुच्चा, कपटी प्रेमी आहे म्हणूनच तू अशी मला न सांगताच पुन्हा कधीही न परतण्यासाठी परलोकी निघून गेलीस.

दयितां यदि तावदन्वगाद्विनिवृत्तं किमिदं तया विना ।
सहतां हतजीवितं मम प्रबलामात्मकृतेन वेदनाम् ॥५० ॥

माझे हे दुर्दैवी प्राण (थोड्या वेळापूर्वी) जर प्रियेच्या मागोमाग निघून गेलेच होते (मी वेशुद्ध झालो होतो तेव्हा) तर तिच्या शिवाय कसे परत आले ? आता आपल्याच कृत्याचे (फलस्वरूप) क्लेश त्याने भोगलेच पाहिजेत.

सुरतश्रमसंभृतो मुखे ध्रियते स्वेदलवोद्गमोऽपि ते ।
अथ चास्तमिता त्वमात्मना धिगिमां देहभृतामसारताम् ॥५१ ॥

रतिश्रमाने आलेले काही घर्मबिंदू (अजूनही) तुझ्या मुखावर दिसत आहेत आणि तू मात्र गतप्राण झालीस ! देहधारी प्राण्यांच्या या नश्वरतेचा धिक्कार असो.

मनसापि न विप्रियं मया कृतपूर्वं तव किं जहासि माम् ।
ननु शब्दपतिः क्षितेरहं त्वयि मे भावनिबन्धना रतिः ॥५२ ॥

मी मनाने देखील तुला न आवडणारी गोष्ट कधी केली नाही. तर मला का सोडून चाललीस ? मी तर केवळ नामधारी भूपती आहे. खरंतर माझी प्रीती तुझ्यावरच आहे. (मी पृथ्वीचा स्वामी असलो तरी, ती तुझी सवत असली तरी माझे खरे प्रेम मात्र तुझ्यावरच आहे. मी तुझ्याशीच एकनिष्ठ आहे.)

कुसुमोत्खचितान्वलीभृतश्चलयन्भृङ्गरुचस्तवालकान् ।
करभोरु करोति मारुतस्त्वदुपावर्तनशङ्कि मे मनः ॥५३ ॥

हे करभोरू ! फुले माळलेले, कुरळे, भ्रमरांसारखे काळे तुझे केस (केसांच्या बटा) वाऱ्याने हालविले जात असल्याने मला तुझ्या परतण्याची शक्यता वाटते आहे. (माझ्या मनांत तुझ्या पुनरागमनाची आशा उपस्थित झाली आहे.)

तदपोहितुमर्हसि प्रिये प्रतिबोधेन विषादमाशु मे ।
ज्वलितेन गुहागतं तमस्तुहिनाद्रेरिव नक्तमोषधिः ॥५४ ॥

त्यामुळेच हे प्रिये ! ज्याप्रमाणे रात्री तृणज्योती नामक वेल आपल्या प्रकाशाने हिमालय पर्वताच्या गुहांमधील अंधार दूर करते त्याप्रमाणेच तू देखील जागी होऊन लगेचच माझे हे नैराश्य नष्ट केले पाहिजेस.

इदमुच्छ्वसितालकं मुखं तव विश्रान्तकथं दुनोति माम् ।
निशि सुप्तमिवैकपङ्कजं विरताभ्यन्तरषट्पदस्वनम् ॥५५ ॥

हालणाऱ्या बटा असणारे पण निःशब्द असे तुझे हे मुख रात्रीच्या वेळी मिटलेल्या, (आत भ्रमर असलेल्या) गुंजारव न करणाऱ्या भ्रमराने युक्त अशा अद्वितीय कमळाप्रमाणे मला दुःख देते आहे ग.

शशिनं पुनरेति शर्वरी दयिता द्वन्द्वचरं पतत्रिणम् ।
इति तौ विरहान्तरक्षमौ कथमत्यन्तगता न मां दहेः ॥५६ ॥

रात्र चंद्राचे सान्निध्य पुन्हा प्राप्त करते, जोडीने विहार करणाऱ्या चक्रवाकाजवळ पुन्हा त्याची प्रिया येते. (परस्परांपासून वियुक्त झालेले चक्रवाकांचे जोडपे पुन्हा भेटते.) त्यामुळे चंद्र आणि चक्रवाक हे दोघे विरहाचा काळ सहन करू शकतात. पण कायमचीच (मला सोडून) गेलेली तू मला कशी बरं विरहाग्नीने जाळणार नाहीस? (मला तू कधीच भेटणार नाहीस. तुझ्या विरहाचा हा विरहाग्नी मला जाळतो आहे.)

नवपल्लवसंस्तरेऽपि ते मृदु दूयेत यदङ्गमर्पितम् ।
तदिदं विषहिष्यते कथं वद वामोरु चिताधिरोहणम् ॥५७ ॥

नवीन पालवीच्या सुकुमार बिछान्यावर निजल्यावर सुद्धा तुझ्या ह्या कोमल देहाला वेदना होत असत तर हे लावण्यवती ! हे असे चितेवर ठेवणे (तुला) कसे सहन होईल बरे !

इयमप्रतिबोधशायिनीं रशना त्वां प्रथमा रहःसखी ।
गतिविभ्रमसादनीरवा न शुचा नानु मृतेव लक्ष्यते ॥५८ ॥

एकांतातील पहिली सखी अरणारी (तुझी) मेखला विहार करतानाचा विलास थांबल्याने निःशब्द झालेली पुन्हा कधीही न उठण्यासाठी झोपलेल्या तुझ्या सह शोकाने मृतप्राय दिसत आहे असे नाही तर खरोखरच ती मौन भावाने तुझे अनुसरण करीत मृतच झाली आहे.

कलमन्यभृतासु भासितं कलहंसीषु मदालसं गतम् ।
पृषतीषु विलोलमीक्षितं पवनाधूतलतासु विभ्रमाः ॥५९ ॥
त्रिदिवोत्सुकयाप्यवेक्ष्य मां निहिताः सत्यममी गुणास्त्वया ।
विरहे तव मे गुरुव्यथं हृदयं न त्ववलम्बितुं क्षमाः ॥६० ॥

कोकिळांकडे मधुर भाषण, कलहंसींकडे मादक चाल, हरिणींकडे चंचल दृष्टी आणि वाऱ्याद्वारा हालविल्या जाणाऱ्या वेलींमध्ये विलास विभ्रम हे सगळे गुण तू स्वर्गारोहणास उत्कंठित झाली असतांना तुझ्या विरहाने असहाय झालेल्या मला दिलासा मिळावा म्हणून तू या सर्वांमध्ये ठेवलेस पण तुझ्या विरहाने अत्यधिक व्याकुळ झालेल्या माझ्या हृदयाला आधार देण्यास ते असमर्थ आहेत. (ते मला आधार देण्याऐवजी अधिकच व्याकुळ करीत आहेत.)

मिथुनं परिकल्पितं त्वया सहकारः फलिनी च नन्विमौ ।
अविधाय विवाहसत्क्रियामनयोर्गम्यत इत्यसाम्प्रतम् ॥६१ ॥

तू या आम्रवृक्ष आणि प्रियंगुलता यांच्या जोडीची कल्पना केली होती तर मग या दोहोंवर विवाहसंस्कार केल्याशिवायच अशी कशी निघून गेलीस ? हे योग्य नाही. (यांचा विवाह न लावताच तुझे मृत्युमुखी पडणे अयोग्य आहे.)

कुसुमं कृतदोहदस्त्वया यदशोकोऽयमुदीरयिष्यति ।
अलकाभरणं कथं नु तत्तव नेष्यामि निवापमाल्यताम् ॥६२ ॥

तुझ्याद्वारा डोहाळे पुरविला गेलेला हा अशोक जो आता फुलांनी बहरेल त्याची ती फुले तुझ्या केसांत माळण्यास उपयुक्त ठरली असती आता तीच फुले तुझ्या दाहसंस्कारानंतर तुला तिलांजलीत देऊ का ? (ज्यांनी तुला सजवायचे ती फुले तुला तिलांजलीत मी कशी बरं वाहू ?)

स्मरतेव सशब्दनूपुरं चरणानुग्रहमन्यदुर्लभम् ।
अमुना कुसुमाश्रुवर्षिणा त्वमशोकेन सुगात्रि शोच्यसे ॥६३ ॥

हे सुंदरी ! इतरांकरिता दुर्लभ असणाऱ्या पैंजणांच्या आवाजाने आकर्षित करणाऱ्या अनुग्रहाचे स्मरण करणारा, पुष्परूपी अश्रू ढाळणारा हा अशोक तुझ्या मृत्यूमुळे सशोक (दुःखी) झाला आहे.

तव निःश्वसितानुकारिभिर्बकुलैरर्धचितां समं मया ।
असमाप्य विलासमेखलां किमिदं किन्नरकण्ठि सुप्यते ॥६४ ॥

किन्नरांच्या कंठाप्रमाणे सुस्वर कंठ असणाऱ्या हे सुंदरी ! तुझ्या निःश्वासाचे अनुकरण करणाऱ्या बकुळीच्या फुलांनी माझ्यासोबत अर्धीच गुंफलेली विलासरशना पूर्ण केल्याशिवायच अशाप्रकारे तू का बरं झोपली आहेस ?

समदुःखसुखः सखीजनः प्रतिपच्चन्द्रनिभोऽयमात्मजः ।
अहमेकरसस्तथापि ते व्यवसायः प्रतिपत्तिनिष्ठुरः ॥६५ ॥

तुझ्या सुखाने सुखी आणि तुझ्या दुःखाने दुःखी होणाऱ्या या तुझ्या मैत्रिणी, प्रतिपदेच्या चंद्राप्रमाणे लहानसा (आपला) हा मुलगा आणि अनन्यरसनिष्ठ प्रेमी असा मी अशा आमच्यासोबत तुझा हा व्यवहार अतिशय कठोर आहे.

धृतिरस्तमिता रतिश्च्युता विरतं गेयमृतुर्निरुत्सवः ।
गतमाभरणप्रयोजनं परिशून्यं शयनीयमद्य मे ॥६६ ॥

आज माझे धैर्य खचले, प्रेम स्खलित झाले (रतिभाव ढळून गेला), (प्रेमाचे आलाप) गान थांबून गेले, वसंतादी ऋतूंचे उत्सव नष्ट झाले. आभूषणांचे प्रयोजनच लोपले (सजण्याचा उद्देशच निघून गेला) आणि (माझी) शय्या सुनी झाली (तुझ्याशिवाय सगळेच व्यर्थ झाले आहे, अर्थशून्य भासते आहे.)

गृहिणी सचिवः सखी मिथः प्रियशिष्या ललिते कलाविधौ ।
करुणाविमुखेन मृत्युना हरता त्वां वद किं न मे हृतम् ॥६७ ॥

तूच माझी गृहलक्ष्मी, मंत्री, एकांतात प्रिय सखी, मनोरम कलांच्या प्रयोगात प्रियशिष्या होतीस म्हणूनच सांग (समष्टिरूपाने) तुझे हरण करणाऱ्या क्रूर काळाने माझे काय बरे हरले नाही ?

मदिराक्षि मदाननार्पितं मधु पीत्वा रसवत्कथं नु मे ।
अनुपास्यसि बाष्पदूषितं परलोकोपनतं जलाञ्जलिम् ॥६८ ॥

हे मदिराक्षी (मदिरेप्रमाणे उन्मत्त करणारे नेत्र असणाऱ्या सुंदरी !) आधी माझ्या मुखाने अर्पित स्वादिष्ट मधूचे पान करून आता कशी बरं माझ्याद्वारा दिलेल्या, परलोकात प्राप्त, अश्रूंनी दूषित अशा जलांजलीचे अनुपान करशील ?

विभवेऽपि सति त्वया विना सुखमेतावदजस्य गण्यताम् ।
अहृतस्य विलोभनान्तरैर्मम सर्वे विषयास्त्वदाश्रयाः ॥६९ ॥

राज्य इत्यादी वैभव असूनही तुझ्याशिवाय अजाचे आता इतकेच सुख समज (तुझ्यासह जे भोगले तेवढेच काय ते सुख ! आता काहीच सुखकारक शिल्लक राहिले नाही.) कारण इतर आकर्षक विषयांनी आकृष्ट न होणाऱ्या माझे सर्व विषय तुझ्याच अधीन होते. (तुझ्याव्यतिरिक्त आता मला काहीच आवडीचे राहिले नाही.)

विलपन्निति कोसलाधिपः करुणार्थग्रथितं प्रियां प्रति ।
अकरोत्पृथिवीरुहानपि स्रुतशाखारसबाष्पदूषितान् ॥७० ॥

कोसलेश अजाने अशाप्रकारे करुणार्द्र होउन प्रियेसाठी असा विलाप करीत (तिच्या वियोगाचे दुःख व्यक्त करीत) पृथ्वीतून उत्पन्न होणाऱ्या जड वृक्षांना देखील मकरंदरसरूपी आसवे ढाळावयास लावले (रडविले.).

अथ तस्य कथंचिदङ्कतः स्वजनस्तामपनीय सुन्दरीम् ।
विससर्ज तदन्त्यमण्डनामनलायागुरुचन्दनैधसे ॥७१ ॥

त्यानंतर (अजाच्या) नातेवाईकांनी त्या अजाच्या मांडीवरून कसेबसे (अतिशय कष्टाने) दिव्य पुष्पमाळेने अखेरचा साज केलेल्या त्या सुंदरी इंदुमतीला उतरविले आणि अगरू व चंदनाच्या काष्ठांनी प्रज्वलित करण्यात येणाऱ्या अग्नीत (चितेवर) समर्पित केले.

प्रमदामनु संस्थितः शुचा नृपतिः सन्निति वाच्यदर्शनात् ।
न चकार शरीरमग्निसात्सह देव्या न तु जीविताशया ॥७२ ॥

'ज्ञानी असून देखील अजराजाने दुःखाने आपल्या प्रियतमा पत्नीचे अनुसरण करीत चितेत बसून मृत्यू स्वीकारला' या लोकापवादाच्या भीतीनेच त्यांनी महादेवीसह (राणी इंदुमतीसह) आपला देह अग्नीच्या अधीन केला नाही. जिवंत राहण्याच्या आशेने त्याने असे केलेले नव्हते.

अथ तेन दशाहतः परे गुणशेषामपदिश्य भामिनीम् ।
विदुषा विधयो महर्द्धयः पुर एवोपवने समापिताः ॥७३ ॥

त्यानंतर शास्त्रज्ञानी अशा त्या अजाने केवळ गुणरूपानेच अस्तित्वात असलेल्या प्रियेचे (प्रियेला उद्देशून) दहा दिवसांनंतर नगराजवळील उपवनात महासमृद्धशाली श्राद्धविधी केले.

स विवेश पुरीं तया विना क्षणदापायशशाङ्कदर्शनः ।
परिवाहमिवावलोकयन्स्वशुचः पौरवधूमुखाश्रुषु ॥७४ ॥

रात्र सरल्यावर (दिसणाऱ्या) चंद्राप्रमाणे त्या इंदुमतीशिवाय निष्प्रभ अशा त्या अजाने नगरातील स्त्रियांच्या चेहऱ्यावरील अश्रूंमध्येच जणू आपल्या दुःखाच्या प्रवाहास पहात नगरात प्रवेश केला.

अथ तं सवनाय दीक्षितः प्रणिधानाद्गुरुराश्रमस्थितः ।
अभिषङ्गजडं विजज्ञिवानिति शिष्येण किलान्वबोधयत् ॥७५ ॥

त्यानंतर यज्ञार्थ दीक्षा ग्रहण केलेल्या कुलगुरू महर्षी वसिष्ठांनी आश्रमात असतानाच (बसल्याजागी) शोकाकुल अजराजाविषयी चित्ताच्या एकाग्रतेच्या बळाने जाणले आणि शिष्याकरवी (शिष्याद्वारा) याप्रकारचा उपदेश दिला.

असमाप्तविधिर्यतो मुनिस्तव विद्वानपि तापकारणम् ।
न भवन्तमुपस्थितः स्वयं प्रकृतौ स्थापयितुं पथश्च्युतम् ॥७६ ॥

वसिष्ठ मुनींचे यज्ञविधी अजून समाप्त झाले नाहीत त्यामुळेच तुमचे (पत्नीवियोगाचे) दुःख जाणत असून देखील ते धैर्य खचलेल्या आपणाला स्थैर्य देण्याकरिता (आधार देण्यासाठी किंवा सांत्वन करण्यासाठी) उपस्थित राहू शकले नाहीत.

मयि तस्य सुवृत्त वर्तते लघुसंदेशपदा सरस्वती ।
शृणु विश्रुतसत्त्वसार तां हृदि चैनामुपधातुमर्हसि ॥७७ ॥

हे सदाचारी (अज राजा) ! संक्षिप्त संदेश असलेली त्या मुनींची वाणी (वसिष्ठ मुनींचा तुझ्याकरिता दिलेला उपदेश) माझ्याजवळ आहे. हे विख्यात पराक्रमी (अज राजा) ! आपण ती ऐकावी आणि मनात जपावी.

पुरुषस्य पदेष्वजन्मनः समतीतं च भवच्च भावि च ।
स हि निष्प्रतिघेन चक्षुषा त्रितयं ज्ञानमयेन पश्यति ॥७८ ॥

अजन्मा पुरुषाच्या चरणांतील तिन्ही लोकांत भूत, भविष्य व वर्तमान या तिन्ही काळांमधील घटना ते मुनी वसिष्ठ अप्रतिहत ज्ञानमय दृष्टीने पाहतात. (त्या क्रांतदर्शी वसिष्ठ मुनींच्या बोलण्याबाबत संशय घेणे योग्य नाही.)

चरतः किल दुश्चरं तपस्तृणबिन्दोः परिशङ्कितः पुरा ।
प्रजिघाय समाधिभेदिनीं हरिरस्मै हरिणीं सुराङ्गनाम् ॥७९ ॥

प्राचीन काळी 'तृणबिंदू' नावाच्या ऋषींच्या अत्यंत कठोर तपाने भयभीत होऊन इंद्राने त्यांची समाधी भंग पावावी म्हणून हरिणी नावाची अप्सरा (ऋषींकडे) पाठविली.

स तपःप्रतिबन्धमन्युना प्रमुखाविष्कृतचारुविभ्रमम् ।
अशपद्भव मानुषीति तां शमवेलाप्रलयोर्मिणा भुवि ॥८० ॥

त्या ऋषींनी (आपल्या चित्ताच्या) शांतिरूपी किनाऱ्यावर प्रलयकालीन लाटेप्रमाणे (स्वतःच्या) तपश्चर्येत बाधक ठरणाऱ्या, मनोहर विलास करणाऱ्या तिला (हरिणी नावाच्या अप्सरेस) क्रोधाने 'भूलोकात मानव होऊन राहा' (मानवाच्या जन्मास प्राप्त हो) असा शाप दिला.

भगवन्परवानयं जनः प्रतिकूलाचरितं क्षमस्व मे ।
इति चोपनतां क्षितिस्पृशं कृतवाना सुरपुष्पदर्शनात् ॥८१ ॥

अहो भगवान ! हा जन (मी हरिणी अप्सरा) परवश आहे म्हणून माझ्या अपराधास (आपल्या तपश्चर्येत बाधा आणण्याच्या माझ्या अपराधास) क्षमा असावी.

अशाप्रकारे शरण आलेल्या त्या हरिणीला दिव्य पुष्पांचे दर्शन होईपर्यंतच पृथ्वीचा स्पर्श करणारी मानवी स्त्री बनविले. (देवांच्या चरणांचा पृथ्वीला स्पर्श होत नसतो त्यामुळे शापरूपात दिव्य पुष्पांचे दर्शन घडेपर्यंत तू मानवीरूपात पृथ्वीवर राहशील अशा स्वरूपात क्षमाही केली.)

क्रथकैशिकवंशसंभवा तव भूत्वा महिषी चिराय सा ।
उपलब्धवती दिवश्च्युतं विवशा शापनिवृत्तिकारणम् ॥८२ ॥
तदलं तदपायचिन्तया विपदुत्पत्तिमतामुपस्थिता ।
वसुधेयमवेक्ष्यतां त्वया वसुमत्या हि नृपाः कलत्रिणः ॥८३ ॥

क्रथकैशिक कुळातील ती कन्या बऱ्याच दिवसांपर्यंत तुझी राणी बनून शापाच्या निवृत्तीचे कारण असलेल्या, स्वर्गातून पडलेल्या त्या दिव्य पुष्पांच्या प्राप्तीने (दिव्य पुष्पांच्या दर्शनाने शापाचा कालावधी संपल्यामुळे ती स्वर्गात म्हणजेच स्वस्थानी जाण्यास) विवश झाली. त्यामुळे तिच्या मृत्यूमुळे आपण चिंतित होऊ नये. जन्म झालेल्याचा मृत्यू अटळ आहे. आपण या पृथ्वीस पाहावे. (पृथ्वीचे पालन करावे) पृथ्वीपती राजा पृथ्वीनेच (तिच्या पालनाने) पत्नी युक्त असतो.

उदये मदवाच्यमुज्झता श्रुतमाविष्कृतमात्मवत्त्वया ।
मनसस्तदुपस्थिते ज्वरे पुनरक्लीबतया प्रकाश्यताम् ॥८४ ॥

अभ्युदय प्राप्त झाल्यावर मदाने उत्पन्न होणाऱ्या निंद्य बाबींचा त्याग करून आपण जे आत्मनिष्ठ शास्त्रज्ञान प्रकटविले तेच (ज्ञान) मानसिक रोग निर्माण होताच (पत्नीच्या स्मरणाने आपण आपले मन विचलित झाले असता) पुरुषार्थरूपाने (पराक्रम दाखवून) पुन्हा प्रकट करावे.

रुदता कुत एव सा पुनर्भवता नानुमृतापि लभ्यते ।
परलोकजुषां स्वकर्मभिर्गतयो भिन्नपथा हि देहिनाम् ॥८५ ॥

तिच्याकरिता रडून आपण तिला पुन्हा कसे मिळवू शकाल ? तिच्या मागून मरण स्वीकारूनही तिला आपण मिळवू शकणार नाही कारण परलोकात निवास करणाऱ्या जीवांच्या गती आपापल्या कर्माने भिन्न भिन्न स्वरूपाच्या असतात.

अपशोकमनाः कुटुम्बिनीमनुगृह्णीष्व निवापदत्तिभिः ।
स्वजनाश्रु किलातिसंततं दहति प्रेतमिति प्रचक्षते ॥८६ ॥

मनाला शोकमुक्त करीत पत्नीला पिंडदानाने उपकृत करावे कारण, असे म्हटले जाते की, 'अत्यंत शोकाने संतप्त आत्मीयांचे अश्रू प्रेतात्म्याला क्लेश पोहचवितात'.

मरणं प्रकृतिः शरीरिणां विकृतिर्जीवितमुच्यते बुधैः ।
क्षणमप्यवतिष्ठते श्वसन्यदि जन्तुर्ननु लाभवानसौ ॥८७ ॥

'देह धारण करणाऱ्याचे मरण तर स्वाभाविकच आहे आणि जीवन विकार आहे' असे विद्वानांचे म्हणणे आहे (ज्ञानी लोकांचा हा उपदेश आहे.) प्राणी श्वास घेत क्षणभर जरी जगला तरी त्याला खरोखरच मोठाच लाभ समजावा.

अवगच्छति मूढचेतनः प्रियनाशं हृदि शल्यमर्पितम् ।
स्थिरधीस्तु तदेव मन्यते कुशलद्वारतया समुद्धृतम् ॥८८ ॥

विवेकहीन व्यक्ती प्रिय व्यक्तीच्या नाशास हृदयात रुतलेला काटा मानते परंतु स्थिर बुद्धीची व्यक्ती मात्र त्या मृत्त्यूस कुशल मार्गातून निघालेला समजते. (मृताच्या मोक्षाचा उपाय मानते.)

स्वशरीरशरीरिणावपि श्रुतसंयोगविपर्ययौ यदा ।
विरहः किमिवानुतापयेद्वद बाह्यैर्विषयैर्विपश्चितम् ॥८९ ॥

जो ज्ञानी माणूस स्वतःच्या देह आणि देहीचा संयोग आणि वियोग यांबावत जाणतो (आत्मज्ञानी आहे) त्याला बाह्य विषयांद्वारे (पत्नी, पुत्र, मित्र इत्यांदीचा वियोग) होणारा विरह कसा बरे तापदायक ठरू शकेल ? सांग.

न पृथग्जनवच्छुचो वशं वशिनामुत्तम गन्तुमर्हसि ।
द्रुमसानुमतां किमन्तरं यदि वायौ द्वितयेऽपि ते चलाः ॥९० ॥

हे जितेंद्रियशिरोमणी महाराज अज ! आपण इतर सामान्य लोकांप्रमाणे दुःखाच्या अधीन जाणे योग्य नाही कारण सोसाट्याचा वारा सुटला असता वृक्ष आणि पर्वत हे दोघेही जर चंचल झाले तर यांच्यामध्ये फरक तो काय ?

स तथेति विनेतुरुदारमतेः प्रतिगृह्य वचो विससर्ज मुनिम् ।
तदलब्धपदं हृदि शोकघने प्रतियातमिवान्तिकमस्य गुरोः ॥९१ ॥

त्या श्रेष्ठ ज्ञानी गुरू वसिष्ठांचा उपदेश 'ठीक आहे, मी तसेच करेन (गुरू वसिष्ठांच्या उपदेशाप्रमाणेच वागेन) अशाप्रकारे स्वीकारून अजराजाने वसिष्ठांच्या शिष्यास निरोप दिला. पण शोक अनावर झाल्यावर मात्र त्यांचे वचन (गुरू वसिष्ठांचा उपदेश) अजराजाच्या मनात न ठसता जणू काही गुरू वसिष्ठांकडे परतविले गेले.

तेनाष्टौ परिगमिताः समाः कथंचिद्बालत्वादवितथसूनृतेन सूनोः ।
सादृश्यप्रतिकृतिदर्शनैः प्रियायाः स्वप्नेषु क्षणिकसमागमोत्सवैश्च ॥९२ ॥

सत्य आणि प्रिय बोलणाऱ्या त्या अजराजाने आपला पुत्र (दशरथ) अजाण असल्यामुळे (सज्ञान नसल्याने) प्रियतमा इंदुमतीच्या चित्रांच्या दर्शनाने तसेच स्वप्नातील क्षणिक समागमाच्या सुखाच्या उत्सवात कशी बशी आठ वर्षे काढली. (चित्रांच्या आणि स्वप्नांच्या आधारे तो कसाबसा आठ वर्षे जगला.)

तस्य प्रसह्य हृदयं किल शोकशङ्कुः
प्लक्षप्ररोह इव सौधतलं बिभेद ।
प्राणान्तहेतुमपि तं भिषजामसाध्यं
लाभं प्रियानुगमने त्वरया स मेने ॥९३ ॥

ज्याप्रमाणे पिंपळाचा अंकुर जमिनीला बळाने छेदून टाकतो त्याप्रमाणेच शोकरूपी शल्याने (खिळ्याने) अजराजाचे हृदय विदीर्ण करून टाकले. त्याने उत्कंठापूर्वक मृत्यूचे कारण असलेले, वैद्यांना चिकित्सेला असाध्य असे ते शोकशल्य प्रियेच्या अनुसरणाचे लाभकारी (साधन) मानले.

सम्यग्विनीतमथ वर्महरं कुमार-
मादिश्य रक्षणविधौ विधिवत्प्रजानाम् ।
रोगोपसृष्टतनुदुर्वसतिं मुमुक्षुः
प्रायोपवेशनमतिर्नृपतिर्बभूव ॥९४ ॥

त्यानंतर राजा अजाने स्वभाव आणि संस्कारांनी विनीत असणाऱ्या, कवच धारण करण्यास योग्य झालेल्या राजकुमार दशरथाला प्रजेच्या संरक्षणाकरिता विधिपूर्वक नियुक्त केले आणि (स्वतः) रोगग्रस्त देहातून मुक्तता व्हावी या इच्छेने अन्नत्यागाचा निश्चय केला.

तीर्थे तोयव्यतिकरभवे जह्नुकन्यासरय्वो-
र्देहत्यागादमरगणनालेख्यमासाद्य सद्यः ।
पूर्वाकाराधिकतररुचा संगतः कान्तयासौ
लीलागारेष्वरमत पुनर्नन्दनाभ्यन्तरेषु ॥९५ ॥

इति श्रीरघुवंशे महाकाव्ये कविश्रीकालिदासकृतौ अजविलापः नाम अष्टमः सर्गः ।

त्या राजा अजाने गंगा आणि सरयू यांच्या संगमावरील तीर्थात देहत्याग केल्याने तत्क्षणी अमरत्वाची प्राप्ती करून घेतली, आणि पूर्वीच्या आकारापेक्षा अधिकतर कांती असणाऱ्या दिव्य कांतेसह नंदनवनातील क्रीडाभवनांमध्ये तो पुन्हा रमण करू लागला.

अशा रीतीने कविश्रेष्ठ कालिदास रचित रघुवंश नामक महाकाव्यतील अजविलापः नावाचा आठवा सर्ग संपला.

नवमः सर्गः

पितुरनन्तरमुत्तरकोसलान्समधिगम्य समाधिजितेन्द्रियः ।
दशरथः प्रशशास महारथो यमवतामवतां च धुरि स्थितः ॥१ ॥

संयमामुळे जितेंद्रिय असणारा, संयमी जनांचा आणि प्रजा रक्षकांचा अग्रणी असणारा महारथी दशरथ वडिलांच्या नंतर उत्तर कोसलचे राज्य मिळवून शासन करू लागला.

अधिगतं विधिवद्यदपालयत्प्रकृतिमण्डलमात्मकुलोचितम् ।
अभवदस्य ततो गुणवत्तरं सनगरं नगरन्ध्रकरौजसः ॥२ ॥

क्रौंच पर्वताला छिद्र करणाऱ्या स्वामी कार्तिकेयाप्रमाणे दशरथाने आपल्या वंशाला साजेसे नगरासह सर्वांचेच पालन पोषण केले (त्याच्या राज्यातील प्रजाजनांचे आणि सर्वच प्राणिमात्रांचे देखील). त्यामुळेच राज्यातील प्रजा दशरथाच्या प्रशासनास (पूर्वीच्या राजांपेक्षाही) अधिक गुणवान मानू लागली.

उभयमेव वदन्ति मनीषिणः समयवर्षितया कृतकर्मणाम् ।
बलनिषूदनमर्थपतिं च तं श्रमनुदं मनुदण्डधरान्वयम् ॥३ ॥

बल नावाच्या दैत्याला मारणाऱ्या इंद्राला आणि मनुवंशाचा दंड धारण करणाऱ्या त्या पृथ्वीपती दशरथाला जल आणि धनाची वेळेवर वृष्टी करीत असल्यामुळे हे दोघेही आपापली कार्ये पूर्ण करणाऱ्याचा थकवा घालवणारे आहेत असे विद्वान लोक म्हणत असत.

जनपदे न गदः पदमादधावभिभवः कुत एव सपत्नजः ।
क्षितिरभूत्फलवत्यजनन्दने शमरतेऽमरतेजसि पार्थिवे ॥४ ॥

अजराजाचा शांतिप्रिय असूनही देवतांप्रमाणे तेजस्वी असणारा पुत्र दशरथ पृथ्वीपती झाल्यावर जनपदात (राज्यात) रोगही पदक्षेप करू शकत नव्हेत तर शत्रूंद्वारे आक्रमणाचा विषयच लांब राहिला. पृथ्वी सुफला झाली.

दशदिगन्तजिता रघुणा यथा श्रियमपुष्यदजेन ततः परम् ।
तमधिगम्य तथैव पुनर्बभौ न न महीनमहीनपराक्रमम् ॥५ ॥

दाही दिशांना जिंकणाऱ्या रघुराजाद्वारा पृथ्वी जशी वैभवसंपन्न झाली होती आणि त्यानंतर अजराजाद्वारा जशी धनधान्याने परिपूर्ण झाली तशीच महापराक्रमी दशरथाला स्वामीरूपात मिळवून पुन्हा शोभून दिसत नव्हती असे नाही तर ती अधिकच शोभासंपन्न झाली.

समतया वसुवृष्टिविसर्जनैर्नियमनादसतां च नराधिपः ।
अनुययौ यमपुण्यजनेश्वरौ सवरुणावरुणाग्रसरं रुचा ॥६ ॥

ज्याप्रमाणे यमराज सर्वांना समदृष्टीने पाहतो, कुबेर धनाची आणि वरुण जलाची वर्षा करतो, सूर्य अत्यंत तेजस्वी असतो त्याप्रमाणे तो तेजस्वी नरपती (दशरथ) आपल्या समदृष्टीमुळे, धन व जलाची लयलूट उपलब्ध करून दिल्यामुळे जणू काही यम, कुबेर, वरुण व सूर्याचे अनुकरण करीत होता.

न मृगयाभिरतिर्न दुरोदरं न च शशिप्रतिमाभरणं मधु ।
तमुदयाय न वा नवयौवना प्रियतमा यतमानमपाहरत् ॥७ ॥

अभ्युदयासाठी प्रयत्नशील तो दशरथराजा शिकारीविषयी आसक्ती, द्यूतक्रीडेचे दुर्व्यसन आणि चांदण्यात मद्यपान इत्यादींच्य मोहात कधीही पडला नाही. किंवा नवयौवना स्त्रीच्या मोहपाशातही तो गुरफटला नाही. (या गोष्टी त्याला त्याच्या कर्तव्यापासून परावृत्त करू शकल्या नाहीत.)

न कृपणा प्रभवत्यपि वासवे न वितथा परिहासकथास्वपि ।
न च सपत्नजनेष्वपि तेन वागपरुषा परुषाक्षरमीरिता ॥८ ॥

तो आपल्या शासन काळात इंद्रासमोरही दीन वाणीत बोलला नाही (त्याने इंद्राला याचना केली नाही) गंमतीतही कधी असत्य भाषण केले नाही आणि रोषरहित असलेल्या त्याने शत्रूच्या बाबतीत ही कठोर वचन उद्गारले नाही.

उदयमस्तमयं च रघूद्वहादुभयमानशिरे वसुधाधिपाः ।
स हि निदेशमलङ्घयतामभूत्सुहृदयोद्धृदयः प्रतिगर्जताम् ॥९ ॥

पृथ्वीचे पालन करणाऱ्या राजांनी रघुकुलाच्या धुरंधर महाराज दशरथाद्वारा अभ्युदय आणि नाश दोन्हीही मिळवले. कारण तो आदेशांचे पालन करणाऱ्यांचा मित्र होता आणि प्रतिस्पर्धा करणाऱ्यांकरिता लोहहृदयी (कठोर) होता.

अजयदेकरथेन स मेदिनीमुदधिनेमिमधिज्यशरासनः ।
जयमघोषयदस्य तु केवलं गजवती जवतीव्रहया चमूः ॥१० ॥

धनुष्यावर प्रत्यंचा चढवलेल्या महाराज दशरथाने समुद्राची मेखला धारण करणात्या पृथ्वीला एकाच रथाच्या साहाय्याने जिंकले. महाराज दशरथाच्या गजसेनेने आणि घोडदळाने तर केवळ त्याचा जयघोषच द्रुतगामी केला. (विजयप्राप्ती एकट्या दशरथाने केली आणि बाकी सैन्य केवळ जयजयकारापुरतेच कामी आले.)

अवनिमेकरथेन वरूथिना जितवतः किल तस्य धनुर्भृतः ।
विजयदुन्दुभितां ययुरर्णवा घनरवा नरवाहनसंपदः ॥११ ॥

शस्त्रास्त्रांनी आणि सुरक्षा व्यवस्थेने सुसज्ज अशा एकाच रथाने भूमंडळाला जिंकणाऱ्या धनुर्धारी आणि कुबेराप्रमाणे धनसंपन्न त्या दशरथाची मेघाप्रमाणे गर्जना करणाऱ्या समुद्रांनी विजय-दुंदुभी वाजविण्याचे काम केले.

शमितपक्षबलः शतकोटिना शिखरिणां कुलिशेन पुरन्दरः ।
स शरवृष्टिमुचा धनुषा द्विषां स्वनवता नवतामरसाननः ॥१२ ॥

पुरभेदन करणाऱ्या इंद्राने शंभर टोके असलेल्या वज्राने पर्वतांच्या पंखांची शक्ति नष्ट केली आणि नव्यानेच उमललेल्या कमळाप्रमाणे मुख असलेल्या त्या दशरथाने बाण वर्षविणाऱ्या, टणत्कार करणाऱ्या धनुष्यानेच शत्रुपक्षाचे बळ नष्ट केले. (इंद्राला शंभर टोकांचे वज्र वापरावे लागले पण दशरथाने फक्त धनुष्याच्या बळावर पराक्रम केला.)

चरणयोर्नखरागसमृद्धिभिर्मुकुटरत्नमरीचिभिरस्पृशन् ।
नृपतयः शतशो मरुतो यथा शतमखं तमखण्डितपौरुषम् ॥१३ ॥

ज्याप्रमाणे देवगण इंद्राचा पदस्पर्श करतात त्याप्रमाणेच शेकडो राजे अखंडित पराक्रमी त्या महाराजाधिराज दशरथाच्या चरणांशी नतमस्तक होत असत आणि त्यांच्या मुकुटातील रत्ने दशरथाऱ्या चरणांच्या नखातील प्रभेमुळे चमकत असत.

निववृते स महार्णवरोधसः सचिवकारितबालसुताञ्जलीन् ।
समनुकम्प्य सपत्नपरिग्रहाननलकानलकानवमां पुरीम् ॥१४ ॥

मंत्र्यांच्या सांगण्यावरून हात जोडून नमस्कार करणारी मुले असलेल्या आणि (युद्धात पती मृत्युमुखी पडल्यामुळे) व्यवस्थितपणे केस न बांधलेल्या शत्रूंच्या स्त्रियांवर दया करून महाराज दशरथ समुद्राच्या किनाऱ्यावरून अलकानगरीप्रमाणेच सुंदर असलेल्या अयोध्येत परत आले.

उपगतोऽपि च मण्डलनाभितामनुदितान्यसितातपवारणः ।
श्रियमवेक्ष्य स रन्ध्रचलामभूदनलसोऽनलसोमसमद्युतिः ॥१५ ॥

अग्नीप्रमाणे प्रचंड तेजस्वी आणि मित्रांपुढे चंद्राप्रमाणे आल्हादक असणाऱ्या त्या दशरथाच्या शासनकाळात इतर कोणत्याही राजाचे (राजचिन्हरूप) श्वेतच्छत्र फडकू शकले नाही. बारा राजांच्या मंडलातील चक्रवर्ती सम्राट असूनही लक्ष्मी चंचल असते हे जाणून आळसाने ते चूक करीत नव्हते. (दशरथराजा इतर राजे राज्य रक्षणाचे काम करतील असे गृहीत धरून आळसाने वागत नव्हता – परावलंबी नव्हता)

तमपहाय ककुत्स्थकुलोद्भवं पुरुषमात्मभवं च पतिव्रता ।
नृपतिमन्यमसेवत देवता सकमला कमलाघवमर्थिषु ॥१६ ॥

पतिव्रता कमलासना देवी लक्ष्मीने अतिथियाचकांच्या बाबतीत गौरवशाली (याचकांना कधीही विन्मुख न पाठविणारे अशी ज्यांची ख्याती आहे अशा) अशा ककुत्स्थ कुळात जन्मलेल्या दशरथराजास आणि स्वयंभू पुरुषोत्तम विष्णूला सोडून इतर कोणत्याही राजाची सेवा केली का ? अर्थात नाही केली. (राज्यलक्ष्मीने विष्णूची आणि विष्णूप्रमाणे असलेल्या दशरथाचीच सेवा केली)

तमलभन्त पतिं पतिदेवताः शिखरिणामिव सागरमापगाः ।
मगधकोसलकेकयशासिनां दुहितरोऽहितरोपितमार्गणम् ॥१७ ॥

पर्वताच्या कन्या – नद्या ज्याप्रमाणे सागराचा पतिरूपात स्वीकार करतात त्याप्रमाणे मगध, कोसल आणि केकय देशाच्या शासकांच्या सुमित्रा, कौसल्या आणि कैकेयी नावाच्या पतिव्रता कन्यांनी शत्रूंवर बाणांनी प्रहार करणाऱ्या त्या दशरथाला पतिरूपात प्राप्त केले.

प्रियतमाभिरसौ तिसृभिर्बभौ तिसृभिरेव भुवं सह शक्तिभिः ।
उपगतो विनिनीषुरिव प्रजा हरिहयोऽरिहयोगविचक्षणः ॥१८ ॥

शत्रुमारक साधनांच्या प्रयोगात निष्णात महाराज दशरथ तिन्ही राण्यांसह प्रजापालनाच्या इच्छेने तिन्ही शक्तीसह पृथ्वीवर अवतरलेल्या इंद्राप्रमाणे शोभून दिसत होते. (तिन्ही राण्या ह्या राजाच्या प्रभुशक्ती, मंत्रशक्ती आणि उत्साहशक्ती यांप्रमाणे त्याला साहाय्यक ठरल्या.)

स किल संयुगमूर्ध्नि सहायतां मघवतः प्रतिपद्य महारथः ।
स्वभुजवीर्यमगापयदुच्छ्रितं सुरवधूरवधूतभयाः शरैः ॥१९ ॥

त्या महारथी दशरथाने युद्धभूमीत इंद्राला साहाय्य करून, निर्भय झालेल्या देवतांच्या वधूंकडून वृद्धिंगत झालेल्या आपल्या शरसंधानामुळे बाहुबळाविषयीचे यशोगान करविले. (आपल्या पतींचे आणि आपले रक्षण केल्यामुळे देववधूंनी दशरथाचे यशोगान केले)

क्रतुषु तेन विसर्जितमौलिना भुजसमाहृतदिग्वसुना कृताः ।
कनकयूपसमुच्छ्रयशोभिनो वितमसा तमसासरयूतटाः ॥२० ॥

दिशादिशांच्या अंताहून संपत्ती मिळवून, तमोगुणरहित असणाऱ्या राजा दशरथाने यज्ञ केले. यज्ञप्रसंगी मुकुट उतरवून ठेवला व तमसा आणि सरयू नद्यांचे किनारे यज्ञाच्या सोनेरी आणि उंच स्तंभांनी (यज्ञयूपांनी) सजविले.

अजिनदण्डभृतं कुशमेखलां यतगिरं मृगशृङ्गपरिग्रहाम् ।
अधिवसंस्तनुमध्वरदीक्षितामसमभासमभासयदीश्वरः ॥२१ ॥

जेव्हा दशरथाने मृगाचे चर्म धारण करून, औदुंबराचा दंड हातात घेतला, कुशाची मेखला बांधली, मौन धारण केले शरीराची खाज दूर करण्यासाठी मृगाचे शिंग जवळ बाळगले,व यज्ञाची दीक्षा घेतली तेव्हा त्याच्या शरीरात साक्षात भगवान शंकरांनी निवास करीत त्याला अनुपम दीप्तीने युक्त केले.

अवभृथप्रयतो नियतेन्द्रियः सुरसमाजसमाक्रमणोचितः ।
नमयति स्म स केवलमुन्नतं वनमुचे नमुचेररये शिरः ॥२२ ॥

यज्ञाच्या समाप्तींनतर अवभृथ स्नानाने विशुद्ध झालेले, देवतांच्या समूहात विराजमान होण्यास योग्य न जितेन्द्रिय असलेले महाराज दशरथ केवल जलवर्षा करणाऱ्या आणि नमुचीचा शत्रू असलेल्या इंद्रापुढेच आपले उन्नत मस्तक झुकवीत होते. (इंद्राविषयी दशरथाच्या मनात अत्यंत आदर होता त्यामुळे इन्द्राखेरीज इतर कोणाहीपुढे तो झुकत नव्हता.)

असकृदेकरथेन तरस्विना हरिहयाग्रसरेण धनुर्भृता ।
दिनकराभिमुखा रणरेणवो रुरुधिरे रुधिरेण सुरद्विषाम् ॥२३ ॥

अद्वितीय महारथी, शक्तिशाली, इंद्राच्या पुढे पुढे चालणाऱ्या, धनुर्धारी दशरथाने अनेक वेळा सूर्याला अभिमुख होणारी, युद्धभूमीतील धूळ देवद्रोही राक्षसांच्या रक्ताने अडविली.

अथ समाववृते कुसुमैर्नवैस्तमिव सेवितुमेकनराधिपम् ।
यमकुबेरजलेश्वरवज्रिणां समधुरं मधुरश्चितविक्रमम् ॥२४ ॥

त्यानंतर यम, कुबेर, जलाधिपती वरुण आणि वज्रधारी इंद्र यांप्रमाणे प्रजापालनाचा भार वाहणाऱ्या, पूजित पराक्रम अशा राजा दशरथाची सेवा करण्याकरिता जणू काही ऋतुराज वसंत नवीन फुलांसह तेथे आला.

जिगमिषुर्धनदाध्युषितां दिशं रथयुजा परिवर्तितवाहनः ।
दिनमुखानि रविर्हिमनिग्रहैर्विमलयन्मलयं नगमत्यजत् ॥२५ ॥

कुबेर जिथे राहत होता त्या उत्तर दिशेकडे जाण्याची इच्छा असलेला सूर्य सारथी अरुणाने रथ वळविल्यानंतर बर्फाला (हिमवर्षाव) अडविल्यामुळे पहाटेला निर्मल करीत मलयपर्वत ओलांडून पुढे निघाला. (मलयपर्वताहून पुढे सूर्य उत्तरायणासाठी निघाला.)

कुसुमजन्म ततो नवपल्लवास्तदनु षट्पदकोकिलकूजितम् ।
इति यथाक्रममाविरभून्मधुर्द्रुमवतीमवतीर्य वनस्थलीम् ॥२६ ॥

सगळ्यात आधी फुलांचा बहर, त्यानंतर नवीन पालवीची निर्मिती आणि ह्या दोहोंनंतर क्रमश: फुलांवर भ्रमरांचे रुंजी घालणे आणि नवपल्लवांमध्ये कोकिळांचे मधुर कूजन अशाप्रकारे वृक्षांनी समृद्ध वनस्थलीत उतरून वसंत प्रकट झाला.

नयगुणोपचितामिव भूपतेः सदुपकारफलां श्रियमर्थिनः ।
अभिययुः सरसो मधुसंभृतां कमलिनीमलिनीरपतत्रिणः ॥२७ ॥

नीतीच्या गुणांनी समृद्ध आणि, सज्जनांवर उपकार करणाऱ्या राजा दशरथाकडे संपत्तीच्यी याचना करणाऱ्या याचकांचे येणे-जाणे जसे (वारंवार) होत असे त्याप्रकारेच वसंतऋतूद्वारा योग्यप्रकारे परिपुष्ट सरोवरातील कमलिनींजवळ भ्रमर आणि जलचर हंसादि पक्षी येऊ लागले.

कुसुममेव न केवलमार्तवं नवमशोकतरोः स्मरदीपनम् ।
किसलयप्रसवोऽपि विलासिनां मदयिता दयिताश्रवणार्पितः ॥२८ ॥

वसंतऋतूत बहरलेल्या अशोक वृक्षाची केवळ फुलेच कामोद्दीपक ठरली नाहीत तर विलासीजनांना मदोन्मत्त करणारा प्रियतमांनी कानांमध्ये ल्यालेला कोमल पल्लवांचा अंकुरही (आभूषणस्वरूप पालवी) कामना चेतवू लागला.

विरचिता मधुनोपवनश्रियामभिनवा इव पत्रविशेषकाः ।
मधुलिहां मधुदानविशारदाः कुरबका रवकारणतां ययुः ॥२९ ॥

वसंतऋतूने निर्माण केलेल्या उपवनशोभेच्या नावीन्यपूर्ण पत्ररचनेसारखे विलसत असलेले, मकरंददानात निपुण असे कुरबकाचे वृक्ष भ्रमरांच्या गुंजारवास कारणीभूत ठरले.

सुवदनावदनासवसंभृतस्तदनुवादिगुणः कुसुमोद्गमः ।
मधुकरैरकरोन्मधुलोलुपैर्बकुलमाकुलमायतपङ्क्तिभिः ॥३० ॥

लावण्यवतीच्या सुंदर मुखातील मदिरेने फुललेल्या आणि त्या मदिरेप्रमाणे गुण असलेल्या फुलांनी बहरलेल्या बकुलवृक्षाला मधुरसिक भ्रमरांच्या लांबलचक रांगांनी वेढले.

उपहितं शिशिरापगमश्रिया मुकुलजालमशोभत किंशुके ।
प्रणयिनीव नखक्षतमण्डनं प्रमदया मदयापितलज्जया ॥३१ ॥

शिशिरऋतूनंतर अर्थात वसंतऋतूचे आगमन झाल्यावर पलाशवृक्षावरील कळ्यांचे समूह हे मदपानाने लज्जारहित झालेल्या प्रमदेने आपल्या प्रियकराच्या अवयवांवर केलेल्या नखक्षतरूपी आभूषणाप्रमाणे शोभून दिसू लागले.

व्रणगुरुप्रमदाधरदुःसहं जघननिर्विषयीकृतमेखलम् ।
न खलु तावदशेषमपोहितुं रविरलं विरलं कृतवान्हिमम् ॥३२ ॥

दंतक्षतामुळे प्रमदांच्या अधरांना अतिशय दु:सह वाटणाऱ्या, जघनस्थळांना मेखलाविहीन करणाऱ्या हिमास (हिमवर्षावामुळे येणा-या गारव्यास) सूर्याने (आपल्या उष्णतेने) संपूर्णपणे घालवले नाही पण थोड्या प्रमाणात मात्र नक्कीच कमी केले.

अभिनयान्परिचेतुमिवोद्यता मलयमारुतकम्पितपल्लवा ।
अमदयत्सहकारलता मनः सकलिका कलिकामजितामपि ॥३३ ॥

नृत्याभिनयाचा सराव करण्यासाठी सज्ज, मलयगिरीवरून वाहणाऱ्या वाऱ्याने हालविली जाणारी, मोहरलेल्या आम्रलतेची पालवी जितेंद्रिय लोकांनादेखील मदोन्मत्त करू लागली.

प्रथममन्यभृताभिरुदीरिताः प्रविरला इव मुग्धवधूकथाः ।
सुरभिगन्धिषु शुश्रुविरे गिरः कुसुमितासु मिता वनराजिषु ॥३४ ॥

फुलांनी बहरलेल्या, सुगंध दरवळणाऱ्या वनराजींमध्ये कोकिळांनी पहिल्यांदाच केलेले आलाप, अतिशय हळूवारपणे सांगितलेल्या मुग्धा नायिकांच्या रतिकथांप्रमाणे, ऐकले गेले.

श्रुतिसुखभ्रमरस्वनगीतयः कुसुमकोमलदन्तरुचो बभुः ।
उपवनान्तलताः पवनाहतैः किसलयैः सलयैरिव पाणिभिः ॥३५ ॥

कर्णमधुर भ्रमरगुंजारवरूपी गीत गात असलेल्या, पुष्परूपी कोमल दंतच्छटा असलेल्या उपवनाजवळील वेली वाऱ्याने हालविल्या जाणाऱ्या किसलयरूपी अभिनययुक्त हस्तमुद्रांनी सुशोभित होऊ लागल्या.

ललितविभ्रमबन्धविचक्षणं सुरभिगन्धपराजितकेसरम् ।
पतिषु निर्विविशुर्मधुमङ्गनाः स्मरसखं रसखण्डनवर्जितम् ॥३६ ॥

मोहक विलास प्रकट करण्यात अत्यंत चतुर असलेल्या, मनोहर सुगंधाने बकुलपुष्पांना जिंकणाऱ्या व कामदेवाचा साहाय्यक असणाऱ्या कामोद्दीपक मधूचे (वसंताचे) लावण्यवतींनी आपल्या पतींसह प्रेमभरित पान केले. (वसंतऋतूचा भरभरून आनंद लुटला.)

शुशुभिरे स्मितचारुतराननाः स्त्रिय इव श्लथशिञ्जितमेखलाः ।
विकचतामरसा गृहदीर्घिका मदकलोदकलोलविहङ्गमाः ॥३७ ॥

उमललेल्या कमळांनी युक्त व मदाने मधुर, अव्यक्त कलकूजन करीत असलेल्या हंसादि जलचर पक्ष्यांनी युक्त असणाऱ्या घरातील विहिरी, स्मितहास्याने सुंदर दिसणाऱ्या, शिथिल आणि किणकिण असा आवाज करीत असलेल्या मेखला धारण करणाऱ्या स्त्रियांसारख्या शोभून दिसत होत्या.

उपययौ तनुतां मधुखण्डिता हिमकरोदयपाण्डुमुखच्छविः ।
सदृशमिष्टसमागमनिर्वृतिं वनितयानितया रजनीवधूः ॥३८ ॥

वसंतऋतूमुळे ह्रास होत असलेल्या, चंद्रोदयामुळे पिवळी मुखकांती झालेल्या, रात्रिरूपी नायिका प्रियकराचे समागमसुख मिळवू न शकणाऱ्या खंडिता नायिकांप्रमाणे कृश झाल्या. (रात्री लहान होऊ लागल्या.)

अपतुषारतया विशदप्रभैः सुरतसङ्गपरिश्रमनोदिभिः ।
कुसुमचापमतेजयदंशुभिर्हिमकरो मकरोर्जितकेतनम् ॥३९ ॥

हिवाळा संपल्यामुळे निर्मल प्रभा असलेल्या आणि रतिक्रीडेमुळे आलेला थकवा घालवणाऱ्या आपल्या किरणांनी चंद्र मकरध्वज कामदेवाला तीव्र करू लागला. (प्रेरित करू लागला)

हुतहुताशनदीप्ति वनश्रियः प्रतिनिधिः कनकाभरणस्य यत् ।
युवतयः कुसुमं दधुराहितं तदलके दलकेसरपेशलम् ॥४० ॥

घृतादींच्या आहुतींनी प्रज्वलित अग्नीसारखे प्रदीप्त जे कर्णिकार फूल उपवनरूपी लक्ष्मीचा सोन्याचा दागिना झाले होते ते पराग आणि पानांसह असलेले नाजूक सुंदर फूल युवतींनी (आपल्या) केसांमध्ये माळले.

अलिभिरञ्जनबिन्दुमनोहरैः कुसुमपङ्क्तिनिपातिभिरङ्कितः ।
न खलु शोभयति स्म वनस्थलीं न तिलकस्तिलकः प्रमदामिव ॥४१ ॥

काजळाचा ठिपका जसा सुंदरीचे सौंदर्य खुलवतो तद्वत् फुलांवर झेपावणाऱ्या (काळ्या) भ्रमरांनी युक्त तिलकवृक्ष वनस्थलीला सुशोभित करीत नव्हता असे नाही, तर सुशोभित करीतच होता.

अमदयन्मधुगन्धसनाथया किसलयाधरसंगतया मनः ।
कुसुमसंभृतया नवमल्लिका स्मितरुचा तरुचारुविलासिनी ॥४२ ॥

वृक्षासह (वृक्षरूपी पुरुषासह) सुंदर विलास करणाऱ्या नवमल्लिका लतेने (लतारूपी तरुणीने) मकरंदरूपी मद्याच्या गंधाने युक्त नवपल्लवरूपी अधरांमध्ये पसरलेल्या पुष्परूपी हास्याच्या कांतीने (प्रेक्षकांच्या) चित्तास मदोन्मत्त केले.

अरुणरागनिषेधिभिरंशुकैः श्रवणलम्बपदैश्च यवाङ्कुरैः ।
परभृताविरुतैश्च विलासिनः स्मरबलैरबलैकरसाः कृताः ॥४३ ॥

अरुणाच्या गुलाबी छटेला पराजित करणारी लाल वस्त्रे, कानावर धारण केले जाणारे यवांकुर, आणि कोकिळांचा मधुर स्वर, या कामदेवाच्या सैनिकांनी विलासी पुरुषांना अबलांवर अनन्यपणे आसक्त केले.

उपचितावयवा शुचिभिः कणैरलिकदम्बकयोगमुपेयुषी ।
सदृशकान्तिरलक्ष्यत मञ्जरी तिलकजालकजालकमौक्तिकैः ॥४४ ॥

शुभ्र परागांनी मोहरलेली, तसेच भ्रमरसमूहांनी वेढलेली तिलकवृक्षाची मंजरी केशरचनेच्या जाळ्यांमध्ये लावलेल्या मोत्यांप्रमाणे सुंदर दिसत होती.

ध्वजपटं मदनस्य धनुर्भृतश्छविकरं मुखचूर्णमृतुश्रियः ।
कुसुमकेसररेणुमलिव्रजाः सपवनोपवनोत्थितमन्वयुः ॥४५ ॥

धनुष्य हाती घेतलेल्या मदनाची पताका असलेले वसंतश्रीच्या मुखाची शोभा वाढवणारे परागकण वाऱ्यामुळे उपवनातील फुलामधून उधळले जात होते, तेव्हा त्यांच्या मागोमाग, भ्रमरांचे समूह फिरू लागले.

अनुभवन्नवदोलमृतूत्सवं पटुरपि प्रियकण्ठजिघृक्षया ।
अनयदासनरज्जुपरिग्रहे भुजलतां जलतामबलाजनः ॥४६ ॥

वसंतोत्सवात नवीन बांधलेल्या झोक्यांचा आनंद अनुभवणाऱ्या स्त्रियांनी कुशल असूनही प्रियकराच्या गळ्याला आलिंगन देण्याच्या इच्छेने झोक्याला बांधलेली दोरी पकडण्यास सक्षम आपल्या भुजारूपी वेली सैल सोडल्या. (स्त्रिया वसंतऋतूचा आनंद लुटत प्रियकरांना आलिंगन देण्याची संधी घेऊ लागल्या.)

त्यजत मानमलं बत विग्रहैर्न पुनरेति गतं चतुरं वयः ।
परभृताभिरितीव निवेदिते स्मरमते रमते स्म वधूजनः ॥४७ ॥

"अगं रुसणं सोडा. रुसून काहीच फायदा (उपयोग) नाही. ओसरून गेलेले उपभोगयोग्य तारुण्य परत मिळत नाही" अशाप्रकारे कोकिळांद्वारे जणू काही कामदेवाचा अभिप्राय व्यक्त केला गेल्यावर (रुसून बसलेल्या) रमणी आपला रुसवा सोडून पतीशी रमण करू लागल्या.

अथ यथासुखमार्तवमुत्सवं समनुभूय विलासवतीसखः ।
नरपतिश्चकमे मृगयारतिं स मधुमन्मधुमन्मथसंनिभः ॥४८ ॥

यानंतर विष्णू, वसंत आणि कामदेवाप्रमाणे असलेल्या त्या राजा दशरथाने विलासवती तरुणींबरोबर वसंतोत्सवाच्या सुखाचा यथेच्छ आनंद अनुभवला आणि मृगयाविहार (शिकार) करण्याची इच्छा व्यक्त केली.

परिचयं चललक्ष्यनिपातने भयरुचोश्च तदिङ्गितबोधनम् ।
श्रमजयात्प्रगुणां च करोत्यसौ तनुमतोऽनुमतः सचिवैर्ययौ ॥४९ ॥

मृगया (शिकार) ही मृग, वराह इत्यादी चंचल प्राण्यांना लक्ष्य करून मारण्याचा सराव करायला लावते. त्या लक्ष्यांच्या भीती आणि क्रोध इत्यादींचे ज्ञान करून देते. शरीरास कष्टामुळे व विजयामुळे उत्कृष्ट गुणांचे बनवते. म्हणूनच राजा दशरथ मंत्र्यांची परवानगी घेऊन मृगयेसाठी निघाले.

मृगवनोपगमक्षमवेषभृद्विपुलकण्ठनिषक्तशरासनः ।
गगनमश्वखुरोद्धतरेणुभिर्नृसविता स वितानमिवाकरोत् ॥५० ॥

The sub types of Banjara are Gor Banjara, Charan Banjara, Mathura Banjara, Sanar Banjara, Navi Banjara, Dhaliya Banjara, Singadiya Banjara, Maru Banjara, Singadiya Banjara, Bagora Banjara, Gijora Banjara, Rohidas or Ravidas Banjara, Brijwasi Banjara and Dhadi Banjara. The head of the Tanda Known is Naik. He was selected by the community members of the settlement. The Tanda system gives birth to their internal judicial system which came to be known as 'Nasab'.

After Modernization

Political Status

There is no any strong political leadership of women among Banjara community. The lack of political leadership making more venerable to Banjara women to get their social, economic and political rights. Women have voting cards but they are not aware how use it effectively. Women do not aware about the political parties of the area and even they do not take part in the Gram Sabhas. There is a restriction on the mobilization of the women in Banjara community. Women listen to their husband in any political or economic decision. Even the Tanda system is a prevalent social control system of the Banjara settlements. There is no place for the women in caste council.

Educational Status

Girl's ratio of attending higher education is very poor due to economic crises and uncertainty of livelihood option along with the migration. The dropout rate of education from primary school is prevalent among the banjara community family cannot afford to educate the girls. Marriage is a major reason for the poor educational status of girls Banjara community. Educating girls means higher expectation from the boy for dowry and higher expectations from the girl for good boy. Apart from marriage poor economic condition of women, lack of school infrastructure in the Tanda or village and social insecurity are the other reasons. The migrations of Tandas have badly affected the education of the girl children and women.

- The changes have been taking place in social organization, standard of living and routine life style. Banjara women have accepted the modern lifestyle.
- Banjara women have accepted the process of development. With the effect of educational awareness, changing economy and progressive demands are responsible for adjustment policy of Banjara.
- Comparatively the rate of superstations has been declined because of the educated persons in society. They are accepting positive perspectives about the girl. In short changing with life values and organization behavior are symbols of development.
- With the help of modernization progress, different efforts and attitude to change the own life style as per the trend which is responsible for social development. Through the medium of intelligence and rationality try to develop social structure.

- There are also changes in lifestyle and guest behavior of women. Traditional lifestyle used to give more importance to common meals but in current scenario prefer the individual honor. This effect can notice at the regional level and reflect on culture and guest behavior.
- Today changes are taking place also in marriage institution, like urban society. Tanda Banjara community started the gift system like pots, dowry, special respect and some demand at the time of marriage ceremony. Dowry system is very harmful of women but is exist in Banjara society.
- Joint family system is converting into nuclear family because of industrializations, modernization the importance of small family structure, family planning program etc.

All over the world, girls and women are given secondary status. All amenities, luxuries and ever provisions must first be provided for boys and men, and only then, if available, can be given to girls and women. This is true to some extent throughout the world but more so and very evidently in India. The Banjara community is not an exception to the statement. However, the true culture of Banjara lies in the traditional dressing pattern of women and distinctive culture of Tanda system. Banjara women are more vulnerable as compared to men. Banjara Women are living under the umbrella of patriarchy. It can be found in every stage of the women. Women are facing double exclusion first is from within the community and another is within the household. The family thinks the cannot afford to educate girls but they spend enormously on the boy's luxuries. Boys are considered the future supporter of the generation whereas girls are the supporters of her in laws family. Women or girls do not have any choices for marriage. Elder members of the family decide on behalf of the girls and they have to marry with decided. The communities men become more attached to the decision making wife women were just considered as laborers. Above all circumstances, women have to face the stress and tension along with violence in the family. Women in Banjara community given secondary status in every walk of life.

Conclusion

In the process of modernization, Banjara women impressed by new lifestyles Banjara of city lifestyle. Women also change their custumer, started the use of sari, bangles, chain, nost girdles, tilak and mangulsutra. Girls wear salwar suit, dress, midi and frock.In Tanda culture, linguistic changes have been taking place because of the assimilation of external culture. Marathi, Hindi, English words are using in routine life. Education, occupation and industries are the responsible for linguistic changes. Gorboli, folk language is going to renewed; because there is no special script for create the literature.Today women don't believe on jat or village panchayat. Directly they are going to court for settlement of the disputes and divorce matter, and marriage dispute matter.

References

- Nagpal Hans, modernization and urbanization in India, Rawat publication, Jaipur and New Delhi, 1996.
- Singh yogendry, modernization of guardian tradition, Rawat publication Jaipur, New Delhi, Edition 2001.
- Srinivas M. M., Social change in modern India, orient Longmah private limited, 1/29 Asaf Ali road, New Delhi, 2003.
- Maha Patra Sitakant, modernization and Ritual, Calcutta Oxford University press Delhi, 1986.
- Census of India 2001, Maharashtra 28 series, volume – II, table A & 8 & 9 Directorate of census operations, Maharashtra.



समाज विकासातील महिला नेतृत्व

डॉ.अतुल पुंजाजी राऊत
संपादक

प्रा. सचिन रवींद्र [illegible]
संपादक

दयाधन पब्लिशर्स ग्रुप,
भारत सरकारच्या MSME मंत्रालया अंतर्गत मान्यताप्राप्त.
नोंदणी क्रमांक MH-12-0001884

समाज विकासातील महिला नेतृत्व

सहा.प्रा.डॉ. अतुल राऊत (संपादक)
सहा.प्रा.सचिन इंगोले (संपादक)
© सौ. मस्के अनिता दयाराम
आवृत्ती :- पहिली
प्रकाशिका
सौ. मस्के अनिता दयाराम
दयाधन पब्लिशर्स ग्रुप, 263, 'अनुदया', अकोला रोड, ग्रामपंचायत कार्यालयाजवळ, बळसोंड, हिंगोली. महाराष्ट्र राज्य, (भारत) 431513.
Mob. No. 7276193979 (WhatsApp) Call 9371725117
Email Id: - dayadhanpublishersgroup@gmail.com
Website: - http://www.dayadhanpublication.com
मुद्रक
श्रेया प्रिंटर्स, 263, 'अनुदया', अकोला रोड, ग्रामपंचायत कार्यालयाजवळ, बळसोंड, हिंगोली. महाराष्ट्र राज्य, (भारत) 431513.
प्रकाशन दिनांक 12/01/2022
ISBN 978-93-91097-34-9
किंमत 350/-
टीप:-

प्रस्तुत ग्रंथातील लेखन व पुनर्मुद्रण यांचे सर्व हक्क सौ. मस्के अनिता दयाराम यांच्याकडे राखीव आहेत. लेखन संभ्रमित अथवा सदोष झाल्यास / आढळल्यास यासाठी केवळ लेखक/लेखिकाच जबाबदार असतील. ग्रंथातील भाषा, लेखन आणि आशय याविषयी संपादकप्रकाशक किंवा मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

न्यायाधिकरण:- जिल्हा व सत्र न्यायालय, हिंगोली.

१८	पंडिता रमाबाई	प्रा.उन्मेश अजाबराव घुगे	९२-९३
१९	भीमाबाई आंबेडकर यांचा जीवन संघर्ष	डॉ.सिंधू परसराम खंदारे	९४-९९
२०	सावित्रीबाई फुले यांचे जीवन चरित्र	अजय रामकृष्ण महल्ले	१००-१०३
२१	स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर आधुनिक कर्तुत्ववान महिला: पंडिता रमाबाई	शंकर कोंडूजी गोरे	१०४-१०८
२२	" अनाथांची माई - सिंधुताई सपकाळ "	श्री. धिरज सतिषराव नाईक.	१०९-११४
२३	महाराणी येसूबाई	अमोल रामकिसन काकडे	११५-११९
२४	कुरण शाळेच्या पुरस्कर्त्या अनुताई वाघ	कु.पुजा संजय गोरे	१२०-१२३
२५	गार्गी	प्रा. डॉ. रावसाहेब शंकरराव ठोके	१२४-१२७
२६	एक उत्तम प्रशासक किरण बेदी	कु. रोहिणी पुरुषोत्तम केळे	१२८-१३१
२७	पालि साहित्यातील बुध्दकालीन महाप्रज्ञावती खेमा थेरीचे योगदान	प्रा.डॉ. सारिका विष्णू केदार	१३२-१३५
२८	बुध्दकालीन स्त्री : आम्रपाली थेरीचे योगदान	प्रा.डॉ. बालाजी मारूती गव्हाळे	१३६-१४१
२९	राजमाता जिजाऊ : न केवळ माता, शक्ति ती...!	सहा. प्रा. ज्ञानेश्वर सुभाष कव्हर	१४२-१४७
३०	आनंदीबाई जोशी : पहिल्या भारतीय महिला डॉक्टर	सहा. प्रा. जयश्री पंजाबराव काळे	१४८-१५१
३१	बाल शिक्षण तज्ञ पद्मभूषण ताराबाई मोडक	प्रा. डॉ. प्रमिला हरिदास भुजाडे (गणवीर)	१५२-१५७
३२	काळापुढे धावणारी स्त्री सावित्रीबाई फुले	सहा. प्रा. सचिन रवींद्र इंगोले	१५८-१६१
३३	आधुनिक भारताच्या समाजकार्यात श्रीमती सिंधुताई सपकाळ (माई) यांचे सामाजिक कार्यातील योगदान एक प्रेरणेचा स्रोत (अनाथ दिव्यांग बालकासाठी चे कार्य)	डॉ. गजानन नामदेवराव मुंढे	१६२-१६५

समाज विकासातील महिला नेतृत्व ISBN No. 978-93-91097-34-9

३१. बाल शिक्षण तज्ञ पद्मभूषण ताराबाई मोडक

प्रा. डॉ. प्रमिला हरिदास भुजाडे (गणवीर)
विभागप्रमुख, सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग
वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर
दूरभ्रमणध्वनी : ७५०७८२४३९८, ८९७५९४९८२०
Email Id : bhujadepramila@gmail.com

प्रस्तावना :

भारतातील पहिल्या बालशिक्षणतज्ञ आणि अंगणवाडीच्या जनक ताराबाई मोडक त्यांना भारताच्या मॉन्टेसरी म्हणतात. ताराबाईची शिक्षण क्षेत्रातील समज काळाच्या १०० वर्षे पुढे होती असे स्पष्ट झाले आहे. ज्या ज्ञानरचनावादाचा आज बोलबाला सुरु आहे त्या ज्ञानरचनावादी शिक्षण पध्दतीचा आग्रह ताराबाईनी स्वातंत्र्यपूर्व काळातच धरला होता. आज स्वातंत्र्याची ७५ वर्षे होत असतांना अजूनही आपण या शिक्षण पध्दतीचा म्हणावा तसा उपयोग केलेला दिसत नाही. ताराबाईने शिक्षणाचे जे प्रयोग केले त्यापासून आपल्याला बरेच काही शिकण्यासारखे आहे.

परिचय व कार्यप्रणाली :

मोडक, ताराबाई (१९ एप्रिल १८९२—३१ ऑगस्ट १९७३) प्रसिध्द शिक्षणतज्ञ व पूर्व प्राथमिक शिक्षणाच्या प्रवर्तक, कर्तव्य कठोर, खंबीर, झुंजार, ध्यैयवादी, बुध्दिवादी, विवेकवादी व विज्ञानवादी होत्या. ताराबाई या चाकण जिल्हा पूणे येथील केळकर घराण्यातील, त्यांचा जन्म मुंबई येथे झाला. वडिलांचे नाव सदाशिवराव व आईचे उमाबाई. बुध्दिमान व सुधारणावादी आईवडीलांमुळे ताराबाईकडे बुध्दिमत्तेचा वारसा आला. १९१४ मध्ये ताराबाई मुंबई विद्यापीठातून बी.ए. झाल्या. महाविद्यालयीन विद्यार्थी दशेत मुंबई येथे त्यांची कृष्णा वामनराव मोडक यांच्याशी ओळख होऊन १९१५ मध्ये त्यांचा नोंदणी पध्दतीने प्रेमविवाह झाला. त्याला दोन्ही घरच्या लोकांचा विरोध होता. कृष्णा मोडक अमरावती येथे वकिली व्यवसाय करीत. त्यांना प्रभा ही मुलगी होते. पुढे ताराबाईचे भावनगर, राजकोट, अमरावती, विकासवाडी इत्यादी ठिकाणी वास्तव्य झाले. ताराबाईनी १९२२ मध्ये राजकोट येथे बार्टन फिमेल ट्रेनिंग

कॉलेजमध्ये लेडी सुपरिटेंडन्ट म्हणून रुजू झाल्या. सदर कॉलेजमध्ये या पदावर काम करणाऱ्या त्या 'पहिल्या भारतीय महिला होत. त्यानंतर त्यांनी 'गिजूभाई बधेका' यांच्या साहाय्याने भावनगर येथे माँटेसरीच्या तत्वावर आधारलेली 'गीता शिक्षण पध्दती' निश्चित केली. हाच ताराबाईच्या 'बालशिक्षण कार्याचा प्रारंभ होय. शिक्षणाचा खरा पाया मुलांच्या बालवयातच घातला जाण्याची शक्यता व आवश्यकता असते. या दृष्टीने त्यांनी पूर्वप्राथमिक शिक्षणाचे नवीन पाऊल टाकले. १९२३–१९३२ ही नऊ वर्षे त्यांनी भावनगरच्याच दक्षिणामूर्ती शिक्षण संस्थेत प्राध्यापिका म्हणून काम केले १९३३ पासून त्यांना शिक्षणाबाबतची 'शिक्षणपत्रिका' काढायला सुरुवात केली. १९३६ साली त्यांनी नूतन 'बालशिक्षण संघाची' स्थापना केली. पुढे बालशिक्षणाचे हे लोण महाराष्ट्रात पसरले. १९३६–१९४८ या काळात त्यांनी मुंबई दादरच्या हिंदू कॉलनीत 'शिशुविहार नावाची संस्था' स्थापन करुन 'पूर्व प्राथमिक अध्यापन मंदिर' सुरु केले. यातून मराठी आणि गुजराती या दोन्ही भाषांच्या हजारांहून अधिक शिक्षक–शिक्षकांचे प्रशिक्षण झाले. ताराबाईनी गिजूभाईच्या मृत्युनंतर पुढील १२ वर्ष नूतन बालशिक्षण संघाची धुरा वाहिली. ग्रामीण भागात बालशिक्षणाचा प्रसार करणे हे या संघाचे काम होते. खेडयांमध्ये शास्त्रीय पध्दतीने मात्र कमी खर्चात बालवाडया चालविण्यासाठी १९४५ मध्ये ताराबाईनी **ठाणे जिल्हयातील बोर्डी** येथे **'ग्राम बालशिक्षण केंद्र'** स्थापिले. या संस्थेतूनच **ग्रामीण बालवाडी** व **ग्राम बाल अध्यापन मंदीर** या संस्था निघाल्या. या संस्थांचा लाभ आदिवासी मुलांना मिळावा, म्हणून त्यांच्या आदिवासी परिसरात आणि अंगणात बालवाडी चालविण्याचा उपक्रम करण्यात आला. या अंगणवाडीमुळे आदिवासींच्या शैक्षणिक विकासाला चालना मिळाली. १९५७ मध्ये बोर्डी येथील ग्राम बालशिक्षा केंद्र कोसबाड येथे हलविण्यात आले. ताराबाईच्या कोसबाडच्या परिसरात प्राथमिक शिक्षणासाठी ६ ते १४ वयोगटातील मुलांसाठी सुरु केलेल्या विकासवाडी या प्रकल्पातील अनुभवातून **कुरणशाळेचा** प्रयोग सुरु केला. प्राथमिक शाळेत मुलांची अनुपस्थिती हा गंभीर प्रश्न होता. मुले शाळेत हजर राहावे म्हणून ताराबाईनी गृहभेटी, प्रचार फेऱ्या, दिंडी, मुलांसाठी बैलगाडीची सोय, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी उपक्रम राबविले. त्याचबरोबर भातशेती हया मूल उद्योगाच्या माध्यमातून विज्ञान, गणित, भाषा हे विषय शिकविण्याचा प्रयत्न केला. यामुळे मुलांना शिक्षण

घेण्यात गोडी देखिल वाटू लागली; परंतु धान्याच्या पेरणीनंतर सहा ते दहा वयोगटातील आदिवासी मूले व काही मुली पूर्ण दिवस गुरांना रानात चारायला नेत. त्यामुळे मुलांची अनुपस्थिती हा गंभीर प्रश्न पुन्हा ताराबाईपुढे निर्माण झाला. यावर उपाय म्हणून ताराबाईनी शाळेलाच रानात नेण्याचा यशस्वी प्रयोग केला आणि त्याला कुरणशाळा (Meadow School) असे नाव दिले. शहराच्या ठिकाणाहून कोणतेही शैक्षणिक साधने न आणता विद्यार्थ्यांना रंग, स्पर्श, वजन, मापन, अंक आकार इत्यादी संकल्पना समजावे याकरिता पिसे, बांगडया, दगड, बिया, माती, रेती, बांबू फळे, शंख, डब्या इत्यादी स्थानिक वस्तूचाच वापर केला. ताराबाईनी १९५८ मध्य आदिवासी मुलांसाठी सुरु केलेल्या कुरणशाळा प्रयोगाची शिक्षण क्षेत्रातील एक खास व भौतिक शोध म्हणून नोंद झालेली आहे. पुढे १९७४ मध्ये भारत सरकारने या प्रयोगाचा आढावा घेणारी कुरणाशाळा, मेडोस्कूल या पुस्तिका ताराबाईंकडून लिहून घेतली. कुरण शाळेबरोबरच रात्रीची शाळा, व्यवसाय शिक्षण हे पूरक प्रकार प्रायोगिक स्वरुपात सुरु करण्यात आले. येथील प्रशिक्षण महाविद्यालयात ताराबाईनी पुरस्कारिलेली शिक्षण योजना चालू असून तिला राज्य सरकारची मान्यता लाभली. एक नवीन प्रयोग असल्याने आदिवासी विभागातील एकशिक्षकी शाळांतील मुलांच्या बुध्दिमापनासंबंधी अधिक संशोधन करुन नव्या अभ्यासक्रमाची रचना, बालसाहित्य निर्मिती व विज्ञान शिक्षण देण्याचे प्रयोग सुरु आहेत. परंपरागत शिक्षण पध्दतीमध्ये जबरदस्त शिक्षेच्या, वेळापत्रकाच्या मूळ तत्वांना त्यांनी धक्का लागू दिला नाही; मात्र त्यांचे शालेय शिक्षण धोरण एका बाजूने राष्ट्रीय तर दुसऱ्या बाजूने स्थलकालातील होते. आदिवासी मुलांचे जीवन विकसित करण्यासाठी ताराबाईनी आपले आयुष्य वेचले. ताराबाई या १९४०—१९५४ या काळात ग्राम बालशिक्षण संघाच्या चिटणीस होत्या. या दरम्यान त्यांनी शिक्षण पत्रिका या मराठी, हिंदी, गुजराती भाषिक मासिकाचे संपादन केले. १९४६—१९५१ या काळात त्या महाराष्ट्र विधानसभेच्या सभासदही होत्या. त्यांनी प्राथमिक शाळा समितीवर अनेक वर्षे काम केले. अखिल भारतीय बालशिक्षण विभागाच्या त्या दोन वेळा अध्यक्षा होत्या. महात्मा गांधी यांनी आपल्या बुनियादी शिक्षण पध्दतीचा आराखडा तयार करण्याचे काम त्यांच्याकडे सोपविले होते. ताराबाई मोडक यांनी संपादित केलेले बालसाहित्याची सुमारे १०५ पुस्तके प्रसिध्द साली असून त्यात

बालनाटके, लोककथा, लोकगीते इत्यादी साहित्याचा अंतर्भाव होता. ताराबाईनी शासनाने त्यांच्या शिक्षण क्षेत्रात कार्याबद्दल २७ जानेवारी १९७२ रोजी पद्मभूषण हा किताब देऊन गौरविले. ताराबाई या फिलॉसॉफीच्या पदवीधर होत्या. १९२१ च्या सुमारास राजकोटच्या बार्टन फीमेल ट्रेनिंग कॉलेजमध्ये प्राचार्य पदावर कार्यरत असतांना त्यांना शिक्षण प्रयोगाविषयी समजले आणि त्या सौराष्ट्रातील भावनगर येथील दक्षिणामूर्तीच्या संस्थेत शैक्षणिक प्रयोगामध्ये सहभागी झाल्या. बालशिक्षणाचा प्रयोग करुन त्या थांबल्या नाहीत. बालशिक्षणाचा जसा प्रचार आणि प्रसार होईल तशी त्यासाठी प्रशिक्षित शिक्षक वर्गाची आवश्यकता भासेल हे गृहीत धरुन बालअध्यापक विद्यालय देखील स्थापन केले. १९३६ मध्ये त्यांनी मुंबईमध्ये आपल्या कल्पनांवर आधारीत शिशूविहार व त्याच्या जोडीला बालअध्यापक विद्यालय सुरु केले. शहरामध्ये बालशिक्षणाचे कार्य सुरु असतांना महात्मा गांधीजीच्या खेडयामध्ये कार्य करण्याची प्रेरणा मिळाली. १९४५ मध्ये त्या बोर्डीत दाखल झाल्या. बोर्डीच्या हरिजन वस्तीमध्ये बालशिक्षणाचा पाया रचण्यास सुरुवात झाली. हरिजन वस्तीपासून सुरु केलेला प्रवास घंटाशाळा अंगणवाडी असा होता गेला. यथावकाश अंगणवाडी ही संकल्पना शासकीय पातळीवर स्वीकारली गेली. कोसबाडला त्यांना अंगणवाडी ते अंगणवाडी सेविका, प्रशिक्षण केंद्र, अध्यापक विद्यालय उभे राहिले. या अध्यापक विद्यालयाने आतापर्यंत हजारो शिक्षक घडवले. १९४९ मध्ये इटलीमध्ये भरलेल्या आंतरराष्ट्रीय बालशिक्षण परिषदेमध्ये भाषण करण्याची संधी त्यांना मिळाली. पूर्वी बालशिक्षणाचे महत्व लोकांना पटवून देणे हा 'वेडेपणा' होता. समाजाची ही मानसिकता ताराबाई ओळखून होत्या. त्यामुळे लोकांपर्यंत जायचे तर आपल्या म्हणण्याला शास्त्रीय बैठक हवी हे त्या जाणून होत्या. म्हणूनच ताराबाईनी शास्त्राचा आधार असणाऱ्या मॉन्टेसरी शिक्षण पध्दतीचा अभ्यास केला. तरीही त्यांच्या या प्रयत्नाकडे निव्वळ 'फॅड' म्हणून बघणाऱ्यांची संख्या कमी नव्हती. आज बाल शिक्षण एक शास्त्र म्हणून उदयाला आले आहे. पण त्याचे बीजारोपण करण्याचे काम ताराबाईनी केले. ताराबाई गिजूभाईना गुरुस्थानी मानत आल्या. त्यांच्याकडूनच त्यांनी बालशिक्षणाची संधी घेतली. त्यांच्या प्रत्येक प्रयोगात मनापासून सामील झाल्या. भावनगर मधील वास्तव्याने त्यांच्यातील लेखिकेलाही आकार दिला. १९२६ साली नूतन बालशिक्षण संघाची (मॉन्टेसरी

संघाची) स्थापना झाली आणि त्यांच्यातर्फे 'शिक्षणपत्रिका' हे मासिक प्रकाशित होऊ लागले. या नियतकालिकाचे संपादन ताराबाईंनी केले. ताराबाईंनी शंभरच्यावर पुस्तकांचे संपादन, लेखन केले. बालशिक्षणाच्या प्रसारासाठी मॉन्टेसरी संमेलने भरवली आणि बालशिक्षण हे त्यांचे कार्यक्षेत्रच बनून गेले. ताराबाई भावनगरविषयी म्हणतात, 'तेथेच मला माझे गुरु, जीवन दिशा आणि जीवनकार्य गवसला'.ताराबाई भावनगरला ९ वर्षे होत्या. या काळात त्यांनी फक्त मॉन्टेसोरींया तत्वांचा अभ्यासच केला नाही, तर ती प्रत्यक्षात आणण्यासाठी भारतीय संदर्भानुसार त्यांत बरेच बदल केले. आपल्याकडे शिक्षणाला पावित्र्याची किनार आहे. याचा विचार करुन बालघरांचे रुपांतर बालमंदिरात केले. बालशिक्षणात भारतीय नृत्यप्रकार, कलाप्रकार, लोकगीते आणि अभिजात संगीत यांचा समावेश केला. माँटेसोरी तत्व बालकांच्या विकासाबरोबरच त्यांच्या स्वातंत्र्याला प्राधान्य दिले हा काळा स्वातंत्र्य युध्दाचा होतो. त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्याला, बालस्वातंत्र्याला विशेष अर्थ होता. ताराबाईंनी या सर्व विचारांचा, संकल्पना मेळ आपल्या बालशिक्षणात साधला. बालशिक्षणात प्रयोग आणि त्याचा प्रसार करत असतांना ताराबाईंनी शिक्षकांचे प्रशिक्षण हाती घेतले. त्यापाठोपाठ बालशिक्षण तळागाळापर्यंत जाण्यासाठी पालक आणि शासन यांच्या प्रबोधनाचे कामही केले. इतके सगळे करुनही त्यांना ध्यास लागला होता तो खेडयातील बालशिक्षणाच्या खेडयांमध्ये बालशिक्षणाचा प्रसार करायचा असेल, तर त्यासाठी स्वस्त साधने हवीत, शिवाय स्थानिक पातळीवरही सहज उपलब्ध होतील किंवा बनवून घेता येतील अशीच हवी.

दादरचे शिशुविहार :

इ.स. १९३६ मध्ये ताराबाई मोडक यांना मुंबईत दादरला शिशुविहार ही संस्था स्थापन केली. महाराष्ट्रातील हे पहिले आदर्श बालमंदिर ! आज इथून मराठी – गुजराती या दोन माध्यमांमधून अध्यापक विद्यालय, अभिनव प्राथमिक शाळा, माध्यमिक विद्यामंदीर, सरलाताई देवघर पूर्व प्राथमिक शिक्षक प्रशिक्षण केंद्र असे विभाग चालतात. 'बालदेवो भव' हे शाळेचे ब्रीदवाक्यच आहे. येथे प्रवेशाच्या वेळेस मुलाखत घेतली जात नाही. मुले शाळेत रुळेपर्यंत शाळेचा व शिक्षकांचा परिचय होईपर्यंत पालकांना आठवडाभर मुलांबरोबर बसण्यास मुभा देण्यात येते. मुलांना डबा, पाटीदप्तर, वॉटर बॅग यांचे ओझे आणावे लागत नाही. शाळेच्या इमारतीची रचनाही मुलांचा विचार

करुनच केली आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला मोकळेपणाने फिरता येईल असे मोठे वर्ग आहेत. प्रत्येक वर्गात ३० मुलांसाठी एक प्रशिक्षित, प्रेमळ व मुलांचे मन जाणणारी शिक्षिका आहे. त्यामुळे प्रत्येक मुलाकडे वैयक्तिक लक्ष देता येते. आनंददायी वातावरणात मुलांना शाळेची आवड निर्माण करतात. कोणतेही ज्ञान ग्रहण करायचे तर त्यासाठी ज्ञानेंद्रियांचा विकास होणे आवश्यक आहे. त्यासाठी रंग, वास, चव, आकार, स्पर्श आवाज या संवेदनासाठी निरनिराळी साधने आहेत. कै. ताराबाई मोडक शिक्षण तज्ञ यांनी मॉन्टेसरीच्या साधनावर आधारीत भारतातील सामाजिक व आर्थिक परिस्थितीला अनुसरुन साधनांची निर्मिती केली.

सारांश :

ताराबाई यांच्या कार्यातून इतरांना प्रेरणा व ऊर्जा ..... आणि बालशिक्षण क्षेत्रात विशेष कार्य करणाऱ्या संस्था आणि व्यक्तिंना प्रोत्साहन मिळावे यासाठी नूतन बाल शिक्षण संघातर्फे ताराबाई पद्यभूषण मोडक विशेष संस्था पुरस्कार दिले जातात. यातून नूतन बाल शिक्षण संघर्षाची बालशिक्षण क्षेत्रातील दीपस्तंभ बनण्याच आणि दुसऱ्यांना प्रकाश देण्याची वृत्ती आजही कायम असल्याचे दिसून येते त्यांच्या कार्याला सलाम !

संदर्भ ग्रंथ

- बालविकास व बालशिक्षणाची मूलतत्वे, य.च.म.मु.वि. नासिक.
- फाटक, पद्यजा, शिक्षणतज्ञ ताराबाई मोडक, मुंबई, १९८१.
- संजय वझरेकर, नवनीत : आचे माहाराष्ट्र सारस्वत: ३१ ऑगस्ट, इ.स. २०१३.
- ताराबाई मोडक आणि अनुताई वाघ यांचे शिक्षणकार्य प्रहार ९ जानेवारी २०१५.
- Mr. M. Wikipedia.org/wiki/ताराबाई मोडक

(48)

स्त्रीवाद

(सिध्दांत आणि व्यवहार)



डॉ. प्रतिभा एस. जाधव



स्त्रीवाद (सिद्धांत आणि व्यवहार)

■ डॉ.प्रतिभा सुरेश जाधव

■ प्रथम आवृत्ती – दि. ८ मार्च २०२२

© प्रकाशक व संपादक

■ प्रकाशक

आधार पब्लिकेशन, अमरावती.
हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,
वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती
मो. ९५९५५६०२७८
email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना

विलास पवार

सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी

सरिता ग्राफिक्स,
कठोरा रोड, अमरावती

■ Price : 400/-

ISBN- 978-93-91305-29-1

सुचना:- सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.

अनुक्रमणिका

अ. क्र.	लेख	लेखक	पु.क्र.
1	स्मरणवेळामधील स्त्रीजीवनाचा वेध	प्रा. रमेश बलभीम जाधवर	1
2	भारतीय लोकशाहीत महीलांची सहभागीता व नेतृत्व एक वास्तविकता	डॉ. एन. आर. चिमूरकर	8
3	स्त्री वाद आणि सामाजिक समानता	प्रा.श्रीमती स्वाती रमेश फापाळे	14
4	स्त्रीवाद :— समस्या आणि उपाय	प्रा. पुंडे सोनाली सयाजी	18
5	भारतातील स्त्री चळवळीतील आंबेडकरी विचारांचे योगदान व भवितव्य	डॉ. वाल्मिक धुडकु इंदासे	23
6	गौरी देशपांडे यांच्या ' एकेक पान गळावया' या लघुकादंबरी संग्रहातील स्त्रीवाद	डॉ. मीनाक्षी विठोबा भोयर	31
7	स्त्रीवाद आणि महाराष्ट्रातील महिलांचा राजकीय सहभाग	डॉ. मनिषा दत्तात्रय पवार	41
8	स्त्रीवाद,स्त्री सक्षमीकरण आणि आजचे वर्तमान	प्राचार्य डॉ. गुंफा कोकाटे	46
9	भारतीय स्त्रीवाद	Lalita Subhash Ahire	54
10	स्त्रीवाद आणि आर्थिक समानता	डॉ. सौ. लक्ष्मी विष्णू भंडारे	60
11	गुणात्मक संशोधन आणि स्त्रीवाद	डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे (गणवीर)	67
12	स्त्रीवाद: काल आज आणि उद्या	सौ. अलका विकास सानप	74
13	स्त्रीवाद काल आणि आज ...	डॉ. स्वाती अनिल मोरे	80
14	भारतीय स्त्रीवादी साहित्य	स्मिता गोवर्धन शहाणे	87

गुणात्मक संशोधन आणि स्त्रीवाद

डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे (गणवीर)
विभाग प्रमुख, सहयोगी प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर
दूरभ्रमणध्वनी : 7507824398, 9850157725, 8975949820
Email Id : bhujadepramila@gmail.com

प्रस्तावना :

२१ व्या शतकात वाटचाल करतांना स्त्रियांचे विविध प्रश्न बहुविध पध्दतीने एकांगी राहिले आहे. आज स्त्रियांच्या विरोधातील रुपांतरीत हिंसा, स्त्रीप्रश्नाच्या संकीर्णीकरणातून आव्हान स्त्रीवादी चळवळी, स्त्रीवादी संशोधनापुढे लक्षणीय ठरले आहे. प्रत्यक्षार्थवादी सामाजिक विज्ञानातील संशोधन ज्या तऱ्हेचे पध्दतीशास्त्र मांडते त्यातून अभ्यासक स्त्रियांना एका मनोभंगाच्या परिस्थितीत ढकलले जाते त्यांनी जर या पंध्दतीशास्त्राचा मागोवा घेतला, तर त्यांना सतत लिंगभेदाच्या, दडपणुकीच्या, त्यांच्या स्वत:च्या अनुभवाला दडपून नाकारुन उपेक्षून संशोधन करावे लागते. इतकेच नाही तर आत्यांतिक स्पर्धात्मक, पुरुषी वर्चस्वाच्या शैक्षणिक जगाच्या तथाकथित विवेकनिष्ठ मानदंडानुसार केलेले संशोधन उच्च दर्जाचे आहे. याचे प्रगटीकरणासाठी परिश्रम करावे लागते.

प्रस्तुत लेखात स्त्रीवादी संशोधन प्रक्रिया आणि त्यात अनुस्युत असणारी पध्दत, पध्दतीशास्त्र आणि ज्ञानमीमांसा हयांची मांडणी भरीव पध्दतीने केली आहे. स्त्रीवादी संशोधन, स्त्रीवादी सिध्दांत, त्यातील पध्दत व पध्दतीशास्त्र हयांची सलग मांडणी यात केली आहे. शैक्षणिक क्षेत्रात 'स्त्रीवाद' एक उपशाखा म्हणून अस्तित्वात आहे. स्त्रीयांचे प्रश्न, समस्या यांचे शास्त्रोक्त प्रगटीकरण व्हावे याकरीता स्त्रीवादी संशोधन अग्रेसर आहे.

गुणात्मक संशोधन आणि स्त्रीवाद (Qualitative Research : Ferminism)

२१ व्या शतकाकडे वाटचाल करतांना नवनवीन संशोधनाची परीघ वाढतच जात आहे. संशोधनात नवीन परिप्रेक्ष्य विकसीत होत आहे. स्त्रीवादी गुणात्मक संशोधन चैतन्यपूर्ण, आव्हानात्मक,

भिन्नत्वात्मक, अनुसणात्मक आहे. सांकेतिक आंतरक्रियावादी, सामाजिक रचितावादी परंपरानुसार कार्य करतात. आंतरक्रियावादी आणि स्त्रीवादी विवेचनात्मक प्रवाह असून ऐतिहासिक, सांस्कृतिक, भौतिक, सामाजिक विषयानुसार गृहितके कृतीशील आणि उत्पादक पध्दतीने केले जाते. स्त्रीवादी संशोधन सैध्दांतीक बांधणीतून, प्रायोगिक तत्वातून, संहितातून, गुणात्मक पध्दतीचे संमिश्रण करुन लिहिले जाते. अन्य सामाजिक संशोधनासाठी हे लेखन धोरण, कृती, निती नियम, नवीन प्रस्थापित परीघ बदलत असते.

गुणात्मक संशोधन आणि स्त्रीवादाची व्यापकता/व्याप्ती :प्रथम टप्प्यातील स्त्रीवादाने हे गृहित धरले की, गुणात्मक संशोधन व्यक्तिनिष्ठ हे गृहित धरले की, गुणात्मक संशोधन व्यक्तिनिष्ठ (subjective) आंतक्रियातून होत असल्यामुळे त्या परीघापर्यंतच मर्यादित असतात. द्वितीय टप्प्यातील स्त्रीवादयांनी स्त्रियांच्या मग त्या ग्रामीण असो, आदिवासी असो, वंचित, दुर्बल असो त्यांचे अनुभव व त्यांचे मूल्यमापन केले गेले. त्यात ही व्यक्तिनिष्ठ विश्लेषण केले गेले ज्यातून संघटना, धोरणे, समस्यांना वाचा फोडली गेली.

स्त्रीवादी गुणात्मक संशोधनाची व्यापकता आवाक्याबाहेर आहे. त्याचा उल्लेख काही लिखाणात शक्य नाही. संरचनात्मक संशोधनात शिक्षण आणि आरोग्य अशा दोन क्षेत्रात विश्लेषण झाले आहे. स्त्रिवादी अभ्यासात आरोग्य आणि रोगनिवारण क्षेत्रात पीडीत, शोषित, वंचित, स्त्रियांच्या अनुभवामधून संरचनात्मक प्रश्नांच्या माध्यमातून आरोग्य प्रश्न / समस्या निवारण व्यवस्था आणि राज्यसंस्थाप्रणित स्त्रियांच्या आरोग्याची केंद्रे यात आंतरविरोध जे निर्माण झाले त्यांची मांडणी केली गेली.

आज ही समाजात पुरुषसत्ताक व्यवस्था आहे, जेव्हा स्त्रियांच्या प्रश्नावर धोरणे आखली जातात तेव्हा ते आखतांना पुरुषी वर्चस्व आणि संख्यात्मकता असते. त्यामुळे स्त्रीवादी गुणात्मक संशोधन मागे पडते. आज ही संशोधनात हे कार्य शिल्लक आहे ?

(अ)स्त्रीविषयक विशिष्ट धोरणविषयक प्रश्नांचा आशय, रचना आणि उगम.

(ब) धोरणाकरीताच्या प्रक्रिया.

आशयात्मक विश्लेषणाने संशोधनाद्वारा हे दाखवून दिले की पांढरपेशीय / बुध्दिप्रामाण्यवादी व्यवसायिकांना कसे वेगवेगळे प्रश्न व

त्यातील गुंतागुंत त्याची धोरणे कशी वेगळी असतात. आरोग्याचे प्रश्न फक्त गर्भपात, कॅन्सर पर्यंतच कसे मर्यादित करुन सरकारी धोरणाच्या उद्दिष्टांविषयी ठरविले गेले. स्त्रियांसाठी होणाऱ्या संशोधनाची पातळी उंचावण्यासाठी पुरुषी मानसिकतेने भारलेले विज्ञान, धोरण, नियंत्रण, धोरण प्रक्रिया यांचे सामाजिक ऐतिहासिक विश्लेषण केले जाते. १९६० च्या दशकात स्त्रीवादी संशोधनाची गुंतागुंत वाढत गेली. स्त्रिवादी संशोधनात ज्ञानांविषयी निर्माण झालेले प्रश्न, कोणाची ज्ञाने ? कोणी, कोठून, कशाप्रकारे, कोणासाठी, कोणत्या हेतूने ज्ञान निर्मिती केली हे महत्वाचे प्रश्न ठरले. म्हणजे समाज विज्ञानांवरील स्त्रीवादी प्रतिक्रियात्मक स्वरुप बदलले आणि स्त्रीवादी ज्ञान निर्मीती करुन नवीन क्षेत्र शोधण्याचा प्रयत्न केला गेला. नंतर संदर्भबध्द, परिस्थितीबध्द, समस्यात्मक मांडणीचे संकल्पणीकरण करुन स्त्रीवादी गुणात्मक पध्दती आणि पध्दतीशास्त्रे यावर लिखाण भरभराटीला आले.

१९६६ नंतर स्त्रीवादी संशोधन स्त्रियांच्या दडपणुकीला आकार देत वंश, वर्ग, लिंग भाव यामध्ये गुरफटले अमेरिकेत तर पारंपारीक गुणात्मक शैलीमधले लेखन, कौटुंबिक, राष्ट्रीय, लैंगिक, आंतरराष्ट्रीय सिमारेषा छेदणाऱ्या प्रवाही सीमारेषा स्पष्ट करुन नवीन परिमाणे व गुंतागुंत वाढत गेली. परिवर्तीत परिस्थिती व स्थलांतरण, नव्या उद्‌भवणाऱ्या परिस्थितीतून ज्ञानाचा त्या परिस्थितीत उपयोग होत नाही असे ही प्रवाही विचार पुढे आलं. विशिष्ट ऐतिहासिक युगात, सामाजिक संदर्भातून, बहुविध अस्मिता वेळेपुरत्या निर्माण केल्या गेल्या हे निष्पन्न झाले. अपंग स्त्रिया तर व्यक्तित्वहीन लिंगभावविहीन स्त्रीवादी वर्तळात उपेक्षीत समजल्या गेल्या की त्यांच्यात पुनरुत्पादनाच्या समस्या असल्यामुळे त्या सहानुभूतीच्या चौकटीत बसतात.

भूमीदृष्टी संशोधनाततर 'सीमांतीकरण' च नव्हे तर परिस्थितीजन्य अनुभव, ज्ञान यांना महत्व देवून विचाराच्या दृष्टीने परिणामकारक आहेत. भूमीदृष्टी हा ज्ञानात्मक, भावनिक, राजकीय साध्य असून ऐतिहासिक परिस्थितीशील अनुभव आहे हे समूहात्मक व्यवहारांमधून, चर्चा विश्वामधून, जाणीवपूर्वक पध्दतीने, एकसत्वीकरण, विश्वपातळीवरील पुर्नदृष्टयता ज्ञानातून घडलेली आहे. स्त्रीच्या भौतिक क्रमविभागणी आणि वांशिक स्तरीकरण करणाऱ्या व्यवस्था यातून ज्ञान अनुभव घडतात असे ही मांडणीतून पुढे आले. आधुनिकोत्तर विचारात

स्त्री संहिता आणि कहाण्या एकात्मीकरण, निश्चितीकरण व्यवस्थेतील अस्तित्व घडविणाऱ्या ठरल्या. यात समाजशास्त्र, सांस्कृतिक अभ्यास, विज्ञानाचे सामाजिक अभ्यास, संशोधनातील प्रायोगिक कक्षातून विषय आणि विविध सूत्रे मांडली गेली.

वाढत्या गुंतागुंतीचा परिणाम असा झाला ही उच्च स्त्रिवादी लेखन करणाऱ्या गे/लेस्बिऊन, क्लिअर्स सैध्दांतिक, वसाहत्तोत्तर संशोधन, अपंग स्त्रिया, भूमीदृषि सैधांतीक, आधुनिकोत्तर, विरचनावादी संकल्पीकरण हयामुळे स्त्रीवादी संशोधन पायाभूत चौकटी, प्रक्रिया गृहित धरलेले विचार परिवर्तित झाले, अनुभव, विचार लिंगभाव या सारख्या संकल्पना बदलल्या आणि हया गृहितांच्या विरघळण्यामुळे स्त्रीवादी संशोधन अधिक जागरुकपणे संशोधकासाठी त्याच्या परिणामबद्दल जागरुक झाले.

स्त्रीवादी संशोधकाची गुण वैशिष्टये :इतिहास, वंश, वर्ग, लिंगभाव, सामाजिक जी गुणवैशिष्टये असते त्यातून संशोधनाची आंर्तक्रिया होत असते. व्यक्ति एकक नसून बहूविधतेचे एकत्रीकरण असतो. संरचना आणि व्यवहारातून तो घडत असतो. एखाद्या घटकाची स्वजाणीव, सांस्कृतिक व्यवहार वर्चस्व आणि दुय्यमत्व याचे मापदंड असते. स्त्रीवादी विषय हे मुक्त असतात.

स्त्रीवादी संशोधकावर संशोधनाचा परिणाम :संशोधक आणि संशोधित यातील ज्ञानमीमांसा शास्त्रीय सीमारेषा आणि परिस्थिती यातील सीमा धूसर होतात. त्यातून वस्तुनिष्ठतेचा संबंध निर्माण होतो. स्त्रीवादी संशोधक समस्येच्या 'अंतर्गत' भाग असतात. त्यातून अंतर्गत आणि बाहय संकल्पनाची मांडणी होण्याची शक्यता असते. संशोधन करतांना अनपेक्षित अस्थिर करणारे अनुभव, सांस्कृतिक पार्श्वभूमी त्यातून ज्ञान एकसंघ, स्थिर अपरिवर्तनीय नाही, असे लक्षात येते. वाढत्या नवनवीन गुंतागुंतीच्या संशोधकात सुरक्षितता असणारा दृष्टीकोण, अनुभव, चिकित्सा परीक्षा डळमळलेली दिसते.

पूर्वग्रह :स्त्रीवादी संशोधनात स्त्रीवादी संशोधनाकरीता संशोधक आणि संशोधन करणारी व्यक्ति एकात्म नसेल तर, संशोधकाच्या पूर्वग्रहाविषयी जी पारंपारीक टीका केली जाते त्या पलिकडे प्रभावी चिंतनशील, तपशीलातून संशोधक स्वत:च्या जीवनाला जोडून विचार मांडतो. संशोधनात सहभागी असणाऱ्या चिंतनात्मक प्रतिसादाद्वारा जे महत्व असते ते सांस्कृतिक स्वमुळे त्रासदायक ठरते. गुणात्मक

संशोधनासाठी स्वचा वापर करणे पायाभूत तत्व आहे. संशोधक जर पुरेशा प्रमाणात चिंतनशील असेल आणि प्रकल्पासंदर्भात सर्जनशील चिंतन करुन स्वत:ची वर्तणूक, माहिती गोळा करुन त्यांचा अन्वयार्थ लावत असेल तर मार्गदर्शक संसाधने निर्माण होऊ शकतात. स्त्रीवादी अभ्यासकांच्या मते, स्त्रीवादी संशोधक, सहभाग घेणारे संशोधन समस्यासूत्रण एकमेकांशी संवाद करुन संशोधन लेखन करतील तर संशोधकाच्या पार्श्वभूमीतील अबोध संकल्पना लक्षात येवू शकते जे महत्वाचे ठरले.

स्त्रीवादी संशोधनात वस्तुनिष्ठतेची समस्या :व्यक्तिनिष्ठता स्त्रीवादी संशोधनात जोडलेली आहे म्हणजे वस्तुनिष्ठतेची समस्या महत्वपूर्ण ठरते. निरिक्षण, अनुभव यांची एकसूत्रता झाली तर प्रबळ वस्तूनिष्ठतेची समस्या राहणार नाही आणि संशोधक आणि त्यांच्या विषयाला चिकित्सक वैज्ञानिक सर्वोत्कृष्ट दर्जा प्राप्त होऊ शकतो. उदा. तरुणांच्या लैंगिकतेविषयी विचार करायचा असेल तर अन्वयार्थाचे सामाजिक स्वरुप टाळता येत नाही. स्त्रीवादी संशोधन त्यांनी केलेल्या समस्या सूत्रणाचे स्पष्टीकरण देऊ शकता. त्यांचे संशोधना अंती जे निष्कर्ष असतात ते तर्कातून गुंतागुंत, आंतरविरोध निर्माण करणारे नसल्यास त्या संशोधनात वस्तुनिष्ठता येऊ शकते.

स्त्रीवादी संशोधनता वैधता : स्त्रीवादी गुणात्मक संशोधन वैधता अचूकता, विश्वासर्हता याकडे गांभीर्याने बघतो. काही स्त्रीवादी संशोधक पारंपारिक पध्दतीने सामाजिक विज्ञानाच्या प्रत्यक्षार्थता परिघात काय करतात. त्यांना जीवनातील वास्तव शोधण्याचे काम करायचे असते या भूमिकेतून ते संशोधन करतात. परंतु ज्या संशोधकांना प्रत्यक्षार्थतावादी मान्य नसून वैधता प्राप्त करण्यास रणनीती तंत्र वापरतात, त्यातून आदर्श निर्माण होतो मात्र विश्वासार्हता राहात नाही. स्त्रीवादी लेखक लाथर यांनी अधिकृतता या चार उपपध्दतीवर अवलंबून असतात असे सांगितले.

(अ)उपहासात्मक अधिकृतता ज्यातून प्रातिनिधित्वाच्या समस्यांना समोरे जाऊ शकतो.

(ब) समांतरात्वातून येणारी अधिकृतता ज्यामधून भिन्नता, विरोध आणि अनिश्चितता हयांचा शोध घेतला जातो.

(क)रिझोमॅटीक अधिकृततेतून अधिकाराशी बहुविध भूमीकाला समोरे जाता येतो.

(ड) विषयानुरुप अधिकृतता जाणूनबुजून आत्ममग्नतेतून अधिकार मिळविते जे चिंतनशील आहे उदा. एडसग्रस्त स्त्रियांवर केलेले संशोधन.

स्त्रीवाद १९६० नंतरच्या दशकातील जागतीकीकरण हयातून नवीन स्त्रीवादी सैध्दांतिक परिप्रेक्ष्ये निर्माण करतात. स्त्रीवादी भूमिदृष्टी सिधांतन, वसाहत्तोतर वाद, वांशिक अभ्यास, आधुनिकोत्तरवाद, विक्षिप्त (Queer) चिंतन, चिकित्सक सिध्दांत, चिकित्सक वंश सिध्दांत, पारंपारिक ज्ञानाला शह देऊन नवीन प्रश्न उभे करतात. आधुनिक युगात वंश, वर्ग, लैंगिकता, राष्ट्रीयत्व, लिंगभाव या प्रश्नांची दखल घेतली जाऊ लागली. स्त्रीवादी संशोधनात विशिष्ट पध्दतीच्या संशोधनामध्ये जीवनदृष्टी विज्ञानाच्या क्षेत्राला ग्रासून टाकते. त्यांना प्रतिष्ठा सन्मान प्राप्त होतो. संरचनात्मक संस्यामध्ये बढती मिळते, स्त्रीवाद आपल्या ज्ञानमीमांसा आणि पध्दतीशास्त्रांना प्रतिष्ठा मिळविण्यासाठी अनेक स्तरावर काम करतात.

गुणात्मक संशोधनातील स्त्रीवादी नीतीमत्ता :संशोधनात संमती, खाजगी पणा, गुप्तता, फसवणूक या क्षेत्रातील संशोधनासाठी त्रासदायक ठरत असते अनेक स्त्रीवादी संशोधकांनी गरीब, कष्टकरी मंडळीचा प्रतिसाद, तर काहीना तथ्य संकलन करतांना अनेक ताणतणावांना समोरे जावे लागते. १९९६ मध्ये नीतिमत्ताविषयक प्रश्न मांडण्याचा प्रयत्न स्त्रीवादी संशोधनातून झाला आहे. स्त्रीवादी परिप्रेक्ष्यांशी सहमत नसणाऱ्या मतांबाबत नैतिक प्रश्न उभा राहतांना दिसतो.

नीतिमत्ता सहभागी संशोधनामधील :स्त्रीवादी संशोधनात सहभागी संशोधन आव्हानात्मक असते. संशोधक, सहभागी असणारे घटक, स्त्रियांचे ज्ञान, स्त्रियांचे प्रतिनिधीत्व, तथ्य संकलन पध्दती, विश्लेषण, आशय, अन्वयार्थ, अहवाल लेखन यात अनेक आव्हाने पेलावी लागतात. जसे—जसे या दोनही गोष्टीतील पोकळी कमी होऊ लागते. नीतिमत्ताचे प्रमाण वाढीस लागते.

नीतिमत्ता विषयावर स्त्रीवाद्यांचे संशोधन :अशा प्रकारच्या संशोधनात दोन क्षेत्रात संशोधन केले जाते.

(अ)नैतिक अस्तित्वासंदर्भात व्यापक प्रश्नांशी संबंधित प्रश्न.

(ब)आरोग्यविषयक वर्तन, व्यवहार आणि प्रसंग

सर्वप्रथम तरुण मुलींच्या नैतिक विकासाच्या संदर्भात अभ्यासाची सुरुवात झाली. मात्र त्यात अनेक क्लिष्टता आढळून

अधिकार
केलेले

हयातून
भूमिदृष्टी
ात्तरवाद,
सिध्दांत,
आधुनिक
ो दखल
ध्दतीच्या
त्यांना
मिळते,
प्रतिष्ठा

खाजगी
क ठरत
ातिसाद,
रे जावे
प्रयत्न
सहमत

ग्रहभागी
घटक,
श्लेषण,
पेलावी
लागते.

ोधनात

संदर्भात
ाढळून

आली. या काळात लिंगभावविषयक सामाजिक रचित संवेदनक्षम असणारे संशोधन केले. संगोपन, संवर्धन, जपणूक, व्यक्ति आणि परिस्थिती यांच्याशी जोडला आहे. स्त्रीवादी संशोधकांनी आरोग्यविषयक व्यवस्थापनांच्या संदर्भात नैतिक नव्या तंत्रविज्ञानाचाही विचार केला आहे. स्त्रीवादी संशोधकांना स्वत:च्या भूमिका, दृष्टिकोण, व्यवहार यांची तपासणी संशोधनाच्या माध्यमाने करतात.

संदर्भसूची :

- Kalpan.M (1992) Mother's images of motherhood London Routedge.
- Hatt S. (1997) Gender, Work and Labour Markets, Basingstroke, Macmillan.
- Brooks, A (1997) Post Feminism : Feminism Culture Theory and Cultural Forms, London Routedge.
- Feminism is for everybody 'Passionaate Politics' bell hooks, part-1 South End Press, Cambridge.
- Feminism is for Everybody 'Passionate Politics' bell hooks, Part II South End Press, Cambridge.
- Menon, Nivedita 2012, Seeking like a Feminist, New Delhi.
- Key Concepts in Feminist Theory and Research – Christina Huges, Great Britain by the Cromwell Press.
- नारीवाद — पी.एन सिंह — जनमेजय सिंह, रावत पब्लिकेशन.
- स्त्रीवादी पध्दतीशास्त्र — विद्युत भागवत पुणे.
- स्त्रियांच्या चळवळी आणि संघटना — स्वात्ती देहाडरा, अनघा तांबे, पूणे.
- कायद्याचा 'भूप्रदेश' स्त्रिवादी भिंगातून, विद्युत भागवत, पूणे.
- Feminist perspectives on Social Research Editor – Sharlene Hesse Biber.
- Feminist Research in Theary and Practice Gail Luthrabi.
- Feminist Methodology Challenges and Clasical Karoline.

(49)

संशोधन पध्दती



संपादक

डॉ. संदीप बी. काळे

संशोधन पध्दती

■ डॉ. संदीप बी. काळे

■ प्रथम आवृत्ती – दि. ११ फेब्रुवारी २०२२

© प्रकाशक व संपादक

■ प्रकाशक

आधार पब्लिकेशन, अमरावती.

हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,

वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती

मो. ९५९५५६०२७८

email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना

विलास पवार

सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी

सरिता ग्राफिक्स,

कठोरा रोड, अमरावती

■ Price : 400/-

ISBN- 978-93-91305-94-9

सुचना:- सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.

अनुक्रमणिका

अ. क्र.	लेख	लेखक	पु.क्र.
1	संशोधन साहित्याचे पुनरावलोकन	डॉ. संदीप बी. काळे	1
2	इतिहास संशोधन पद्धती	प्रा. (डॉ.) शामराव कोरेटी	6
3	तथ्य संकलन (Data Collection)	प्रा. डॉ. विलास घोडे	17
4	अर्थशास्त्रातील प्रबंध लेखन	डॉ. लिलाधर खरपुरिये	26
5	सामाजिक शास्त्रात संशोधन प्रस्ताव	डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे (गणवीर)	34
6	ग्रंथालय आणि माहिती शास्त्रातील संशोधन पध्दतीचा उपयोग	श्री. धिरज रामचंद्र कोकांडे	44
7	सामाजिक सर्वेक्षण	डॉ. कल्पना एम. बंडीवार	50
8	राज्यशास्त्र विषयाच्या संशोधन पद्धती	डॉ. जे. डी. सोनखासकर /प्रा. श्रीमती छाया दत्तात्रय डुकरे	55
9	सामाजिक संशोधनात संगणकाचे महत्व	डॉ. रामेश्वर शिवलींग व्हंडकर	65
10	संशोधनामध्ये अहवाल लिखाणाचे महत्व	डॉ. प्रशांत एन. शंभरकर	73
11	गृहीतकृत्य : संशोधनातील संकल्पना आणि महत्व	गौरी चंद्रशेखर चिंचोळकर	79
12	तथ्य संकलन (Data Collection)	प्रा. संजय एस. लांडगे	98
13	संशोधनाच्या पायऱ्या व त्याचे संशोधनात महत्व	प्रा.डॉ. प्रशांत रा. देशमुख	105
14	सामाजिक संशोधनात व्यष्टी अध्ययन पध्दती	डॉ. कैलाश वि. बिसांद्रे	115

सामाजिक शास्त्रात संशोधन प्रस्ताव

डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे (गणवीर)
विभाग प्रमुख, सहयोगी प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग
वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर
दूरभ्रमणध्वनी : 7507824398, 9850157725, 8975949820
Email Id : bhujadepramila@gmail.com

संशोधन प्रस्ताव म्हणजे संपूर्ण संशोधन नियोजन होय, त्यात संरचना, धोरण, आराखडा या सर्व समस्यांचे किंवा प्रश्नाचे उत्तर होय, जे आपल्याला संशोधन प्रस्तावात मांडणी करायची असते. संशोधन प्रस्ताव म्हणजे एक विविध आपल्या संशोधनाचे उद्देश्य पूर्ण करणारे एक कठिन कार्य होय. जे आराखडाच्या स्वरुपात असते. त्यात गृहितकृत्याची चाचणी आपल्या संशोधनातील प्रश्नांची उकल होय. संशोधन प्रस्ताव म्हणजे जे संशोधकांनी अभ्यासाकरीता घेतले त्याच्या कारणमिमांसाचे कथन होय. संशोधन प्रस्ताव म्हणजे संशोधकाच्या संपूर्ण संशोधनाचे विस्तारीत कार्यकारी योजना होय. जे वाचकांना त्याच्या संशोधनातील यथार्थता, वस्तुनिष्ठता, वैद्यता आणि, पध्दतीशास्त्राचे उत्तर देण्याचे कार्य करते. संशोधन दोन प्रकारचे असते. (अ) गुणात्मक (ब) संख्यात्मक. प्रत्येक क्षेत्रात संशोधन प्रस्ताव असते. संशोधन प्रस्तावाद्वारे संशोधनातील वैधता, यथार्थता याच परिक्षण पर्यवेक्षणाद्वारे केले जाते. कोणत्याही शैक्षणिक क्षेत्रात संशोधन प्रस्ताव विविध समित्यांच्या मान्यतेकरीता पाठविले जाते. जर त्या संशोधन प्रस्तावाला मान्यता मिळाली तर संशोधक संशोधन कार्य सुरु करु शकतो. म्हणूनच संशोधन प्रस्ताव कसे लिहावे हे अत्यंत महत्वपूर्ण आहे.

जरी संशोधकांनी गुणात्मक आणि संख्यात्मक संशोधन विषय निवडला असेल तरी त्या संशोधकाचे संशोधन संरचना सारखे असते. फक्त मुख्य भेद प्रस्तावप्रक्रिया आणि पध्दतीशास्त्राची असते. प्रत्येक विद्यापीठाच्या नियमानुसार, विषयानुरुप संशोधन प्रस्तावात तफावत असू शकते. हा एक आराखडा देण्यात येत आहे. मात्र संशोधकाच्या विषयानुरुप, गरजेनुसार गरज पूर्ण होऊ शकते.

संशोधन प्रस्तावातील घटक :

सामाजिक संशोधनाच्या प्रस्तावात खालील माहिती असणे गरजेचे आहे :—

- प्रस्तावना, ज्यात संशोधन साहित्य सर्वेक्षण असावे.
- संशोधनातील सैध्दांतिक परिप्रेक्ष्य.
- अध्ययनारुप संकल्पनात्मक प्रारुप.
- संशोधनाचे उद्देश्य.
- असे गृहितक ज्यांचे परिक्षण केले जाऊ शकते.
- संशोधन आराखडा.
- अभ्यासाची कार्य योजना.
- संशोधन साधन ज्याचा वापर संशोधनात होणार आहे.
- नमुना निवड आणि नमुना आकार.
- संशोधनातील नैतिक आव्हाने.
- तथ्य संस्करण प्रक्रिया.
- अहवालातील प्रकरण.
- संशोधनातील मर्यादा.
- प्रकल्पातील वेळेचे नियोजन.

वेगवेगळया संस्था, विद्यापीठ आणि अनुदान देणाऱ्या संस्था प्रमाणे यात काही तफावत होऊ शकते. वेगवेगळया संस्था त्या गरजा प्रमाणे, विषयानुरुप, पर्यवेक्षणानुरुप यात विविधता असू शकते. संशोधनात जे लिखाण केले जाते, त्याचे योग्य संदर्भ संशोधनाच्या अंती देणे गरजेचे आहे. विषयानुरुप साहित्य सर्वेक्षणाचा सर्वे होणे गरजेचे आहे. त्यातून सैध्दांतिक पार्श्वभूमी मांडणी गरजेची आहे.

प्रस्तावना :संशोधन प्रस्तावाची सुरुवात प्रस्तावनेने करणे आवश्यक असते. जेव्हा साहित्य सर्वेक्षण केले जाते त्यावेळेस विषयानुरुपच साहित्यावलोकन करणे गरजेचे असते. संशोधनाच्या विभागानुरुप जे साहित्य लिखित स्वरुपात असते, त्याची संशोधकाची प्रकल्भता वाढविण्यात मदत होत. त्यातून पध्दती आणि जी माहिती मिळते संशोधकाच्या संशोधनाला त्यातून कोणते कार्य करणे आहे आणि कोणते नाही याची माहिती संशोधकास मिळते. जेव्हा प्रस्ताव लिखाण

केले जाते तेव्हा त्याचा प्रकार, गुणवत्ता हे सर्व साहित्यावलोकनावर अवलंबून असते. यामध्ये

- ज्या क्षेत्रात अभ्यास करणे आहे त्याची ओळख.
- अभ्यास क्षेत्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी ज्यात (विकास, वृध्दी) इत्यादी.
- विषयानुरुप आदर्शात्मक / अध्यात्मीक आव्हाने.
- विषयाची शब्दावली
- मुख्य सिध्दांत
- विषय क्षेत्रातील आव्हाने, समस्या, गुण इत्यादी
- मुख्य समस्याशी संबंधित सैध्दांतिक महत्व आणि प्रायोगिक आव्हाने काय येणार आहे.
- विषयातील मुख्य निष्कर्ष काय प्राप्त झाले आहे.

उदा.शैक्षणिक उपलब्धि आणि सामाजिक वातावरणातील सहसंबंध. तर यामध्ये

- शिक्षणाची समाजातील भूमिका
- वर्तमान स्थितीत शिक्षणातील बदलते प्रवाह.
- कोणकोणते घटक आहे जे शैक्षणिक अभिवृत्तीला बदलत आहे.
- देशात शिक्षणाचा विकास
- प्रांतत, क्षेत्रात शिक्षणातील सहभागिता प्रमाण
- शिक्षणातील बदललेली मूल्ये
- शैक्षणिक उपलब्धि करीता पालक आणि संवगडीची भूमिका
- शैक्षणिक उपलब्धिवर सामाजिक पर्यावरणाचा प्रभाव इत्यादी.

समस्या सूत्रण :प्रस्तावना झाल्यानंतर आपल्या निवडलेल्या विषयाकडे लक्ष केंद्रित करणे. वर्तमान संशोधनातील जी पोकळी आहे त्याबद्दलचे ज्ञान, मुख्य विषयानुरुप देणे गरजेचे आहे. जे अजूनही अनुत्तरीत प्रश्न आहे ते ओळखणे. इथे संशोधकाच्या काही प्रश्नाची उत्तरे देणे गरजेचे आहे, जे तार्किक, सहसंबंधित असावित. ही माहिती विविध विषयावरील अभ्यास, साहित्यावलोकन संशोधनाकरिता गरजेची आहे.

- सर्वप्रथम संशोधकानी समस्या ओळखणे.
- त्या समस्यावरील विविध घटक, पार्श्वभूमी, परिप्रेक्ष्य माहिती करणे.

- संशोनधनातील मुख्य पोकळी ओळखून ती माहिती ज्ञात करणे.
- असे प्रश्न निर्माण होणारे ओळखणे आणि अभ्यासातून त्याची उत्तरे शोधणे, देणे.
- निर्माण झालेल्या प्रश्नावर उपलब्ध सहसंबंधित माहिती कुठुन प्राप्त होईल, त्यासंबंधीचे विविध अभिमत जे साहित्याच्या माध्यमातून देणे.
- जे संशोधनातील पोकळी आहे ती संशोधकाच्या अभ्यासातून कशी भरुन निघणार आहे, त्याबद्दल तार्किकतेचा विकास करणे.

उदा.

- स्थलांतरणानंतर कुटुंबाच्या समायोजनाची प्रक्रिया काय होती ?
- स्थलांतरीतांचे समायोजन कशा पध्दतीने केले.
- स्थलांतरणानंतर कुटुंबातील घटकामध्ये कोणत्या प्रकारचे अभिवृत्तीत बदल झाले त्याचे कोणकोणते प्रकार आहे.
- कुटुंबातील संबंध आणि भूमिकांचा समायोजनावरील प्रभाव.
- कोणत्या प्रकारचा प्रभाव, जो संशोधक अभ्यासातून देण्याचा प्रयत्न करणार आहे. या प्रश्नाबद्दल साहित्यावलोकनातून त्या प्रश्नाची उत्तरे काय आहे. संशोधकाच्या नुसार प्रस्तावित अभ्यासाबद्दलचा दृष्टिकोण त्या समस्याबद्दल संशोधकाच्या काय योजना आहे.
- जे निष्कर्ष संशोधनातून निघणार ते कसे अभ्यासक्षेत्राला मददगार सिध्द होऊ शकतात.

संशोधकाचे उद्देश :संशोधकाचे मुख्य उद्देश्य समस्या किंवा अभ्यासात नेमके काय करणार आहे, ज्याचे परिक्षण केले जाणार आहे ते या उद्देशामध्ये प्रस्तावित असते. संशोधनाचे उद्देश्य स्पष्ट, विशिष्ट स्वरुपाने मांडणी असणे गरजेचे असते. प्रत्येक उद्देश्य एक–एक समस्या अंकित करणारी असावी. काही कार्य क्रियान्वयन करणारे शब्दांला प्रयुक्त करणे गरजेचे आहे जसे ज्ञात करणे, माहित करणे, परिक्षण करणे याप्रमाणे संशोधकांनी निवडलेला विषय कोणत्या स्वरुपाचा आहे त्या आधारावर उद्देश्य असायला हवे जे गृहितकृत्य (उपकल्पनाशी संबंधित असावे) संख्यात्मक संशोधनात जे वाक्य मांडले जातात ते गुणात्मक संशोधनात शक्य आहे. गुणात्मक संशोधनात संपूर्ण अभ्यासातून काय शोध घेणार आहोत त्यावर आधारित उद्देश्य मांडणी असे. उदा. घरगुती हिंसाचाराबद्दल पीडीत व्यक्तिच्या भावना काय आहे ? वांशिक

विषमता बद्दल लोक काय विचार करतात ! योगा आणि प्राणायम मधील सहसंबंध ? विस्थापना नंतर पुर्नस्थापित जीवन कसे ? जर गरज पडल्यास कधी संशोधकांचा पूर्ण अभ्यास झाल्यानंतरही संशोधनाचे उद्देश्यामध्ये मांडणी बदलवता येते.

उदा. मुख्य उद्देश्य :— कुटूंबावर स्थलातरणाचा काय प्रभाव झाला ज्ञात करणे.

- पती किंवा पत्निच्या भूमिकेमध्ये स्थलातरणानंतर जो प्रभाव झाला निर्धारित करणे.
- वैवाहिक संबंधावर स्थलांतरणाचा काय प्रभाव झाला ज्ञात करणे.
- शैक्षणिक उपलब्धि आणि पाल्यांच्या अपेक्षा बद्दल पालकांची भूमिका माहित करणे.
- विवाहाबद्दल अभ्यासण्यात येणाऱ्या लोकांचे बदलते अभिप्राय निर्धारित करणे.

उपकल्पनाचे परिक्षण :दोन चलातील परस्पर संबंध ज्याचे परिक्षण करणे आहे, जे अभ्यासात म्हटले आहे. संशोधकाच्या निवडलेल्या समस्यानुसार जे गृहित धरुन उद्देशानुसार उपकल्पनेची मांडणी करणारे कथन होय. जर संशोधनानंतर त्या उपकल्पनाचे परिक्षण करणे आहे. तर विविध विभागात त्याची मांडणी करणे. गृहितकृत्य एका विशिष्ट शैलीत मांडणी करणे असते. त्याकरीता योग्य शब्दबध्दता होणे गरजेचे आहे. संशोधनात विविध उपकल्पना असतात ज्याचे संशोधन परिक्षण करु शकतो. यद्यपि हे गरजेचे नाही की प्रत्येकदा उपकल्पनाची मांडणी व त्याचे परिक्षण असावेच. संशोधकाच्या विषयाला पूर्णतः पर्यंत नेण्याकरीता उपकल्पना शिवाय ही विषय परिपूर्ण अभ्यास होऊ शकते.

उदा.H_2 =स्थलांतर पती—पत्निच्या संबंधात बहुतांश वेळेस परिवर्तन झाले आहे.

H_2 =बहुतेक प्रकरणात पालकांच्या अपत्याबद्दलच्या आकांक्षात परिवर्तन झाले आहे.

संशोधन आराखडा :संशोधनातील प्रश्नाचे उत्तर देण्याकरीता संशोधन आराखडा तैयार करावा लागतो. संशोधनातील उणीवा आणि बलस्थाने ओळखून संशोधन आराखडा तैयार करणे. संशोधन आराखडयात खालील बाबी असणे गरजेचे आहे.

- अभ्यासली जाणारे लोकसंख्या कोणती आहे ?
- अभ्यासल्या जाणाऱ्या लोकसंख्यातील प्रत्येक घटक ओळखणे ? होय, तर कसे ?
- पूर्ण लोकसंख्यातून नमुना लोकसंख्या अभ्यासली जाणार आहे का ?
- पूर्ण लोकसंख्येतून तुमच्या संशोधनाचा नमुना कसा निवडणार त्यांचा उल्लेख ?
- नमुना लोकसंख्याकडून तथ्य संकलन कसे करणार ? (मुलाखत, प्रश्नावली, निरिक्षण)
- जर प्रश्नावली मेल द्वारा पाठविणार असणार तर, त्याची परत प्राप्ती कशी करणार ते नमूद करणे.
- प्रश्नावली करीता स्मरणपत्राची योजना आखली आहे का ?
- प्रश्नावलीची विश्वसनीयता कशी सुरक्षित करणार ?
- जर एखादा उत्तरदाताला काही अड़चण असल्यास त्यांनी कसे, कुठे संपर्क साधणे यांचा उल्लेख.

मापन प्रक्रिया :संशाधक संशोधनातील चलाचे क्रियान्वयन कोणत्या पध्दतीने करणार यांचा उल्लेख असावा. संशोधन तंत्र कसे योग्य आहे याचा उल्लेख संशोधनातील उणीवा आणि बलस्थानांचा उल्लेख. प्रस्तावित संशोधनातील उद्देश्य कसे संबंधित आहे त्याचा आढावा, त्याचा मापनातील प्रमाणात मापन प्रक्रिया. या मापनाची वैधता आणि विश्वसनीयताची स्पष्टता. संशोधकाच्या क्रियान्विकरण होणाऱ्या मुख्य संकल्पनाची चर्चा असावी. जसे आत्मसम्मान दोन गटातील मापन करावयाचे असल्यास तर लिंकर्ट किंवा थर्राटन मापन स्केलचा वापर करणार त्याचा उल्लेख असावा. गुणात्मक संशोधनात प्रस्तावाला संशोधन मापन तंत्र संलग्नित असावे.

संशोधनातील नैतिक आव्हाने :जे संशोधन केले जात आहे त्याबद्दल संशोधकांनी सतर्क असणे गरजेचे आहे. जर एखाद्या संस्थेसोबत किंवा त्या संस्थेबद्दल संशोधन करावयाचे असल्यास त्यांचे धोरण, नैतिकता, संस्थेतील नीतिनियम माहित करुन संशोधन कार्य करतांना सतर्कतेने करणे गरजेचे आहे. उत्तरदात्यांच्या दृष्टिकोनातून संशोधकांनी नैतिक आव्हानाचा विचार करणे गरजेचे आहे. संशोधनातील कुठल्याही

प्रकारची नैतिक आव्हाने संशोधकाला पेलावी लागणार नाही. या प्रमाणे त्याने नैतिकता सांभाळणे गरजेचे आहे.

नमुना निवड :कुठुन आणि कसे माहिती / तथ्य (गोळा) संकलीत केली जाणार आहे. त्या नमुन्याचा आकार माहित असावा.

- ज्याला नमुना म्हणून निवडले आहे त्याची कारणमीमांसा संशोधकाला माहित असावी.
- नमुना कुठल्या प्रकारे निवडला आहे त्याची कार्ययोजना संशोधकाला माहिती असावी उदा. कोटा पध्दती, स्तरीत नमुना, याद्दच्छिक नमुना, उद्देशयपूर्ण नमुना इत्यादी.

नमुना निवड :कुठुन आणि कसे माहिती / तथ्य (गोळा) संकलीत केली जाणार आहे. त्या नमुन्याचा आकार माहित असावा.

- ज्याला नमुना म्हणून निवडले आहे त्याची कारणमीमांसा संशोधकाला माहित असावी.
- नमुना कुठल्या प्रकारे निवडला आहे त्याची कार्ययोजना संशोधकाला माहिती असावी उदा. कोटा पध्दती, स्तरीत नमुना, याद्दच्छिक नमुना, उद्देशयपूर्ण नमुना इत्यादी.

तथ्यांचे विश्लेषण :तथ्यांचे विश्लेषण संगणक किंवा मानवीय पैलूतून केले जावू शकते. याकरीता सांख्यिकीय योजना, प्रक्रिया, त्याचे विश्लेषण करणे. संख्यात्मक संशोधनात ही मुख्य चल आणि क्रॉस सारणी चल असावी. आशय विश्लेषणाकरीता तीन प्रक्रिया महत्वपूर्ण आहे.

- जेव्हा कार्यक्षेत्रात संशोधक जातो तेव्हा संरचीत माहिती संकलीत करण्याची तैयारी असावी. विषयानुरुप माहिती संकलीत करण्याकरीता संरचित माहितीचे फ्रेमवर्क असावेत.
- ज्या संशोधन क्षेत्रात कार्य – तथ्य संकलीत करणे आहे, विषयानुरुप काय संकलीत करणे आहे त्याचे लेखन केलेले असावे.
- जर संगणकाद्वारा (माहिती) तथ्य संकलीत केले जात असेल तर Ethnograph, Nvivo, NUD IST द्वारा विश्लेषित माहिती गोळा केली जाऊ शकते. संगणकाचे हे प्रोग्राम आशय विश्लेषणाच्या नियमानुसार असावेत. उदा. (१) वय (२) पालकांचा व्यवसाय (३) पालकांची शैक्षणिक पात्रता (४) विद्यार्थीची व्यावसायिक अपेक्षा (५)

पाल्याच्या अभ्यासात पालकांची भूमिका (६) आत्म सम्मान (७) सवगंडीचा प्रभाव (८) अभ्यासाकरीता किती तास दिले जाते.

क्रॉस सारणीयन : शैक्षणिक उपलब्धि :

(१) संवगडीचा प्रभाव (२) व्यावसायिक अपेक्षा (३) आत्म सम्मान (४) शिक्षकांबद्दल अभिवृत्ती (५) पालकाबद्दल अभिवृत्ती.

अहवाल :

शक्य तितक्या स्पष्ट सोप्या वाक्यात अहवाल असावा. संशोधनात मांडलेले उद्देश्य अभ्यासातील प्रकरणे, प्रत्येक प्रकरणाचे योग्य शिर्षक अभ्यासाची / संशोधनाला पूर्णत्वाव नेते. उदा. अहवाल खालील भागात वर्गीकृत असावा.

प्रकरण १ — प्रस्तावना

प्रकरण २ — लोकसंख्या विश्वाची सामाजिक आर्थिक लोकसंख्यात्मक, क्षेत्रात्मक वैशिष्टये

प्रकरण ३ — पती—पत्नी भूमिका वरील प्रभाव

प्रकरण ४ — वैवाहिक संबंधावर परिणाम

प्रकरण ५ — मुलांच्या अपेक्षावर परिणाम

प्रकरण ६ — विवाह अभिवृत्ती वरील परिणाम

प्रकरण ७ — सारांश, सूचना, शिफारशी

संशोधनातील मर्यादा : जर एखाद्या संस्थेबद्दल अभ्यास असेल तर तथ्यांची उपलब्धिता परवानगी, नमुना इत्यादीच्या काय मर्यादा आहे, त्याचा उल्लेख. संशोधनाचे शैक्षणिक अनुभव आले संशोधन करतांना त्याचा उल्लेख असावा. संशोधकाच्या मर्यादा त्याच्या निष्कर्षाची आणि सामान्यीकरणाला प्रभावीत करणारी नसावी.

(APPENDIX) अभिशिष्ट :संशोधन तंत्र संलग्नित असावे जसे मुलाखत अनुसूची असेल तर ती असावी.

कार्य नियोजन :विशिष्ट कालखंडात संशोधन पूर्णत्वास नेण्याकरीता वेळेचे नियोजन कार्य नियोजन असणे गरजेचे आहे. याकरिता खालील काही चरणातून संशोधकाला संशोधनाचे कार्य नियोजन करणे गरजेचे आहे.

घटक वेळमर्यादा

- प्रस्ताव लेखन ३ महिने
- संशोधन तंत्र ४ महिने
- तथ्य संकलन ६ महिने

- कोडींग २ महिने
- तथ्य विश्लेषण २ महिने
- प्रथम अहवाल २ महिने
- द्वितीय / अंतीम अहवाल २ महिने
- टंकण / मुद्रण ३ महिने

सारांश :

संशोधनातील प्रश्नाची उकल करणारी कार्यात्मक नियोजन म्हणजे संशोधन प्रस्ताव होय. याद्वारा प्रस्तावाच्या माध्यमाने संशोधक काय करणार आहे याचे उत्तर आहे. एखादा विषय समस्या सूत्रण केल्यानंतर योजनाला क्रियान्वयन करण्याकरीता जी नीती/योजना संशोधक वापरणार आहे. ज्याकरीता त्यांनी हा विषय निवडला त्याबद्दलची माहिती होय. या पध्दतीने वाचकांना पध्दतीशास्त्र, वैधता आणि उद्देशाच्या माध्यमाने संशोधन पूर्णत्वास नेण्याची प्रक्रिया होय. शैक्षणिक पध्दतीशास्त्र, मग संशोधकाचा संशोधन गुणात्मक असो की संख्यात्मक त्याची कारणमीमांसा होय. यात काही शिर्षकाखाली संशोधन प्रस्ताव लिहावा लागतो जसे प्रस्तावना, समस्यासूत्रण, संशोधनाचे उद्देश्य, गृहितक (उपकल्पना ज्याचे परिक्षण केले जाणार) संशोधन आराखडा संपूर्ण योजना, मापन प्रक्रिया, नमुना, तथ्यांचे विश्लेषण, अहवाल संरचना, निवडलेल्या समस्यांची मर्यादा. विशेषत: प्रत्येक शिर्षकाखालील बाबीमध्ये संशोधन अभ्यासानुसार फरक असू शकतो. गुणात्मक संशोधन अभ्यासात गुणात्मक पध्दतीशास्त्राचा आणि संख्यात्मक पध्दतीशास्त्रात संख्यात्मक अभ्यासाचे घटक निर्धारित केले जातात.

संशोधनाची सुरुवात प्रस्तावनानी होते जे संशोधनाचा मुख्य भाग आहे. त्यानंतर साहित्यावलोकनाच्या माध्यमातून आपल्या संशोधन विषयाची गहनता, महत्व तो कसा इतर विषयापेक्षा वेगळा आहे माहिती होते. कोणत्याही संशोधनाला सैध्दांतिक बैठक असेल तर त्याचे महत्व वाढिस लागते. या विभागात समस्याची विशिष्ट कारणे, नियोजन, विविध उद्यान्वित प्रश्नाचे निराकरण या विभागात केले जाते. अभ्यासातील दिशा देण्याचे कार्य संशोधनाच्या उद्देशाद्वारा होत असते. त्यात काही मुख्य उद्देश्य आणि उपउद्देश्य सुध्दा असू शकतात. उपकल्पनेत ज्या उपकल्पनाचे परीक्षण करणे आहे त्याची तालिका

